# कैकाडी समाजाचे क्षेत्र बंधन उठवून विदर्भाप्रमाणे संपूर्ण राज्यामध्ये कैकाडी समाज अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट करणेकरिताकैकाडी समाजाचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, मानववंशशास्त्रीय अभ्यास

(महाराष्ट्र शासन)

# संशोधन अहवाल- २०१९

## प्रमुख मार्गदर्शक


श्री कैलास कणसे (भापोसे), महासंचालक


## संशोधक


श्री. भीमराव पारखे, प्रकल्प संचालक

श्रीमती आरती जाधव, संशोधन अधिकारी

श्री. श्रीशैल बिराजदार, संशोधन अधिकारी

श्रीमती शुभांगी सुतार, प्रकल्प अधिकारी

श्री. अस्लम शेख, संशोधन सहाय्यक



डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

# प्रास्ताविक

भारतीय संविधान हे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत आपण अर्पण केले आहे. त्यामध्ये सर्व भारतीयांस न्याय, स्वातंत्र्य आणि बंधुता यांचे आश्वासन देण्यात आले आहे. राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वांमधील ४६ व्या कलमानुसार, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे शैक्षणिक व आर्थिक संवर्धन करून त्यांचे अन्याय व सर्व प्रकारच्या पिळवणूकीपासून “राज्य” संरक्षण करण्याबाबत हमी देण्यात आली आहे. कायद्याने ‘अस्पृश्यता’ नष्ट केली आहे. अनुसूचित  जाती आणि जमाती यांचे कल्याण होण्याच्या दृष्टीने शासन अनेक विधायक योजना, उपक्रम राबवीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांची स्वायत्त संस्था असून विशेषतः अनुसूचित जातींच्या विकासासाठी अनेक विधायक उपक्रम राबविण्यासाठी कटीबद्ध आहे.

महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील कैकाडी समाजाचे क्षेत्र बंधन उठवून विदर्भाप्रमाणे संपूर्ण राज्यामध्ये कैकाडी समाज अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट करणेकरिताकैकाडी समाजाचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, मानववंशशास्त्रीय अहवाल” करण्याच्या प्रश्नावली तयार करून बार्टी मधील संशोधन अधिकारी, संशोधन सहाय्यक व समतादूत विभागातील समतादूतामार्फत व कैकाडी समाजाचे कार्यकर्ते यांना सोबत घेऊन महाराष्ट्रातील ९४० कैकाडी जातीच्या कुटुंबाची माहिती गोळा करण्यात आली. प्राप्त झालेल्या ९४० कुटुंबाच्या माहितीचे  व २६ लक्ष्य गट चर्चद्वारे प्राप्त माहितीचे तक्तीकरण, विश्लेषण करण्यात आले असून त्याआधारे अहवाल लेखनाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

सदर अहवाल निवृत्त प्राध्यापक डॉ. राम गंभीर, मानववंशशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या मार्गदर्शन व अभिप्राय विचारात घेवून पूर्ण करण्यात आला आहे.

समाजातील विविध क्षेत्रातील सामाजिक समतेशी संबंधित विषयावर संशोधन करणे, हे बार्टीच्या प्रमुख उद्दिष्टांपैकी एक आहे. त्या आधारे महाराष्ट्रातील विविध जातींचे संशोधन करून दस्तावेज तयार करण्यात येतात. संशोधनाचा उपयोग शासकीय धोरणे व योजना यांमध्ये आवश्यक बदल करण्यासाठी होत असतो. कैकाडी समाज महाराष्ट्रातील विदर्भामध्ये अनुसूचित जातीच्या

यादीमध्ये तर उर्वरित महाराष्ट्रात विमुक्त जातीमध्ये समाविष्ट आहे. एकाच राज्यामध्ये एकाच जात हि दोन प्रवर्गामध्ये दिसून येते. या भिन्न प्रवर्गामध्ये या समजास अनेक सामाजिक अडचणी येत असून शैक्षणिक व आर्थिक विकासावरही परिणाम होत असल्याने या विषयाबाबत संशोधन करून अहवाल राज्य शासनास सादर करण्यासंदर्भातील निर्देश प्राप्त झाले असून या अनुषंगाने सदर संशोधन अभ्यास करण्यात आलेला आहे.

सदर संशोधन अभ्यासामध्ये कैकाडी समाजाची सद्यस्थितीची विस्तृत मांडणी केली असून जातींच्या दोन भिन्न प्रवर्गामध्ये समाविष्ट असल्यामुळे त्यांचेवर झालेले परिणाम आणि त्यांची कारणे मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. कैकाडी समाजाचे विदर्भातील कैकाडी (अनुसूचित जाती) आणि उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी (विमुक्त जाती) यांचा तुलनात्मक अभ्यास बार्टी - पुणे मार्फत करण्यात आला असून त्याआधारे सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन त्यांचे क्षेत्रीय बंधन उठविण्याबाबत योग्य ती कार्यवाही करेल, अशी मला आशा आहे.

श्री. कैलास कणसे (भापोसे)
महासंचालक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ |
| २ | संशोधन पद्धती | १२ |
| ३ | संदर्भ साहित्याचे अवलोकन | २२ |
| ४ | लक्षगट चर्चेद्वारे संकलित मानववंश शास्त्रीय माहिती | ४२ |
| ५ | माहिती तक्तीकरण व सादरीकरण | १०७ |
| ६ | अहवालातील ठळक बाबी | १९४ |
| ७ | निष्कर्ष व शिफारशी | २०३ |
| ८ | परिशिष्ट | |
| अ | संदर्भसूची | २१४ |
| आ | कैकाडी समाजाची प्रश्नावली | २१६ |

# तक्तीकरण

## कैकाडी समाजाची कौटुंबिक माहिती

तक्ता क्र. १ कुटूंबप्रमुखाचे लिंग

तक्ता क्र. २ कुटुंबातील व्यक्तींचे लिंग

तक्ता क्र. ३ कुटूंबप्रमुखाचे वय

तक्ता क्र. ४ कुटूंबातील व्यक्तींचे वय

तक्ता क्र. ५ कुटूंबप्रमुखाची वैवाहिक स्थिती

तक्ता क्र. ६ कुटूंबातील व्यक्तींची वैवाहिक स्थिती

तक्ता क्र. ७ कुटूंबप्रमुखाचे विवाहाच्या वेळेचे वय

तक्ता क्र. ८ विवाहित व्यक्तींचे विवाहाच्या वेळेचे वय

तक्ता क्र. ९ कुटूंबप्रमुखाचे शिक्षण

तक्ता क्र. १० कुटूंबातील लोकांचे शिक्षण

तक्ता क्र. ११ शिक्षण मध्ये सोडले का

तक्ता क्र. १२ शिक्षण सोडण्याची कारणे

तक्ता क्र. १३ कैकाडी समाजाचा मुख्य व्यवसाय

तक्ता क्र. १४ मासिक उत्पन्न

## कुटुंबाची इतर माहिती व सोई सुविधा

तक्ता क्र. १५ कौटुंबिक / वैयक्तिक माहिती

तक्ता क्र. १६ घराची मालकी

तक्ता क्र. १७ घराची बांधणी

तक्ता क्र. १८

तक्ता क्र. १९ घरात खोल्या किती आहे

तक्ता क्र. २० स्वयंपाकघरात कोणते इंधन वापरले जाते

तक्ता क्र. २१ पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत

तक्ता क्र. २२ घरापासुन पिण्याचे पाणी मिळण्याचे अंतर

तक्ता क्र. २३ स्नानगृहाची व्यवस्था कोणत्या प्रकारची आहे.

तक्ता क्र. २४ शौचालयाचा प्रकार

तक्ता क्र. २५ सांडपाण्याची व्यवस्था

तक्ता क्र. २६ कोणत्या प्रकारची वीज वापरली जाते.

तक्ता क्र. २७ विज पुरवठा कसा होतो

**कुटुंबाची इतर माहिती व सोई सुविधा**

तक्ता क्र. २८ विदर्भामधील कैकाडी समाज व उर्वरित महाराष्ट्रामध्ये असणारा समाज एकच आहे का?

तक्ता क्र. २९ कुटूंबामध्ये पोटजाती विवाह होतो का ?

तक्ता क्र. ३० कुटूंबामध्ये आंतरजातीय / अंतरधर्मीय विवाह केला आहे का ?

तक्ता क्र. ३१ आंतरधर्मीय / आंतरजातीय विवाह केला असेल तर तपशील

तक्ता क्र. ३२ आंतरधर्मीय / आंतरजातीय विवाह केल्यामुळे समाजातील इतर लोकांकडुन मिळणारी वागणुक

तक्ता क्र. ३३ आंतरजातीय विवाह केल्यामुळे आपल्या कुटूंबाला अडचणींना सामोरे जावे लागले होते का ?

तक्ता क्र. ३४ आपल्या कुटूंबात हुंडा देण्याची / घेण्याची पध्दत आहे का ?

तक्ता क्र. ३५ हुंडा घेण्याची पद्धत असल्यास कोणाकडुन दिला जातो

तक्ता क्र. ३६ आपल्या कुटूंबातील कोणत्याही महिलेचा पुर्नविवाह झाला आहे का ?

**महाराष्ट्रातील कैकाडी कुटुंबांकडे असलेले शासकीय दाखले**

तक्ता क्र. ३७ रेशन कार्ड आहे का?

तक्ता क्र. ३८ कोणत्या रंगाचे रेशन कार्ड आहे.

तक्ता क्र. ३९ जातीचा दाखला आहे का ?

तक्ता क्र. ४० जातपडताळणी प्रमाणपत्र

तक्ता क्र. ४१ जातीची चुकीची नोंद झाली आहे का?

तक्ता क्र. ४२ शासकीय योजनांचा लाभ घेतला आहे का?

तक्ता क्र. ४३ होय, असल्यास योजनेचे नाव

तक्ता क्र. ४४ योजनेचा लाभ घेताना आपणास अडचणी आल्यात का ?

तक्ता क्र. ४५ आपल्या कुटूंबाचा पिढीजात (पारंपारिक) व्यवसाय आहे का?

तक्ता क्र. ४६ समाजातील इतर लोकांच्या दृष्टीने पिढीजात (पारंपारिक) व्यवसायाचा दर्जा कसा आहे?

तक्ता क्र. ४७ तुमच्या पुढील पिढीने तुमचा पारंपारिक व्यवसाय करावा असे वाटते का

तक्ता क्र. ४८ आपले कुटूंब स्थलांतरीत कुटूंब आहे का

तक्ता क्र. ४९ सदरील ठिकाणी किती वर्षापासुन राहता

**सामाजिक माहिती**

तक्ता क्र. ५० इतर समाजाचे तुमच्याकडे बघण्याचा दृष्टीकोण कसा आहे

तक्ता क्र. ५१ इतर समाजाच्या समारंभात तुम्ही सहभागी होता का (लग्न भोजन इ.)

तक्ता क्र. ५२ इतर समाजाचे लोक तुमच्या समारंभात सहभागी होता का

तक्ता क्र. ५३ इतर जातीतील लोकांच्या स्वयंपाक घरात तुम्हास प्रवेश दिला जातो का?

तक्ता क्र. ५४ कामाच्या ठिकाणी किंवा कोणत्याही कारणाने तुम्ही तुमची जात लपवता का?

तक्ता क्र. ५५ शिक्षण घेताना शाळा / विद्यालय मध्ये आपणास अस्पृश्यतेबद्दल अनुभव आला का?

तक्ता क्र. ५६ तुमच्या समाजातील महिलांना हळदी कुंकू किंवा तत्सम कार्यक्रमात आमंत्रित केले जाते का?

तक्ता क्र. ५७ कैकाडी समाजाचे असल्यामुळे कोणत्याही कारणास्तव कधी गावातील किंवा इतर समाजातील लोकांनी तुम्हाला मारहाण / शिवीगाळ असे काही केले आहे का

तक्ता क्र. ५८ समाजातील सार्वजनिक मंदिरामध्ये आपल्याला प्रवेश आहे का

तक्ता क्र. ५९ कैकाडी समाजास जातीच्या उतरंडीमध्ये कनिष्ठ दर्जा देऊन अन्याय झाला आहे असे वाटते का?

तक्ता क्र. ६० तुम्हाला गावामध्ये प्रवेश आहे का?

## कैकाडी समाजातील महिलांची स्थिती

तक्ता क्र. ६१ आपल्या कुटूंबात कमवित्या महिला आहेत का ?

तक्ता क्र. ६२ कमविण्याचे कारण

तक्ता क्र. ६३ आपल्या घरातील महिला अर्थाजनाकरिता अंग मेहनती / श्रमाचे काम करतात का?

तक्ता क्र. ६४ घराची मालकी अथवा शेत जमिन यावर महिलांचे नाव दिले जाते का?

तक्ता क्र. ६५ तुमच्या पहिल्या प्रसूतीच्या वेळी वय किती होते

तक्ता क्र. ६६ मागच्या वेळेस बाळंतपण कोठे झाले.

तक्ता क्र. ६७ मागील ५ वर्षात कुटूंबातील स्त्रीचा प्रसूती दरम्यान मृत्यु झाला आहे का

तक्ता क्र. ६८ घरातील विविध निर्णय प्रकियेत महिलांच्या विचारांना प्राधान्य / मत घेतले जाते का?

तक्ता क्र. ६९ कुटूंबामध्ये तुम्हाला कशाप्रकारे वागणूक दिली जाते

## कैकाडी समाजातील अंधश्रद्धा

तक्ता क्र. ७० कुंडली पाहता का?

तक्ता क्र. ७१ कुठल्या महात्त्वाच्या कामासाठी जाताना मुहूर्त पाहिला जातो का ?

तक्ता क्र. ७२ देव-देवतेला पशु बळी देतात का ?

तक्ता क्र. ७३ मंदिरात जाता का ?

तक्ता क्र. ७४ आपणास पुनर्जन्म आणि शकुन अपशकुन यावर विश्वास आहे का?

तक्ता क्र. ७५ मासिक पाळीच्या वेळी घरातील महिलेस बाजूला बसविले जाते का?

तक्ता क्र. ७६ आपल्या मुरळी / देवदासी सोडणे अशी घटना घडली आहे का ?

## प्रकरण पहिले

# प्रस्तावना

# प्रस्तावना

भारतीय समाज व्यवस्थेत जात हा प्रमुख घटक असल्याचे दिसून येते. प्रत्येक व्यक्तीची ओळख पटण्यासाठी प्राचीन काळापासून जात हा घटक प्रमाण मानला जात असे. भारतीय समाजव्यवस्थेचे 'जातिव्यवस्था' हे एक महत्वपूर्ण वैशिष्टय आहे. जातीव्यवस्था ही भारतीय समाजातील एक अत्यंत महत्वाची सामाजिक संस्था आहे. भारतातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय जीवनाचे रंगरूप जातीव्यवस्थेनुसार ठरते. व्यक्तींची जीवनपध्दती व सामाजिक संबंधाचे स्परूप जातीनुसार कळते. म्हणून जातीव्यवस्था हा भारतीय समाजव्यवस्थेचा अविभाज्य घटक असून तो भारतीय समाजरचनेचा पाया आहे.

कोणत्याही व्यक्तीला आपल्या गरजा, प्रश्न, अडचणी एकटे राहून सोडविता येणे शक्य नसते, त्यावर अनेक मर्यादा पडतात. म्हणून व्यक्ती एकटे न राहता समूह करून राहतात. जेव्हा मानव समूहातील परस्पर संबंधाचे संघटन होते, तेंव्हा समाज अस्तित्वात येतो. अगदी त्याचप्रमाणे भारतीय समाज अस्तित्वात आला आहे. कालांतराने भारतीय समाजामध्ये 'वर्णव्यवस्था आणि जातिव्यवस्था' निर्माण झाल्या आणि भारतीय समाज वर्ण आणि जाती व्यवस्थेमध्ये बंदिस्त झाला.

भारतीय समाज व्यवस्था अतिप्राचीन आणि तितकीच गुंतागुंतीचा आहे. जवळ जवळ मागील पाच हजार वर्षापासून त्याची वाटचाल सुरू आहे. भारतामध्ये मुख्यत: हिन्दू धर्माचे प्राबल्य आहे. हिन्दू धर्म भारतात प्राचीन काळापासून आजपर्यंन्त आपले प्राबल्य व अस्तित्व टिकवून आहे. हिंदू धर्माच्या स्थित्यंतर (संक्रमण) काळामध्ये जी 'वर्णव्यवस्था' आणि 'जातीव्यवस्था' निर्माण झाली तिने भारतीय समाजात उच्च-निच्च, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य, गुलाम-दास असे गट निर्माण करून उतरंडीची विषम व्यवस्था निर्माण केली. त्यामुळे संपूर्ण भारतीय हिन्दू समाज वेगवेगळया जाती-उपजातीमध्ये विभागला गेला आणि हिन्दू धर्म हा जातीव्यवस्थेचे जनू संग्रहालयच बनला.

भारतात सर्व प्रदेशात कोणतीही एक 'जात' आढळून येत नाही. "संबंध भारतामध्ये" हिन्दू धर्मात ८००० (आठ हजार) जाती आहेत असा उल्लेख मराठी विश्वकोष खंड सहा मध्ये केला आहे. तसेच संस्कृती कोष खंड तीन मध्ये ८००० जाती आहेत असे महादेवशास्त्री जोशी यांनी सांगीतले आहे. डॉ. श्री. व्यं केतकर यांच्या मते, "भारतीय समाज व्यवस्थेत जातींची एकूण संख्या

४००० (चार हजार) एवढी आहे”  तर वर्ल्डबुक मधील खंड सी. सी. एच. ३ पृ. क्र. २७९ वर ही संख्या ३००० (तीन हजार) देण्यात आली आहे. डॉ चांदेकरांनी भारतात जातींची संख्या ६००० (सहा हजार) असून प्रत्येक जातीत पुन्हा साडेबारा जाती आहे. असे म्हटले आहे. डॉ. घुर्ये यांच्या मते जात हा भाषिक क्षेत्रीय गट आहे. एका प्रदेशात २०० जाती गट असून त्याची ३००० लहान गटात विभागणी केली आहे यावरून असे दिसून येते की,  भारतीय समाजता जाती उपजातींची संख्या लक्षणीय आहे.

**भारतीय जात व्यवस्थेचा उगम :**

भारतीय समाज व्यवस्थेत जातीच्या निर्मितीच्या संदर्भात अभ्यास केला असता असे दिसून येते की, भारतीय समाजव्यवस्थेत जातीची निर्मिती, उत्पत्ती केंव्हा झाली हे मात्र निश्चित सांगता येणे फारच कठिण आहे. परंतु भारतीय समाजव्यवस्थेत जातिव्यवस्था खोलवर रूजली असून ती एक भारतीय समाजरचनेचे अविभाज्य अंग बनली आहे. ‘जात’ हा शब्द अत्यंत फसवा आहे. ह.भ.प. बाबा महाराज सातारकर यांनी ‘जात’ या शब्दाची फार सोपी, चपखल अशी व्याख्या केली. “जी मनातून जात नाही ती जात होय” मनुष्य जोपर्यन्त स्वत:ला अन्य प्राणी मात्रापेक्षा श्रेष्ठ समजत होता तोपर्यन्त ठिक होत. पण जेंव्हा एक व्यक्ती स्वत:ला दुसऱ्या व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ समजू लागला तेंव्हा अनर्थ ओढवला आणि यामुळेच सामाजिक विषमतेच्या विषवृक्षाची निर्मिती झाली.

**जातीच्या व्याख्या (Definition of Caste):**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर :**

१. जातिअंतर्गत विवाह जातींच्या उत्पत्तीचे कारण आहे.

२. धर्मानेच जातीच्या भिंती निर्माण केल्या आहेत.

३. जातीमध्ये एका लोक समुहाचा इतर जातीमधील लोक समुहाबरोबर खाण्यापिण्याचा संबंध नसतो.

**जातीची संकल्पना :**

‘जात’ या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून इंग्रजीत (Caste) शब्द वापरला जातो. परंतु (Caste) हा शब्द ‘Caste’ या लॅटिन शब्दापासून बनला आहे. ‘Caste’ या शब्दाचा अर्थ प्रजाती किंवा जन्मभेद असा होतो. म्हणून जात ही जन्मभेदाच्या आधारवर निर्माण झालेली व्यवस्था होय,

असे म्हणता येईल. जातीला मराठीत 'यती' आणि 'ज्ञाती ' तसेच दक्षिण भारतात 'कुलम' असे पर्यायी शब्द आहेत. यातील जाती हा शब्द जरी जात या अर्थाचा असला तरी विस्तृत जातीच्या अल्पशा ज्ञात भागालाच जात म्हटले जाते. भारतातील जातीसाठी Caste हा शब्द वापरला. जात या शब्दाची उत्पत्ती 'जन' या संस्कृत शब्दापासून झाली असून, त्याचा अर्थ जन्माने अस्तित्वात येणार गट होय.

प्राचीन काळी दळणवळणाची साधने अल्प असल्यामुळे लग्न संबंध दूर ठिकाणी होत नसत. दुसऱ्या कुळाची माहिती मिळण्यास पंचाईत पडत असे. त्यामुळे जवळच्या प्रदेशात लग्न सबंध करणे योग्य समजत असे. जातीला मराठीत "याती ," ज्ञाती आणि दक्षिण भारतात कुलम असे पर्यायी शब्द आहेत .यातील जाती हा शब्द जरी जात असला तरी विस्तृत जातीची अल्पशा ज्ञात भागालाच जात म्हटले आहे. प्राचीन काळी दळणवळणाची साधने अल्प असल्यामुळे लग्न संबंध दूर ठिकाणी होत नसत. दुसऱ्याकुळाची माहिती मिळण्यास पंचाईत पडत असे. त्यामुळे जवळच्या प्रदेशात लग्न संबंध करणे योग्य समजत असे हे ज्ञात असलेले म्हणून संबंध योग्य क्षेत्र जाती होय.

जातीचा अभ्यास केलेल्या तज्ञांनी जातीची काही लक्षणे व वैशिष्ट्ये विषद केली आहे. यामधील"सेनार्ट "या फ्रेंच तज्ञांच्या मते जात ही अनुवंशीकतेच्या दृढ बंधनाची तत्वशः बांधलेली एक घनिष्ट संस्था होय. तिला रूढीने चालत आलेली एक स्वतंत्र जात पंचायत असते. या पंचायतीचा एक प्रमुख असतो. या पंचायतीची बैठक निश्चित सणाच्या दिवशी व खास प्रसंगी होते. त्यात बहुधा निवडक लोक भाग घेतात. जात एका विशिष्ट धंद्याशी निगडीत असते. जातीतील लोकांचा परस्परातील संबंध मुख्यत: रोटी बेटी व्यवहार व सार्वजनिक उत्सवांनी निमंत्रित होतो. विटाळाच्या मर्यादा वेगवेगळ्या असतात. परंतु समाज प्रमुखाला विशिष्ट प्रकारचे दंड ठोठावण्याचा पूर्णतः अधिकार असतो. तसेच जाती बाहेर टाकण्याचा सर्वात मोठा अनिर्बंध अधिकारही समाज प्रमुखाला देण्यात आलेला असतो. डॉ.इरावती कर्वे यांच्या मते विवाह फक्त "जातीच्या आतच होतो ". बहुधा एका मर्यादित भागात, बहुधा एका भाषिक भागात असतो. तिला पारंपारिक असे एक किंवा अधिक धंदे असतात. तीचे इतर जातीच्या अनुषंगाने उच्च अथवा नीच असे कमी अधिक निश्चित स्थान असते आणि इतर जातीशी कसे वागावे याबद्दलची एक परंपरा असते. महाराष्ट्रातील जातींना लागू होतील अशा वैशिष्ट्यांचा निर्देश डॉ. इरावती कर्वे यांनी केलेला आहे.

त्याचा उल्लेख करणे हे जातीच्या संकल्पना समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरेल. ती वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होत.

1. जात हा एक असा गट आहे, कि, ज्यात विवाह "आतल्या आत होतात."
2. प्रत्येक जातीची परंपरागत अशी एक विशिष्ट आचार पद्धती असते व ती पाळली जात आसे कि नाही हे पाहण्याचे काम जातीतील वृद्ध व आदरणीय व्यक्तीच्या जात पंचायतीकडे असते.
3. निरनिराळ्या जातीचे लोक एकमेकांशी सर्रासपणे न मिसळता शेजारी शेजारी राहतात व त्यांचा संबंध वरवरचा असतो.
4. प्रत्येक जातीला वडिलोपार्जित असा पारंपारिक धंदा असतो. पण एकाच तऱ्हेचा धंदा करणाऱ्या एकाहून अधिक जाती असू शकतात.
5. समाजात जातींना उच्च नीच स्थाने असतात व सर्व जातीची एक श्रेणी अथवा शिडी असते.इ.स. पूर्व 300 मध्ये भारतात आलेल्या मॅगॅस्थेनीस ह्या ग्रीक राजदूताने जातीचे वर्णन करताना या समाजातील लोक वेगवेगळ्या व्यवसाय गटात जावू शकत नाहीत असे म्हंटलेले आढळते.तसेच काही तज्ञांनी जातीच्या व्याख्या केलेल्या आहेत. त्यावरूनही जातीचे स्वरूप स्पष्ट करण्यास मदत होईल.
6. जात हा एक असा लोकसमूह असतो कि, त्याचा इतर लोकसमूहाशी लग्न व खाणे पिणे याबाबतीत परस्पर संबध मुळीच नसतो या समुहातील व्यक्ती केवळ अंतर्गत गटातील व्यक्ती पुरतेच वरील प्रकारचे संबध मर्यादित ठेवतात.
7. जेव्हा "एखादा वर्ग हा पूर्णपणे अनुवांशिकतेवर आधारित असतो, तेव्हा त्या वर्गास जात असे म्हणतात." अशी व्याख्या 'कुले' यांनी केली.
8. डॉ. इरावती कर्वे यांच्या मते "विस्तृत संबंध असणारा आंतरविवाही समूह म्हणजे जात होय."

थोडक्यात जातीच्या व्याख्या करण्याचे अनेक प्रयत्न झालेले आहेत. त्यात सर्वास लागू पडणारे स्थूल लक्षण म्हणजे "ज्या विशिष्ट संघामध्ये प्रवेश जन्माने होतो आणि दुसऱ्या कोणत्याही कारणाने होत नाही व ज्या संघातील व्यक्तीस त्या संघातील व्यक्तीबरोबर लग्न करता येत नाही त्या स्नाघास जाती म्हणावे

**अस्पृश्यतेची निर्मिती -:**

क्षुद्रामधील सर्वच अस्पृश्य नाहीत. कारण क्षुद्राचे निर्वासित व अनिर्वासित असे दोन प्रकार पडतात. त्यापैकी ज्यांचे भोजन केलेले पात्र धुतल्यावर त्रैवणीकास चालते ते अनिर्वासित क्षुद्र होत ,. व ज्यांचे चालत नाही ते निर्वासित क्षुद्र होय. अस्पृश्य जाती या निर्वासित क्षुद्र होय, म्हणून त्या अस्पृश्य होत.

अस्पृश्यता ही जातीसंस्था निर्माण होण्याचे एक कारण आहे असे गृहीत धरून बऱ्याच अभ्यासकांनी अस्पृश्यता व जाती संस्था यावर आपली मते मांडून त्याचे मुळ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते अस्पृश्यतेचा उगम तीन कारणातून झालेला आहे. ते पुढील प्रमाणे-:

1. अस्पृश्य समाज हा पूर्व काळी पराभूत झालेल्या टोळ्यातून फुटून वेगळा पडलेला अवशेष आहे.
2. ब्राम्हण समाजाने बौद्ध धर्मियांशी जो झगडा केला त्या शत्रूत्वातून अस्पृश्यतेचा जन्म झाला.
3. अस्पृश्याने गोमांस भक्षण न सोडल्याने अस्पृश्यता पक्की करण्यात आली. कारण गोमांसास धार्मिक पापाचे रूप देण्यात आले.

अस्पृश्यतेचा जन्म इ.पु.स. 600 मध्ये झाला असावा असे हि म्हंटले जाते. कारण चीनचा दुसरा प्रवाशी युआन चँगइ.पु.स.629 मध्ये भारतात आला. त्याचे सोळा वर्षे भारतात वास्तव्य होते. त्याने येथील लोकांच्या चालीरीती आणि रूढी यांची व्यवस्थितपणे नोंद केलेली आहे. येथील शहराबद्दल तो लिहितो शहराभोवतालच्या भिंती उंच व रुंद आहेत.रस्ते अरुंद व निमुळते आहेत. खाटिक, कोळी, झाडूवाले यांच्या वस्त्या ओळखता याव्यात म्हणून भिन्न भिन्न चिन्हे उभी केलेली आहेत. त्यांना सक्तीने शहराबाहेर ठेवले आहे. त्यांना गावात जाताना डाव्या बाजूने अंग चोरून व नरमाईने जावे लागते .म्हणून त्या काळी अस्पृश्यता होती हे स्पष्ट होते.

अस्पृश्यतेच्या संदर्भात कर्मवीर वि. रा. शिंदे लिहितात", भारतीय अस्पृश्यता ही अग्नेय आशियातील देशातून आर्यपूर्व संस्कृतीमध्ये दक्षिणेकडे प्रथम आलेली असावी" कारण उत्तरेपेक्षा दक्षिणेत अस्पृश्यता होती हे स्पष्ट होते.

**जातीचे स्वरूप :**

जातीव्यवस्था ही भारतीय समाजातील एक अत्यंत महत्वाची सामाजिक संस्था आहे. प्रचलित जातीव्यवस्थेचे मूळ वर्णव्यवस्थेत आहे आणि जातीव्यवस्था ही वर्णव्यवस्थेच्या बुडाशी असलेल्या सिध्दांताला कालांतराने आलेले फळ आहे; असे सर्वसाधारणपणे मानले जाते. भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनाचे रंगरूप जातिव्यवस्थेनुसार ठरते. म्हणून ‘जातीव्यवस्था हा भारतीय समाज रचनेचा पाया मानला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती संस्था कशी निर्माण झाली याचे केलेले विवेचन थोडक्यात असे सांगता येईल. जगातील इतर सर्व समाजाप्रमाणे भारतीय समाजही कालोघात वर्गीय समाज बनला. त्या काळात त्यात अ) ब्राम्हण किंवा पुरोहित ब) क्षत्रिय किंवा सैनिक क) वैश्य किंवा व्यापारी ड) शूद्र किंवा शेतकरी, मजूर आणि कलावंत एवढे वर्ग होते. सुरूवातीला हे वर्ग परिवर्तलीय होते. त्यांच्या व्यक्तीगत गुण व अवगुणांमुळे वर्गातील व्यक्ती बदलत राहत होत्या परंतु पुढे कधीतरी हिंदूच्या इतिहासात पुरोहित वर्गाने इतर जतनेपासून स्वत:ला वेगळे तोडून घेतले आणि आपल्या वर्गात इतरांना प्रवेश नाकारून स्वत:च्या वर्गाचे जातीत स्थलांतर करून घेण्यात हा वर्ग यशस्वी झाला. पुढे श्रम विभागाणीच्या तत्वानुसार बाकीच्या जनतेची ही विभागणी झाली. क्षत्रीय वर्गाचे तर राज्यकर्ते आणि सैनिक अशी पोट विभागणी झाली. ही पोटविभागणी नैसर्गिक, होती हे खरे परंतु वर्ग पध्दतीतील मुक्त प्रवेश पध्दती बंद करणे ही अनैसर्गिक बाब होती. त्यामुळे वर्ग बंदिस्त झाले व वर्गाचे स्थलांतर जातीत झाले.”

लोकसंख्या जस जशी वाढत जाऊ लागली तसे समाजातील लोकांनी गरजेप्रमाणे वेगवेगळे व्यवसाय हाती घेतले. पहिल्यांदा समाजाची विभागणी व्यवसायानुसार झाली. भारतीय अर्थव्यवस्थेत समाज रचनेचा विचार करताना प्रत्येक धंद्याची स्वतंत्र जात असून त्या जातीचे ग्राम बनले आहे. प्रत्येक जात आपआपलया धंदयाची वतनदारी होती. त्यामुळे एखादया गावाबाहेरील माणूस गावात आल्यास स्थानिक होऊ शकत नसे ; कारण ज्याला ‘वृत्ती’ म्हणजे वतन नाही असा मनुष्य ग्रामात हक्काने राहू शकत नसे. त्याला जर गावात स्थायिक व्हायचे असेल तर संपूर्ण गावकऱ्यांनी त्याला एकमताने परवानगी दिली पाहिजे. परवानगी मिळाल्यानंतरही ती व्यक्ती केवळ उपरी म्हणून स्थापन होत असे. उपरीचा मिरासी म्हणजे पिढीजात ग्रामस्थ होण्यास कित्तेक पिढया जाव्या लागत. पिढीजात ग्रामस्थ होणे याचा राजवाडयांनी सांगितलेला अर्थ त्या व्यक्तीची जातीसंस्थेत व्यवस्था लावणे होय.”

म्हणजेच जातीव्यवस्थेचा सबंध भौतिक परिस्थिती, उत्पन्नाची स्तोत्रे, उपजीविकेची साधने व त्यातून निर्माण झालेली परंपरागत व्यवसाय पध्दती आहे. वर्गवादी जातीव्यवस्थेचा बदलाच्या संदर्भात श्री शरद पाटील यांचे तत्व विचारात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, प्राचीन काळापासून ज्या भारतीय इतिहासाचे परिशीलन करता येईल. जातीव्यवस्था ही उत्पादन संबंधाच्या विकसनातील एक महत्वाचा टप्पा होता. आद्य भारतीय समाज हा स्त्री सत्तावादी होता या स्त्रीसत्तेच्या पोटी आद्य दैवर्ण्यव्यवस्था, पुढे मातृव्रंशिकतेवर उभी असलेली त्रैवर्ण्यव्यवस्था, पितृवंशिकतेच्या पोटी आलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था व या वर्णव्यवस्थेतूनच पुढे जातीव्यवस्था अशाक्रमाने भारतातील वर्ण जातीव्यवस्थेचा विकास झाला आहे. अशा प्रकारच्या श्रेणीबध्द रचनेमुळे समाजाचे श्रेष्ठ-कनिष्ठ अशा असंख्य श्रेणीत विभाजन झाले. प्रत्येक धंदयाची स्वतंत्र जात असून त्याजातीचे समाज बनले उदा. कुंभारवाडा, मांगवाडा, महारवाडा, चांभारवाडा, सुतारवाडा, धनगरवाडा, वडारवाडा इत्यादी यातून प्रत्येक जात आपआपल्या धंद्याची वतनदार बनली. महाराष्ट्रात ग्रामसंस्थाधिष्ठित वसाहत स्थापन होत असतानाच येथे जातीसंस्था स्थिरावली असे राजवाडे यांचे मत होते. महाराष्ट्रात ग्रामीण भागात जातींना वंशपरंपरागत हक्क मळणून जे वतन मिळालेले आहे, वतन या संज्ञेत जातधंदा, वंशपरंपरागत कार्य, चाकरी, नेमणूक, उत्पन्न अधिकार, मानपान, हक्क, वडिलोपार्जीत मिळकत, स्थावर अगर स्थावराच्या योग्यतेची जंगत मालमत्ता, जन्मभूमी या सर्वाचा समावेश होय. या वतनाच्या संकल्पनेतूनच जातीभेद उच्च-कनिष्ठ अशी प्रतवारी सुरू झाली व यातूनच पुढे शुद्र ही जात निर्माण झालेली दिसून येते.

**अस्पृश्यतेचा उगम आणि विकास :**

मानवी संस्कृती आणि त्यातही भारतीय मानवी संस्कृतीमध्ये जातीपलीकडे जातीपेक्षा भयानक असणारा रोग अस्तित्वात आहे, ज्याला 'अस्पृश्यता' म्हणतात. अस्पृश्य या शब्दाला इंग्रजी भाषेत 'Untouchability' म्हणतात. भारतात वर्णव्यवस्थेच्या बाहेर असणारा आणि जातीव्यवस्थेत सर्वात खाली असणारा समाज अस्पृश्य मानला जातो. भारतामध्ये अस्पृश्याना शूद्र, हरिजन, दलित, पाचवा वर्ण, मागासलेल्या जाती, मागावर्गीय आणि इतर अनेक नावांनी संबोधले जाते.

**अस्पृश्यतेचा अर्थ :**

अस्पृश्य म्हणजे, “स्पर्श करण्यास अयोग्य होय” डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिन्दूस्थानातील अस्पृश्यतेच्या स्वरूपाचा उहापोह करण्यापूर्वी जगातील इतर देशामध्ये अस्पृश्यता होती काय? या प्रश्नाचा वेध घेतला आहे. त्यांनी अमेरिका, आफ्रिका, युगांडा, मलाया, ऑस्ट्रेलिया, स्पार्टा, न्यूझिलंड, फिजीबेटे, इजिप्त, ग्रीक, रोमन येथील अदिम पुरातन टोळया व लोक व त्या समाजामध्ये प्रचलित असलेल्या विटाळाच्या कल्पना व शुध्दीकरणाचा साचा एक सारखाच होता म्हणून विटाळ, भ्रष्टता, बाटणे आणि अशा प्रकारच्या विटाळातून मुक्त होण्याची भावना ही बहुतांश अस्पृश्यतेमध्ये अंतर्भूत होती असे प्रतिपादले आहे. परंतु हिन्दूमधील अस्पृश्यता ही एक केवळ विचित्र घटना आहे. जगामधील दुसऱ्या भागात मानवतेने आजपर्यंन्त कधीच या समस्येचा अनुभव घेतला नाही, असे स्पष्ट प्रतिपादन केले.

❖ **कैकाडी समाज**

**महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जातीच्या यादीमध्ये राजुरा तालुका वाग्लीउन संपूर्ण विदर्भ त्याचप्रमाणे उर्वरित महाराष्ट्रामध्ये विमुक्त जातीच्या यादीमध्ये क्षेत्र बंधन असलेली अशी कैकाडी हि जात आहे.**

एखाद्या समाजाचा विशेषता: आर्थिक, समाजसंघटन आणि त्या समाजाची नैसर्गिक साधनसामुग्री उदा. जंगल संपत्ती, झाडे, प्राणी आणि त्या समाजातील लोकांचे इतर जाती आणि लोकसमूह यांच्याशी असणारे नातेसंबंध इत्यादींचा अभ्यास करणे, हे त्या समाजाला त्याच्या उन्नतीच्या दृष्टीने समजून घेण्यास अत्यंत महत्वाचे ठरते. सदर संशोधनात “अनुसूचित जाती” ‘भटके’, भटकी गुन्हेगार जमात, ‘विमुक्त जमात’, अशा जीवन पध्दतीतून प्रवास करणाऱ्या कैकाडी या स्वत:च्या जमातीचा (समुदायाचा) सामाजिक, आर्थिक ,शैक्षणिक पैलू या दृष्टकोनातून अभ्यास करणे प्रधान हेतू आहे.

‘कोणत्याही एके ठिकाणी स्थायी स्वरूपाची वस्ती न करता उपजीविकेसाठी सतत आणि वरचेवर स्थलांतर करणाऱ्या जमाती म्हणजे भटक्या जमाती. अनादी काळात टोळी जीवन पध्दतीने रहाणारा मानव अस्थिर होता. उदरनिर्वाहाचे कोणतेही निश्चित साधन नसल्याने त्याला कायम भटकंती करावी लागे. संघर्षाच्या काळात दुर्बल टोळींचे तर हे जीवनच बनले. पुढे जशी कालैघात मानवाला चरितार्थाची साधने माहीत होत गेली, तसे हे जीवन निश्चित करणे शक्य झाले नाही. ते

भटकतच राहिले. या लोकांना आजही कायमस्वरूपी उदरर्निर्वाहासाठी साधने उपलब्ध  नाहीत. परिणामी त्यांचे जीवन मागासलेले, अस्थिर, दरिद्री व दुर्लक्षित असे झाले आहे. या परिस्थितीत आजही फारसा फरक नाही. भटकणे हाच त्यांचा स्थायी भाव आहे.

**समाजाची विभागणी**

भारताच्या संदर्भात काळाच्या गरजेनुसार समाजाची विभागणी होत गेली. कोणत्याही एखाद्या गावात एक सवर्ण समाज, जो  इतरांकडून आपल्यासाठी श्रम करून घेत होता, आजही काही प्रमाणात घेत आहे. दुसरा या समाजाची सेवा करणारा अथवा राबणारा त्याला कनिष्ठ मानलेला वर्ग समाजाचा तिसरा वर्ग डोंगरकपारीत रहाणारा आदिवासी आणि चौथा अन्नाच्या शोधासाठी रानोमाळ, गावाच्या आश्रयाने पण गावात स्थिर न होता भटकणारा व कोणतेही निश्‍चित जीवन जगणारा भटका वर्ग. यांपैकी सवर्ण समाज गेली अनेक वर्षे कायम श्रेष्ठ राहिला. अस्पृश्य व आदिवासी समाजासाठी कल्याणकारी  कार्यक्रम राबविले गेले आहेत किंबहुना जात आहेत. या सर्व परिस्थितीत भटका समाज मात्र उपेक्षित रहात गेला आहे. कारण हा समाज कोठेच एके ठिकाणी स्थिर नव्हता. त्यांची संख्या निश्‍चित मिळत नाही. मतदार यादीत नाव येत नाही. मतदार नसल्याने राजकीय लोकांचे फारसे लक्ष या लोकांकडे गेलेले दिसत नाही. यामुळे कल्याणकारी योजनांचा लाभ या लोकांना मिळाला नाही.

भटके या शब्दाच्या उत्पत्ती विषयक समाजविज्ञान कोश (१९८६, पान ३९२) मध्ये भटके (Nomadics) या शब्दाची उत्पत्ती ‘नेमो’(Nemo) या ग्रीक शब्दापासून झाली आहे. याचा अर्थ ‘चारणे’ असा होतो. जनावरांना घेऊन जेथे चारा उपलब्ध होईल, तेथे नेण्याच्या प्रवृत्तीतून एक समाज तयार झाला. या निमित्ताने हिंडणारा व पुढे आपल्याही उपजीविकेसाठी तो भटका समाज बनला.

परंतु हा शब्द किंवा संकल्पना जंगलात भटकणाऱ्या लोकांसाठीच वापरली जात नाही, तर एकाच ठिकाणी कायमचे वास्तव्य न करता भटकंती करणाऱ्या लोकांसाठीही ती वापरली जाते. खेचरे, गाढवे, घोडे, उंट इत्यादींवर आपल्या जीवनावश्यक वस्तू लादून स्वत:च्या इच्छेनुसार किंवा परिस्थितीच्या दडपणामुळे (ब्रिटिशांच्या जंगलविषयक धोरणामुळे) चांगली उपजीविका होऊ शकेल, अशा ठिकाणाच्या शोधात असे लोक सतत स्थलांतर करीत रहातात. डोंबाऱ्याचे खेळ,

भविष्य कथन, किरकोळ व्यापार, कारागिरी, वैद्यकी, बुटया, पाटया (विणकाम) इ. व्यवसाय ते करतात.

**कैकाडी लोकांचे मूळचे वस्तीस्थान :**

कैकाडी लोकांच्या मूळ वस्तीस्थानाविषी व्ही. राघवय्या (१९६८, पान १७३), लक्ष्मण माने (१९९७, पान ५७), डॉ. ना. धो. कदम (१९६८, पान ४९), त्रि. ना. अत्रे (१९११, पान ४०), प्रभाकर मांडे (१९८३, पान ११९) या लेखक व अभ्यासकांनी असे म्हटले आहे की, कैकाडी समुदाय महाराष्ट्रात जरी आढळत असला, तरी तो मूळचा महाराष्ट्रातील समुदाय नाही. ब्रिटिशांच्या जंगलविषयक धोरणामुळे जंगलातून बाहेर पडून उपजीविकेसाठी भटकंती करत महाराष्ट्रात काही कुटुंबे आली आहेत. हे लोक मूळचे आंध्रप्रदेशच्या किनारपट्टीवर आढळतात, तामिळनाडूतील तेलंगण प्रदेशातील कुरूची भागातील लोक आहेत.

**१) भारतामधील कैकाडी समाजाचे वास्तव्य:**

वरील अभ्यासकांच्या मते कैकाडी समाजातील लोक आंध्रप्रदेश तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, ओरिसा, मध्यप्रदेश, बिहार आणि महाराष्ट्रात आढळतात. वेगवेगळया प्रांतांत हे लोक वेगवेगळया नावांनी ओळखले जातात. उदा. **आंध्रप्रदेशमध्ये** येरकुला, म्हैसूर-कोरच्या, **कर्नाटक राज्यामध्ये** - कोरवी, मद्रास-कोरवी, **मध्यप्रदेश** व **महाराष्ट्र राज्यामध्ये** कैकाडी म्हणून ओळखले जातात.

**२) महाराष्ट्र राज्यामधील कैकाडी समाजाचे वास्तव्य:**

कैकाडी समाजाची महाराष्ट्रात विदर्भात मोठया प्रमाणावर वस्ती आढळती. येथे हे लोक 'अनुसूचित जात' म्हणून ओळखले जातात. उर्वरित महाराष्ट्रात सर्वत्र 'विमुक्त जाती' म्हणून ओळखले जातात. हे लोक आंध्र व मध्य प्रदेशातून महाराष्ट्रातील विदर्भ, नाशिक विभाग व मराठवाडयात आलेले आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील लोक कर्नाटक राज्यातून आलेले आहेत. हा फरक कैकाडी लोकांच्यातील भाषेवरून जाणवतो. विदर्भ, मराठवाडा नाशिक विभागातील कैकाडी लोकांची बोली भाषा एक आहे, तर पश्चिम महाराष्टातील बोलीभाषा वेगळी आहे. उदा. 'काय आहे' हे म्हणत असताना विदर्भ, मराठवाडा, नाशिक विभागातील कैकाडी 'मुदा किर' असे

म्हणतात तर पश्चिम महाराष्ट्रातील कैकाडी 'यांद इगिद' असे म्हणतात. पश्चिम महाराष्ट्रातील कैकाडी स्वत:ला कोरवी, बजंत्री समजतात. यावरून महाराष्ट्रात कैकाडी लोकांचे स्थलांतर कोणकोणत्या प्रदेशातून झाले आहे हे समजते.

# प्रकरण दुसरे

# संशोधन पद्धती

# संशोधन पद्धती

भारतीय जनगणना २०११ च्या जनगणनेनुसार ११.२४ कोटी लोकसंख्या असलेले महाराष्ट्र राज्य लोकसंख्येनुसार देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. राज्याचे मोठ्या प्रमाणात शहरीकरण झाले असून ४५.२ टक्के जनता शहरात राहते. जनगणनेनुसार राज्यात अनुसूचित जातीची लोकसंख्या १.३३ कोटी एवढी आहे. महाराष्ट्र राज्याच्या अनुसुचीत जातीच्या यादीत एकूण ५९ जातींचा समावेश आहे. अनुसूचित जमातीमध्ये ४७ जाती, विमुक्त जातीमध्ये एकूण १४ जाती, भटक्या जातीमध्ये ३७ जाती, इतर मागासवर्गीय जातीमध्ये ३५० जातींचा समावेश आहे. यामध्ये प्रकर्षाने आढळून येते कि, अनुसूचित जातीतील यादी क्र. २८ वर नमूद असलेली कैकाडी जातीचा उल्लेख विमुक्त जातीतील यादी क्र.४ मध्ये नमूद असल्याचे आढळून येत आहे. सदर प्रवर्गातील भिन्नता हि क्षेत्रीय बंधनामुळे झाली असून या सर्वांचा परिणाम कैकाडी समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासावर होत आहे.

कैकाडी समजाचे दोन भिन्न प्रवर्गामध्ये समाविष्ट असल्यामुळे एकूणच या समाजावर काय परिणाम झाले आहेत, हे पाहण्यासाठी सदर विषय अभ्यासण्यात आलेला आहे.

महाराष्ट्रातील जाती व्यवस्थेचा आढावा घेतांना आढळुन आले की कैकाडी ह्या जातीचा उल्लेख अनुसुचित जातीच्या यादी मध्ये क्र.२८ मध्ये आहे तर अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, नागपूर, वर्धा, व यवतमाळ जिल्हे व राजुरा तालूका सोडुन चंद्रपुर जिल्हयांत वास्तव्य

करणाऱ्या कैकाडी समाज अनुसुचित जातीमध्ये प्रविष्ठ आहे तर उर्वरित जिल्हयातील वास्तव्य करणारे कैकाडी लोक व विमुक्त जातीमधील यादीतील क्र.४ मध्ये प्रविष्ठ आहेत. यावरुन स्पष्ट दिसते कि एकच जात दोन वेगवेगळया प्रवर्गामध्ये विभागली गेलेली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी ) पुणे ही सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांची स्वायत्त संस्था असुन या संस्थेमार्फत अनुसुचित जातीतील वेगवेगळया जातींचे संशोधन करण्यात येते. २०१४ साली कैकाडी समाज संघटना, महाराष्ट्र राज्य दि.२५/०६/२०१४ रोजी एक निवेदन बार्टी संस्थेस दिले होते. त्यामध्ये राज्यातील कैकाडी समाजास विदर्भाप्रमाणे अनुसुचित जाती या प्रवर्गामध्ये समाविष्ट करण्यासाठी संशोधन करण्याबाबत निवेदन दिले. या अनूषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे येथे कार्यरत असलेल्या संशोधन अधिकारी यांनी राज्यातील कैकाडी समाजाची लोकसंख्या असलेल्या गावात लक्ष्य गट चर्चेचे आयोजन करून कैकाडी समाजाचा व्यवसाय ,राहणीमान ,त्यांची संस्कृती ,त्यांची लग्न पद्धती, देवदेवता, रिती रिवाज तसेच इतर तत्सम माहिती गोळा करुन एक अहवाल महाराष्ट्र राज्य शासनास दिनांक ५ सप्टेंबर २०१४ रोजी सादर केला होता.

भिन्न प्रवर्ग असूनही दोन्ही प्रवर्गातील कैकाडी समाज यांच्यामध्ये रोटी ,बेटी व्यवहार आहेत. त्यांना सामाजिक दृष्टया खालच्या दर्जाची व अस्पृश्यतेची वागणुक दिली जाते. त्यामुळे विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी जातीवरील क्षेत्रबंधन उठविण्यास हरकत नसून संपुर्ण राज्यामधील कैकाडी समाजाला सामाजिक न्याय मिळण्याच्या दृष्टीने अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट करणे योग्य राहील असे नमुद केले होते. सदर अहवाल महाराष्ट्र शासनाने दिनांक ७ ऑक्टोंबर २०१४ रोजी पुढील कार्यवाहीसाठी केंद्र सरकारकडे पाठविला होता .त्यानंतर केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालय,भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दिनांक १६ डिसेंबर २०१४ रोजी सदर प्रस्तावाबाबत त्यांचे अभिप्राय व मार्गदर्शनासाठी महानिंबधक आणि जनगणना आयुक्त, नवी दिल्ली (आर.जी.आय) यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात आला होता.

सदर अहवालाबाबत महानिबंधकआणि जनगणना आयुक्त यांनी त्रृटी काढलेल्या होत्या. त्यामध्ये प्रामुख्याने मानववंश शास्त्रीय व संस्कृतीविषयक साहित्य उपलब्ध नसल्याचे कळविण्यात आले होते.सदर त्रृटीची पुर्तता करून बार्टीने कैकाडी जातींचा अहवाल केंद्रशासनाकडे फेरसादर केला होता. परंतु दिनांक ०७/०८/२०१७ रोजी महाराष्ट्र शासनाने पाठविलेल्या पत्रात राज्यातील कैकाडी समाजाचे क्षेत्रीय बंधन उठविण्याबाबतचा केंद्र शासनाकडुन आलेला प्रस्ताव पुन्हा परिपुर्ण

माहितीसह केंद्र शासनाकडे पाठविण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहे. त्यानुसार दोन प्रवर्गात समाविष्ट असलेल्या कैकाडी जातींच्या बांधवामध्ये असणारे साम्य शोधण्यासाठी महाराष्ट्रातील कैकाडी जातींचे सामाजिक,आर्थिक, शैक्षणिक, मानवंशशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करण्यात येत आहे. सदर संशोधनाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे

## संशोधनाची उदिष्ट्ये :- (Objective)

१. कैकाडी समाजाचे दोन भिन्न प्रवर्गामध्ये असल्याबाबतची कारणे शोधणे.

२. विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रामधील  कैकाडी समाज यांच्यातील सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक सध्यस्थितीचा अभ्यास करणे.

३. विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाज यांच्यातील साम्य/साधर्म शोधणे.

४. विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाज यांच्या व्यावसायिक सध्यस्थितीचा अभ्यास करणे.

५. उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाजामध्ये विदर्भाप्रमाणे अस्पृश्यता आहे का ते अभ्यासणे.

६. कैकाडी समाजाच्या भाषा ,रुढी, परंपरा, देव देवता,अंधश्रध्दा इत्यादीचा मानववंशदुष्ट्रीने अभ्यास करणे.

७. कैकाडी समाजातील महिलांची सध्यस्थिती अभ्यासणे.

८. कैकाडी समाजाला मिळालेल्या शासनाच्या विविध योजनांचा लाभ तसेच लाभ घेतांना आलेल्या अडचणींचा अभ्यास करणे.

## गृहीतके :- (Hypothesis)

१. कैकाडी समाजामध्ये स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत अत्यंत कमी आहे.

२. कैकाडी समाजातील लोकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे.

३. विदर्भाप्रमाणेच उर्वरित महाराष्ट्रात कैकाडी समाजाबाबत अस्पृश्यता पाळली जाते.

४. विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाज यांच्यामध्ये भिन्न प्रवर्ग असूनही रोटी बेटी व्यवहार होतात.

५. कैकाडी समाजातील लोकांना शासनाच्या योजनांचा लाभ खूप कमी प्रमाणात मिळालेला आहे.

## संशोधन पध्दती (Research Methodology) :-

महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील यादीमध्ये विदर्भात वास्तव्य करणारा कैकाडी समाज अनुसूचित जातीमध्ये प्रविष्ट आहे. तर उर्वरित महाराष्ट्रात कैकाडी समाज हा विमुक्त जातीमध्ये समाविष्ट आहे, त्यामुळे त्यांचे क्षेत्रीयबंधन उठवून संपूर्ण कैकाडी समाजाला अनुसूचित जातीमध्ये प्रविष्ट करण्यासाठी "विदर्भ" व "उर्वरित महाराष्ट्र राज्यामधील" कैकाडी जातीचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक तसेच मानववंशशास्त्रीय पद्धतीने तुलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे त्याचे अभ्यास क्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य आहे. सदर संशोधन अभ्यास तुलनात्मक असल्यामुळे विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातील जिल्ह्याची निवड नमुना पद्धतीने करण्यात आलेली आहे. कैकाडी समाजाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक तसेच दुय्यम स्त्रोतामार्फत माहिती गोळा करण्यात आलेली आहे. प्राथमिक स्वरूपाची माहिती गोळा करण्यासाठी मुलाखत अनुसूची, लक्ष गट चर्चा, व प्रत्यक्ष निरीक्षण पद्धती वापरण्यात आलेली आहे. या तीन पद्धतीतून संकलित माहितीची एकमेकांशी पडताळणी करण्यात आलेली आहे.

माहितीचे संकलन व लेखन गुणात्मक तसेच संख्यात्मक स्वरूपात आहे. मानव वंश शास्त्रीय माहिती, क्षेत्रीय बंधनामुळे काकीआडी समाजावर झालेले परिणाम अशा स्वरूपाची माहिती गुणात्मक स्वरूपामध्ये मांडण्यात आलेली आहे. तर सामाजिक-आर्थिक-शैक्षणिक स्थिती चे वास्तव सांख्यिकीय माहितीच्या स्वरूपात मानाद्न्यात आलेले आहे.

## नमुना निवड पद्धती (Sampling Methodology):

विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाजाचे सर्वेक्षण करताना महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. यासाठी विदर्भातील काही जिल्हे तसेच उर्वरित महाराष्ट्रातील जिल्ह्यांची निवड करण्यात आली .




## विदर्भातील अनुसूचित जातीमध्ये असणाऱ्या कैकाडी समाजाकरिता नमुना निवड पद्धती

विदर्भातील कैकाडी समाज अनुसूचित जातीमध्ये असल्यामुळे भारतीय जनगणना १९६१ - २०११ नुसार विदर्भातील जिल्ह्यांची कैकाडी समाजाची लोकसंख्येची आकडेवारी प्राप्त झाली ती खालीलप्रमाणे

| जिल्हा | कैकाडी लोकसंख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **१९६१** | **१९८१** | **१९९१** | **२००१** | **२०११** |
| **अकोला** | ८७८ | ८२२ | १३६८ | ७३४ | ७६० |
| **अमरावती** | २०५ | २८२ | १६ | ७९७ | ७०० |
| **बुलढाणा** | ० | १०५० | १४०८ | १४०३ | १६०२ |
| **यवतमाळ** | १४९ | २५२ | १७३ | ४०९ | ४८७ |
| **वाशीम** | ० | ० | ० | ८४९ | ९२७ |
| **नागपूर** | ० | ५४ | ४८० | ३७० | ५६३ |
| **वर्धा** | ० | ४४ | १५ | ८५ | ४५ |
| **भंडारा** | ० | २२ | १७ | ४८ | १ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **चंद्रपूर** | ० | १५२ | २५१ | ५३७ | ५१४ |
| **एकूण** | **१२३२** | **२६७८** | **३७२८** | **५२३२** | **५५९९** |




कुटुंब निहाय यादी प्राप्त होऊ न शकल्याने इथे गैर संभाव्यता नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

## उर्वरित महाराष्ट्र राज्यामधील विमुक्त जातीतील कैकाडी समाजाकरिता नमुना निवड पद्धती:

उर्वरित महाराष्ट्र मधील कैकाडी समाज हा विमुक्त जातीमध्ये असल्यामुळे त्यांची आकडेवारी प्राप्त झाली नाही. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये विमुक्त जातीतील कैकाडी समजाची कुटुंबे शोधण्यासाठी गैर संभाव्यता नमूना (Non-probability Sampling ) नुसार सुविधा नमुना निवड (Convenience sampling) पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

२०१४ साली कैकाडी समाज संघटनेने दिलेल्या निवेदनामुळे तसेच महाराष्ट्र शासनाने दिलेल्या आदेशानुसार कैकाडी समाजाचे सर्वक्षण बार्टी कडून सुरु करण्यात आले होते. त्यामुळे कैकाडी समाजाकडून प्रश्नावली भरण्यासाठी कैकाडी समाजातील सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार सर्वेक्षणासाठी एकूण १३ जिल्ह्याची निवड करून

एकूण ९४० कैकाडी कुटुंबाची माहिती गोळा करण्यात आली. निवड करण्यात आलेल्या जिल्ह्यांची नमुना संख्या व त्याची टक्केवारी पुढीलप्रमाणे:

| विभाग | अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | नमुना संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| उर्वरित महाराष्ट्र | 1 | मुंबई | 161 | 17 |
| | 2 | अहमदनगर | 55 | 6 |
| | 3 | औरंगाबाद | 55 | 6 |
| | 4 | कोल्हापूर | 56 | 6 |
| | 5 | जळगाव | 156 | 17 |
| | 6 | जालना | 54 | 6 |
| | 7 | पुणे | 55 | 6 |
| | 8 | सातारा | 55 | 6 |
| | 9 | बीड | 50 | 5 |
| | 10 | चंद्रपूर (राजुरा तालुका ) | 5 | 1 |
| विदर्भ | 11 | वाशीम | 92 | 10 |
| | 12 | बुलढाणा | 54 | 6 |
| | 13 | चंद्रपूर | 40 | 4 |
| | 14 | नागपूर | 52 | 6 |
| **एकूण** | | | 940 | 100 |

तसेच मानवशास्त्रीयदृष्टीने अभ्यास करण्यासाठी वरील निवडलेल्या जिल्ह्यामध्ये लक्ष्य गट चर्चा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. त्यामध्ये टेप रेकोर्ड व छायाचित्र यांचा वापर करून कैकाडी समाजाची घरांचे स्वरूप, व्यवसायाचे स्वरूप, भाषा, सण-समारंभ, पेहराव इत्यादी माहिती गोळा करण्यात आलेली आहे.

## प्रत्यक्ष भेटी व लक्ष्य गटचर्चा आयोजित करण्यात आलेली गावे व जिल्हे

| विभाग | जिल्ह्यांची नावे | गावाची नावे |
|---|---|---|
| **उर्वरित** | सातारा, | १. गाव नागठाणे तालुका जिल्हा सातारा. |
| **महाराष्ट्र** | कोल्हापूर, | २. गाव तारळे तालुका पाटण जिल्हा सातारा. |

| | | |
|---|---|---|
| | अहमदनगर, औरंगाबाद, जालना, बीड. | ३. गाव काशीळ तालुका जिल्हा सातारा. |
| | | ४. गाव उंब्रज (शिवडे) तालुका कराड जिल्हा सातारा. |
| | | ५. गाव पेठवडगाव तालुका हटकणगले जिल्हा कोल्हापूर |
| | | ६. कोरवी गल्ली इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर. |
| | | ७. गाव हंगा तालुका पारनेर जिल्हा अहमदनगर. |
| | | ८. गाव वांबोरी तालुका राहुरी जिल्हा अहमदनगर. |
| | | ९. कैकाडी समाज मोहल्ला, जालना जिल्हा जालना. |
| | | १०. गाव बिडकीन तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद. |
| | | ११. गाव गेवराई तालुक गेवराई जिल्हा बीड. |
| | | १२. गाव नवगण राजुरी तालुका जिल्हा बीड. |
| **विदर्भ** | बुलढाणा, अकोला, वाशीम, यवतमाळ, चंद्रपूर, नागपूर. | १. कैकाडी गल्ली मेहकर, तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा. |
| | | २. भिल्ल गल्ली, बुलढाणा शहर, जिल्हा बुलढाणा. |
| | | ३. गाव चिखलगाव तालुका अकोला जिल्हा अकोला. |
| | | ४. गाव कान्हेरी सराफ तालुका बार्शीटाकळी जिल्हा अकोला |
| | | ५. गाव मेडशी तालुका मालेगाव जिल्हा वाशीम. |
| | | ६. गाव आमानी तालुका मालेगाव जिल्हा वाशीम. |
| | | ७. इंदिरानगर कारंजा (लाड) तालुका कारंजा(लाड) जिल्हा वाशीम. |
| | | ८. गाव दारव्हा तालुका दारव्हा जिल्हा यवतमाळ. |
| | | ९. जगन्नाथ बाबा मठ नगर चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर. |
| | | १०. गाव राजुरा तालुका राजुरा जिल्हा चंद्रपूर. |
| | | ११. गाव भटाळा तालुका वरोरा जिल्हा चंद्रपूर. |
| | | १२. गाव पाथरी तालुका जिल्हा चंद्रपूर. |
| | | १३. रामेश्वरी नगर, नागपूर शहर. |
| | | १४.सोनाजी कैकाडी नगर, नागपूर. |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जात<br>(इतर नावाने ओळखली जात असल्यास त्याचा उल्लेख) | १८ | पारंपारिक पोशाख |
| २ | उपजात | १९ | विशिष्ट प्रकारचे दागदागिने - अलंकार |
| ३ | व्यवसाय | २० | जन्मविधी |
| ४ | वास्तव्य / लोकसंख्या | २१ | पाचवी पूजा |
| ५ | स्थलांतर | २२ | बारसे |
| ६ | इतिहास (उगम कसा झाला याबाबतची काही कथा असल्यास) | २३ | मुलगी वयात आल्यानंतर करण्यात येणारे विधी |
| ७ | आडनावे | २४ | मुलीचे लग्नाचे वय |
| ८ | बोली भाषा | २५ | लग्न जमविण्याची पध्दत |
| ९ | आहार पध्दती, शाकाहारी / मांसाहारी / सणसमारंभ याकरीताचे भोजन कोणत्या प्रकाराचे मास खातात | २६ | विवाह पध्दत (वर-वधु पाहण्यापासून ते विवाहानंतरच्या सर्व विधी) |
| १० | पारंपारिक कला कौशल्य | २७ | हुंडा पध्दत |
| ११ | कुळ | २८ | सर्व विधी कोणामार्फत केले जातात. |
| १२ | गोत्र | २९ | मृत्यु विधी (मरणापासून तेरावा/वर्ष श्राध्द पर्यंत) |
| १३ | कुलदैवत | ३० | अंधश्रध्दा (जटा, वैदू, इतर) |
| १४ | प्रमुख सण उत्सव | ३१ | स्त्रियांचा सामाजिक दर्जा |
| १५ | जत्रा | ३२ | जातपंचायत |
| १६ | तीर्थस्थाने / तीर्थ क्षेत्र | ३३ | रोटी बेटी व्यवहार |

मानव वंश शास्त्रीय माहितीकरिता खालील चलांचा /बाबींचा वापर करण्यात आला.

# प्रकरण तिसरे

# संदर्भ साहित्याचे अवलोकन

# *संदर्भ साहित्याचे अवलोकन*

भारतामध्ये तामिळनाडू, आंध्र, केरळ, कर्नाटक महाराष्ट्र या राज्यामध्ये प्रामुख्याने कैकाडी जात आढळून येते. महाराष्ट्र राज्यामध्ये वास्तव करणारा कैकाडी समाज राज्य शासनाकडून दोन वेगवेगळ्या प्रवर्गामध्ये विभाजित करण्यात आला आहे. वास्तविक यामागील कारणांचा आणि यामुळे झालेल्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी कैकाडी समजाबाबत दुय्यम माहितीच्या आधारे तथ्यांचे संकलन करण्यात आले. यामध्ये अनेक संदर्भ ग्रंथामध्ये कैकाडी समाजाची माहिती उपलब्ध झाली असून त्याची विस्तृत स्वरूपात मानादानी केली आहे.

१. **द पिपल ऑफ इंडिया- महाराष्ट्र पार्ट व्हॉल्यूम XXX, श्री. के. एस. सिंग** यांच्या पुस्तकानुसार कैकाडी या जातीचे लोक भटकंती करत असून ते सध्या विदर्भात राहतात व त्यांची भाषा ही तामिळ व तेलगू भाषा मिश्रीत आहे. कैकाडी यांचा प्रमुख व्यवसाय हा टोपल्या बनविणे, खडी फोडणे असा आहे. कैकाडींचा धर्म हिंदू असून त्यांचे दैवत खंडोबा, मारामा माता आहेत. प्रामुख्याने हिंदू सण उदा. पोळा, दसरा, दिवाळी साजरा करतात. सामाजिक स्तरावर कैकाडी हे महार, प्रधान आणि मांग या जातींसोबत राहत व पुर्वीच्या काळी त्यांच्याकडून इतर हिंदू समाजातील लोक पाणी सुध्दा घेत नसे. (परिशिष्ट ६)

२. **अन्थ्रोपॉलॉजी सर्वे ऑफ इंडिया - श्री. के. एस. सिंग** यांच्या पुस्तकानुसार महाराष्ट्रातील काही भागामध्ये कैकाडीला गढवे सोनार असे संबोधले जाते. कैकाडी हे तेलंगाना मधून स्थलांतरीत झालेले आहेत.(एथोवेन 1922). कैकाडी यांना बांबू पासून टोपली तयार करणारे असेही संबोधले जाते. कैकाडी विदर्भातील जिल्ह्यामध्ये पसरलेले आहेत. सध्या कैकाडी मराठी भाषेत बोलतात. विदर्भात जाधव, गायकवाड, पत्की, मुळे आणि माने हि आडनावे आढळतात त्यांना कुळ नावे संबोधली जातात. एकाच कुळातील लोकांचे विवाह जुळविले जात नाहीत. व्यक्ती वडीलांच्या बहिणीच्या मुलीशी अथवा आईच्या भावाच्या मुलीशी लग्न करू शकतात. कैकाडी लग्न पद्धतीत वधूची किमत मोजावी लागते. कुणबी पद्धतीने लग्न पद्धती आहेत. (घटपूजा, मंगलअष्टका इ.) विधवा पुनर्विवाह व घटस्फोटाची परवानगी आहे.

समाजातील वृद्ध व्यक्तींच्या उपस्थितीत विवाह, इतर सामाजिक बाबीवर निर्णय तसेच कौटुंबिक वादविवाद मिटविले जातात . ते हिंदू धर्म, पूजा, ब्राह्मण देवदेवतांची पूजा करतात आणि सर्व प्रमुख हिंदू सणांचे पालन करताततते मरमाताई ., विठ्ठल रुक्मणी, नारायण आणि वाघोबा या सर्व स्थानिक देवतांची देखील पूजा करतात. टोपल्या बनवणे आणि दगडफोडणे ही कैकाडीची पारंपरिक परंपरा आहेन पाल-गाढव-पूर्वीच्या काळात डुक्कर . .देखील प्रमुख आर्थिक कारणे मानली गेली

३. **मराठी विश्वकोष** मध्ये कैकाडी समाजाबाबत पुढीलप्रमाणे नमुद केले आहे. कैकाडी समाज हे कर्नाटक व दक्षिण महाराष्ट्र येथील रहिवासी आहेत. दरोडेखोर व मुशाफिरी या बाबत कैकाडयांची प्रसिध्दी आहे. त्यामुळे पोलिसांची त्यांच्यावर नजर असते. त्यांचा पारंपारिक व्यवसाय टोपलया तयार करणे, पक्षी व हरीण पकडयाची जाळी तयार करणे, पक्षांचे पिंजरे तयार करणे, मुलांची खेळणी तयार करणे, टोपल्यांतील साप लोकांना दाखवून पैसे गोळा करणे. या जातीत नऊ पोट जाती आहेत. बोरीवाले, धनताळे, कामाठी, काइजी, लमाण, माकडवाले, उरूकैकाडी, वाइबेस व भामटे असे ते नऊ भाग आहेत. कैकाडी हे हिंदू धर्मिय असून वारसासंबंधी हिंदु कायद्याचाच अवलंब करतात. हिंदु देवतांना मान देऊन हिंदु सणच ते पाळतात. बहिरोबा, भवानी, मरिआइ, फिरंगाई, तुकाई, यमाई वगैरे देवतांची ते उपासना करतात. सोनोरीचार, बहिरोबा, जेजुरीचा खंडोबा, तुळजापूरची भवानी व मारूती या त्यांच्या कुलदेवता होत. टोपल्यांतील साप लोकांना दाखवून काही लोक भिक्षा मागतात, वाळू, माती, विटाख् कौलें वगैरे गाढवांवर लादून नेआण करण्याचे कामहि लोक करतात. काहीं लोक शेती व मजूरी करूं लागले आहेत. बकरें, हरीण, ससे व डुक्कर यांवर उपजीविका करून ते दारू पितात. त्यांचा सामाजिक दर्जा कुणब्याहुन अत्यंत हीन आहे. (परिशिष्ट - ७)

४. **द ट्राईब्स ॲण्ड कास्ट द सेंट्रल प्राव्हिन्सेसे ऑफ इंडिया बाय आर. व्ही. रसेल ॲण्ड हिरालालच्या** पुस्तकामध्ये कैकाडी व कैकारी या दोन्ही जातींबद्दल स्पष्ट केले आहे की, या दोन्ही जाती भटकणाऱ्या असून काही ठिकाणी त्यांना बरगंडी, एरूकुला, कोरवा, कोरावारस व कोरावास या नावाने देखील ओळखतात. त्यांची बोली भाषा ही तामिळ आणि तेलगू मिश्रीत आहे. त्यांचा पारंपारिक व्यवसाय हा पामच्या झाडाच्या पाने व गवतापासून टोपल्या किंवा कनग्या तयार करणे, बऱ्याच ठिकाणी ते दगड, माती, विटा वाहून नेण्याचे काम करतात. ते नेहमी भटकत असतात. तसेच ते चोऱ्या करणे व दरोडे टाकण्याचे देखील काम करत. कैकाडी

लोक डुक्कराचे, मेंढी इ. जनावरांचे मांस खातात. तसेच त्यांचा जातीतील माणसे स्त्रीया व पुरूष दोघेही दारू पितात. या जातीमध्ये नियमीत स्नान करणे हा प्रकार नाही. त्यांचे कपडे व राहणीमान अस्वच्छ आहे. त्यांच्याकडून कोणी धान्य किंवा इतर साहित्य घेत नाहीत त्यांचा स्पर्श देखील ब्राम्हण, कलार, बनिया, व इतर जातींना देखील नकोसा असतो. मंदिर प्रवेशापासून त्यांना मज्जाव केलेला आहे. त्यांचे समाजातील स्थान निम्न दर्जाचे आहे असा उल्लेख आहे. (परिशिष्ट - ८)

५. **मराठी विश्वकोष :- विभाग अकरावा : काव्य — खतें** कैकाडी कर्नाटक व दक्षिण महाराष्ट्र येथें या जातींची वस्ती साधारणत: असून १९९१ साली मुंबई इलाख्यात ह्यांची संख्या ९६१४ होती. दरोडेखोरी व मुशाफरी याबद्दल कैकाडयांची प्रसिध्दि आहे. अजूनहि चोऱ्या व घरफोडी करण्याचा त्यांचा व्यवसाय चालू असला तथापि अलीकडे त्यांची थोडी सुधारणा झाली आहे. आपले मूळ ठिकाण तेलंगण होय असें ते सांगतात आणि तेलगू व कानडी मिश्रित अशी त्यांची भाषा ऐकली की, तें तेलंगणचे असावे हें संभवनीय दिसतें. कैकाडी जातीतं भामटे व लमाण वगैरे गुन्हेगारहि शिरले असून काहींना अर्धवट मराठी हि बोलता येते. या जातींत नऊ पोटजाती आहेत. बोरीवाले, धनताळे, कामाठी, काइजी, लमाण, माकडवाले, उरूकैकाडी वाइसबेस व भामटे असे ते नऊ भाग आहेत. या सर्वांचा धंदा म्हणजे माकडें घेऊन फेरी करणें, टोपल्या करणें, जादूगिरी करणें व खिसे कातरणें किंवा अशाच स्वरूपाचा असतो. ओड व कोल्हाटी जातींशी त्यांचे सादृश्य दिसून येतें. उपरोक्त जातींशिवाय गोत्रांतर — विवाहामुळे झालेले काहीं भेद आढळतात. जाधव, माने गायकवाड, माधवंत व पोवार असे पांच मुख्य वंश आहेत. जाधवांचे मधू व सपाटसर आणि मान्यांचे मानक व मालाजूर असे भेद आहेत. कांहीं ठिकाणी वरील वंशाचीं नांवें हल्ली आडनावें बनली आहेत. मुख्य वंशांनां, सातपादी, मेलपादी, कावाडी, मेंढरेगुदी व संगाडी अशीं दुसरीं नांवें आहेत.

त्यांच्यांत बालविवाह रूढ असून बहुपत्नीत्वास मुभा ठेवली आहे. मुलाचा बाप प्रथम मागणी घालतो व वधूस बापास २५ ते १०० रूपयेपर्यंत देतो. लग्नाचा मुहूर्त व कार्य ब्राह्मणांकडून करविण्यांत येतें. पंचपालवी हें कैकाडयांचे देवक असून त्याची लग्नाच्या दिवशीं स्थापना करितात. होम, मंगळसूत्र, कंकण वगैरे समारंभ कुणब्याप्रमाणेंच करण्यांत येतोत. खानदेश व बेळगांव जिल्ह्यांत अशी चाल आहे कीं, नवरयानें आपल्या बायकोच्या घरीं तीन मुलें होईपर्यंत राहून आपल्या सासरयाच्या कुटुंबास पोसलें पाहिजे. अशा अटीवर लग्न

ठरवल्यानंतर पुढें नवरा-बायकोत कलह झाल्यास तिच्या आई बापास पोसण्याची जबाबदारी नवऱ्यावर असते. धनताळे कैकाडयांत पंचाकडून लग्न ठरविण्यात येतें. पिंपळाची डहाळी एका घटांत घालून व त्यांत पाणी घालून, त्या घटांपुढे वधूवरास बसवितात. लोकांनी अक्षता टाकल्यानंतर लग्नविधि पूर्ण होतो. या जातींत विधवाविवाहास मोकळीक आहे. एक ब्राह्मण उपाध्याय व विधवा स्त्रियाच विधवेच्या लग्नांत भाग घेतात. एखाद्या अविवाहित पुरूषास विधवेशी लग्न कर्तव्य असेल तर त्यास प्रथम शमी वृक्षाशी लग्न करावे लागतें. नवरा-बायकोंत भांडण झाल्यास काडीमोड करण्याची वहिवाट आहे.

कैकाडी हे हिंदुधर्मीय असून वारसासंबंधीं हिंदु कायद्याचाच अवलंब करितात. हिंदु देवतांना मान देऊन हिंदु सणच ते साजरे करतात. बहिरोबा, भवानी, मरिआइ, फिरगाई, तुकाई, यमाई वगैरे देवतांची ते उपासना करतात. सोनोरीचा बहिरोबा, जेजुरीचा खंडोबा, तुळजापुरची भवानी व मारूती या त्यांच्या कुलदेवता होत. आळंदी, जेजुरी, सोनोरी, तुळजापूर, पंढरपूर वगैरे ठिकाणीं ते यात्रेस जातात. गोसावी हे त्यांचे धर्मगुरू असून शकून, जादुगारी, चेटूक, कौल इत्यादिवर त्यांची श्रध्दा असते. एखादी साथ उदभवली कीं, बकरें किंवा रेडा बळी देतात. खानदेशचे कैकाडी दावुमलिक नांवाच्या मुसुलमान साधूस फार मान देतात. या जातीचे उपाध्ये साधारणपणें देशस्थ ब्राम्हाण असतात. कैकाडी लोक मृतांस पुरतात किंवा जाळतात. दहा दिवसपर्यंत सुतक पाळण्यांत येतें व प्रेतवाहक हि सुतक पाळतात. रक्षा क्षौर करणें वगैरे सर्व विधी करण्यांत येतात.मातीची एक मूर्ति घरच्या देवांत पुजेकरिता ठेवण्यात येते. श्राध्द करण्याची चाल या लोकांत नाही.

**कैकाडी चोर म्हणून प्रसिध्द असल्याने त्यांच्यावर पोलिसांची नेहमी नजर असते. त्यांचा परंपरागत धंदा टोपल्या करणे हा होय.** पक्षी व हरिण पकडण्याची जाळी तयार करणें, पक्ष्यांचे पिंजरे करणें, मुलांची खेळणीं तयार करणे वगैरे हि धंदे कैकाडी लोक करतात.

टोपल्यांतील साप लोकांना दाखवून काहीं लोक भिक्षा मागतात. वाळू, माती, विटा, कौलें वगैरे गाढवांवर लादून नेआण करण्याचें काम हि काहीं लोक करतात. काहीं लोक शेती व मजुरी करूं लागले आहेत. बकरें, हरीण, ससे व डुक्कर यांवर उपजीविका करून ते दारूहि पितात. त्यांचा समाजिक दर्जा कुणब्याहून अत्यंत हीन आहे.

या जातीचा उल्लेख दामाजीपंत मंगळवेढेकर यांच्या वेळीं (तेरावें शतक) झालेल्या एका ऐतिहासिक महजरांत स्पष्ट आढळते. महारांनी गांवातील कोणत्या लोकांपासून कोणकोणते हक्क वसूल करावेत याबद्दलच्या यादींत त्यांनी कैकाडी लोकांपासून, प्रत्येक लग्नास सवा दोन रूपये व मर्तिकाच्या प्रत्येक मढयाबद्दल साडेतीन रूपये वसूल करावेत असा निर्देश केलेला आहे. [इति. मंङ चतु. सं. वृ. ६२]

**वरहाड मध्यप्रांतांतील कैकाडी**

मध्यप्रांतांत यांची वस्ती जास्त आहे. हे कान्होबा रमजानास आपला पूर्वज समजतात व तयानें आपल्या मुलास एक फांदी दिली व त्यावर निर्वाह करण्यास सांगितलें म्हणून आम्ही टोपल्या विणून निर्वाह करतो, अशी हें जीवनवृत्ती समजावतात. नेमाड जिल्ह्यांत यांच्या दोन जाती आहेत. एक मराठी व दुसरी फिरस्ता. मराठे कैकाडी दुसऱ्या वर्गास नीच समजतात. नागपुरांत यांच्या अनेक उपजाती आहेत. उदा. (कामाठी भामटी, कुणबी, तोकींवाला व बोरीवाला) यावरून अन्य जातींनीं आपल्यातून काढून दिलेले लोक कैकाडी जातींत शिरले असावे असें दिसते. वऱ्हाडांत यांच्या साडेबारा पोटजाती आहेत. नेमाडांत यांचे दोन वर्ग जादों व गायकवाड असे आहेत व हे परस्परांशी विवाह करतात. दक्षिण जिल्ह्यांतून जादों, माने, कुमरे, जेष्टी, कलें, दाने व इतर असे अनके वर्ग आहेत. यांचा मद्रासच्या कोरवा जातीशीं पूर्वी केव्हां तरी निकट संबंध असावा.

सगोत्र विवाह यांच्यात निषिध्द आहेत. मुलीचें लग्न ८ ते १२ वर्षाच्या वयांत होतें. मुलीला वर मिळत नसला तर दुसऱ्या कोणाच्या तरी लग्नांत अर्काच्या झाडाबरोबर किंवा अंगठीबरोबर तिचें लग्न करतात, व तें झाड फार जपून वाढवितात आणि ती आंगठी बोटांत घालतात. जर तें झाड मेलें किंवा अंगठी हरवली तर त्यांची उत्तरक्रिया करतात. २० ते १०० रूपयांपर्यंत मुलीचें शुल्क असतें. विधवेनें नवऱ्याच्या पाठच्या भावाबरोबर लग्न केलें पाहिजे व या पाठच्या भावाखेरीज इतर भावाबरोबर तिला लग्न करतां येत नाहीं. जर तिनें योग्य दिरास सोडून इतरास वरिलें तर त्या माणसानें तिच्या लग्नाचा अर्धा खर्च दिरास भरून दिला पाहिजे. विधवाविवाह तिच्या नवऱ्याकडेच झाला पाहिजे. प्रथम वरानें विधवेबरोबर लग्न करण्यापूर्वी रूईच्या झाडाबरोबर प्रथम विवाह केला पाहिजे. हे पुष्कळ बायका करतात. पण पहिल्या

बायकोच्या परवानगीशिवाय दुसरें लग्न करतां येत नाहीं व पहिली बायको नवऱ्याकडून दुसरे लग्न केल्यावर "मी चांगला वागेन" असे कागदावर लिहून घेते. बहुधा पहिल्या बायकोचे आईबाप दुसरें लग्न करू देत नाहींत. सबळ कारणें असलींच तर घटस्फोट करू देतात. पंचायतीच्या सह्यांसह एक फारखतीचा कागद तयार करतात, त्याबद्दल नवऱ्यास ८ ते १० रूपये भरावे लागतात.

कैकाडी लोक नागाला देव म्हणून पूजतात तसेच ते खंडोबाची व मरीमातेची देखील पूजा करतात. हे लोक फार अपवित्र समजले जातात. ब्राम्हण, वाणी व कलारसुध्दा यांस स्पर्श करीत नाहींत. यांस मंदिरांत येऊ देत नाहींत.

कैकाडी समाजामध्ये जातपंचायत असून ती निरनिहाळया अपराधांबद्दल शिक्षा करते. जर कोणा कैकाडिणीनें भिन्न जातीच्या पुरुषाशी व्यभिचार केला तर तिला नदीवर किंवा विहिरीवर नेतात. तिचें संपूर्ण क्षौर करतात. मग दोन दारांचें झोपडें मुद्दाम जवळच तयार करून ठेवलेलें असतें. त्यांत ती एका दाराने जातें व बाहेरून ते झोपडें पेटवितात. तें पेटत असतानां ती कांही वेळ झोंपडीत बसते. नंतर दुसऱ्या दारानें बाहेर पडते. मग एका लहान मुलास प्रथम तिच्या हातचें जेवण घालतात. असाच विधि मुंबईचे कैकाडी (कोरवा) लोक करतात. **[रसेल व हिरालाल.]**

**६.** कैकाडी जातीचा अनुसूचित जातीच्या प्रवर्गात राष्ट्रापतीचे आदेश व ज्या शासन निर्णयानुसार समावेश करण्यात आलेला आहे, त्याचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **क्र.** | **शासन निर्णय क्रमांक** | **शेरा** |
|---|---|---|
| १ | The Gazette of India, Extra Aordinary Part II- Section ३ New Delhi Notification Dated १० August १९५० Ministry of Law.<br>**(परिशिष्ट-१)** | मध्य प्रदेश राज्याच्या यादीमध्ये अनुक्रमांक १९ वर कैकाडी ही जात अकोला, अमरावती, यवतमाळ भंडारा, चांदा, नागपूर व वर्धा जिल्ह्यामध्ये अनुसूचित जातीमध्ये दर्शविण्यात आलेली आहे.भारताचे मा. राष्ट्रपती यांनी राज्य घटनेतील कलम ३४१ नुसार १० ऑगस्ट १९५० रोजी आदेश निर्गमित करून मध्यप्रदेश या राज्यामध्ये (विर्दभातील सर्व जिल्ह्यामध्ये) कैकाडी जातीचा समावेश अनुसूचित जातीच्या यादी केलेला आहे. सदर भाग नंतर महाराष्ट्रात समाविष्ट झाला. त्यावेळेचा विर्दभ हा विभाग, १९६० च्या महाराष्ट्राच्या |

|  |  |  |
|---|---|---|
|  |  | पुर्नरचनेपर्यंत मध्य प्रदेशमध्ये होता. |
| २ | Maharashtra Reorganization Act १९६०, Notified in Part VII-A of the Seventh Schedule of the Bombay Reorganization Act, १९६० **(परिशिष्ट-२)** | Part VII –A of the Seventh Schedule of the Bombay Reorganization Act, १९६० मध्ये बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा व चांदा कैकाडी जातीचा अनुसूचित जातीमध्ये समावेश केलेला आहे. |
| ३ | Government of Maharashtra, Education and Social Welfare Department, Resolution and Social Welfare Department, Resolution No. CBC. १३६१-M, dated २१/११/१९६१ **(परिशिष्ट-३)** | या शासन निर्णयानुसार कैकाडी या जातीचा अ.क्र. ४ वर समावेश विमुक्त जातीमध्ये संपूर्ण महाराष्ट्राकरीता करण्यात आलेला आहे. परंतु वर नमुद केल्यानुसार राज्यघटनेतीन अनुच्छेद ३४१ अन्वये भारताचे मा. राष्ट्रपतींनी दिनांक १० ऑगस्ट १९५० रोजी अधिसूचित केलेल्या आदेशानुसार वर नमुद केलेल्या विदर्भातील जिल्हयापुरता कैकाडी जातीचा अनुसुचित जातीमध्ये समावेश केल्याचे, राज्यशासनाचे १९६१ सालाच्या शासन निर्णयामध्ये सामावेश करण्याचे राहून गेले आहे. तथापि भारताचे मा. राष्ट्रपतीचे सदरचे आदेश हे घटनात्मक असल्याने त्याचे सर्वोच्च स्थान आहे. तसेच तद्नंतर सदर विदर्भातील जिल्हयांमध्ये कैकाडी ही जात अनुसूचित जातीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आदेश (सुधारित) कायदा क्र. १०८/१९७६ नुसार कायम करण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ४ | Government of Maharashtra Circular, Education and Social Welfare Department, No CBC-१४६२-M, dated १st October १९६२. **(परिशिष्ट-४)** | सदर शासन निर्णयामधील अनुसूचित जातीच्या यादीत विदर्भातील क्षेत्रामध्ये राजूरा तालुका वगळून, कैकाडी या जातीचा समावेश अनु. क्र. ९ वर दर्शविण्यात आलेला आहे. |
| ५ | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आदेश (सुधारित) कायदा १९६ क्र. १०८/१९७६ **(परिशिष्ट-५)** | अनुसूचित जातीच्या यादीत अनु. क्र. २८ वर (फक्त अकोला, अमरावती, भंडारा बुलढाणा, नागपूर वर्धा, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्हा (राजूरा तहसिल वगळता) नमुद आहे. |

**१.** राष्ट्रपती यांनी राज्य घटनेतील कलम ३४१ नुसार, मध्यप्रदेश या राज्यासंदर्भात १० ऑगस्ट, १९५० रोजी अद्यादेश निर्गमित करून **विर्दभातील सर्व जिल्ह्यामध्ये** कैकाडी जातीचा समावेश अनुसूचित जातीच्या यादीत केलेला आहे. त्यावेळेस विर्दभातील सर्व जिल्हे, १९६० च्या महाराष्ट्राच्या पुर्नरचनेपूर्वी मध्य प्रदेशमध्ये होते.

**२.** दरम्यान कालावधीत विमुक्त जाती भटक्या जमातीचा स्वतंत्र प्रवर्ग महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक २१ नोव्हेंबर, १९६१ नुसार निर्माण करण्यात आला. या आदेशानुसार विमुक्त जातीच्या प्रवर्गात अनु. क्र. ४ वर कैकाडी जातीचा समावेश करण्यात आला परंतु तत्पुर्वी म्हणजेच, २१ नोव्हेंबर, १९६१ पुर्वी Part VII-A of the Seventh Schedule of the Bombay Reorganization Act, १९६० मध्ये दर्शविण्यात आलेल्या यादीनुसार विदर्भातील उपरोक्त जिल्ह्यांमध्ये कैकाडी या जातीचा समावेश अनुसूचित यादीत आहे.

**३.** केंद्र शासनाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या यादीमध्ये दर्शविण्यात आलेले क्षेत्रिय बंधन उठवून, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आदेश (सुधारित) कायदा, १९७६ क्र. १०८/१९७६ नुसार अनुसूचित जातीची सुधारित यादी प्रसिध्द केली . त्यामध्ये अनुसूचित जातीच्या यादीत अनु. क्र. २८ वर कैकाडी या जातीचा समावेश फक्त अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा नागपूर, वर्धा, यवतमाळ आणि चंद्रपूर (राजूरा तहसिल वगळता) या जिल्हयांमध्ये करण्यात आला.

**४.** राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांचा अहवाल क्र. १८/ जुलै २००६ मध्ये आयोगास शासनाचे सामाजिक न्याय विभागाचे पत्र क्रमांक विपआ -२००३/प्र.क्र.३७/मावक -५ दिनांक १५ ऑक्टोंबर २००३ दिनांक २.९.२००४ च्या प्राप्त पत्रानुसार कैकाडी समाजावरील क्षेत्रबंधन उठविण्याबाबतची माहिती व कार्यवाही करण्याबाबत मागणी करण्यात आलेली होती. त्यानुसार राज्य मागासवर्ग आयोगाने नागपूर, चंद्रपूर, व सोलापूर या जिल्ह्याच्या समाज कल्याण विभागास सर्वेक्षण करून माहिती मागविली होती ती खालीलप्रमाणे

**"संबंधित समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद, जिल्हा अकोला, यांचे अभिप्राय खालील प्रमाणे आहे.**

**१.** विदर्भातील कैकाडी समाजाचे विदर्भाबाहेरील कैकाडी समाजाशी बेटी व्यवहार आहेत.

**२.** अकोला जिल्ह्यामधील बहुतांशी कैकाडी समुहाचे पूर्वज हे विदर्भातील आहेत.

**३.** नोकरी पेशात असणारे किंवा मोठया व्यवसायाच्या दृष्टीने स्थायी झालेले लोक वगळता इतरांचा अद्यापही कायम ठाव ठिकाणा नाही.

**४.** सवर्ण हिंदू समाजात कैकाडी समाजास अद्यापही निम्न दर्जा आहे.

**५.** खेडयापाडयातून राहणारा कैकाडी समाज आजही गाढवावरून माती / रेती वाहून, डाले, टोपले विणणे / विकणे अशा स्वरूपाचे व्यवसाय करतो.

**६.** वरील करणास्तव कैकाडी जातीवरील क्षेत्रबंधन उठविण्यात हरकत नाही असे मत आहे.

**प्राप्त झालेल्या सर्वेक्षण अहवालमधील निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.**

१. व्यवसाय डुक्कर पालन, गाढव पालन, गाढवावरून माती / रेती वाहून नेणे, टोपले विणणे / विकणे. महिलासुध्दा हाच व्यवसाय करतात.

२. शिक्षणचे प्रमाण फारच कमी आहे व शैक्षणिकदृष्टया मागासलेले आहेत.

३. अजूनही समूहातील काही लोकांना गुन्हेगार समजतात.

४. आजही कैकाडी समूहातील काही लोकांना अस्पृश्य समजण्यात येते.

५. कैकाडी समूहातील बहुतांश व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी पाणी भरण्यास व मंदिर प्रवेशास मनाई केली जात नाही

आयोगाच्या दिनांक २९/११/२००५ रोजी झालेल्या बैठकित ठरल्याप्रमाणे आयोगाचे मा. सदस्य डॉ. श्रीमती भोईटे व मा. श्री गायकवाड यांनी कोल्हापूर जिल्ह्याची कैकाडी समुहाची क्षेत्रपाणी करून पुढील बैठकित त्यांनी क्षेत्रपाहणी अहवाल सादर करावा असे सर्वानुमते ठरले होते. त्याप्रमाणे आयोगाचे मा. सदस्य डॉ. श्रीमती भोईटे व मा. श्री. गायकवाड यांनी दिनांक ३/१२/२००५, रोजी कोल्हापूर जिल्ह्याची कैकाडी समुहाची क्षेत्रपाहणी केली, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. बाजीराव पाटील व त्यांचे सहकारी ही क्षेत्रपाहणीच्या वेळी उपस्थित होते. सदरहू क्षेत्रपाहणी अहवाल दिनांक २३/२/२००६ रोजी पुणे येथील आयोगाच्या बैठकित मा. सदस्या डॉ. श्रीमती भोईटे यांनी सादर केला.

**कैकाडी समुहाचे क्षेत्रपाहणी अहवालाचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.**

१. उर्वरित महाराष्ट्रातील जिल्हे व विदर्भ यामधील कैकाडी समुहांच्या लोकांमध्ये बेटी व्यवहार होतो, असे काहीजणांनी सांगितले तर काही लोकांनी बेटी व्यवहार होत नाही अशी उत्तरे दिली.

२. सदरील समुहातील बहुतांश व्यक्ती शैक्षणिकदृष्टया मागासलेले आहेत.

३. समुहाचा व्यवसाय वेताच्या बुटया, टोपल्या बनविणे असा आहे, काही व्यक्ती खाजगी, शासकीय / निमशासकीय सेवेत आहेत. आर्थिक व सामाजिक स्थिती बेताची आढळली, बहुसंख्य व्यक्ती दारिद्रयरेषेखालील जीवन जगतात, असे दिसून आले.

४. तसेच क्षेत्रबंधन उठवून विदर्भातील कैकाडी समुहाप्रमाणेच उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समुहास अनुसूचित जातीच्या सवलतीस पात्र ठरवावे, अशी उत्तरदात्यांची मागणी आहे.

या लोकांची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर असे वाटते की या समाजाला अनुसूचित जातीमध्ये समावेश करण्याची शिफारस शासनाकडे आयोगामार्फत करावी. म्हणजे दारिद्रय व आर्थिक दृष्टया खालावलेल्या या कैकाडी समाजाला सर्व भारतभर आपली उन्नती करून घेण्याची संधी मिळेल, असे मत मा. सदस्यांनी व्यक्त केले.

वरील बाबींबाबत आयोगाच्या .बापट यांच्या अध्यक्षतेखाली सखोल चर्चा झाली. मा. सदस्यांनी केलेला क्षेत्रपाहणी अहवालाचे वाचन केल्यानंतर अहवालावर सखोल चर्चा होऊन सदरहू अहवालास सर्वानुमते मान्यता दिली. **यास्तव कैकाडी समूहाचे क्षेत्रबंधन उठविण्यात यावे व त्यांचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्याची शिफारस केंद्र शासनाकडे करण्यासाठी आयोगाची एकमताने शिफारस आहे. तथापि हा समुह अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट होईपर्यंत त्यांच्या विमुक्त जातीच्या सवलती सुरू ठेवाव्यात.”**

७. **लक्ष्मण माने (उपरा कांदबरी) :-** लक्ष्मण माने यांच्या मते कैकाडी समाजात जात पंचायत अस्तित्वात होती (उपरा, पान क्र.32 ). कैकाडी समाजात लग्न ठरविताना नवऱ्या मुलीच्या मामाचा हक्क असतो. मामाला विचारल्याशिवाय मुलींच लग्न होत नाही. मामाला मावळखंड म्हणून सव्वा रुपयांपासून पंच ठरवतील तेवढा मान असतो. तो नवऱ्याच्या मालकांन द्यायचा असतो. मावळखंड दिल्याशिवाय मामा लग्नाला होकार देत नाही. मामाला होकार मिळाला नाही तर पंचायत बसते. (पान क्र.34)

**८. महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती (डॉ. एस.जी.देवगावकर) पान न. १८८ ते १९०.**

भारतातील अनेक राज्यात आढळणारी आणि महाराष्ट्रातही विविध जिल्हयांमध्ये पसरलेली ही जात असुन तिला वेगवेगळया भागात वेगवेगळया नावाने ओळखतात. कैकारी, कैकाडी, बरगंडी, येरुकला, कोरवा अशीही नावे आहेत. कैकाडी या शब्दाचा शब्दार्थ तामिळ भाषेत कयी म्हणजे हात आणि कुडे म्हणजे टोपली म्हणजे हाताने टोपल्या विणणारे असा होतो. त्यांच्या बोलीभाषेत तामिळ आणि तेलुगु शब्द आढतात. तामिळनाडु, तेलुगु भागात येरुकला किंवा कोरवा नावाची जात आहे. किट्स यांच्या मते कैकाडींना अरकॉट मध्ये कोरवार, कार्नाटकात कोरवा म्हणुन ओळखतात. मध्यप्रदेशाच्या नेमाड जिल्हयात ते आढळतात आणि ते आपण तेलंगणातुन, दख्खनमधुन आलो आहे असे सांगतात. ते विदर्भात, खानदेशात राहत असुन त्यांच्यात साडेवारा जाती असल्याचे सांगतात.

नेमाडमध्ये त्यांच्यात दोनच पोटजाती असुन त्यांना मराठा कैकाडी आणि फिरस्ती कैकाडी म्हणतात. नेमाड आणि खानदेशात त्यांच्यात फक्त दोनच कुळे असुन त्यात जाधव आणि गायकवाड ही दोन कुळे आहेत. नागपूर विभागात आणखी आंतर्विवाही पोटविभाग आढळतात.

त्यात कामाठी (ताडीची पाने व खेळणी विकणारे) भामटी (बाजारात चोरी करणारे), कुणबी (शेतकरी), टोकरीवाले (टोपल्या करणारे), बोरीवाले (विटा, दगड, गिट्टी वाहुन नेणारे) इ. कामाठी हा शब्द महाराष्ट्रात तेलुगु भागातून आलेल्यांसाठी वापरण्यात येतो. कुणबी आणि भामटी ही दुसऱ्या जातींची नावे होत. दक्षिणेकडच्या जिल्ह्यांमध्ये विदर्भात पातके, गायकवाड, जाधव, माने, कुमरे, जेष्ठी, काळे, दाने इ. परगोत्रविवाही कुळे आढळतात. एथनोव्हेन यांनी नऊ आंतर्विवाही विभाग सांगितले आहेत. (१) बोरीवले (२) ढुंताळे किंवा चोर (३) कामठी (४) काइजी (५) लमाण (६) माकडवाले (७) उर कैकाडी (८) वियाबासे (९) भामटा. जाधव हे राजपुतांचे आडनाव त्यांनी घेतले आहे.

जातीत, पोट-जातीत किंवा पोट-विभागात आंतर्विवाही (endogamy) आणि कुळांच्या स्तराला बहिर्विवाह (exogamy) हा प्रकार कैकाडींमध्ये आहे. कुळाच्या आत विवाह करता येत नाही. पत्नीच्या मोठया बहिणीशी विवाह होत नाही मात्र लहान बहिणीशी करता येतो. आईच्या भावाच्या मुलीशी (मामेबहिणीशी) किंवा वडिलांच्या बहिणीच्या मुलीशी (आतेबहिणीशी) विवाह करता येतो मात्र आईच्या बहिणीच्या मुलीशी (बहिणीशी) विवाह करता येत नाही. बहुपत्नी विवाहाला संमती असली तरी बहुतांश कैकाडी हे एकपत्नी विवाहच करतात. दुसऱ्या विवाहाला पहिल्या पत्नीची संमती आवश्यक असते. सहसा फार दुरच्या मुलीशी विवाह करीत नाहीत. गावातल्या / खेडयातल्याच मुलीशी विवाह करतात. लग्नानंतर मुलगी मुलाच्या घरीच रहायला जाते. पुर्वी वधूमूल्याची (Bride-price) पध्दती होती, मात्र आता नाही. घटस्फोट घेतो येतो. पंचायत समोर घटस्फोट घेतात व पती पंचायतीला दंड भरतो. कोर्टात जात नाहीत. न पटणे, भांडण, मूल न होणे, विवाहबाह्य संबंध यातुन घटस्फोट होतात. विधवा विवाहाला संमती असुन बहुधा पतीच्या लहान भावांशी विवाह करतात. तो अविवाहित असल्यास त्याचे प्रथम रुईच्या झाडशी लग्न लावतात.

कैकाडींच्या स्त्रियांचे त्यांच्या व्यवसायात महत्त्वाचे योगदान असल्यामुळे त्यांना कुटुंबात जवळजवळ पुरुषांच्या बरोबरीचे स्थान असते. स्त्रीचे पहिले बाळंतपण माहेरी होते. दाई किंवा अनुभवी स्त्री मदत करते. चाकूने नाळ कापुन तो खोलीतच एका कोपऱ्यात पुरतात. तो खड्डा दाई पाचव्या दिवशी भरते. जन्माचे अशौच (वृध्दी) सात दिवस पाळतात. बाराव्या दिवशी बारसे करुन नामकरण करतात. बाळाची माता त्या दिवशी शुध्द होते व सर्व कामात भाग घेऊ शकते. विवाह

घरची वडील माणसे ठरवितात. परंतु पळून जाऊन विवाह क्वचितच आढळतो. दुसऱ्या जातीत विवाह होत नाहीत. पूर्वी मुलींचे विवाह ८ ते १२ वर्षे वयात होत. मात्र आता १६ ते १७ वर्षे वयात आणि मुलांचे १८ ते २० वर्षे वयात होतात. मे आणि जून मध्येच जास्त विवाह होतात. साधारणपणे कुणब्यांप्रमाणेच पध्दती आढळते.

यात घटपूजा महत्त्वाची असते. पाण्याचे भरलेल्या मातीच्या दोन घडयांमध्ये नदीचे पाणी आणून त्यात पिंपळाची लहान फांदी टाकून घरी तांदुळाच्या ढिगावर ठेवतात. नंतर त्यांत आंब्याची पाने, सुपाऱ्या, हळद व थोडे पैसे (नाणे) टाकून त्यांची तोंडे कपडयाने बांधतात. त्यांस पाच वेढे सुताचे देतात. याला 'मगर माथन' म्हणतात. त्याच्या जवळ वधू-वरांना बसवून त्यांच्यावर उपस्थित सर्व तांदूळाच्या अक्षता टाकतात. त्याचवेळी अलिकडे मंगलाष्टके म्हणतात. वधूची आई त्यांच्या कपडयांची गाठ बांधते. याने विवाहविधी पूर्ण होतो. नंतर सर्वांना मेजवानी देतात. लग्नाचा खर्च वरपिता करतो.

कैकाडी मृतांना अग्नी देतात किंवा जमिनीत पुरतात. साधारणपणे १६ वर्षाखालच्या मुलांना पुरतात. मृत्यूचे अशैच १२ दिवस असते. मृताला घेऊन जाणारे पाच दिवस अशौच पाळतात. तिसऱ्या दिवशी घ्सरी स्वयंपाक होतो. तोपर्यंत अतर लोक अन्न पाठवितात. तेराव्या दिवशी घराची शुध्दी होते. भताचे दुधात केलेल्या पिंड मृताच्या नावे ठेवतात यालाच पिंडदान म्हणतात. नंतर सर्वांना जेवण देतात. वैशाखातल्या पहिल्या पंधरवाडयातल्या तिजेला (अक्षयतृतियेला) पूर्वज पूजा करतात.कैकाडी हिंदू असून सर्व हिंदू देवदेवातांची पूजा करतात. ते नागदेवतेची पुजा करतात व नागपंचमी करतात. खंडोबा, मरीमाता, वाघोबा यांची पूजा करतात. विठ्ठल, रखुमाई यांचीही भक्ती करु लागले आहेत. पोळा, दसरा, दिवाळी, होळी साजरी करतात. पंढरपूरला कैकाडी महाराज या संताचा मोठा मठ आहे.

टोपल्या बनविणे आणि दगड फोडणे हा त्यांचा परंपरागत व्यवसाय आहे. परंतु बांबूच्यापासून नव्हे तर कापूसाच्या झाडाच्या काडया, ताडाच्या व शिंदीच्या झाडांची पाने (Palm leaves) आणि विशिष्ट प्रकारचे गवत यापासून टोपल्या, झाडण्या बनवतात. दगड फोडणे, दगड, विटा, मुरुम, गिट्टी, रेती इ. वाहून नेणे हे काम दक्षिणेतले कैकाडी जास्त करतात. विदर्भात आढळणारे रान कैकाडी हे गुन्हेगारी करतांनाही आढळतात. गाढवांवर सामान लादून कैकाडी

फिरतात. ते दगडाचे पाटे व जाते करुन विकतात. भंडारा जिल्ह्यावरच्या इ.स. १८६७ च्या भंडारा सेटलमेंट रिपोर्टमध्ये लॉरेन्स म्हणतात की, कैकाडी हे व्यवसायाने चोर असून घरांच्या भिंतींना भगदाडे पाडून घरात घुसण्यात कुशल आहेत. मात्र बाहेर ते अन्य व्यवसाय दर्शवितात.

सामाजिक उतरंडीत कैकाडी हे महार, मांग व परधान यांच्या जवळ मागण्यात येतात. त्यांच्यात परंपरागत जातिपंचायत नाही. ते खेडयाच्या पंचायतीच्या सरपंचासमोरच आपले वाद नेतात. शिक्षणाला मुळीच महत्त्व नाही. साक्षरता नगण्य आहे. मुले-मुली १४ वर्षांची झाली की घरच्या व्यवसायाला लागतात. त्यामुळे शैक्षणिक सवलती, शिक्षण आणि नोकऱ्यातले आरक्षण इत्यादींचा ते लाभ घेत नाहीत. त्यांची आर्थिक परिस्थिती अजूनही फारच दारिद्रयपूर्ण असून भटकेपणा पुष्कळ प्रमाणात आढळतो.

**९. विमुक्तायन- लेखक श्री. लक्ष्मण माने महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : एक चिकित्सक अभ्यास (पान क्र. ५७ ते ७०)**

भारतामध्ये तामिळनाडू, आंध्र, केरळ, कर्नाटक, ओरिसा, मध्यप्रदेश, बिहार आणि महाराष्ट्र या राज्यांमध्ये कैकाडी ही भटकी जमात दिसून येते. तामिळनाडूत तिला कुरव अथवा कोरवा या नावने ओळखतात. तसेच आंध्र प्रदेशात यांना येरकुला असे म्हणतात. कर्नाटकामध्ये या जमातीस कोरवी, कोरवा किंवा बंजत्री म्हणून ओळखतात. महाराष्ट्रात व मध्यप्रदशात ही जमात कैकाडी म्हणुन ओळखली जाते. सिंदीच्या अथवा जंगलातील काही झाडांच्या फोकांपासून टोपल्या, कुरकुली, झाप, कणगी, चटया, इ. वस्तू तयार करुन गावगाडयात राहणाऱ्या कुळवाडयांना देऊन त्यांच्या बदल्यात धान्य घेऊन कैकाडी आपली उपजीविका करतात. कैकाडी भीक मागत नाहीत. परंतु सुपे, कणग्या डालगे इ. वस्तू दुरुस्त केल्याच्या बदल्यात भाकरी किंवा शेतकरी देईल ते अन्न घेतात. कैकाडी जमात आपल्याबरोबर नेहमी गाढवे पाळते. ही गाढवे त्यांचा संसार एका गावावरून दुसऱ्या गावाकडे नेण्यास उपयोगी पडतात. शिवाय गाढवावरुन माती व दगड वाहण्याचे काम करता येते. काही कैकाडी सणगरांना कुंच्या तयार करुन देतात. झाडांच्या मुळापासून तयार केलेल्या या कुंच्याचा उपयोग घोंगड्यांना खळ लावण्यासाठी होतो. त्यावरुन त्यांना कुंचीकोरवी असेही म्हटले जाते. उपजीविकेसाठी भटकताना जे जे व्यवसाय जमतील ते ते व्यवसाय कैकाडी

जमातीने आत्मसात केल्याचे दिसून येते. काही ठिकाणी या जमातीमधील लोक लहान माकडांना पकडून त्यांना शिकवितात व त्यांचा खेळ करुन दिखवितात, म्हणुन त्यांना माकडवाले म्हणतात.

अशा प्रकारे कैकाड्यांमध्ये पुढील प्रकार दिसून येतात: (१) चोर कैकाडी ऊर्फ फिरस्ते किंवा डोंटलमोर. (२) गाव कैकाडी, जे गावात राहतात पण बुट्टी, टोपल्या, कणगी करुन देऊन निरनिराळया ठिकाणी भटकत राहतात व पावसाळयाच्या दिवसांत काही दिवस राहण्यासाठी ते ज्या गावी स्थाईक झाले असतील तिथे येऊन राहतात आणि सुगी सुरु झाली की पुन्हा भटकतात. यांमधील जे कैकाडी वाजंत्री वाजवितात त्यांना बजंत्री किंवा सनादी कैकाडी म्हणून ओळखतात. (३) कुडची कैकाडी किंवा कुंचीवाले कैकाडी. (४) माकडवाले-यांनाच लालबाजारवाले किंवा गणसूर असे म्हणतात. (५) पामलोर-सापाचा खेळ करुन दाखविणाऱ्या कैकाड्यांना कर्नाटकात पामलोर म्हणून ओळखतात. असे कैकाड्यांचे निरनिराळे प्रकार दिसून येतात.

तंजावरकडील मराठी राजांनी लिहिलेल्या ‘कुरवंजी’ नाटकामध्ये राजघराण्यातील स्त्रियांना भविष्य सांगणारी, शकुन सांगणारी कुरत्ती स्त्री म्हणजे कैकाडिणीचे पात्र आहे. ती डोक्यावर पाटी घेते. पाठीला मूल बांधलेले असत. ती गावात शकुन सांगण्यासाठी व भविष्य सांगण्यासाठी फिरत असल्याचे दिसुन येते. आजही कैकाडी स्त्री याच स्त्रीप्रमाणे फिरत असल्याचे दिसून येते. त्याचप्रामणे कुरव कैकाडी समाजाची अशी धारणा आहे की, कैकाडी स्त्री ही आदिमातेचे रुप आहे. ती सर्व मातृदेवतांची माता आहे. मातृदेवतांचा उपासक पोतराज आपल्या एका गीतातून कैकाडिणीचे पुरातन काळापासून अस्तित्तव मान्य कारतो.

**कैकाड्यांची बोली भाषा :**

कैकाडी लोकांची भाषा म्हणून या भाषेस ‘कैकाडी भाषा’ असे आपण म्हणतो. परंतु ही द्रविड बोलींमधील एक प्रमुख बोली भाषा आहे व तिला ‘कुळूर’ भाषा असे म्हटले जाते. कैकाडी जेव्हा ही भाषा बोलतात तेव्हा ती दुसऱ्याला काहीच समजत नाही. आज चालू असलेली कैकाड्यांची बोली भाषा ही मूळची तमिळ भाषा आहे. कारण ह्या भाषेची रचना, व्याकरण व बोलण्याची पध्दत ही सर्व तमिळ भाषेबरोबर जुळताना दिसते. कारण महाराष्ट्रातील एखाद्या कैकाडयाबरोबर तमिळ भाषिक बोलू लागला तर त्या कैकाड्यास किमान ऐंशी टक्के भाषा तरी समजते असे कैकाडी समाजाचे कार्यकर्ते मलाजुरे सांगतात यावरुन कैकाडी समाजाची भाषा ही तमिळ आहे. फार प्राचीन काळापासून कैकाडी हे भटकत आल्यामुळे ते ज्या ज्या प्रांतात गेले, त्या

त्या भागातील प्रमुख भाषेतील शब्द त्यांनी आपल्या भाषेत समावून घेतले आहेत. या भाषेमध्ये तलगू, मल्याळम, कानडी आणि मराठी या सर्व भाषांतील शब्द आलेले आहेत. या भाषेमध्ये तेलगू, मल्याळम, कानडी आणि मराठी या सर्व भाषांतील शब्द आलेले दिसून येतात.

कुरव म्हणजे कैकाडी हे निरनिराळया प्रांतात आपले पोट भरण्यासाठी शेकडो वर्षे भटकत आहेत. त्यामुळे त्या त्या राज्यातील लोकजीवनाचे ते एक महत्त्वपूर्ण भाग बनले आहेत. परंतु आज अखेर त्यांनी आपली मूळ भाषा सोडलेली नाही. आजही ते प्रामुख्याने त्यांच्याच भाषेमध्ये बोलत असतात. कैकाडी ज्या ज्या प्रांतात राहतात त्या त्या प्रांतातील लोकभाषा ते अतिशय उत्तम रीत्या बोलतात व त्यांच्या गोड व लोकांवर छाप पाडणाऱ्या बोलण्याच्या कौशल्यामुळे ते गावामध्ये भविष्य सांगणे व शकुन सांगण्याचा उद्योग करु शकतात. कैकाडी विशेषत: गाव कैकाडी जमातीमध्ये लोकगीते, पारंपारिक गीते ऐकावयास मिळत नाहीत, परंतु कुंचकोरवी अथवा माकडवाले यांच्या कुरव भाषेमध्ये अनेक प्रकारची गाणी, लोकगीते असल्याचे दिसून येते. लग्नासारख्या संमारंभात ही लोकगीते म्हटली जातात. महाराष्ट्रामध्ये भटक्या विमुक्त समाजाचे कार्य करणारे व मराठीमधील साहित्यिक लक्ष्मण माने यांच्या गाजलेल्या ‘उपरा’ या आत्मकथनपर ग्रंथात अनेक वाक्ये ही कैकाडी बोलीमधील आहेत. ती विचारात घेता आपणांस कैकाडी भाषेचे स्वरुप समजून येईल.

कैकाडी जमात ही मातृदेवता मानणारी जमात आहे. स्त्री-देवतांचे प्रस्थ यांच्यात मोठया प्रमाणात दिसून येते. जवळजवळ सर्वच पूजाविधी व जत्राखेत्रा ह्या स्त्री-देवता प्रसन्न करुन घेण्यासाठीच केलेल्या दिसतात. शडीदेवी (वृक्षदेवता)ख् उरअम्मा (लक्ष्मीदेवी), वासलअम्मा (दारदेवी), फिरस्ती अम्मा, आरकुल अम्मा (जलदेवी), म्हशायताई अम्मा, देव्हरं अम्मा (कुलदेवी) या देवातांना कैकाडी भजताना दिसतात व या सर्व देवींचे नवस फेडण्याची पध्दतीही शडीदेवी किंवा आंगणजत्रा व सटवीपूजनाच्याप्रमाणेच असतात.

**जातिबहिष्कृत करणे :**

कैकाडी समाज कैकाडी म्हणून अत्यंत बंदिस्त स्वरुपाचा आहे. जमात-पंचायत व जमातीचे आजअखेर घालून दिलेले रुढ नियम जर जमातीच्या सदरस्याकडून मोडले गेले तर त्याला जमातीतून बहिष्कृत केले जाते. उदाहणार्थ एखाद्याने सगोत्री विवाह केला असेल त्या पुरुषास शिक्षा दिली जाते. स्त्रीला शिक्षा देण्याची पध्दत नाही. डुकराची विष्ठा, मलमूत्र गोळा करून एका टोपलीत

भरतात. एक लहानशी झोपढी बांधतात. या झोपढीस समोरासमोर अशी दोन दारे असतात. ज्याने चूक केली असेल त्याच्या डोक्यावर डुकराच्या मलमूत्राने भरलेली टोपली देतात. या टोपलीत इतर लोक पाणी ओतावयास सुरूवात करतात. त्यामुळे टोपलीतील सर्व घाण ज्याच्या डोक्यावर असते त्याच्या अंगावर ओघळत असते. अशा अवस्थेत त्याची गावभर मिरवणूक काढतात. मिरवणूक झाल्यावर शिक्षेसाठी मुद्दाम बांधलेल्या झोपडीच्या एका दरवाजातून आत नेतात व दुसऱ्या दरवाजाने बाहेर काढतात. तो बाहेर आला की झोपडी पेटवून देतात. झोपढी जळल्यानंतर तो शुध्द झाला असे मानले जाते. अशा प्रकारची गोष्ट कैकाडी समाजात चुकूनच घडते. जर कैकाडी जमातीमधील व्यक्तीने परजातीतील व्यक्तीशी संबंध किंवा सोयरीक केली तर तिला जमातीमधून बहिष्कृत करतात. जर तिने जमातीची माफी मागितली नाही तर जमात ती व्यक्ती मेली असे समजून तिचा दिवस घातला जातो. कैकाडी जमातीमध्ये जातीच्या रक्षणासाठी म्हणून जरी जमातीबहिष्कृत करण्याचे नियम असले तरी पंचानी निर्णय दिल्यानंतर बाहेरच्या कोणत्याही व्यक्तीस कैकाडी समाजात बरोबरीचे स्थान दिले जाते. अशा स्त्री-पुरुषांना या जमातीध्ये घेण्याच्या पध्दतीस ‘उरसांड घेणे’ असे म्हणतात. या उरसांडामध्ये पुरुष असेल तर त्यास ‘देल्लक’ म्हणतात व स्त्री असेल तर तिला ‘पूकी’ असे म्हटले जाते. अशा उरसांड व्यक्तीस जो कैकाडी घेणार असेल तो जर कवाडी असेल तर त्याने त्या व्यक्तीस सातपाडी कैकाड्याच्या मांडीवर द्यावे लागते व अशा रीतीने त्याचा नवा जन्म झाला असे मानण्यात येते. त्या व्यक्तीने ज्याने मांडीवर घेतले असेल त्याच्या नावाने करदोडा बांधावा लागतो. अशा प्रकारे विधिपूर्वक बाहेरील व्यक्तीस जमातीमध्ये घेतले जाते व त्याच्या मुलांना जमातीची मान्यता मिळते. अशा प्रकारे मान्यता मिळाल्यावर या जमातीत उरसांड झालेली स्त्री किंवा पुरुषास जमातीच्या इतर सदस्यांप्रमाणे जमातीचे सर्व अधिकार व मान मिळतात.

**कैकाडयांची जमात — पंचायत**

कैकाडी जमातीमध्ये जमातीच्या चालीरितींविरुध्द किंवा जमातीचे नियम मोडणारे काही गुन्हे घडले तर त्यासाठी जमात — पंचायत म्हणजेच कैकाडी जमातीचे न्यायालय असते. कोणताही गुन्हा घडला असेल किंवा न्या पाहिजे असेल तर जमातीमध्येच निवाडा करण्यात येतो. कोर्ट किंवा पोलिसांकडे तक्रार घेऊन जाणे जमातीमध्ये गुन्हा समजण्यात येतो. बायको पळविली, ‘सुल्ल्या’ ची ठरलेली रक्कम दिली नाही, कोणी करणी केली, देव घातला, देणे बुडविले अशासारखे खटले

जमात-पंचायतीसमोर येतात. एखाद्या व्यक्तीने परजातीच्या व्यक्तीशी लग्न केले, जमातीमधील विधवेशी अनैतिक संबंध ठेवले किंवा एकाच गोत्रामध्ये लग्न केले तर ते जमातबहिष्कृत कृत्य म्हणून त्या व्यक्तीस शिक्षा किंवा दंड देण्यासाठी ही जमात-पंचायत बसविली जाते. कैकाडी समाजामध्ये जमात-पंचायत प्रभावी दिसून येते.

जमात-पंचायतीमध्ये न्याय देणाऱ्या व्यक्तीस 'ओकाळे' असे म्हणतात. ही व्यक्ती वसाहतीमध्ये वयोवृध्द, अनुभवी व जमातीवर प्रभाव असणारी अशी असते. तिच्या मदतीला पंच असतात. तसेच वादी व प्रतिवादी आपले वकील किंवा प्रतिनिधी नियुक्त करतो. नेहमी न्यायालयात ज्याप्रमाणे वकील बाजू मांडत असतात तसेच हे प्रतिनिधी आपल्या अशिलाची बाजू मांडतात. यांना कैकाडी मजात 'कै' असे म्हणते. समजा एखादा वाद निर्माण झाला व त्या व्यक्तीस खरे-खोटे करुन घ्यावयाचे आहे, म्हणजेच प्रकरण पंचायतीसमोर आणायचे असेल तर वादीचा पक्ष प्रतिवादी पक्षास 'दुवाय' घालतो. दुवाय म्हणजे शपथ घालणे. दुवाय घातली की प्रतिवादीला कोणत्याही स्थितीमध्ये पंचांच्यासमोर यावेच लागते. कारण 'दुवाय' मोडली तर त्यास जातिबहिष्कृत करण्यात येते. वादी व प्रतिवादी आपआपले जमीनदार नियुक्त करतात. जमीनदारांच्या हातावर रुपया ठेवला जातो. त्यास 'चिप्पा मारणे' असे म्हणतात. जोपर्यंत खटल्याचा निकाल लागत नाही तोपर्यंत जामीनदार बदलता येत नाही. त्याने त्याच पक्षाकडे राहिले पाहिजजे. निकाल लागल्यानंतर जामीनदाराकडील बदलता येत नाही. त्याने त्याच पक्षाकडे राहिजे पाहिजे. निकाल लागल्यानंतर जामीनदाराकडील रुपया पक्षाकाराकडे परत येतो. त्यांच्या हातावर पाणी घातले जाते व त्यांना जबाबदारीतून मुक्त करण्यात येते.

'ओकाळे' असलेले पंच, जामीनदार या सर्वांचे जेवणखाण, दारु या सर्वांसाठी पाहिल्यांदा वादी-प्रतिवादींना खर्च भरावा लागतो. याला थळभरणी असे म्हणतात. तरच पंचायतीच्या कामास सुरूवात होते. देन्हीकडील वकील बाजू मांडतात व शेवटी ओकाळे दोन्ही बाजू ऐकून घेऊन निर्णय देतात. 'निर्णय मान्य आहे काय?' म्हणून विचारले जाते. जर निर्णय दोघांनाही मान्य झाला तर खटल्याचा निकाल लागतो. परंतु जर एखाद्यास निर्णय मान्य नसेल तर त्या पंचायतीचा झालेला खर्च भागवून तो खटला पुढच्या स्थळी वर्ग करतात, म्हणजे दुसरीकडे जिथे कुठे जमात असेल तिथले स्थळ दिले जाते व त्या ठिकाणी परत तिथे असणाऱ्या 'ओकाळयांसामोर' खटल्याचे काम सुरु होते. काही वेळेला निव्वळ ईर्षा निर्माण झाल्यामुळे तेराचौदा ठिकाणी खटला खलविला गेल्याची कैकाडी जमातीमध्ये उदाहरणे आहेत. यात वादी-प्रतिवादीस इतका खर्च येतो की, नंतर ते

काहीतरी करुन पंचांना मिटविण्याची विनंती करतात व खटला मिटविण्यात यतो. पंच वादी व प्रतिवादींकडून जमलेल्या लोकांसाठी जेवणाचा व इतर खर्च घेतात. यामध्ये बसणाऱ्या सर्वांना दारु प्यावी लागते. कारण पंचामध्ये लहानमोठा असा भेद नसतो. लहान मुलांनाही दारु पाजली जाते.

**१०. गांव-गाडा – (लेखक श्री. त्रिंबक नारायण आत्रे)**

वास्तविक लग्न धर्माचार्यानी लावावयास पाहिजे परंतु कोल्हाटी, कुंचीवाले (कैकाडी) हिंदू जाती कोणत्याही धर्मचर्याकडून लग्न न लावता जातपंचाकडून लावितात. ( पान क्र.४८)

कैकाडी गांवाबाहेर उघड्या पटांगणांत झाडाच्या सावलीला उतरतात. त्यांची चारपांच किंवा अधिक बिऱ्हाडे असतात. दर बिऱ्हाडाला दोन तीन गाढवे आणि शेळ्या, कोंबड्या कुत्री असतात ते पिटकुल, करंजी, तरवड वैगरेची फोंक काढून त्यांच्या पाट्या कणगी, कोंबड्याचे डाले किंवा झाप करतात आणि विकतात. हि जात भीक मागणारी व चोरटी आहे. भीक मागताना ते घराची कुलुपे काडून चोरी करतात. ज्या घरांत थोडी माणसे असतील त्याच्या मागच्या दारी काही कैकाडणी बसतात व काही जणी पुढच्या दारी भांडून एकमेकांना रक्त निघेपर्यंत मारतात. घरातील माणसे तंटा तोडण्याला दाराबाहेर गेली म्हणजे मागच्या दारी बसलेल्या कैकाडणी लागेल ते घेऊन पसार होतात. पिके, धान्य, शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या चोरण्यात त्यांचा हातखंडा आहे. कुचेवाले उर्फ माकडवाले हि कैकाडीची पोटजात आहे. ते गावाबाहेर सूरड नावाच्या गवतांच्या पालात राहतात. त्यांची दहा बारा बिऱ्हाडे एकमेळाने असतात. माकडाचे खेळ करतात. त्यांच्या बायका बायकांना गोंधतात. शिंदीचे खुळखुळे विकतात, व सुपें टोपली फोकाट्यांनी संधीतात. बायका, पुरुष, पोरं गावात तुकडे ए शेतात धान्य मागतात. (पान क्र. ११४-११५) कैकाडी हिंदू जाती डुकरे पाळतात.

# प्रकरण चौथे

# लक्षगट चर्चेद्वारे संकलित मानववंश शास्त्रीय माहिती

## *कैकाडी समाज लक्षगट चर्चा - अहवाल मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व खान्देश विभाग*

कैकाडी समाजाची सामाजिक परिस्थिती, त्यांच्या रूढी, परंपरा, चालीरीती, परस्पर असणारे संबंध, धार्मिक प्रथा, बोलीभाषा, मराठवाड्यात आणि पश्चिम महाराष्ट्रात राहणारा कैकाडी समाज व विदर्भात राहणारा कैकाडी समाज कोणत्या प्रकारे समान आहे, मानववंशशास्त्रीय दृष्टीकोनातून विविध माहिती जाणून घेण्यासाठी मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, आणि बीड जिल्ह्यातील

विविध गावात घेण्यात आलेल्या लक्षगट चर्चा व प्रत्यक्ष पाहणी दरम्यान खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

## १. कैकाडी समाजातील आडनावे

कैकाडी समाजामध्ये प्रामुख्याने जाधव, गायकवाड, माने ही मूळ आडनावे मोठ्या प्रमाणात दिसून येतात. त्याचबरोबर शामगिरे, सपटसर, उतरसर, पवार, कोरवी, बजंत्री, देवगिरे, कतराळे, सातपाडे, मेंडके, फुलारी, देशमाने, सपट, गजरे, कैवाडे, कवाडे, मुळे, कोरवी, सिंधी, शिंदे, चौगुले, वाजंत्री, संगनाळे, नरगुंडे, बुनांद्रे, जिस्टे, भामरे, निष्ठुरे, कवाडी, बिजले, दिष्टे, जुमालसर, लोडे, काडे, हजारे, पाटोळे, कांबळे, नागोर, मानके इत्यादी आडनावे दिसून येतात. अहमदनगर जिल्ह्यातील हंगा या गावातील चर्चे दरम्यान असे सांगण्यात आले कि राजपूत, घाडगे, शिंदे, काळे हे ठराविक गावात कैकाडी समाजाचे लोकांनी स्वतः हून नावे लाऊन घेतली आहेत. तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी या शहरातील चर्चे दरम्यान कोरवी, चौगुले, सुखसारे, भंगारे, कानंगले, संगनाळे हे नेहमीच्या आडनावा व्यतिरिक्त आडनावे दिसून आली.

## २. उपजात/पोटजाती

कैकाडी समाज हा महाराष्ट्रामध्ये विविध जिल्ह्यामध्ये पसरलेला असून तिला वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या नावाने तसेच व्यवसायावरून सुद्धा ओळखले जाते. कैकाडी समाजातील विविध व्यवसायावरून त्यांच्या उपजाती पडलेल्या दिसून येतात. त्या खालीलप्रमाणे आहेत:-

अ) **गाव कैकाडी :-** काड्या गोळा करून किंवा जंगलातील शिंदीच्या फोकापासून, निरगुडीच्या झाडाच्या फोकापासून टोपल्या, कणगी, पाट्या, ताट्या विणणे आणि बाजारात त्यांची विक्री करणारे कैकाडी लोकांना गाव कैकाडी म्हणून संबोधले जाते. गावात राहून पिढीजात पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या कैकाड्यांना गाव कैकाडी म्हणतात. गाव कैकाडी हे कैकाडी समाजातील उच्च लोक म्हणून सुद्धा ओळखले जातात.

आ) **पामलोर** :- पामलोर हि कैकाडी समाजाची पोटजात आहे. "पाम म्हणे साप" सापाचे पिंगी वाजवून खेळ करणारे किंवा सापाला दाखवून भिक मांगून आपला उदरनिर्वाह भागविणारे कैकाडी यांना पामलोर कैकाडी म्हणून संबोधले जाते.

इ) **दोन्तले/धंतोळे/चोर कैकाडी :-** चोऱ्या करून आपला उदरनिर्वाह भागविणारे कैकाडी यांना दोन्तले, धंतोळे किंवा चोर कैकाडी म्हणतात. चोर कैकाडी हे सतत भटकंती करतात. यांना फिरस्ते कैकाडी असे सुद्धा म्हणतात.

ई) **कुंचीकोरवी :-** कुंची किंवा झाडू-केरसुनी बनवून त्यांची बाजारात विक्री करून आपला उदरनिर्वाह भागविणारे कैकाडी लोकांना कुंचीकोरवी म्हणतात.

उ) **कोतीकुळू/माकडवाले कैकाडी:-** कोती म्हणजे माकड. माकडांना प्रशिक्षण देवून माकडांचे खेळ करणारे कैकाडी समाजाला कोतीकुळू किंवा माकडवाले कैकाडी असे म्हणतात. माकडवाले कैकाडी हे जंगल भागात मोठ्या प्रमाणात वास्तव्य करताना दिसून येतात.

संपूर्ण महाराष्ट्रामधील कैकाडी समाज हा एकच असून फक्त व्यवसाय व भागानुसार त्याला वेगवेगळे नावे पडली आहेत असे सांगण्यात आले.

## ३. कैकाडी समाजाची पारंपारिक व्यवसाय

कैकाडी समाजातील लोक अजूनही पिढीजात परंपरागत व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह भागविताना आपणास दिसून येतात. प्रामुख्याने खालील प्रमाणे कैकाडी समाजातील लोक व्यवसाय करतात.

अ) **बांबु व्यवसाय/विणकाम:-** वडिलोपार्जित चालत आलेला बांबु व्यवसाय कैकाडी समाजामध्ये पुर्वी पासून मोठया प्रमाणात केला जातो. डोंगरावर, जंगलामध्ये, रानामध्ये वाढलेला बांबु, शिंदीचे फोक, निरगुडीच्या झाडाची फोक, कवळीची फोक/बांबू आणून त्यापासून झाप, साध्या टोपल्या, ताट्या, बुट्टया, पाटया, डालग्या आणि कणग्या तयार करत. पूर्वी शेतात पिकलेले काढल्यानंतर शेतकऱ्यांना धान्य साठविण्यासाठी मोठया कणग्याची आवश्यकता असते. कणग्या आकाराने मोठया असल्याने एका जागी तयार करुन शेतकऱ्यांच्या घरी नेऊन देणे शक्य होत नसे, त्यामुळे शेतकरी कैकाडी लोकांना कणग्या विणण्याची जागा तयार करून देत आणि कैकाडी लोक त्या ठिकाणी जाऊन कणग्या विणत

असत. पूर्वी शेतकरी त्या मोबदल्यात अन्नधान्य देत असत. आता रोखीच्या बदल्यात विक्री केली जात होती. तसेच झाडू/केरसुनी बनवून त्यांची विक्री करणे हा पण व्यवसाय कैकाडी समाजातील लोक करतात. बांबुपासून विविध वस्तु बनवून विक्री करण्याचा व्यवसाय आजच्या तंत्रज्ञानाच्या आणि प्लास्टिकच्या युगामध्ये लोप पावत चालला आहे.त्यामुळे घरातील स्त्रिया खुरपणी, मजुरी तर पुरुष मंडळी हे मजुरी करून आपला उदरनिर्वाह भागवत आहेत.

आ) **वराहपालन/ डुक्कर(फँड्री) पालन:-** कैकाडी समाजाची ओळख सांगाणारा, समाजाला ओळख देणारा हा व्यवसाय आहे. कैकाडी म्हटलं की सर्वात प्रथम बाब जी डोळयासमोर येते ती म्हणजे त्यांचे डुक्कर पाळणे आणि डुकराचे मांस खाणे. कैकाडी समाजामध्ये डुक्कर पालन हा प्रमुख व्यवसाय मानला जातो. डुक्कर पालन करणे त्यांच्याकरीता दुहेरी फायद्याचे आहे. डुकराचे मांस कुटूंबाच्या खाण्यात देखील येते तसेच मांसाची विक्री करुन मिळालेल्या पैशातुन उदरनिर्वाह होतो. पूर्वी ज्या प्रमाणात डुक्कर पाळणे किंवा पाळलेले डुक्कर मारून खाणे याचे प्रमाण होते त्या तुलनेने आत्ता कमी प्रमाणात व्यवसाय चालू आहे. अनेकदा ६०-७० रुपये किलो ने डुकराचे मांस विकायला बाजारात ठेवले जाते. कैकाडी समाजा अंतर्गत डुकरांच्या मासांची देवाण-घेवाण होत होती. तसेच काही ठिकाणी डुकराची लीद/शेण शेतीसाठी पूरक असल्यामुळे ती साठवणे आणि ते शेतकऱ्यांना विक्री केली जाते. कैकाडी समाजाकडे असणारी डुक्कर संकरित स्वरुपाची नाहीत. हि डुक्करे गावात हिंडून जगणारी डुक्करे असतात, विशिष्ट कुटुंबांची एक विशिष्ट खुण असते. डुकराचा अर्धा कान कापलेला असतो, शेपूट अर्धी कापलेली असते, कान मधून चिरला जातो, अर्धा कान व अर्धी शेपूट कापलेली असते इत्यादी खुण केल्या जातात. वरील खुणाच्या सहाय्याने कोणत्या कुटुंबांची कोणती डुक्करे आहेत, हे कळते. या खुणा जेव्हा प्रसूत होते, तेव्हा केल्या जातात. यावरून आपल्या मालकीची डुक्करे किती व कोणती हे त्यांना कळतात. गावातील विरोधामुळे डुक्कर पाळणे हा व्यवसाय बंद होत चालला आहे. डुक्करे पाळणे हे अस्वच्छतेचे लक्षण म्हणून इतर लोक पाहतात.

इ) **गाढवपालन/ गाढवाच्या सहाय्याने मजुरी:-** कैकाडी लोक पूर्वी गाढव हा पाळीव प्राणी म्हणून पाळत असत. कैकाडी समाज हा कायमस्वरूपी एका जागी स्थायिक नसल्याने नेहमी

भटकंती करत असत, अश्यावेळी गाढवाच्या सहाय्याने एका गावाहून दुसऱ्या गावाला जाण्यासाठी याचा उपयोग होत. त्याचबरोबर मजुरी करण्यासाठी या गाढवांचा उपयोग होत उदा. रस्त्यावर मुरूम, खडी, वाळू माती टाकणे किंवा वाहून नेणे, तलावांना बंधारा घालण्यासाठी मुरूम, माती उचलणे किंवा खड्डे खणणे अशी जड ओझी वाहण्याची कामे करत असत. कमी वेळेत जास्त काम, हे आधुनिक साधनांमुळे शक्य होते. त्यामुळे याही व्यवसायाचा ऱ्हास होत चालला आहे.

ई) **वाजंत्री/बँड व्यवसाय:-** सातारा, सांगली, कोल्हापुर या भागात कैकाडी समाज वाजंत्रीचे काम करत असत. कलाट, ढोलक, ट्रमपेट, पडघम, बडा ढोल असे अनेक प्रकारचे वाद्य कैकाडी समाजामध्ये वाजवली जातात. लग्न, धार्मिक कार्यक्रम, गावातील जत्रा किंवा इतर कोणत्याही मंगल प्रसंगी सुपारी घेऊन वाद्य वाजविण्याचा व्यवसाय करतात. तसेच त्यांना खेडेगावातील संगीतकार असे सुद्धा म्हटले जाते.

अश्याप्रकारे कैकाडी समाजामध्ये पारंपारिक व्यवसाय केले जातात. त्याचबरोबर प्लास्टिक वस्तूंचा मोठ्या प्रमाणात वापर, वराह पालन साठी असलेला विरोध यामुळे समाजाची पारंपारिक व्यवसायांचा ऱ्हास होत आहे. त्यामुळे कैकाडी समाजातील लोक मजुरी करणे, गवंडी काम, ऊस तोडणी, ओझे उचलण्याची कामे इत्यादी कामे करून आपला उदरनिर्वाह भागवितात.

## ४. स्थलांतर

महाराष्ट्रात कैकाडी समाज हा सर्व जिल्ह्यामध्ये आढळून येतात. कैकाडी समाजाच्या घेण्यात आलेल्या लक्षगट चर्चे दरम्यान, कैकाडी हे मुळचे कर्नाटक, मध्यप्रदेश, तामिळनाडू व आंध्रप्रदेश येथील मूळ रहिवासी असून तेथून महाराष्ट्रात स्थलांतरित झाले असावेत असे सांगण्यात आले. त्यांच्या कैकाडी भाषेमध्ये कानडी आणि तेलगु शब्दांचा भरणा दिसून येतो. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी व्यवसायासाठी हा समाज स्थलांतरीत झालेला दिसून येतो. कैकाडी समाज हा एकाच ठिकाणी वास्तव्य करत नव्हते. व्यवसायासाठी गावी-गाव फिरस्ते स्थलांतर झाल्याचे दिसून येते. कैकाडी समाज कायम फिरस्ती असल्यामुळे कैकाडी समाज कायम गावाच्या बाहेर किंवा वेशीबाहेर आपले वास्तव्य करत असलेले दिसून येते. कैकाडी समाजाची स्वत्रंत वस्ती असल्याचे मोठ्या प्रमाणात सर्वेक्षण दरम्यान दिसून आले.

## ५. कैकाडी शब्दाचा अर्थ

कै म्हणजे हात आणि काडी - म्हणजे काडीकाम करणारे लोक. हाताने गवत, बांबू कापून त्याच्या वस्तू बनवून उदरनिर्वाह करणारे व्यावसायिक म्हणजे कैकाडी होय. कैकाडी समाजाला कर्नाटक मध्ये कोरवी, आंध्रप्रदेश मध्ये येरकुला तर मध्यप्रदेश व महाराष्टामध्ये कैकाडी म्हणून ओळखला जातो. कैकाडी समाज हा महाराष्ट्रामध्ये सर्व जिल्ह्यामध्ये व्यवसायामुळे स्थलांतरित झालेला आहे. कैकाडी समाजाचा मुख्य व्यवसाय हा डाले, टोपले विणणे हाच आहे. परंतु विविध ठिकाणी उदरनिर्वाह भागविण्यासाठी वराहपालन, गाढवाच्या साह्याने माती वाहने, मजुरी करणे असे विविध व्यवसाय करत असलेले दिसून येतात. व्यवसायावरून त्यांना उपजाती पडलेल्या दिसून येतात.

## ६. कैकाडी समाजाची बोली भाषा

कैकाडी समाजाची कैकाडी हीच बोली भाषा आहे. कैकाडी भाषेला लिपी नाही. प्रामुख्याने त्यांची भाषेमध्ये तेलगु आणि कन्नड भाषेचे मिश्रण असलेले दिसून येते. सद्य स्थितीमध्ये इतर समाजाच्या संपर्कात आल्याने मराठी भाषा मोठ्या प्रमाणात बोलली जाते. कैकाडी समाजातील लोक आपापसात बोलण्यासाठी कैकाडी भाषेचाच वापर मोठ्या प्रमाणात करताना दिसून येतात. कैकाडी समाजातील वरिष्ठ/जुन्या व्यक्तींना पूर्णपणे कैकाडी भाषा बोलता येते परंतु सद्याची तरुण पिढी कैकाडी भाषा कमी बोलते. तर काही तरुण बोलतच नाही. कैकाडी भाषा सार्वजनिक ठिकाणी बोलण्यास संकोच करतात कारण आपली कैकाडी भाषा बोलणे म्हणजे मागासलेपणाच लक्षण आहे असे ते मानतात. शाळेत लहान मुलांना मराठी भाषा व घरात कैकाडी भाषा यांमुळे त्यांना शाळेत मराठीतून शिकविलेले सुरुवातील समजत नाही. त्यामुळे इतर मुलांच्या तुलनेत शैक्षणिकदृष्ट्या हि मुले मागास राहतात. सद्यस्थितीत नवीन पिढी कैकाडी भाषा बोलतच नाही, त्यामुळे हि भाषा लोप पावेल, असा प्रश्न निर्माण होतो.

## ७. पारंपारिक कला कौशल्य

कैकाडी समाजामध्ये विविध कला कौशल्य दिसून येतात. सिंदी, निरगुडी इत्यादी झाडांच्या फोकांचा वापर करून परंपरागत धान्य साठवण्याच्या कणग्या, डाले, झाप, साध्या टोपल्या, पाट्या, बुट्ट्या, ताटी इत्यादी वस्तू बनवने, बेंड वाजविणे (वाजंत्री व्यवसाय करणारे कैकाडी समाज),

माकडांचा खेळ करणे, शिकार करणे इत्यादी कला कौशल्य कैकाडी समाजाच्या लोकांमध्ये अंतर्भूत असलेली दिसून येतात. ख्वल्ली (विळा), कोयता या अवजाराच्या सहाय्याने कणगी, पाट्या. डाले, टोपले विणणे हे मुख्य कौशल्य कैकाडी समाजातील पुरुष तथा महिला मंडळ यांच्या मध्ये परंपरागत आलेले दिसून येते. या व्यासायाद्वारे कैकाडी समाज आपला उदरनिर्वाह भागवितो.

## ८. कुलदेवता

कैकाडी समाजामध्ये रेणुका देवी म्हणजेच यल्लम्मा, पालीचा खंडोबा, जेजुरीचा खंडोबा, फिरस्ती आई (फिरंगी आई), तुळजापूरची तुळजाभवानी, कानिफनाथ मढी, मरिमाता, वाघजाई, महाकाली, झाडांचा देव/रानाचा देव यालाच फाल्ददेऊर असेही म्हणतात, येडाई इत्यादी कुलदेवता आहेत. या शिवाय कैकाडी समाज इतर अनेक देव मानतात आणि पूजले जातात. कैकाडी समाज हा प्रामुख्याने फिरस्ती देवी यांना मोठ्या प्रमाणात मानतात. फिरस्ती देवीला आखाड/आषाढ महिन्यात पाट (शेळी), बकरे, कोंबडा यांचे बळी देऊन वनभोजन केले जाते. कैकाडी समाज व्यवसाय संदर्भात भटकंती करत असला तरी अश्या कार्यक्रमाच्या वेळी सर्व समाज एकत्र येऊन कुलदेवीची पूजा करतात. कैकाडी समाज हा हिंदू रीतीरिवाज प्रमाणे इतर हि सण, उत्सव देखील साजरे करतात. कैकाडी समाजातील लोकांना मंदिरात प्रवेश नसायचा बाहेरूनच दर्शन घ्यावे लागत असे.

## ९. कैकाडी समाजातील कुळ

सातपाडे आणि कवाडे हे दोन मुख्य कुळ कैकाडी समाजामध्ये आहेत असे सांगण्यात आले. तसेच इतर कुळी हे पुढीलप्रमाणे आहेत – दिष्टे, लोढे, मनाडे, शामगीरे, देवगिरे, दोन्तले, पटाले, नागोरे, डाने, सपटसरे, उतरसरे, तिरकाळे, मानपाडे, मदनसर, जलमसर, पतके, निर्गुंदा, नळगुंद्रे, हवाले, जलगुंद्रे, मछीन्द्र, चिखलकर, सुजितराय, खालजीत्रे, मधु, सोनसर, डांगे, बुलाजरे, पालीसर, कटोरे, मिए, कायसो, लालबजारी, नरगुंदे, काडे, बिजलीसरे, अंगसो, बुलाकरे, कायसरे, रामगिरे, गजरे, चीतपुत, डाने इत्यादी कुळे चर्चे दरम्यान कैकाडी समाजाच्या लोकांकडून सांगण्यात आले.

## १०. रूढी परंपरा

**अ) ताईबाईची जत्रा**

घरातील पूर्वजांच्या आत्म्यास शांती मिळण्याकरीता कुटूंबातील पुढील पिढयांनी त्यांच्या पूर्वजांच्या राहत्या ठिकाणी (बुडका जिथे असेल तिथे) तीन वर्षातून एकदा ताईबाईची जत्रा करावी लागते. जत्रेमध्ये आटकुरी मेंढी {दोन पिल्ले पोटात असलेली ४ महिन्याची गाभण मेंढी आणि १ वर्षाचे १ दात असलेले गुन्नी (छोटा डुक्कर) अर्पण करतात}. संध्याकाळी सर्व एकाच आजोबा किंवा पणजोबाच्या सर्व पुढील पिढी, भावकी एकत्र येऊन सर्व पूजेचे साहित्य आणायचे. त्यानंतर मेढीला हळद कुंकू वाहून पुजा करतात. त्यानंतर मेंढी कापल्यानंतर तिच्या पोटात असलेले अर्भक बाजुला काढुन ठेवतात, आणि मेंढीच्या मांस शिजवुन स्वयंपाक करतात. महिला स्वयंपाक करत असताना, पुरुष मंडळी घरात खड्डा खणतात.

स्वयंपाक तयार झाल्यानंतर मेंढीच्या मांसाचा खड्ड्यात नैवेद्य दाखवतात. त्यांनतर सर्व मिळुन जेवण करतात. जेवण झाल्यानंतर राहिलेले उष्टे खरकट बाजुला काढून ठेवतात. त्यानंतर अर्भक आणि राहिलेले खरकट जेवण एकत्र करुन घरात खणलेल्या खड्ड्यात टाकले जाते, आणि ते खरकट खाण्यासाठी सोबत आणलेले डुकराचे छोटे पिल्लु (गुन्नी) खड्ड्यात सोडले जाते. डुकराचे पिल्लु खरकट खात असताना त्याच्यावरुन माती टाकली जाते आणि डुकराच्या छोटे पिल्लूला जिवंत पुरले जाते. अशा प्रकारे त्यांचा सन्मान करत घरातील पूर्वजांच्या आत्म्यास शांती दिली जाते. आजोबा किंवा पणजोबा पासुन झालेल्या कुटूंब विस्तारातील सर्व भावकी व नातेवाईकानी एकत्र येऊन हि यात्रा पार पाडायची असते. (बुडका म्हणजे आजोबांच्या मुळ गावात, यालाच बेट म्हणतात) या प्रथेला **ताईबाईची जत्रा** म्हणतात.

**आ) आखाडी जत्रा/आषाढी जत्रा**

कैकाडी समुदायात आखाडी जत्रा करण्याची प्रथा आहे. या जत्रेत बोकड किंवा कोंबडा कापण्याची प्रथा आहे. या दिवशी घरातील देवदेवतांची पूजा केली जाते. बोकड व कोंबडा बळी देऊन नातेवाईकांना जेवण दिले जाते. या जत्रेला ज्यांना देवीच्या ठिकाणी काही कारणामुळे जात येत नसेल अशा वेळी यामध्ये कोबंडी कापतात यावेळी चिखलाची देवीची प्रतिकृती व फिरता लक्ष्मीचा गाडा तयार करतात. दोन रेडे तयार केले जातात. (रेडयाचा गाडा), चार चाक, गाडयाच्या भोवती काटयांची कमान तयार करतात. त्यामध्ये देवी ठेवतात.

सकाळी अंघोळ करुन बाजारातुन लागणारे साहित्य खरेदी करुन आणले जाते. घराजवळच्या झाडाखाली जमीन सरावली जाते, शेतातुन माती आणुन चिखल तयार केला जातो

आणि त्या चिखलाचे देव व दोन रेडे, चार चाकांचा गाडा तयार करतात. कळकाच्या (बांबूची कमान) बांबुचे खोप तयार करायचे त्या खोपमध्ये कांबळ ठेवुन त्यावर देव ठेवायचे. तिला चोळी-बांगडी, डोरले, ओटीचे सगळे सामान देवीला अर्पण करतात. या दिवशी पाच सुहासिनी उपवास करतात. संध्याकाळी ४ वाजता कोंबडे किंवा ज्यांची ऐपत आहे ते बोकड कापतात. अधिकतर लोक कोंबडे कापतात कारण त्यांची अशी धारणा आहे की देवीला कोंबडे आवडते.

रात्री आठ वाजेनंतर नैवैद्य दाखविला जातो त्यानंतर सुहासिनी उपवास सोडतात. सर्व कार्यक्रम झाल्यानंतर जेवण झाल्यांनतर रात्री ११-१२ च्या दरम्यान एका टोपलीमध्ये सर्व देव, रेडे आणि गाडा अस सर्व गावाबाहेर किंवा वेशी बाहेरच्या बाभळीच्या झाडाखाली नेऊन सोडतात. सोडुन येताना मागे वळुन पाहिले जात नाही. समाजाला असे वाटते की देवी आपल्यासोबत आपाली सर्व दुखे व संकटे घेऊन जाते. हि यात्रा जागेवर जाऊन केली तरी या पध्दतीनेच करतात. अशी यात्रा हि आखाडाच्या महिन्यात केली जाते, म्हणून तिला **आखाडी जत्रा** म्हणतात.

**इ) यल्लम्मा सौंदत्तीची जत्रा**

कैकाडी समुदाय यल्लमा देवीची जत्रा साजरी करतात. याला लिंब नेसणे असे म्हणतात. प्रत्येकी तीन वर्षांनी हा कार्यक्रम करतात. आपले चांगले व्हावे म्हणुन हि पंरपरा पाळली जाते. सौंदत्ती यल्लमा कर्नाटक राज्य येथे आहे. ऐपतीनुसार लोकं नवीन कपडे घेतात. या जत्रेसाठी पौर्णिमा किंवा एक दिवस आधी तिथे पोहचतात. तेथे गेल्यांनतर तेथील कुंडात अंघोळ करुन लिंबाचा पाला कमरेला आणि छातीला बांधला जातो यालाच “लिम नेसणे” असेही म्हटले जाते. लिंबाचा डहाळ बांधून देवळाभोवती तीन प्रदक्षिणा मारतात.

पूर्वीच्या काळात अंगावर कोणतेही कपडे न घालता केवळ लिंबाचा ढहाळा बांधुन प्रदक्षिणा घालत असत, परंतु या प्रथेमध्ये सुधारणा झालेली पाहायला मिळते. यामध्ये महिला व पुरुष दोघांचाही सहभाग असतो. हि प्रथा आजही चालु आहे. यानंतर पुरणपोळीचा स्वयंपाक तयार केले जाते. त्यानंतर घरातील सर्व जण एकत्र येऊन नैवैद्य दाखवून १० ते १२ नारळ फोडतात. प्रत्येक नारळातील अर्धा नारळ देवळात अर्पण करुन उरलेलं अर्धे नारळ घरी येताना घेऊन येतात. जत्रा संपवून घरी येताना घराजवळ आल्यानंतर पाच पाऊले मागे जाऊन एक नारळ फोडायचा आणि सोबत आलेल्या देवीला परत पाठवायचं. याला देव बोळवने म्हणतात.

त्यावेळी आपल्यासोबत आणलेल्या नारळाची खीर करतात आणि सर्वांनी त्याचा आस्वाद घ्यायचा. (म्हणजे सोबत देव आलेले आहेत अशी समजुत आहे त्यांना गोड (खीर) देऊन परत पाठवायचे). अश्या प्रकारे यल्लम्मा सौंदत्तीची जत्रा साजरी केली जाते.

### ई) लिम नेसणे (लिंबाचा कार्यक्रम)

यल्लम्मा सौंदत्ती, कर्नाटक येथून आल्यानंतर आठ दिवसांनी बोकड आणून पुन्हा लिंबाचा कार्यक्रम उत्सव साजरा करतात. यामध्ये जागतीर्णीना बोलावले जाते. सौंदतीच्या जत्रामध्ये ज्यांनी लिम नेसली असेल त्यांना पुन्हा लिंब नेसायला लावतात. संध्याकाळी चार वाजेच्या सुमारे बोकड कापतात आणि कापलेल्या बोकडाचे वाहते रक्त ओलांडून त्या व्यक्तीला जावे लागते, गावाच्या बाहेर गेल्यांनतर ओढयाच्या ठिकाणी, नदीजवळ किंवा पाण्याजवळ जावून अंगावर नेसलेले लिंब पाण्यात सोडून देतात. लिंब सोडला कि नवीन कपडे घालुन घरी परत यायचे. जे ते आपले नवीन कपडे घेतात.

घरी परतल्यावर घरातील महिला बोकडाच्या मांसाचे स्वयंपाक करतात. तसेच गोडधोड म्हणुन पुरणपोळीचा स्वयंपाक देखील करतात. परणपोळयांच्या गोड नैवैद्याने पाच परडया भरतात. त्यानंतर यल्लमा देवीला सुटी-रूटीचा नैवेद्य दाखवायला जातो, नैवैद्यमध्ये बोकडाचं काळीज, सिना आणि रोटी या तिन्हीही गोष्टी दाखविल्या जातात. नैवैद्य दाखविल्यानंतर सुहासिनांना जेवु घातले जाते, आणि मग इतर नातेवाईकांना जेवण दिले जाते. जेवणांतर रात्रभर जोगतीणीच्या गाण्याचा कार्यक्रम ठेवला जातो. हा कार्यक्रम बऱ्याचदा पाहाटे पहाटे चार वाजेपर्यंत चालु असतो.

### उ) फाल्दिवरचा कार्यक्रम/ रानकारण

फाल्द म्हणजे शेत. म्हणजे गावाच्या बाहेर रानात किंवा जंगलात हा कार्यक्रम केला जातो. हा कार्यक्रम गावाच्या वस्ती बाहेर केला जातो. आखाडी/आषाढ महिन्यात चिखलाची देवी तयार करण्यात येते व त्याची ओटी भरण्यात येते. तसेच एक फिरता गाडा तयार करून त्यात चिखलाची देवी (लक्ष्मी) बसवून त्याची पूजा केली जाते. त्याचबरोबर दोन चिखलाचे रेडे तयार करण्यात येतात. चिखलाची देवी च्या समोर नैवैद्य दारू, बिडी, तंबाखू, पंचपक्क्वान ठेवले जात व नतंर पूजा केली जाते. पूजा झाल्यानतर रात्री तो गाडा गावाबाहेर ठेऊन येतात.

गावाबाहेर ठेवताना एकदा फिरता गाडा व त्यातील चिखलाची देवी ठेवल्यानंतर पाठीमागे वळून पाहू नये. अश्या पूजेमुळे आपले संकट वगेरे गावाबाहेर जाते असा त्यांचा समज आहे. फिरस्ती देवीच्या श्रद्धा असल्यामुळे भटकी समाज भटकत असताना फिरस्ती देवी त्यांच्या पाठीशी असयाचे असा कैकाडी समाजाचा समज आहे. या पूजेमुळे भूतांचा त्रास होऊ नये असा त्यांचा समज आहे. यावेळेस बोकड, कोंबडा किंवा डुक्कर कापले जात होते. नैवैद्य ठेवल्यानंतर जेवणाची पंगत बसत होती.

### ऊ) शाल्गाची (मोठे डुक्कर) यात्रा

ही यात्रा दोन-तीन वर्षातून एकदा करण्याची प्रथा प्रचलित आहे. यासाठी डुक्करामधील नर डुक्कर पूर्वजांच्या नावे पाळला जातो. हा डुक्कर गावाच्या बाहेर वडाच्या काठीने मारला जातो व तो भाजला जातो. कापून त्याचा नैवैद्य पूर्वजांचे पाच दगड मांडून त्यांना हळद-कुंकू वाहून दाखवला जातो. कैकाडी समुदायातील नातेवाईकांना जेवण दिले जाते. परंतु स्त्रियांचा या यात्रेत सहभाग असत नाही. या यात्रेत सर्व स्वयंपाक पुरुषच करतात.

या यात्रेत शिल्लक राहिलेले मास घरी नेले जात नाही. ते तेथेच खाऊन संपवले जाते. अशा पद्धतीने पूर्वजांची पूजा करण्याची प्रथा आहे. यामुळे पूर्वजांचे आपल्यावर चांगले लक्ष राहते असा कैकाडी समाजाचा समज आहे.

### ऋ) नवस बोलणे व फेडण्याची प्रथा

कैकाडी समाजामध्ये मुल आजारी पडणे किंवा घरातील कोणताही व्यक्ती आजारी पडणे, काम मिळत नसेल, काम मिळूनही पैसे शिल्लक राहत नसतील, पूर्वी गाढव आजारी पडले किंवा हरवले, महिलांना मुल होत नसेल, काही अनिष्ट घडले असेल तर काळूबाई, यल्लम्मा, तुळजाभवानी या देवतांना ऐपतीप्रमाणे नवस बोलले जातात. उदा. पाच नारळाचे तोरण बांधणे, खणा नारळाने ओटी भरणे, पाव किलो पेढे वाहने, कोंबडे किंवा बोकड कापून जेवण देणे अशा प्रकारचे नवस बोलले जाते. जर कैकाडी लोकांना वाटले कि, आपल्याला सुख शांती किंवा संकटातून मार्ग मिळणे, आजारी व्यक्ती बरी होणे हे नवस बोलल्यामुळे घडले असेल तर ते नवस बोलल्याप्रमाणे फेडतात. काही ठिकाणी डुक्कर कापून सुद्धा नवस फेडले जात असत.

११. जत्रा

**कानिफनाथ मढी:-** अहमदनगरहून पाथर्डी रोड वरील निवडुंगे हे गाव आहे. तेथून 3 कि.मी. अंतरावर मढी हे गाव आहे. पाथर्डीहून मढी गाव 12 कि.मी. अंतरावर आहे. फाल्गुन वद्य पंचमीला (होळी) मढीला कानिफनाथांची यात्रा भरते. ही यात्रा पाडव्या पर्यंत चालते. होळीते गुढी पाडव्या पर्यंत मढी व निवडुंगे गावामध्ये विविध व्रतबंधने पाळली जातात. यात शेतीची कामे, विवाह/वास्तुशांती, दाढी/हजामत करणे, नवीन कामास प्रारंभ, तसेच घरामध्ये पदार्थ तळणे, मांस न खाणे इत्यादी कामे वर्ज्य केली जातात. भटक्यांची पंढरी म्हणून समजल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र मढी इथे सकाळी नाथ मंदिराच्या कळसाला कैकाडी समाजाची मानाची काठी लाऊन खऱ्या अर्थाने मढी यात्रेला प्रारंभ होतो. मानाची काठी ही 20 ते 25 फुटाची असते तसेच काठीला त्रिशूल आणि अर्ध चंद्र लावलेला असतो. होळी ते गुढीपाडवा या काळापर्यंत ही यात्रा उत्सव चालतो. येथे कैकाडी समाजाचे सर्व लोक जमा होतात.

कैकाडी समाजाने गडाचे बांधकाम करण्यास सहकार्य केले कानिफनाथ पैठण येथे वास्तव्यास असताना त्यांची सेवा केली. याबद्दल नाथांनी स्वतः कैकाडी समाजाला मान दिला. हा गढ उभा करताना त्यांनी मदत केल्याने त्यांना हा कळसाला काठी लाऊन यात्रा सुरु करण्याचा मान दिला जातो. पूर्वी यात्रेच्या वेळेस वोकाळे (जातपंचायत) भरवले जात होते. वोक खेळणे म्हणजे न्याय निवाडा करणे, वाद सोडवणे. मुलामुलीचे भांडणे मिटवले जात होते. जातपंचायत मध्ये वोकाळे विविध शिक्षा/दंड म्हणून त्यात वाळीत टाकणे, सर्व समाजातील लोकांना दारू पाजणे, मटन खायला देणे इत्यादी शिक्षा दिली जात होती. सध्या जातपंचायतला बंदी आल्याने अशी जातपंचायत भरत नाही. या यात्रेत गावातील लोक कैकाडी समाजाच्या लोकांना मान-पान देतात, आदर सत्कार करतात, त्यांची जेवणाची सोय करतात. कैकाडी समाजामध्ये या यात्रेची फार मोठे महत्त्व दिसून येते.

**बिडकीन जत्रा:-** गाव बिडकीन तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद येथील चर्चेदरम्यान असे सांगण्यात आले कि, गावातील मरिमाता मंदिराच्या ठिकाणी आषाढ/आखड महिन्यात येथील प्रत्येक कैकाडी समाजाच्या कुटुंबातील एक डुक्कर मरिमाता देवीला कापले जाते. येथे कैकाडी समाजातील सर्व लोक एकत्र जमा होतात. या ठिकाणी या यात्रेदरम्यान २५-३० डुक्कर कापले जातात. डुक्कराचे मुंडके आणि पाय नैवेद्य म्हणून ठेवली जातात. डुक्कराला सर्वप्रथम हळद कुंकू लावून त्याला सातरी च्या ठिकाणी नेले जाते. सातरी म्हणजे खाट-कुट किंवा कापण्याचे ठिकाण

होय. डुक्कर कापून देवीला नैवैद्य ठेवले जातात व नतंर पंगत बसवतात. यावेळेस प्रत्येक घरातील एक डुक्कर कापवेच लागते. याला कैकाडी समाजामध्ये याला फल्देवर बाग असे म्हणतात. अशी यात्रा आखाड/आषाढ महिन्यात भरवली जाते.

**कैकाडी महाराजांची जयंती:-** कैकाडी महाराज हे राजाराम जाधव नावाचे संत होते. त्यांनी गाडगे महाराजांचे शिष्यवृत्त पत्करले होते. त्यांनी कैकाडी समाजाच्या लोकांना चांगल्या गोष्टीची शिकवण दिली, जनजागृती केली, पशु हत्या करू नका असे त्यांनी सांगितले, चांगले शिक्षण घ्या सांगितले. त्यामुळे कैकाडी समाजामध्ये त्यांना मोठा मान आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी कैकाडी महाराजांची जयंती साजरी केली जाते. कैकाडी महाराजांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रम ठेवून जनजागृती केली जाते. काही ठिकाणी यात्रा भरवली सुद्धा जाते.

## १२. जन्मविधी

**पाचवीची पूजा** - कैकाडी समाजामध्ये मूल जन्माला आल्यानंतर बारसे घालण्याची प्रथा दिसत नाही परंतु मूल जन्माला आल्यानंतर पाचव्या दिवशी पाचवीची पूजा केली जाते. घरात बाळ जन्माला आल्यास त्याच दिवशी घराच्या बाहेरील बाजूस नाहणी म्हणजे बाळाला अंघोळ घालण्यासाठी खड्डा खांदला जातो अश्या प्रकारे पाच दिवस त्याच खड्ड्यात अंघोळ घालत असत. मुल जन्माला आल्यास पाचव्या दिवशी अशी पूजा केली जाते. या पूजेमध्ये गव्हाच्या पिठापासून दिवे मुटके, पान सुपारी, खारीक-खोबरे, नारळ, फळे, ज्वारी-हरभरा च्या घुगऱ्या यांचा समावेश होतो. हि पूजा सायंकाळी केली जाते. एका सुपात पानावर दिवे-मुटके व सुपारी ठेवली जाते. त्याच सुपात घुगऱ्यावर नारळ ठेवला जातो, तसेच बोकडाची मुंडी आणि पाय ठेवून पूजा केली जाते.

पाचव्या दिवशी मुलाला नवीन कपडे नेसवले जात असत. पाचव्या दिवशी पूजा झाल्यानतर तो खड्डा भुजवला जातो. दुसऱ्या दिवशी सूपमधील सर्व वस्तू नदीत सोडून द्यायचे. पाचव्या दिवशी ५ सुहासिनी दिवसभर उपवास धरत असत. पाचव्या दिवशी ज्या कैकाडी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली असेल ते पाट, कोंबडी कापली जात आणि त्याची जेवण दिले जात होते. अन्यथा वरण, भात, पोळी तयार करून सोयरे यांना जेवण दिले जाते. मुलगी जन्माला आली असेल तर पाट (शेळी) कापतात आणि मुलगा असेल तर बोकड कापतात. पाचवीच्या दिवशी फक्त अशी पूजा करून जेवण दिले जात होते व नाहणीचा खड्डा भूजावला जात होता. या दिवशी बाळाचे नाव ठेवले जात नव्हते. हि पूजा करण्यामागे लोकांची अशी श्रद्धा असते कि, या दिवशी

सटवाई त्या जन्मलेल्या बाळाचे नशीब लिहित असते.  तसेच काही ठिकाणी या दिवशी सुपामध्ये असलेल्या दिव्यावर सुई गरम करून बाळाच्या पोटावर हलके डाग (चटका) देतात.

**बारसे** - कैकाडी समाजामध्ये बाळाचे बारसे करण्याची किंवा नाव ठेवण्याची प्रथा नाही. घरातील लोकांना आवडेल त्या नावाने बाळाला हाक मारायला सुरुवात केली जाते आणि तेच नाव कायमस्वरूपी राहते. परंतु काही ठिकाणी इतर समाजाच्या रूढी परंपरा कैकाडी समाजाने अंगिकारलेल्या दिसून येतात. घरातील महिला बाळ जन्माला आल्यानंतर पाच महिलांना आमंत्रण दिले जाते, बाळाला पाळण्यात घालायचे व नाव ठेवायचे. नाव ठेवताना गाणी म्हटली जातात. बाळाचे नाव मावळण (आत्या) ठेवतात.

**जावळ** - जन्मानंतर बाळ सव्वा महिन्याचे झाल्यानंतर लग्न होण्याच्या आधीपर्यंत कधीही जावळ (बट काढणे) काढले जाते. जावळ काढते वेळी मुलाचे जावळ काढायचे असल्यास बोकड कापुन विधी केले जातात, तर मुलीची जावळ काढायची असल्यास पाट (शेळी) कापुन विधी करतात. जावळ काढते वेळी ज्याचे जावळ काढायचे आहे त्याच्या मामाला आर्मंत्रित केले जाते.  बोकड किंवा शेळी आणले जाते, नातेवाईकांना आर्मंत्रित केले जाते.  घरातील मंडळी मामासाठी नवीन कपडे आणतात आणि मामा ज्याचे जावळ काढायचे आहे त्या मुलाचे/मुलीचे कपडे आणतो. जावळ काढण्याचे विधी घरापासुन दुर रानात केले जातात जिथे पाण्याची सोय आहे. तर काही ठिकाणी जावळ करत असताना कैकाडी समाजाच्या प्रत्येक कुटुंबाची आसराया वेगवेगळ्या ठिकाणी असते.  आसराया देवी जिथे असतात तिथे जाऊन जावळ करतात. जावळ करताना बाळाला नवीन कपडे घालते जातात.  बाळ स्वत: पाटावर बसु शकेल एवढा मोठा असल्यास त्याला पाटावर बसले जाते आणि जर बाळ पाटावर बसु शकत नसेल तर मामा बाळाला पाटावर बसवून त्याच्या मांडीवर बाळाला बसविले जाते.  त्यांनतर मामाच्या हातात पान आणि कात्री दिली जाते.  यानंतर बाळाच्या बटेवर खाण्याचे पान ठेवुन केसांची बट आणि पान पाच वेळा कापतो.  बट कापण्याची विधी पूर्ण होताच आणलेल्या बोकडाची किंवा शेळीची हळद कुंकू वाहून पुजा केली जाते आणि बोकड/शेळी कापतात.  त्यानंतर स्वयंपाक करुन आलेल्या सर्वांना मेजवानी दिली जाते.  जेवढा स्वयंपाक तयार केला जातो ते पुर्ण संपवुन घरी येतात, कोणताही शिल्लक अन्नपदार्थ घरी आणत नाही. लग्न होण्याच्या अगोदर पर्यंत जावळ काढणे कैकाडी समाजामध्ये बंधनकारक असलेले दिसून येते.

## १३.   मयत/मृत्यू विधी:-

हिंदू धर्माच्या प्रथेनुसार कैकाडी समाजामध्ये सुद्धा विशिष्ट मृत्यू विधी पार पाडला जातो. कैकाडी समाजामध्ये प्रेताला अग्नी दिले जाते किंवा पुरले जाते. कैकाडी समाजामध्ये मृत्युविधी बाबत सविस्तर विचारणा केल्यास खालीलप्रमाणे माहिती मिळाली :-

**नातेवाईकांना कळविणे आणि तिरडी बांधणे**

कैकाडी समाजामध्ये कुटुंबातील एखादी व्यक्ती मयत झाल्यानंतर घराच्या बाहेर मांडी घालून भिंतीला आधार देवून मयत व्यक्तीला बसवले जात असत. त्यांनंतर कुटुंबातील व्यक्ती सर्व नातेवाईकांना तातडीने कळवले जाते. मयत झालेल्या दिवशी समाजातील प्रमुख व्यक्तीला कळविले जाते, आणि त्यांना तेथे बोलविले जाते. ज्याप्रमाणे इतर जाती धर्मांमध्ये विधी करण्यासाठी स्वामी, गुरुजी किंवा ब्राम्हण असतात त्याचप्रमाणे कैकाडी समाजामध्ये विशिष्ट व्यक्ती सर्व विधी करतात. मयताच्या अंतविधी बाबत सर्व विधी व रीतीरिवाज त्यांच्याकडून पूर्ण करून घेतले जातात. एका बाजूला तिरडी बांधायला घेतात, तिरडी बांधताना जवळपास उपलब्ध असलेले चिवटया, कट्या, बांबू गोळा करायचे, कडबा आणला जातो. कडबा नसेल तर पिंजरा किंवा निलगिरीच्या फांद्या वापरून तिरडी बांधली जात असे. मयताला अंघोळ घातली जाते, पांढरे कपडे मयताला नेसवले जातात. त्या नंतर बांबूची तिरडी बांधून त्यावर मृत व्यक्तीला झोपवले जात असत. सुपामध्ये ज्वारी किंवा तांदूळ घालून त्यामध्ये एक नाणे घालून ते मयताच्या बाजूला ठेवले जाते. मयतावर फुल किंवा फुलांचा हार चढवला जातो आणि गुलाल टाकला जातो आणि मयत उचलली जाते.

**खांदा देणे/ खांदेकरी**

खांदा देण्यासाठी भावकीतील दोन व्यक्ती आणि  सोयऱ्यांकडील दोन व्यक्ती अशा चार जणाना तयार केले जाते.  मयताच्या कुटूंबातील पुरूषाने किंवा मयताचा मुलगा मयतासमोर पाणी धरुन चालतो.  स्मशानभूमीमध्ये पाहेचल्यानंतर विसाव्याच्या ठिकाणी मयत ठेवली जाते.  येथे खांदे बदल करतात, मागचे दोघे पुढे येतात आणि पुढचे मागे जातात.  त्यानंतर मयत घेऊन अंत्यविधी करण्यासाठी सारणावर ठेवुन मयताच्या मुलाने पणी धरलेला माठ खाद्यावर घेवुन चीते भोवती पाच पाच फेऱ्या मारायच्या, फेऱ्या मारताना प्रत्येक फेरी सुरू करायच्या आधी मडक्याला पारंपारिक विळीने म्हणजेच खल्ली एक छिद्र पाडले जाते.  पाच फेऱ्या पूर्ण झाल्यानंतर मडकं दगडावर

आपटून फोडले जाते. त्यानंतर मयताला अग्नी दिला जातो. दहन करताना मोठा मुलगा चितेला अग्नी देतो. अग्नी देताना मयताचे शीर दक्षिणेकडे ठेवतात. तर मयत दफन केले जात असेल तर खड्डा करताना दक्षिणोत्तरचा खड्डा खणला जातो व पुरताना देखील मयताचे शीर दक्षिण दिशेला असते. शक्यतो अंत्यविधीला महिलांना नेत नाहीत. मातीचा कार्यक्रम करण्यासाठी महिलांना नेले जाते. आता सद्यस्थितीत स्मशानभुमीत दहन करतात. समाजातील अस्पृश्यता असल्या कारणामुळे मयत गावात पुरली किंवा जाळण्यासाठी गावातुन मज्जाव केला जात होता, काही ठिकाणी स्मशानभूमीत दहन करण्याची परवानगी गावात मिळत नसत त्यावेळेस कुठेतरी लांब जंगलाच्या ठिकाणी /शेतात किंवा दोन गावाच्या मध्ये असणारे शिवार/बोर्डर च्या ठिकाणी मयताला अग्नी दिला जात होता अथवा दफन केले जात होते.

फार वर्षांपुर्वी गावांतील स्मशानभुमीमध्ये मयताला अग्नी देण्यासाठी एकच जागा होती, जेथे केवळ सवर्ण जातींना अंत्यसंस्कार करण्याची परवानगी असे. **दलित, मागासवर्गीय अस्पृश समजल्या जाणाऱ्या समाजाला त्या ठिकाणी अंत्य संस्कार करण्यास परवानगी नव्हती. कैकाडी हा समाजदेखील त्या पैकीच एक होता. त्यामुळे त्यांनाही गावातील प्रमुख स्मशानभुमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यास परवानगी नव्हती. कैकाडी हा समाज देखील त्यापैकीच एक आहे.** त्यामुळे त्यांनाही गावातील प्रमुख स्मशानभुमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यास मनाई होती. कैकाडी समाज भटकंती करणारा समाज होता, ज्या गावातील लोक दाखवतील त्या ठिकाणी प्रेत पुरत असत. प्रेत पुरण्यासाठी पाच-सहा फुट खोल खड्डा खणतात, त्यामध्ये मीठ घालतात, तसेच तिथे आलेली भावकीतील व नातेवाईक मंडळी कोणत्याही झाडाच्या पानाने थोडे थोडे पाणी घालतात, याला पाणी घालणे असे म्हणतात. त्या नंतर प्रेत त्या खड्डयामध्ये पुरतात.

त्यानंतर एका माठात पाणी भरतात. जी व्यक्ती अंत्यविधी करणार आहे त्या व्यक्तीने माठ डाव्या खांद्यावर घेऊन मयताच्या भोवती पाच फेऱ्या मारतो. प्रत्येक फेरी मारते वेळी विधी करवुन घेणारे समाजाचे प्रमुख / त्या माठाला त्यांच्या पारंपारिक विळीने म्हणजे ख्वल्लीने छिद्रे पाडतात. पाच फेऱ्यापुर्ण झाल्यानंतर माठ खांद्यावरुन मागच्या बाजुला सोडून फोडला जातो. मुलगा यावेळी "बोंब मारतो". ज्या दगडावर गाडगे टाकले जाते तो दगड मयताला जिथे पुरले गेले आहे त्याचे शीर ज्या बाजुला असेल त्या बाजुला ठेवून त्याची पुजा करतात. त्यानंतर सर्वजण एकत्र येऊन वर्गणी गोळा करतात. गायकवाडाच्या घरातील व्यक्ती मयत झाला असेल तर जाधवच्या

घरातील लोक वर्गणी गोळा करतात आणि जाधवच्या घरातील व्यक्ती मयत झाला असेल तर गायकवाडाच्या घरातील लोक वर्गणी गोळा करून त्या पैश्याची दारू आणली जाते व सर्वांना पाजली जाते. तिसऱ्या दिवसापर्यंत ज्याच्या घरात मयत झाली असेल तेथे चूल पेटत नाही. तिसऱ्या दिवशी घरी स्वयंपाक होतो. तो पर्यंत इतर लोक अन्न पाठवितात.

**राख सावळणे/मातीचा कार्यक्रम**

दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी राख सावळली जाते. यासाठी भावकीला, पाहुण्यांना निरोप दिला जातो. मयताला पुरले अथवा जाळले गेले आहे तेथे सर्वजण एकत्र जमतात. मयताला पुरले असेल तर सर्व जण मातीला हात लावतात. ज्या ठिकाणी मयताला विसावा देण्यात आला होता त्या ठिकाणी एरंडेलल्या पानावर दामटी टाकुन त्याच्यावर भात, भाज्या, शाकाहारी, मांसाहारी असा सर्व नैवेद्य ठेऊन जवळच्या नातेवाईकांनी हा नैवेद्य तेथे ठेवायचा. ते सर्व तेथे उद घालुन ठेवला जातो व कावळा शिवण्यासाठी ठेवला जातो. कावळा शिवला तर ठिक नाही तर एखाद्या गायीला आणले जाते किंवा तसाच तेथे ठेवला जातो. लांबुन येणाऱ्या पाहुण्यांची जेवणाची सोय करावी म्हणुन डुक्कर मारुन त्याचे मांस शिजवुन त्याचे जेवण सर्वांना दिले जाते.

**खांदा उतरविणे**

मातीच्या दिवशी ज्यांनी मयत उचलताना डोके दिले आहे त्यातला भाऊबंदकीतला एक व पाहुन्यातला एक तसेच ज्याने शिकाळ धरले आहे त्या मुलाचे केस कापतात. त्यानंतर त्यांचे खांदे उतरवतात. म्हणजे येणारे पाहुणे हरळी घेऊन येतात. त्यावेळी घराच्या समोर एक शेणाचे आळे केले जाते. त्याच्यामध्ये गोमुत्र टाकले जाते. हरळी त्याच्या बाजुला ठेवली जाते. मयत झालेल्या मुलाच्या डोक्यावर समाजाचे पंच ते सगळं ठेवतात आणि त्याला उलट चालवत नेतात. पंच लिंबाचा पाला किंवा निरगुडीचा पाला आणुन पाणी त्याच्या डोक्यावरुन टाकतात आणि पाठिवर थाप मारुन खांदा उतरविण्याची पध्दत असते. यावेळी खांदा उतरला का? खांदा उतरला का? असे विचारले जाते. मग खांदेकरी व्यक्ती **उतरला** असे म्हणतो. उलट चालवत नेऊन ५०-१०० फुटावर ते सर्व डोक्यावरचे टाकुन दिले जाते. घरी आल्यानंतर ज्यांनी मयताला खांदा / डोक दिल आहे अशा केशवपण केलेल्या चोघांना जेवणासाठी ताट वाढले जातात. एक चापातीचा दामटा आणि मटन त्याच्यावर ठेवले जाते. प्रत्येकाने ते खायचे त्यामध्ये एक ताट बाजुला काढून ठेवले जाते आणि राहिलेल्या दोन ताटातले तिघांनी मिळून खायचे, नंतर थोडे खाऊन झाल्यावर पुन्हा दुसरे ताट

बाजुला केले जाते.  आता उरलेल्या एका ताटामध्ये तिघांनी खायचे असते. यानंतर सर्व पाहुणे जेवतात. ४ खांदेकरी आणि पाणी पाजणारे पाच दिवस शिव ओलांडत नसत म्हणजेच गावाच्या बाहेर जात नव्हते.

मातीचा कार्यक्रम झाल्यावर “दिवसाचा” म्हणुन संध्याकाळी कार्यक्रम असतो.  दुपारी जेवणे झाल्यानंतर सगळे घर स्वच्छ केले जाते.  मयत झालेल्या व्यक्तीचे अंथरुन-पांघरुन वापरण्यात असलेले कपडे धुवायचे आणि ते संध्याकाळी पुजायचे आणि एक पांढरे कापड आणुन त्याच्या वर सुपारी भाजुन कापडावर माणसा सारखी आकृती असणारे चिन्ह काढायचे / प्रतिमा काढायची व त्याची पुजा करायची.  पांढऱ्या कापडसमोर वाळु किंवा माती ठेवली जाते व त्यामध्ये कापुन त्यावर बळी दिलेल्या कोंबडयाचे रक्त सांडायच. कोंबडा किंवा कोंबडी हाताने मान मुरगुळून मारली जाते.  मयत स्त्री असेल तर कोंबडी व पुरूष असेल तर कोंबड्याचा बळी / नैवेद्य दिला जातो.   त्याचबरोबर मयत झालेल्या व्यक्तीला ज्या वस्तू , पदार्थ आवडत असेल ते ठेवायचे उदा. दारु, तबांखु, सिगरेट, बिडी,  मयत स्त्री  असेल तर तिचे मंगळसुत्र, पुरूष असेल तर त्याचे घड्याळ किंवा वापरण्यातील वस्तु तिथे ठेवतात.  व त्याची संध्याकाळी सात वाजता पुजा करतात.  हे सगळ पुजून उद घालतात आणि सर्व  घरातील लोक बाहेर येऊन दरवाजा बंद करतात आणि दहा पंधरा मिनिटांनी दरवाजा उघडून मामा जेवायला का? मावशी जेवलाय का? असे विचारुन एक दोन फेऱ्या मारतात.

संध्याकाळी परत तिथे दुध घालतात.  कोंबडा किंवा कोंबडी मुरगुळून मारल्यानंतर त्याची भाजी बनवली जाते, तसेच त्यात भाजी जास्त बनविण्यासाठी हरभरा डाळ किंवा इतर डाळी टाकून शिजवून सर्वांना जेवण दिले जाते. यालाच “गोडाचे जेवण” म्हणतात.  त्या दिवशी काहीतरी गोड पदार्थ केले जातात. ज्यांना आर्थिक परिस्थिती मुले गोडाचे जेवण देणे शक्य होत नाही ते किमान चहा तरी देतात. किंवा सर्व जण वर्गणी गोळा करून जेवण दिले जाते. कोंबडा किंवा कोंबडी कापणे आर्थिक परिस्थितीमुले शक्य नसेल तर काही  ठिकाणी डुक्कराचे मटन नैवैद्य म्हणून सुद्धा ठेवले जाते.  मोठे डुक्कर कापूनच सर्वांना जेवण दिले जाते. त्यामुळे या दुखात इतर समाज सहभागी होताना दिसत नाही. मृताबाबत शोक तीन, पाच, दहा अथवा बारा दिवस करतात. पूर्वी सव्वा महिन्यानंतर जेवण घालण्याची प्रथा होती.  ऐपतीप्रमाणे पाचव्या दिवशी ज्या ठिकाणी मयत ठेवली गेली होती त्या ठिकाणी पुरुष मयत असेल तर बोकड आणि महिला मयत असेल तर

पाट किंवा शेळी कापले जाते. सातव्या दिवशी डुक्कर कापले जात असत व दारू वगेरे पाजून सर्वे नातेवाईक व पाहुणे आपआपल्या घरी निघून जात होते.

## पित्र पुजण्याची विधी

मृत पुर्वजांच्या आत्म्यास शांती देण्याकरिता कुटूंबाच्या ऐपतीप्रमाणे आणि पैशाच्या उपलब्धतेप्रमाणे वर्षातुन किंवा दर तीन वर्षांनी एकदा सर्वांना जेवण घालण्याची प्रथा या समाजामध्ये अस्तित्तवात आहे. या कार्यक्रमामध्ये आणले जाणारे डुक्कर १ वर्षापेक्षा जास्त वयाचे असुन नर डुक्कर लागतो. डुकराबाबत खास बाब म्हणजे हे डुक्कर मोठया डोक्याचे असते म्हणुन याला **भ्यारशिरज** (म्हणजे मोठया शिराचा डुक्कर) असे म्हटले जाते. कार्यक्रमाच्या दिवशी डुक्कर आणला जातो.

नंतर सर्व नातेवाईक आणि कुटूंबातील लोक आपल्या पुर्वजांना पुरलेल्या जागा/ थडग्याजवळ जातात. तेथे पोहोचल्यानंतर डुकराला थडग्यापाशी नेऊन त्यावर गुलाल आणि फुल टाकून त्याला पूजतात, त्यानंतर दोघे जण डुकराला ओणव करुन त्याचे पुढचे पाय धरतात आणि एक व्यक्ती डुकराच्या छातीमध्ये लोखंडी पारेने वार करतात. पार घुसवल्यानंतर मरण पावलेल्या डुकराला भाजुन घेतात आणि कापतात. छाती जवळच्या मांसाचे लांब लांब तुकडे कापुन घेतात यालाच वार काढणे असेही म्हणतात. त्यानंतर मटन शिजवुन नैवेद्य दाखवतात. नैवेद्य दाखविताना मृत व्यक्तीस आवडत असलेल्या सर्व गोष्टी दाखविल्या जातात उदा. दारु, सिगारेट, बिडी इत्यादी गोष्टी नैवेद्य म्हणुन दाखविल्या जातात. त्यानंतर सगळे एकत्र भोजन करुन घरी येतात. भोजन केल्या नंतर दारू पिण्याचे प्रमाणसुद्धा दिसून येते.

## पितृ घालणे

काही ठिकाणी पितृ घालण्यासाठी एक विशिष्ट वार ठरवून त्या दिवसा अगोदर एक मोठे डुक्कर पकडून ठेवले जात असत. कैकाडी समाजच्या इतर दिवशी कार्यक्रमात दगडांनी किंवा खोऱ्यानी/गजानी डुक्कराला ठार मारले जाते परंतु त्या दिवशी फाशी देऊन डुकराला मारले जाते आणि त्याचे मुंडके एका सुपात ठेवून तसेच त्यात दारू, गांजा, सिगरेट नैवैद्य म्हणून ठेवले जाते. त्या दिवशी पाच सोयरे उपवास करतात. डुकर भाजले जाते. त्यानंतर सोयरे उपवास सोडतात आणि सर्व जण जेवायला बसतात.

**गण घालणे**

गाव हंगा तालुका पारनेर जिल्हा अहमदनगर येथील झालेल्या चर्चेनुसार असे सांगण्यात आले कि, कुटुंबातील पूर्वजांच्या आत्म्यांचा शांतीसाठी गण घातले जाते. पूर्वजांना ज्या गोष्टी आवडतात त्या गोष्टी नैवैद्य म्हणून ठेवली जातात. पूर्वजांना डुक्कर आवडत असल्यामुळे डुक्कर कापून त्याचे नैवैद्य ठेवले जाते. गण हि कुटुंबाच्यापुरते मर्यादित असते. या कार्यक्रमाला कैकाडी समाजच उपस्थित असतो. डुक्कर कापून झाल्यानंतर त्याची भाजी बनवून जेवण बनवले जात होते. एका ठिकाणी सुपात नैवैद्य डुक्कराचे मांस, दारू, विड्या अश्या वस्तू ठेवून सर्व जण जेवण करायला बसत असत.

## १४. लग्न जमविण्याची पद्धत/ विवाहपद्धती

सर्वेक्षण अंतर्गत झालेल्याचर्चेनुसार लग्न जमविण्याची पद्धत आणि विवाह कसा पार पाडला जातो याबद्दल खालीलप्रमाणे माहिती मिळाली:-

कैकाडी समुदायामध्ये पुर्वी मुलीचे वय १५ ते १७ वर्ष व मुलाचे वय १८ ते २० वर्ष होण्यापुर्वीच लग्न करायचे. लग्नाचा कार्यक्रम तीन चार दिवस चालत असुन पहिल्या दिवशी हळद, दुसऱ्या दिवशी वरात काढली जात. एखाद्या कुटूंबात मुलाचे १६-१७ आणि मुलीचे १४-१५ वय झाले कि ते लग्नायोग्य झाले आहेत असे समजुन कुटूंबातील सदस्य सोयरीक जमविण्याचा विचार करत असत. एखादी मुलगी लग्नाला आली कि, तिच्यावर तिच्या मामाचा अधिकार असतो. तिच्या मामाच्या परवानगी शिवाय तिचे लग्न होत नव्हते. जोपर्यंत मामा लग्नाला तयार नसे तोपर्यंत तिचे लग्न ठरत नसत. कैकाडी समाजामध्ये मुलींना आपल्याच जवळच्या नात्यात देण्याच्या प्रथेमुळे मुलीला आपली सुन करुन घेण्याचा पहिला अधिकार मामाला दिलेला आहे. मुलीला मामा असतील आणि मामा त्याच्या विवाह योग्य मुलाचे लग्न त्या मुलीशी लावुन देण्यास मामा तयार असेल तर मुलीचे लग्न मामाच्या मुलाशी ठरविले जाते. जर मामाला विवाह योग्य मुलगा नसेल तर मामाला थोडेफार पैसे देवून मुलीचे लग्न दुसऱ्या मुलाशी लावुन देण्यास मान्यता घेत असत. याला **"सुल्ला देणे"** असे म्हणतात. व मामाला 'सुलाकार' म्हटले जाते. हा सुल्ला १२५ रुपये पर्यंत असायचा. सुल्ला नवरा मुलाकडून मामाला दिला जात असत. मुलीचे लग्न जमविण्याचा मुख्य अधिकार मामाला असतात, त्यामुळे जोपर्यंत मुलीच्या लग्नाला मामाचा होकार मिळत नाही तोपर्यंत मुलीचे लग्न जुळत नाही.

लग्न जमविण्यासाठी मुली बघण्यापासून सुरुवात होते. एखाद्या कुटूंबातील मुलगा विवाहा योग्य असेल तर त्याच्या कुटूंबातील कुटूंबप्रमुख, जेष्ठ व्यक्ती आणि भावकीतील काही नातेवाईक ओळखीच्या किंवा नात्यातल्या लोकांकडे मुलगी पाहण्यासाठी जातात. एकाच खेड्यातील मुला-मुलीचे विवाह केले जातात. दूरवर मुले - मुली शोधण्यास जात नाहीत. विवाह ठरवून केले जातात. मुलगी पाहायला जाताना ब्लाऊजपीस, नारळ घेऊन जातात. मुलीच्या घरी पोहचल्यानंतर मुलीकडचे मुलीला आवरुन पाहायला आलेल्या पाहुण्यांसमोर आणुन बसवतात, मुलगी बघुन झाल्यानंतर मुलगी पसंत असेल किंवा नसेल हे स्पष्ट सांगितले जाते. त्यातही मुलगी पसंत असेल तर नारळ आणि ब्लाऊजपीस देऊन मुलीची ओटी भरण्याचा कार्यक्रम केला जातो आणि सोयरीक जुळवली जाते. यालाच “शाई बदाई” असे म्हणतात. शाई बदाई म्हणजे कुंकू लावणे. यामध्ये कुटूंब प्रमुखाची भुमिका महत्त्वाची असते. लग्न ठरविणे, त्याबाबत बोलणी करणे याची पुर्ण जबाबदारी प्रमुखाची असते. मुलाला किंवा मुलीला जोडीदार पसंत किंवा नापसंत करण्याचा हक्क दिला जात नाही, कुटूंबातील जेष्ठ व्यक्ती ठरवतील त्याच व्यक्तीशी लग्न करावे लागते. लग्न जुळले की मुलीकडचे लोक मुलाकडच्या लोकांना जेवण वैगरे घालतात.

मुला-मुलीकडील व्यक्तींनी पसंती कळविल्यानंतर मुलीचे नातेवाईक मुला कडील मंडळीना विवाह ठरविण्यास यावे, असे निमंत्रण देतात. काही दिवसांनी मुलाकडचे पाच ते दहा मोठया व्यक्ती किंवा नातेवाईक विवाह ठरविण्यास जातात. बोलणी करताना हुंडा (अगदी किरकोळ स्वरुपात), कपडे घेणे देणे, लग्नातील मानपान याबाबत चर्चा केली जाते. बहुतांशी लग्नाचा खर्च दोन्ही कुटूंब मिळुन करतात. मुलाकडचे लोक मुलीच्या आजीला “आज्जीचेर” म्हणुन साडी-चोळीभेट देतात. लग्नाचा दिवस ठरवला जातो, दिवस ठरविताना कोणताही मुहूर्त न पाहता शक्यतो श्रावण महिन्यातील एखादा दिवस ठरवला जातो. पूर्वी व्यवसायासाठी, कामधंद्यासाठी बाहेर गेलेला कैकाडी समाज वर्षातून एकदा तरी श्रावण महिन्यात आपल्या मुळ गावी येतो. यावेळी सगळा समाज एकत्र जमतो. लग्नासाठी समाजातील जास्तीत जास्त लोकांची उपस्थिती लागावी याकरीता बहुतांश लग्न श्रावण महिन्यात म्हणजे पावसाळयात लावली जातात. बोलणी झाल्यानंतर मुलीचे मामा गहु, ज्वारी, तांदुळ, डाळ, गुळ असे धान्य मुलीच्या घरच्यांना नेऊन देतात. या प्रथेला “पुट्टुल देणे” असे म्हटले जाते.

या धान्यामध्ये मुलीकडच्या लोकांनी आणखी धान्याची भर टाकुन लग्नामध्ये सर्वांना जेवण घालावे लागते. लग्नाचा पुर्ण कार्यक्रम ३ दिवसांचा असुन पहिल्या दिवशी हळद, दुसऱ्या दिवशी लग्न आणि तिसऱ्या दिवशी वरात काढल्यानंतर लग्नकार्य पुर्ण होते. तर काही ठिकाणी पहिल्या दिवशी संध्याकाळी हळद, दुसऱ्या दिवशी गाढवावरून वरात निघत असे आणि लग्न होत असे, आणि लग्न झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी डुक्कराचे मांस, दारू च कार्यक्रम असायचा. सर्वेक्षण दरम्यान बीड जिल्ह्यातील गेवराई गावातून अशी माहिती मिळाली कि, कैकाडी समाजामध्ये लग्न पूर्वी पाच दिवस सुद्धा चालत होते. पहिल्या ते पाचव्या दिवसापर्यंत नवरामुलगा व नवरी मुलीला हळद लावली जात होती आणि पाचव्या दिवशी लग्न लावले जात होते. लग्न झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी डुक्कर पकडून त्याचे जेवण व दारूची मेजवानी होत होती.

**पहिला दिवस: हळद लावण्याचा कार्यक्रम**

लग्नकार्य मुलीकडे होत असल्याने मुलीकडचे लोक हळदी साठी आणि लग्नासाठी घरासमोर बांबु, फोक, लिंबाचा पाला आणि आंब्याचा डहाळ वापरुन मांडव तयार करतात. नवरा मुलगा हळदीच्या दिवशी त्याच्या घरुन हळदीचा कार्यक्रम ठरविल्या ठिकाणी सर्व तयारीसह येतो. नवरा मुलगा मांडवात पोहचल्यानंतर जातभाई/ कुळवे हळदिच्या ठिकाणी जमिनीवर तांदळाची चौकट आखतात आणि चारही कोपऱ्यामध्ये पानाचा विडा ठेवतात त्यानंतर नवरा मुलगा मांडवात पोहचल्यानंतर जातभाई / कुळवे हळदिच्या ठिकाणी जमिनीवर तांदळाची चौकट आखतातआणि चारही कोपऱ्यामध्ये पानाचा विडा ठेवतात त्यानंतर नवरा मुलगा आणि नवरी मुलगी यांना चौकोनाच्या दोन बाजुला बसवुन हळद लावायला सुरुवात करतात. हळद लावायला सुरुवात कोणत्याही नातेवाईकाने किंवा कुटूंबातील सदस्यांनी केली तरी हरकत नसते, परंतु मान म्हणुन पहिली हळद लग्न लावणाऱ्या कुळवेना असतो.

लग्न लावणाऱ्या व्यक्तीला जातभाई किंवा कुळवे म्हटले जाते. त्यांना हळद लावली कि इतर सर्व जाण दोघांना हळद लावतात. तर काही ठिकाणी हळदीच्या दिवशी गावातील अथवा घरातील देवांना पुरण पोळीचा नैवैद्य दाखवला जात असत. नवरा मुलाला ५ सुवासिनी प्रथम हळद लावतात नंतर तीच उष्टी हळद नवरी मुलीला लावली जात होती. तसेच बीड जिल्ह्यातील गेवराई गावातील चर्चेनुसार अशी माहिती मिळाली कि, पन्ना म्हणजे मोठे खुगीर गाढव यावर नवरदेवाला बसवून हळद लावली जात असे. हळदीचा कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर मुलगीला तिच्या घरी नेले

जाते.  मुलाला त्यानंतर मुलीच्या घरी जाता येत नाही, म्हणुन मुलीकडचे नवऱ्या मुलाची आणि त्यांच्या घरातल्या लोकांच्या राहण्याची सोय त्यांच्या घराजवळ एखाद्या खोलीमध्ये करतात, याला “जानवस”  घर म्हणतात.  हे घर त्याचं स्वत:च किंवा भावकिचे नसते.

**दुसरा दिवस : लग्न कार्याचा दिवस**

दुसऱ्या दिवशी सकाळी नवरा मुलगा स्वत:च आवरुन गावतल्या मारुतीच्या पाया पडण्यासाठी/दर्शन घेण्यासाठी जातो.  त्याच्या सोबत मुलीकडचे चार-पाचजण जातात.  त्यांना प्रत्येका सोयऱ्यांना हातात गव्हाच्या पिठापासुन बनवलेले दोन दोन मुटके/ लिंबोटे घ्यायचे.  नवरा मुलगा मंदिरात जाऊन दर्शन घेतो, त्यानंतर बाहेर येताना आपल्या हातातील कट्यार जमिनीवर आडवी ठेवुन ती ओलांडुन पुढे येतो आणि त्यानंतर काट्यार पुन्हा हातात घेतो.  त्यानंतर त्याच्यासोबत आलेले सगळे सोयरे त्याच्या हातातले मुटके / लिंबोटे नवऱ्या मुलाला फेकून मारतात आणि त्याला घेऊन चालत मांडवात येतात.  नवरा मुलगा मांडवाजवळ आल्यावर मांडवाबाहेर त्याला अंघोळ घालुन नवीन कपडे घालतात आणि मांडवात नेतात.  तोपर्यंत तिकडे नवरी कडचे लोक तिला तयार करुन मांडवात आणतात.

मांडवात आणल्यानंतर दोघांना पाटावर उभे करतात.  त्यानंतर त्याच्यावर अक्षदा म्हणुन तांदुळ टाकतात आणि लग्न लावतात.  लग्न लागल्यानंतर नवरा नवरीला त्याच पाटावर बसवतात.  त्यांच्या  बाजुने चार करवल्या उभ्या राहतात आणि लग्न लावणारे कुळवे दोरा घेऊन नवरा नवरीच्या भोवती दोरा सुतवतात.  दोरा सुतवताना प्रत्येक फेरी पुर्ण करताना दोरा करवल्यांच्या हातात दिला जातो.  चार फेऱ्या पुर्ण केल्यानंतर दोरा काढुन घेतात आणि मांडवावर टाकतात.  त्यानंतर तांदुळ घेवुन नवरा नवरी वरुन उतरुन टाकतात, याला सेसा भरणे असेही म्हटले जाते.  यानंतर लग्न कार्य पुर्ण होते, आणि जेवणाच्या पंगती बसतात.  संध्याकाळी नवरा मुलीच्या घरी सर्वांच्या पाया पडायला जातात. पाया पडुन झाल्यानंतर वऱ्हाड घालावण्याचा कार्यक्रम होतो, यामध्ये कोणत्याही विधी किंवा खास बाब नसून यामध्ये एकमेकांचा निरोप घेतला जातो. लग्नात प्रामुख्याने उदरनिर्वाहसाठी शिदोरी म्हणून विळा म्हणजेच ख्वल्ली दिली जात होती, त्याचा वापर करून कैकाडी समाजातील स्त्रिया आपला रोजगाराचा प्रश्न सोडवत असे.

कैकाडी समुदायात पारंपारिक विवाहाच्या प्रथाप्रमाणे प्रगत समाजाच्या संपर्कामुळे प्रगत समाजातील हिंदू विवाह प्रथाही आत्मसात करताना दिसून येतात. उदा. मेहंदी कार्यक्रम, साखरपुडा, पूजा, विधी करणे अश्या प्रथा सुद्धा आत्मसात करताना कैकाडी समाज दिसून येतो.  धार्मिक विधी करण्यासाठी ब्राम्हण येत नसल्यामुळे लग्नकार्य पार पाडण्यासाठी कैकाडी समाजातील जेष्ठ व्यक्तीच लग्नविधी पार पाडत असे.

**लग्नकार्य दरम्यान विशिष्ट प्रथा**

लक्षगट चर्चे दरम्यान जालना शहरामध्ये झालेल्या चर्चेनुसार लग्न कार्य पार पडत असताना विविध खेळ व महत्वाची नोंद सांगण्यात आले ते खालीलप्रमाणे

**अ)** लग्नकार्य पार पडल्यानंतर नवरा नवरीचे विविध खेळ घेतले जात होते. नवरा मुलाने थोडेसे खोबरे चावून घ्याचे आणि थोडेसे पाणी पिऊन त्याची गुळणी करून नवरीच्या तोंडावर थुंकायचे नंतर नवरीने पण अशीच क्रिया करायची याला **“गुळणागुळणी”** असे म्हणतात.

**आ)** नवरदेवाने डाव्या हातात सुपारी ठेवायची आणि नवरीने ते दोन्ही हाताने सोडवायचा प्रयत्न कार्याचा नंतर नवरीने दोन्ही हातात मिळून एक सुपारी ठेवायची आणि नवरदेवाने ते फक्त डाव्या हाताने सोडवायचा प्रयत्न करायचा असा खेळ खेळला जात होता.

**इ)** त्याचबरोबर अशी माहिती सुद्धा मिळाली कि,  पूर्वी विशिष्ट अशी प्रथा होती ज्यात नवरीला गावातील एखाद्या घरात लपवून ठेवली जात होती आणि नवरदेव गाढव अथवा उपलब्ध होत असेल तर घोड्यावर वाजत गाजत गावातील सगळ्या घरात शोधत शोधत मिरवणूक काढली जात होती. नवरी मुलीचा शोध लागल्यानंतर मांडवात आणून लग्न लावून दिले जात होते.  झाडाची मांडव तयार करून लग्न लावली जात होती.

**ई)** अहमदनगर जिल्ह्यातील हंगा गावातील चर्चे दरम्यान असे सांगण्यात आले कि, लग्न कार्य होण्याच्या अगोदर नवरा मुलाचे जावळ कार्यक्रम झालेला असणे गरजेचे आहे. प्रामुख्याने जाधव कुटुंबातील नवरा मुलगा असेल तर लग्नाच्या अगोदर जावळ (बट कापणे) करून बोकड कापावेच लागत होते. व नंतरच लग्न होत होते.

## १५. आहार

कैकाडी समाज हा शाकाहारी आणि मांसाहारी अशा दोन्ही प्रकारचे अन्न खातात. परंतु मुख्यतः कैकाडी समाज मांसाहारी असून आहारामध्ये अधिकतर डुकराचे मांस खातात. समाजातील अनेक रिती रिवाज, रूढी, परंपरा जपताना डुकराचा बळी देऊन त्याच्या मांसाचे नैवद्य दाखविणे आणि सेवन करण्याची प्रथा रूढ आहे. यामध्ये शाल्ग (मोठे डुक्कर), गुन्नी (छोटे डुक्कर), भ्यारशिरज (मोठ्या डोक्याचे डुक्कर) यांचा वापर पारंपारिक उत्सवांमध्ये केला जातो. या व्यतिरिक्त चिकन, मटन, मासे आणि घोरपडीचे मांस देखील खाण्यात येते.

कैकाडी समाजामध्ये दारू पिण्याचे प्रमाण सुद्धा मोठ्या प्रमाणात दिसून येते. सण, उत्सव, विवाह अश्या कार्यक्रमामध्ये पुरी, भाजी असे पदार्थ असतात. अलीकडच्या काळात काही वर्षांमध्ये गावामध्ये डुक्कर पाळणे आणि खाणे अधिक कठीण झाले आहे. इतर समाजातील लोक कैकाडी समाजाला डुक्कराचे मांस खाण्यावरून चिडवतात, त्रास देतात त्यामुळे कैकाडी लोक इतरांपासून लपवून डुकराचे मांस खातात. तर नवीन पिढीचे तरुणांमध्ये डुक्कराचे मांस खाण्याचे प्रमाण कमी आहे किंवा त्यांनी पूर्णपणे सोडलेले दिसून येते. तसेच सध्या वराहपालन साठी गावातून विरोध होत असल्यामुळे त्याचे प्रमाण कमी झालेले दिसून येते.

## १६. कैकाडी समाजातील अंधश्रद्धा

कैकाडी समुदायामध्ये अंधश्रद्धेचा प्रभाव आजही असल्याचे दिसून येते. कैकाडी समाजामध्ये महिलांच्या अंगात येणे, पोट दुखत असेल तर लिंबाच्या काडीने डाग देणे, चटका देणे हा प्रकार दिसून येतो. त्याचबरोबर अंधश्रद्धावर भर असल्याने शेळी (पाट), बकरे, डुकर, कोंबडा बळी देण्याची पद्धत या समाजात मोठ्या प्रमाणात आहे. बोकड, कोंबड्या बळी दिल्याने देव प्रसन्न होतात व ते आपल्याला संकटातून वाचवितात. कुटुंबातील व्यक्ती आजारी पडली तर रुग्णालयात न जाता अंगात येणाऱ्या व्यक्तीकडे जातात. आखाडीच्या/ आषाढीच्या महिन्यात पशु बळी दिले जातात.

तसेच लग्न समारंभ, जावळ करणे, जत्रा, पाचवीच्या दिवशी पशु बळी दिले जातात. नवस बोलणे व फेडणे हे सर्व अंधश्रद्धेची लक्षणे या समुदायात मोठ्या प्रमाणात

आढळून येतात. कैकाडी समाजातील ज्या महिलेच्या अंगात येते त्यांचा मृत्युविधी करताना प्रामुख्याने त्यांचा दफनविधी केला जातो व इतर महिलांना दफन न करता त्यांना जाळले (अग्नी देणे) जात असत असे मराठवाड्यातील जालना शहरात झालेल्या लक्षगट चर्चे दरम्यान सांगण्यात आले.

## १७. जातपंचायत

कोणताही समाज घेतला तर त्या त्या समाजामध्ये अंतर्गत कलह हा असतोच. या अंतर्गत कलहाणे समाजामध्ये अनेक समस्या निर्माण होतात. यासाठी पूर्वी समाज अंतर्गत कलह मिटविण्याची व्यवस्था त्या त्या समाजाने केली होती. त्या व्यवस्थेला जातपंचायत असे म्हणतात. कैकाडी समुदायामध्ये जातपंचायत अस्तित्वात होती. जातपंचायतीमध्ये न्यायनिवाडा करणारे समाजातील शहाणे व जेष्ठ व्यक्तींचा समूह पंच म्हणून काम करतात. कैकाडी समुदायामध्ये अश्या पंचांना "ओकाळे" असे म्हणतात. तर ओक खेळणे म्हणजे न्यायनिवाडा करणे, वाद सोडविणे होय. जातपंचायत मध्ये पंच म्हणून फक्त पुरुषच असतात.

अशी जातपंचायत ठराविक दिवशी किंवा ठराविक वेळी बसत नाही, जर एखाद्या कुटुंबात वाद झाला असेल व तो कुटुंबात सुटत नसेल तर तो वाद जातपंचायतकडे नेला जातो. तसेच कैकाडी समाज व्यवसायनिमित्त सततचे स्थलांतर करीत असतो. त्यामुळे जत्रा-यात्रा असेल तर हा समाज एकत्रित येतो अश्या वेळेस सुद्धा जातपंचायत भरवली जाते.

या जातपंचायतीमध्ये विविध वाद व प्रश्न मांडले जातात व त्याची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला जातो. अश्या जातपंचायतीत कौटुंबिक कलह उदा. पत्नीपासून किंवा पतीपासून काडीमोड घेणे (घटस्फोट), पत्नी नांदावयास न येणे (पतीच्या घरी राहत नसणे), पती पत्नीला घरात न घेणे, बंधू – बंधू यांच्यातील भांडणे वगेरे प्रश्न तसेच आर्थिक व्यवहारातून उद्भवलेली प्रश्न इत्यादी प्रश्नही जातपंचायतीसमोर मांडले जातात. असे प्रश्न उद्भवल्यानंतर जात पंचायत निर्णय देण्यासाठी बसतात. त्यावेळी समाजातील इतर लोक व ज्या कुटुंबाचा वाद आहे अश्या कुटुंबातील लोक आणि पंच बैठकीत उपस्थित राहतात. दोन्ही बाजूच्या मंडळीना बोलण्याची संधी दिली जाते. त्यांचे एकूण घेतल्यानंतर पंच निर्णय देतात. जातपंचायतीमध्ये शिक्षा म्हणून महिलांचे केस कापणे, पुरुष असल्यास टक्कल करून त्याला चप्पल ने मारणे, जातीच्या बाहेर टाकणे (बहिष्कृत करणे/वाळीत टाकणे/कटमोडी करणे), पैश्याच्या स्वरुपात दंड आकारणे,

समाजातील सर्व लोकांना जेवण देणे किंवा पंचांना जेवण देणे, दारू पाजणे इत्यादी शिक्षा केली जात होती.

सद्यस्थितीमध्ये अश्या जातपंचायत भरविणे व न्यायनिवाडा करणे यावर शासनाने बंदी घातली आहे. त्यामुळे कैकाडी समुदायामध्ये अशी जातपंचायत भरविणे बंद झालेले दिसून येते. कैकाडी समाज सध्या आपले कलह आपआपसात किंवा न्यायपालिकेद्वारे सोडवताना दिसून येतात. अहमदनगर, बीड जिल्ह्यातील लक्षगट चर्चे दरम्यान असे सांगण्यात आले कि, अहमदनगरहून पाथर्डी रोड वरील निवडुंगे गाव येथून ३ किमी अंतरावर असणारे मढी गाव येथे कानिफनाथ यांची फाल्गुन वद्य पंचमीला (होळी) यात्रा भरते. या यात्रेदरम्यान पूर्वी जातपंचायत भरवली जात होती. वर्षभरातील विविध भांडणे, वाद येथे सोडविले जात होती. परंतु अश्या जातपंचायती भरविण्यावर शासनाकडून बंदी आल्याने सध्या जातपंचायत भरत नाही.

## १८. समाजातील स्थान

कैकाडी समाजातील लोकांकडे आजही उपजीविकेचे साधने नसल्यामुळे त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती मध्ये सुधारणा झालेली नाही. डाले, टोपल्या विणणे हा व्यवसाय प्लास्टिकच्या वस्तूचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. समाजातील खालचे स्थान, डुकराचे मांस खाल्यामुळे इतर लोक त्यांना काम देत नाहीत. त्यामुळे दैनंदिन कष्टाची कामे करून कैकाडी समाजातील लोक आपली उपजीविका भागवतात असे दिसून आले. कैकाडी समाजात साक्षरता नगण्य आहे. त्यामुळे शैक्षणिक सवलती, शिक्षण आणि नोकऱ्या इत्यादींचा ते लाभ घेत नाहीत. त्यांची आर्थिक परिस्थिती अजूनही फारच दारिद्य असून उदरनिर्वाह भागविण्यासाठी ते गावोगावी भटकत असतात.

कैकाडी समाजातील लोक हे व्यसनाधीन असून दारू पिणे हे व्यसन मोठ्या प्रमाणात असलेले दिसून येते. कैकाडी समाजाच्या लोकांना सार्वजनिक ठिकाणी पाणी भरू दिले जात नाही, मंदिर मध्ये प्रवेश करण्यास मनाई करण्यात येते, शाळेमधील कैकाडी समाजाच्या मुलांना त्यांचे नावाने हाक न मारता, "ये कैकाडी" किंवा "कैकाड्याचा सुनील" म्हणून हाक मारली जाते, गावातील लग्न समारंभ व इतर कार्यक्रमामध्ये कैकाडी समाजाच्या लोकांना आमंत्रण नसायचे आणि असेल तर त्यांना वेगळ्या ठिकाणी स्वतंत्र बसविण्यात येते अशी दुय्यम किंवा अस्पृश्यतेची वागणूक दिली जात असल्याचे लक्ष गट चर्चेमध्ये कैकाडी

समाजाच्या लोकांनी सांगितले. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील बहुतेक गावात कैकाडी समाजाची कुटुंबे हि मूळ गावाच्या वस्ती बाहेर असलेली दिसून आली. त्यांच्या शेजारी असणारे कुटुंबे हि सुद्धा अनुसूचित जातीमधील उदा. महार, मांग, चांभार अश्या समाजाची कुटुंबे आहेत.

अनुसूचित जातीमधील लोक ज्यांना अस्पृश्य मानले जाते त्याचप्रमाणे कैकाडी समाजाला अस्पृश्यतेची वागणूक मिळते. कैकाडी समाजातील लोक गावातील गणपती, जयंती सारख्या मोठ्या उत्सवात सहभागी होत नाही. जरी क्वचितच संबध आला तरी अशा समाजासोबत मैत्री आहे ज्यांना अस्पृश्य किंवा हीन जातीची वागणूक मिळते, अशा समाजासोबतच सहभागी होतात. लग्नकार्य, मृत्युविधी असे महत्वाचे विधी करण्यासाठी ब्राम्हण येत नसल्यामुळे कैकाडी समाजातील जेष्ठ व्यक्ती अश्या विधी पूर्ण कर असतात. कैकाडी समुदाय आजदेखील अस्पृश्यतेचे जीवन जगताना दिसून येतो. सामाजिक जाती व्यवस्थेमध्ये कैकाडी समाज हा कनिष्ठ वर्गात गणला जातो.

## १९. रोटी बेटी व्यवहार

उर्वरित महाराष्ट्र व विदर्भ भागातील कैकाडी समाजामध्ये रोटी बेटी व्यवहार होतो. विदर्भामध्ये राहणाऱ्या अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट असणारा कैकाडी समाज व विदर्भ वगळता उर्वरित महाराष्ट्रातील जिल्ह्यामध्ये वास्तव्य करत असलेला कैकाडी समाज यांचे राहणीमान, चालीरीती, बोलीभाषा, खान-पान, रूढी, परंपरा, पारंपारिक व्यवसाय, विवाहपद्धती, कुलदेवता, कुळ, आडनावे व इतर समाजाकडून मिळणारी वागणूक या सर्व बाबी एकच असल्याचे दिसून येते. त्यामुळे यांच्यात रोटी बेटी व्यवहार होत असलेला दिसून येतो. त्या संदर्भात पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडामधील जिल्ह्यामध्ये झालेल्या लक्षगट चर्चेदरम्यान व प्रत्यक्ष पाहणीद्वारे अनेक लोकांनी त्या संदर्भात माहिती दिली तसेच विवाह/लग्नपत्रिका, विवाह नोंदणी प्रमाणपत्र दाखवण्यात आले.

# कैकाडी समाज लक्षगट चर्चेदरम्यान संकलित गावाची माहिती व निरीक्षणे

# पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि खान्देश मधील जिल्ह्यामधून

१. **गाव नागठाणे तालुका सातारा जिल्हा सातारा** या ठिकाणी कैकाडी समाजाची सात ते दहा कुटुंबे आहेत. येथील कैकाडी समाजाची वस्ती हि मूळ गावाच्या बाहेर असलेली दिसून येते. कैकाडी समाज हा व्यवसायासाठी सतत भटकंती करत असल्यामुळे गावाच्या बाहेर ते वास्तव्य करतात व तसेच पुढे निघून जातात. पाट्या, टोपले विणणे अश्या हात कौशल्यामुळे कैकाडी असे नाव पडले असावे असे सांगण्यात आले. कैकाडी समाजामध्ये कै म्हणजे हाथ आणि काडी म्हणजे काड्या. डुक्कर सुद्धा पाळले जाते परंतु हा व्यवसाय नसून फक्त खाण्यासाठी मांस उपयोगात आणण्यासाठी पाळले जाते. कैकाडी समाजातीलच डुक्कराचे मांस विकत घेतात. येथील समाज मोठ्या प्रमाणात वाद्य वाजवण्याचा व्यवसाय करताना दिसून येतो. लग्नात, यात्रेत कलाट, ढोलक, ट्रमपेट, पडघम, बडा ढोल इत्यादी वाद्य वाजवले जात. इतर समाजाच्या दृष्टीने कैकाडी समाजाला दुय्यम स्वरुपाची वागणूक दिली जाते.

शाळेत मुलांना अस्पृश्यतेची वागणूक मिळते. शाळेतील मुलांचे मित्रसुद्धा कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातीमधील मुलेच असतात. इतर समाजच्या स्मशानभूमीत कैकाडी समाजाच्या व्यक्तीस जाळण्यास मनाई होती. त्यामुळे नदीकडेला, गावाच्या बाहेर जाळले जात होते. सध्या नागठाणे येथे कैकाडी समाजाची स्मशानभूमी स्वतंत्र आहे. पूर्वी येथे कैकाडी समाजाची जातपंचायत भरवली जात होती. कौटुंबिक वाद, वैवाहिक वाद सोडवण्यासाठी अशी जातपंचायत भरवली जात होती. जातपंचायतमधील पंचना ओकाळे म्हणून संबोधले जाते. न्यायनिवाडा करताना शिक्षा म्हणून पैसे देणे, काडीमोड देणे, समाजातील व्यक्तींना जेवण देणे, समजावून सांगणे, वाळीत टाकणे, पंचांना दारू पाजणे अश्या स्वरुपात दंड दिला जात होता. सद्यस्थितीमध्ये अशी जातपंचायत भरवली जात नाही. वाद कुटुंबात आपापसात मिटवले जातात. अन्यथा न्यायालयात सुद्धा जावून वाद मिटवले जातात.

२. **गाव तारळे तालुका पाटण जिल्हा सातारा** या ठिकाणी कैकाडी समाजाची ३० ते ३५ कुटुंबे आहेत. कैकाडी समाजाची वस्तीच्या शेजारी आजूबाजूला महार, मांग, चांभार, वडारी अश्या

समाजाची घरे आहेत. येथील कैकाडी समाज पाट्या, टोपले विणणे व विक्री करणे, वाजंत्री व्यवसाय, वराह पालन, गाढवावरून माती वाहने, चोऱ्या करणे अश्या स्वरुपात व्यवसाय करतात. पूर्वीपासून चालत आलेला टोपल्या विणणे हा व्यवसाय लोप पावत चालला आहे आणि डुक्कर पालन करू नये याकरिता देखील त्यांच्यावर बंदी आणण्यात येत आहे. आजुबाजुतील गावकरी डुकरांना औषध घालून मारतात. ग्रामपंचायतीने नोटीस काढून डुक्कर पाळण्यास मनाई केली आहे. त्यामुळे उदरनिर्वाहाचे कोणतेच साधन त्यांना प्राप्त होत नाही. आमदारांना जमीन मिळण्यासाठी अर्ज केला परंतु कोणतेही दखल घेण्यात आली नाही.

पूर्वी सार्वजनिक पाण्याच्या ठिकाणी विहिरीवर पाणी भरू दिले जात नव्हते. इतर समाजातील लोक पाणी बादलीत भरून कैकाडी समाजाच्या लोकांच्या बादलीत टाकत असे. कार्यक्रमाच्या वेळी जेवणाची पंगत वेगळी बसवली जात होती. मागील १५ ते २० वर्षापासून यात बदल दिसत असला तरी अद्याप मंदिरामध्ये नैवैद्य दाखवू देत नाहीत. डुक्कर पाळली जातात म्हणून मंदिरात प्रवेश नाकारला जातो. गावातील सार्वजनिक यात्रेमध्ये कैकाडी समाजाला सहभागी करून घेतले जात नाही, नियोजनामध्ये त्यांना विचारणा केली जात नाही केवळ बघ्याची भूमिका कैकाडी समाजाची असते. शाळेत जाणाऱ्या मुलांना तुम्ही लोक डुक्कर खाता, तुझ्याशी बोलणार नाही असे सारखे म्हणतात गावातील कैकाडी समाजाच्या सर्व मुलांना असा त्रास होतो. त्यामुळे मुले लवकर शिक्षण सोडून देतात. त्यामुळे कैकाडी समाजाचे शिक्षणाचे प्रमाण कमी आहे असे दिसून येते. पूर्वी येथे कैकाडी समाजाची जातपंचायत होती. जातपंचायत प्रमुखाला ओकाळे म्हणतात. येथील लोकांचा विदर्भातील कैकाडी समाजातील लोकांशी रोटी-बेटी व्यवहार होतो. विदर्भातील कैकाडी समाज आणि सातारा जिल्ह्यातील समाज हा एकच असून त्यांचे रूढी, परंपरा, चालीरीती एकच आहेत असे सांगण्यात आले.

३. **गाव काशीळ तालुका जिल्हा सातारा याठिकाणी** कैकाडी समाजाची ७ ते ८ कुटुंबे आहेत. या कुटुंबांनी एकत्र येऊन जमीन विकत घेतली आणि येथे एकत्रित वास्तव्य करीत आहेत. कैकाडी समाजाच्या आजूबाजूस धनगर वाडा व बौद्ध वस्ती आहे. कैकाडी समाजाची वस्ती मूळ गावाच्या बाहेर आहे. वस्तीमध्ये कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. तसेच कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ येथील लोकांना भेटला नाही. व्यवसायासाठी भटकंती करताना मोठ्या प्रमाणात दिसून येतात. पाट्या टोपल्या विणणे,डुक्कर पालन, गाढवावरून माती वाहने अशी व्यवसाय येथील कैकाडी समाज करतो. ट्रक, ट्रक्टर सारख्या आधुनिक साधनाचा वापर

वाढल्यामुळे गाढवावरून माती वाहने हा व्यवसाय बंद झाला आहे. पूर्वी हा समाज डुक्कर पाळत होता परंतु गावातल्या लोकांनी विरोध केला म्हणून लोक डुक्कर पाळत नाही.

डुक्कर पाळलेच किंवा गावात कोणाच्या शेतात डुक्कर गेले तर गावकरी औषध घालून डुकरांना मारून टाकतात किंवा भांडणे काढतात, नुकसानभरपाई द्यावी लागते. त्यामुळे अश्या बाबी घडू नये म्हणून सद्यस्थितीमध्ये हा समाज डुक्कर पाळत नाही. डुक्कर खाणे किंवा पाळणे हि गोष्ट इतर समाज घाणेरढे समजतात. कैकाडी समाजातील लोकांना जातीवरून शिव्या दिल्या जातात, डुक्कराचे मांस खातात या मुले इतर समाज जवळ करून घेत नाही. येथील कैकाडी समाजामध्ये शिक्षणाबद्दल उत्सुकता दिसून आली परंतु नोकरी मिळत नाही यामुळे हा समाज अजून पिछाडीवर जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही. शाळेत मुलांना कैकाडीवरून चिडवणूक होत असे. येथील कैकाडी समाजाचे विदर्भातील कैकाडी समाजाबरोबर रोटी-बेटी व्यवहार होतात असे सुद्धा सांगण्यात आले. तसेच लग्नपत्रिका दाखवण्यात आले.

४. **गाव उंब्रज (शिवडे) तालुका कराड जिल्हा सातारा** येथे कैकाडी समाजाची १० ते १२ कुटुंबे आहेत. येथील समाज भटकंती करून येथे वास्तव्यास आला आहे. ग्रामपंचायतीद्वारे भाडेपट्टीने जागा राहण्यासाठी मिळाली आहे. पंढरपुरी कैकाडी हि आमची जात आणि ख्वल्ली ह्या मुख्य शस्त्रानेच आमची ओळख अशी माहिती येथील समाजाने दिली. येथे कैकाडी समाजात माने आणि जाधव हे मूळ आडनाव आहेत. कैकाडी समाजाला वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी नावे आहेत परंतु जात एकच आहे. कोल्हापूर पासून साताऱ्याच्या बाजूला पहिले तर तेथे कैकाडी म्हणून समाजास ओळखतात.

कोल्हापूर पासून पुढे सांगली, इचलकरंजीच्या बाजूला कोरवी म्हणतात, कर्नाटकच्या बाजूला बजंत्री म्हणतात आणि सोलापूर च्या बाजूला माकडवाले कैकाडी म्हणतात. कैकाडी समाज एकच परंतु गावे बदलली तर त्यांची समाजाच्या नावाची ओळख बदलेली दिसून येतात. डुक्कर खातात म्हणून शाळेतील मुलांना अस्पृश्यता अनुभवास येते, शाळेतील इतर मुले चिडवतात त्यामुळे दुसऱ्या दिवसापासून शाळेला न जाने हा प्रकार दिसून आला. त्यामुळे शिक्षणाचे प्रमाण येथे कमी आहे. पारंपारिक टोपल्या विणणे हा व्यवसाय लोप पावत असल्यामुळे नवीन प्रकारे काड्याची शोभेच्या वस्तू तयार करून विक्री केली जाते. येथील कैकाडी समाजाला कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळाला नाही.

५. **पेठ वडगाव तालुका हातकणगले जिल्हा कोल्हापूर** याठिकाणी कैकाडी समाजाची १७५ च्या आसपास कुटुंबे आहेत. टोपल्या, बुट्ट्या, पाटी, कणगी बनवून बाजारात किंवा घरोघरी विकणे हा त्यांचा मुख्य व्यवसाय मोठ्या प्रमाणात दिसून येतो. परंतु प्लास्टिक वस्तूच्या वाढत्या वापरामुळे हा व्यवसाय लोप पावत आहे. वराह पालन हा व्यवसाय सुद्धा पूर्वीप्रमाणे चालत नाही. स्वाईन फ्लू मुळे येथील नगरपालिकाने नोटीस काढून डुक्कर पाळण्यास बंदी केली आहे. ज्या ठिकाणी डुक्कर पाळले जात होते त्या ठिकाणी औषध घालून डुकरांना मारले गेले आहे. त्यामुळे हा व्यवसाय सुद्धा लोप पावत आहे. त्यामुळे हा समाज आत्ता मजुरी, गवंडी काम इत्यादी कामे करून आपला उदरनिर्वाह भागवितात.

येथील कैकाडी समाजाला इतर समाजातील लोकांकडून समारंभात आमंत्रण जास्त प्रमाणात दिले जात नाही, आणि आमंत्रण असेल तर जेवताना कैकाडी समाजाची वेगळी पंगत बसवली जात असे. कैकाडी समाजातील लोकांना नावाने हाक मारताना सुद्धा जातीद्वारे उल्लेख करून हाक मारली जाते उदा. कैकड्याचा बंडू, कैकड्याचा माने असे नाव घेऊन पुकारले जाते. गरिबीमुळे व उदरनिर्वाहाचे साधन लोप पावत असल्यामुळे शिक्षण घेणे अवघड जात आहे. त्यामुळे सुद्धा मुले लवकर शाळा सोडून मोल-मजुरी करायला लागतात. येथील कैकाडी समाज ८५% अशिक्षित असलेला दिसून येतो. येथील कैकाडी समाज हा आपल्या घरात सवांदासाठी मोठ्या प्रमाणात कैकाडी भाषेचा वापर करतात.

६. **कोरवी गल्ली इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर** येथे कैकाडी समाजाची ३०० ते ३५० कुटुंबे आहेत. साधारण २५०० ते ३००० पेक्षा कैकाडी समाजाची लोकसंख्या इचलकरंजी येथे आहे. कोरवी गल्ली येथे कैकाडी समाज वास्तव्यास आहे. येथील कैकाडी समाजास कोरवी समाज म्हणून ओळखला जातो. कोरवी म्हणजेच कैकाडी होय, असे येथील लोकांनी सांगितले. फक्त सांगली, कोल्हापूर या ठिकाणी कैकाडी जातीला कोरवी असे संबोधले जाते असे सांगण्यात आले. येथील लोक प्रामुख्याने कणगी, बुट्ट्या तयार करून विकणे, वराहपालन करणे, वाजंत्री व्यवसाय करणे, गाढव पाळणे हा व्यवसाय करताना दिसून येतात. व्यवसाय करत असताना व सामाजिक जीवन जगत असताना त्यांना विविध अस्पृश्यतेचे अनुभव येतात.

अस्पृश्यतेबद्दल त्यांनी आपले मनोगत मांडले:- बुट्ट्या, कणगी जेंव्हा गल्लोगल्ली विक्री साठी जात होते. त्यावेळी महिलांना कणगी विकत घेतल्यानंतर त्यांनाच पाणी मारून, धुवून स्वच्छ करून द्यायला सांगत असत. तसेच अश्या वेळी कैकाडी समाजातील महिलांनी

पाणी पिण्यासाठी मागितल्यानंतर घराबाहेर ठेवलेल्या तांब्यातूनच पाणी पिण्यास दिले जात होते. उंचावरून स्पर्श होणार नाही अशा बेताने पाणी लांबून दिले जाते. गावात जर डुक्कर मेले असेल तर ते उचलण्यासाठी कैकाडी समाजातीलच लोकांना बोलवले जाते. अनुसूचित जातीमधील इतर समाजाप्रमाणेच कैकाडी समाजाला अस्पृश्याची वागणूक दिली जाते. त्यांची वस्ती हि मूळ गावाच्या वेशी बाहेर होती.

आत्ता शहरीकरण वाढल्यामुळे आजूबाजूला वस्ती राहण्यास आलेली दिसून येते. येथील कैकाडी समाजातील महिलांना हळदी कुंकू साठी इतर समाजातील महिला बोलवत नाही. मंदिरात जाताना काहीतरी कारण सांगून मंदिरात प्रवेश नाकारला जायचा, कार्यक्रमामध्ये गोठ्यात बसवून जेवायला वाढले जाते, अनेकदा तर कार्यक्रमाचे निमंत्रण दिले जात नाही, दिले तर आवार, गोठा स्वच्छ करायला बोलवले जात होते, कैकाडी समाजातील लोकांना जातीवरूनच हाक मारली जाते उदा. कैकाड्याचा सुनील, कैकाड्याचा विलास अशी हाक मारली जाते इत्यादी अनुभव येताना दिसून येतात.

गावातील मंदिरात केवळ वाजंत्री म्हणून बोलवले जाते परंतु मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश दिला जात नाही. गावातील यात्रेमध्ये कैकाडी समाजाचा सहभाग नसायचा. शाळेत शिकणाऱ्या मुलांना सुद्धा जातीवरून चिडवले जाते. शाळेतील मुलांना शेवटच्या बेंच वर बसवले जाते. कैकाडी समाजातील मुलांचे मित्रसुद्धा हे अस्पृश्य मानले जाणाऱ्या अनुसूचित जातीमधील समुदायची आहेत. विदर्भातील अनुसूचित जातीमध्ये असणारे कैकाडी आणि येथील कैकाडी समाज एकच आहे. त्यांच्यात रोटी-बेटी व्यवहार होतात. दोन्ही भागातील देवदेवता, आडनावे, भाषा, धार्मिक परंपरा, पारंपारिक व्यवसाय हे एकच आहेत. असे सांगण्यात आले. त्यासंदर्भातील लग्नपत्रिका दाखवण्यात आले.

७. **गाव हंगा तालुका पारनेर जिल्हा अहमदनगर** येथील कैकाडी समाज हा ३० ते ४० वर्षापूर्वी येथे स्थलांतरित होऊन येथे वास्तव्यास आलेले आहेत. पूर्वीपासूनच कैकाडी समाजाची वस्ती गावाच्या बाहेर आहे. त्यांच्या आजूबाजूला मातंग समाजाची लोक वास्तव्यास आहेत. पाट्या, टोपले विणून विक्री करणे, वराह पालन, गाढवावरून माती वाहने हा येथील कैकाडी समाजाचा मुख्य व्यवसाय दिसून येतो. व्यवसाय करण्यासाठी कच्च्या मालाची उपलब्धता होत नसल्यामुळे व्यवसाय बंद पडत आहे. इतर व्यवसायात सहभागी होताना अस्पृश्यता पाळली जाते. येथील कैकाडी समाजाला इतर समाजाप्रमाणे मान नाही असे येथील लोकांचे म्हणणे

आहे. सार्वजनिक ठिकाणी कैकाडी समाजाला विहिरीवर पाणी भरू दिले जात नव्हते, इतर समाजाची लोक लांबून त्यांच्या बादलीत पाणी टाकत होते. हंगा गावातील कैकाडी समाज बोलीभाषा म्हणून कैकाडी भाषेचा वापर मोठ्या प्रमाणात करतात.

फाल्दिवरचा कार्यक्रम, गण घालणे, आखाडी यात्रा अश्या रूढी परंपरा पाळली जातात. या ठिकाणी पूर्वी कैकाडी समाजाची विशिष्ट अशी जातपंचायत भरत होती. अश्या जातपंचायतीमध्ये ओकाळे (पंच) म्हणून समाजातील शहाणे/जेष्ठ माणसे काम करतात. विवाह संदर्भातील, कौटुंबिक वाद असतील तर जातपंचायतीमध्ये मिटवली जात होती. न्यायनिवाडा झाल्यानंतर दोषी व्यक्तीस समाजातील व्यक्तींना जेवण देणे, दारू पाजणे, बहिष्कार/वाळीत टाकणे, समजावून सांगणे अश्या स्वरुपात दंड दिला जात असे.

महाराष्ट्रामधील सर्व कैकाडी समाज एकच असल्याने येथील कैकाडी समाज आणि विदर्भातील कैकाडी समाजासोबत रोटी-बेटी व्यवहार झाला आहे असे सांगण्यात आले. रवींद्र हंसराज गायकवाड या व्यक्तीचे विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर येथील मनीषा गुलाबराव जाधव या मुलीशी विवाह झाला आहे. त्या संदर्भात लग्नपत्रिका, रवींद्र गायकवाड यांचे विमुक्त जातीचे प्रमाणपत्र व मनीषा जाधव यांचे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र दाखवण्यात आले.

८. **गाव वांबोरी तालुका राहुरी जिल्हा अहमदनगर** येथे कैकाडी समाजाची २१ कुटुंबे वास्तव्यास आहेत. गाढवावरून माती वाहने, डुक्कराची शिकार करणे, मुंगुस पकडणे, ताट्या, टोपल्या विणणे, माकडांचा खेळ करणे, लाकडांची खेळणी तयार करणे, चोऱ्या करणे इत्यादी व्यवसाय येथील कैकाडी समाज करताना दिसून येतो. पूर्वी कैकाडी समाजाला हीन स्वरुपाची वागणूक मिळायची उदा. सार्वजनिक ठिकाणी विहीरिवर पाणी भरण्यास बंदी होती, त्यांना विहिरीला स्पर्श करू देत नव्हते. समाजात मान मिळत नव्हता. कैकाडी समाज डुक्कर पाळतात, खातात त्यामुळे त्यांना मंदिरात प्रवेश नसायचा. येथील कैकाडी समाज हा फिरस्ती आईला मोठ्या प्रमाणात मानतात. कानिफनाथ मढीच्या यात्रेदरम्यान गावातील कैकाडी समाज हा मांसाहारी जेवण करत नाही.

९. **गाव बिडकीन तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद** कैकाडी समाज हा डाले टोपले विणणे, वराहपालन, गाढवावरून माती वाहने, शिकार करणे, बँड व्यवसाय, सनई, ढोल वाजवणे इत्यादी व्यवसाय करतात. येथील कैकाडी समाजाला डुक्कर पाळतात, त्याचे मांस खातात

यामुळे  मंदिरात प्रवेश नसायचा, बाहेरूनच दर्शन घ्यावे लागत होते, पानवाट्यावर पाणी भरू दिले जात नव्हते अथवा तेथे शिवू दिले जात नव्हते, लग्नसमारंभामध्ये जेवणाची पंगत सगळयात शेवटी बसवले जात होते अश्या प्रकारे अस्पृश्यता पाळली जात होती. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने आहारासाठी डुकराचे मांस मोठ्या प्रमाणात खाल्ले जात होते. येथील कैकाडी समाजात व्यसनाधीनता मोठ्या प्रमाणात दिसून येते. लग्न समारंभात दारू पिणे हा नियमितपणा असायचा. पूर्वी  गावातील इतर लोक कैकाडी समाजातील मयत लोकांना गावात पुरू अथवा जाळू देत नव्हते. ते लोक सांगतील त्या ठिकाणी गावाच्या बाहेर १ ते २ किमी बाहेर जाळले अथवा पुरायला सांगितले जात होते. सर्वसाधारण स्मशानभूमीत कैकाडी समाजाला जाळू दिले जात नव्हते.

सध्या कैकाडी समाजाची वेगळी स्वतंत्र स्मशानभूमी गावाच्या बाहेर आहे. गावातील मरिमाता देवीच्या मंदिराच्या ठिकाणी आखाड/आषाढ महिन्यात कैकाडी समाजातील प्रत्येक कुटुंबाला एक डुक्कर कापवेच लागते. प्रत्येक कुटुंब एक डुक्कर कापून देवीला मुंडके आणि पाय नैवेद्य म्हणून ठेवून कैकाडी समाजातील लोकांना जेवण दिले जाते. येथील कैकाडी समाज आणि विदर्भातील कैकाडी समाज एकच असल्याचे सांगण्यात आले. तेथील रूढी, परंपरा, यात्रा एकच असून त्यांच्यासोबत रोटी-बेटी व्यवहार होतात. येथे पूर्वी कैकाडी समाजातील लोकांमध्ये काही वाद निर्माण झाल्यास, कौटुंबिक वाद असल्यास ते सोडवण्यासाठी  कैकाडी समाजाची विशिष्ट अशी जातपंचायत भरली जात होती. सध्या अशी जातपंचायत भरली जात नाही. वाद असतील तर आपापसात वाद मिटवली जात होती. वर्षातून एकदा मढीला जातपंचायत भरवली जात होती असे सुद्धा सांगण्यात आले.

प्रामुख्याने डुकराचे मांस खाणे, दारू पिणे, अशिक्षितपणा, अंधश्रद्धा, आर्थिक दुर्बलता, समाजातील इतर लोकांकडून भेटत असलेली मानहानीकारक वागणूक अश्या कारणामुळे कैकाडी समाज हा मोठ्या प्रमाणात अस्पृश्यतेची जीवन जगत असलेला दिसून येतो.

१०. **कैकाडी समाज वस्ती जालना जिल्हा जालना** येथे झालेल्या सर्वेक्षण दरम्यान पुढील माहिती मिळाली. जालना येथील कैकाडी समाज वस्ती या भागात कैकाडी लोकांची १०० च्या आसपास कुटुंबे आहेत. या लोकांचा मुख्य व्यवसाय डाले, टोपले विणणे व गावोगावी त्याची विक्री करणे, डुक्कर पाळणे, चोऱ्या करणे इत्यादी व्यवसाय करतात. वराहपालन करत असताना वेगवेगळया कुटुंबातील व्यक्ती आपल्या मालकीच्या डुक्कर ओळख खुण म्हणून

डुकराचे अर्धे कान कापणे, अर्धी शेपूट कापणे अशी विविध खुण करतात. कैकाडी समाजातील लोकांना इतर समाजातील लोकांकडून अस्पृश्य मानून मोठ्या प्रमाणात अस्पृश्यता पाळली जाते हे दिसून आले. येथील कैकाडी समाज मोठ्या प्रमाणात कैकाडी भाषा बोलताना दिसून येतो.

शिक्षणाचा अभाव दिसून येतो, त्यामुळे तरुण चोऱ्या करणे अश्या गुन्हेगारी क्षेत्राकडे वळताना दिसून येतात. जन्मविधी, मृत्युविधी अश्या विधी पारंपारिक पद्धतीने करताना आर्थिक अडचणीमुळे पूर्ण करता येत नाही. येथील वस्ती मध्ये महिलांच्या अंगात येणे हा अंधश्रद्धा प्रकार दिसून आला. तसेच ज्या महिलांच्या अंगात येते त्या महिलेला जाळले न जाता त्यांचा दफनविधी केला जातो. जालना जिल्ह्यामधील मुला-मुलींचे विदर्भामधील जिल्ह्यात रोटी-बेटी व्यवहार झालेले आहेत. त्याबद्दल लग्नपत्रिका, जातप्रमाणपत्र दाखवण्यात आले.

११. **गाव गेवराई तालुका गेवराई जिल्हा बीड** येथे झालेल्या सर्वेक्षण दरम्यान पुढील माहिती मिळाली. येथील कैकाडी समुदाय डाले-टोपले विणणे व विक्री करणे, वराहपालन करणे, माकडाचे खेळ करणारे, सापाचे खेळ करणे, ऊसतोडीसाठी जाणे तसेच मोलमजुरीचे कामे करून उदरनिर्वाह भागवितात. आर्थिक व सामाजिक स्थिती बेताची आढळली, बहुसंख्य व्यक्ती दारिद्रय रेषेखाली जीवन जगतात. कैकाडी समुदायाला इतर समाजाकडून अस्पृश्यतेची वागणूक मिळत असल्यामुळे कैकाडी कुटुंबाची मयत गावात पुरली अथवा जाळण्यासाठी मज्जाव केला जात होता. त्यामुळे दोन्ही गावाच्या मध्ये असणारे शिवार/बोर्डर च्या ठिकाणी सदर मयत जाळली अथवा पुरली जात असत. मयत दफन अथवा जाळल्यानंतर तिसऱ्या दिवशी कोंबडी कापली जाते, तर सातव्या दिवशी डुक्कर कापून नैवैद्य ठेवला जातो. अश्या विधी पार पाडल्या जातात.

पूर्वी येथे कैकाडी समाजाची विशिष्ट अशी जातपंचायत भरत होती. अश्या जातपंचायत मध्ये फक्त पुरुषच असतात. जातपंचायत मध्ये दोषी पुरुष असेल तर टक्कल करून चपलाने मारणे, जातीच्या बाहेर टाकणे, पैश्याच्या स्वरुपात दंड आकारणे व दोषी महिला असेल तर त्यांचे केस कापणे अश्या प्रकारची शिक्षा केली जात होती. विदर्भातील अनुसूचित जातीमध्ये असणारे कैकाडी व विमुक्त जातीमध्ये असणारे कैकाडी हे एकच आहेत. त्यांचे रक्ताचे नातेसंबंध आहेत. त्यांच्यात रोटी-बेटी व्यवहार होतात. दोन्ही भागातील

कैकाडी समाजाचे देवदेवता, कुळ, आडनावे, भाषा, धार्मिक परंपरा, पारंपारिक व्यवसाय एकच आहेत. असे येथील लक्षगट चर्चे दरम्यान सांगण्यात आले.

१२.**नवगण राजुरी तालुका जिल्हा बीड** येथे झालेल्या लक्षगट चर्चेदरम्यान पुढील माहिती मिळाली. कैकाडी समाज पूर्वीपासून कणगी, ताट्या, टोपली विणणे व विक्री करणे, वराहपालन करणे, शिकार करणे, वराहपालन करणे, गाढवपालन करणे, माकडाचे खेळ करणे इत्यदी व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह भागवितात. कैकाडी समाजाच्या धार्मिक कार्यामध्ये डुक्कर मारून मांस खाण्याची प्रथा रूढ आहे. नवगण राजुरी येथे लग्न कार्यामध्ये एक विशिष्ट प्रथा आढळून आली. लग्न कार्यात काठ्या खेळणे किंवा काठ्या फिरवणे असा खेळ केला जात असे. लक्ष्मी आई आणि फिरस्ती आईला पशु बळी देण्याची प्रथा आहे. कैकाडी समाजातील लोकांना इतर समाजाकडून अत्यंत हीन दर्ज्याची वागणूक मिळते. कैकाडी समाज डाले, टोपले विक्रीसाठी फिरस्त असताना इतर समाज पाणी पिण्यासाठी देताना हात लांब धरून ओंजळीत पाणी ओतायचे त्यांना शिवून घेत नसे.

कैकाडी समाज डुक्कर पाळतो व त्याचे मांस सेवन करतो या कारणामुळे त्यांना अशी अस्पृश्यतेची वागणूक मिळत असल्याची कारणे समोर आली. शाळेत जाणाऱ्या मुलांना अनुसूचित जातीतील मुले सोडून इतर कोणतीही व्यक्ती जवळ करून घेत नसत. इतर समाजातील जत्रा, उत्सव मध्ये कैकाडी समाजाच्या लोकांना मान नसायचा. तसेच मंदिरात प्रवेश सुद्धा नसायचा. मंदिराच्या बाहेरूनच दर्शन घ्यावे लागत असत. त्यामुळे येथील कैकाडी समाजाच्या लोकांनी स्वतःची वेगळे मंदिर स्थापित करून पूजा अर्चना चालू केली, असे दिसून आले. कैकाडी समाजातील लग्न लावण्यासाठी ब्राम्हण येत नसे त्यामुळे समाजातील जेष्ठ व्यक्ती लग्न लावतात. विदर्भातील जिल्ह्यामध्ये रोटी-बेटी व्यवहार होतात, रूढी परंपरा समान असल्याचे सांगण्यात आले.

# कैकाडी समाज सर्वेक्षण गट चर्चा (FGD)
# विदर्भ विभागातील जिल्हे

**गटचर्चा मुद्दे व मिळालेली माहिती**

कैकाडी समाजाची सामाजिक परिस्थिती, त्यांच्या रूढी-परंपरा, चालीरीती, परस्पर असणारे संबध, धार्मिक प्रथा, बोलीभाषा, विदर्भातील अनुसूचित जातीमधील कैकाडी समाज आणि उर्वरित महाराष्ट्रामधील विमुक्त जातीमध्ये असणारा कैकाडी समाज समान आहेत का? मानववंशशास्त्रीय दृष्टीकोनातून विविध माहिती जाणून घेण्यासाठी विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, बुलढाणा, अकोला, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यातील विविध गावात घेण्यात आलेल्या लक्षगट चर्चा व प्रत्यक्ष पाहणी दरम्यान खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**१. कैकाडी समाजातील आडनावे**

जाधव, गायकवाड, माने ही मूळ आडनावे दिसून येतात. तसेच जाधव आणि माने यांना कैकाडी समाजामध्ये विशिष्ट प्रतिष्ठा आहे. दोन्तले समाजात फक्त पवार आडनावाचे लोक आहेत. तसेच शामगीरे, देवगिरे, मलाजुरे, मुळे, पवार, कोरवी, बजंत्री, दिष्टे, लोडे, नागोर, फुलारी, देशमाने, कवाडे, जुमालस, शिंदे, नळगुणदास, बोद्रे, मेहरे इत्यादी आडनावे आढळतात.

**२. उपजात/ पोटजाती**

कैकाडी समाज हा महाराष्ट्रामध्ये विविध जिल्ह्यामध्ये पसरलेला असून तिला वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या नावाने तसेच व्यवसायावरून सुद्धा ओळखले जाते. विदर्भातील विविध जिल्ह्यामध्ये गटचर्चा घेत असताना प्रामुख्याने खालील उपजाती सांगण्यात आल्या आहेत. वऱ्हाडी कैकाडी, पंढरपुरी कैकाडी, गावकैकाडी, कुंचीवाले (कुंचीकोरवे), माकडवाले कैकाडी, पामलोर कैकाडी, गधेवाले, दोन्तले (चोर कैकाडी) इत्यादी पोट जाती सांगण्यात आले. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये असणाऱ्या या पोटजाती मध्ये रोटी बेटी व्यवहार होतात असे विदर्भातील लोकांनी सांगितले. संपूर्ण महाराष्ट्रामधील कैकाडी समाज हा एकच असून फक्त व्यवसाय व भागानुसार त्याला वेगवेगळे नावे पडली आहेत असे सांगण्यात आले.

### ३. कैकाडी समाजाची पारंपारिक व्यवसाय

अजूनही कैकाडी समाजातील लोक सिंदी, निरगुडी इत्यादी झाडांच्या फोकांचा वापर करून परंपरागत धान्य साठवण्याच्या कणग्या, डाले, झाप, सध्या टोपल्या, पाट्या, बुट्ट्या, ताटी इत्यादी वस्तू बनवून गावात, शेतकऱ्यांना व बाजारात विक्री करून आपला उदरनिर्वाह भागवितात. त्याचबरोबर गाढवावरून माती वाहने, वराह (डुकर) पालन करणे हा सुद्धा व्यवसाय कैकाडी समाज करत असलेला दिसून येतो. कैकाडी समाजाचा वराहपालन हा व्यवसाय व्यवसायभिमुख नाही तो फक्त डुकरांचे मांस अन्न म्हणून खाण्यासाठी उपयोगात आणत होते व समाजांतर्गत डुकरांच्या मांसासाठी देवाण-घेवाण होत होती. सद्यस्थितीमध्ये लोखंडी व प्लास्टिक वस्तूंचा वापर वाढल्यामुळे डाले, टोपले विणणे व्यवसाय लोप पावत आहे तसेच गावातील इतर लोकांच्या विरोध असल्यामुळे वराह पालन करणे शक्य नसल्यामुळे कैकाडी समाजातील लोकांना उदरनिर्वाह भागविण्यासाठी शेतमजुरी, हमालीची कामे पण करावी लागत आहेत.

### ४. स्थलांतर

महाराष्ट्रात कैकाडी समाज हा सर्व जिल्ह्यामध्ये आढळून येतात. विदर्भातील जिल्ह्यामध्ये कैकाडी समाजाची लोकसंख्या अधिक असल्याचे दिसून आले. कैकाडी समाजाचे मुख्य पूर्वज हे पंढरपूर, करमाळा जिल्हा सोलापूर येथील असलेले सांगण्यात आले. त्याचबरोबर नागपूर शहर येथे झालेल्या चर्चे दरम्यान असे सांगण्यात आले कि त्यांचा उगम हा केरळ राज्यातून असू शकतो. तसेच कर्नाटक व आंध्रप्रदेश येथील मूळ रहिवासी असून तेथून स्थलांतरित झाले असावेत असे सांगण्यात आले. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी व्यवसायासाठी हा समाज स्थलांतरीत झालेला दिसून येतो. कैकाडी समाज हा एकाच ठिकाणी वास्तव्य करत नव्हते. व्यवसायासाठी गावी-गाव फिरस्ते स्थलांतर झाल्याचे दिसून येते. कैकाडी समाज कायम फिरस्ती असल्यामुळे कैकाडी समाज कायम गावाच्या बाहेर किंवा वेशीबाहेर आपले वास्तव्य करत असलेले दिसून येते.

### ५. कैकाडी शब्दाचा अर्थ

कै म्हणजे हाथ आणि काडी - म्हणजे काडी चे काम करणारे लोक. हाताने गवत, बांबू कापून त्याच्या वस्तू बनवून उदरनिर्वाह करणारे व्यावसायिक म्हणजे कैकाडी होय. कैकाडी

समाजाला कर्नाटक मध्ये कोरवी, आंध्रप्रदेश मध्ये येरकुला तर मध्यप्रदेश व महाराष्टामध्ये कैकाडी म्हणून ओळखला जातो. कैकाडी समाज हा महाराष्ट्रामध्ये सर्व जिल्ह्यामध्ये व्यवसायामुळे स्थलांतरित झालेला आहे. कैकाडी समाजाचा मुख्य व्यवसाय हा डाले, टोपले विणणे हाच आहे. परंतु विविध ठिकाणी उदरनिर्वाह भागविण्यासाठी वराहपालन, गाढवाच्या साह्याने माती वाहने, मजुरी करणे असे विविध व्यवसाय करत असलेले दिसून येतात.

## ६. कैकाडी समाजाची बोली भाषा

कैकाडी समाजाची कैकाडी हीच बोली भाषा आहे. कैकाडी भाषेला लिपी नाही. प्रामुख्याने त्यांची भाषेमध्ये तेलगु आणि कन्नड भाषेचे मिश्रण असलेले दिसून येते. सद्य स्थितीमध्ये इतर समाजाच्या संपर्कात आल्याने मराठी भाषा मोठ्या प्रमाणात बोलली जाते. कैकाडी समाजातील वरिष्ठ व्यक्तींना पूर्णपणे कैकाडी भाषा बोलता येते परंतु सद्याची तरुण पिढी कैकाडी भाषा कमी बोलते. तर काही तरुण बोलतच नाही.

## ७. पारंपारिक कला कौशल्य

कैकाडी समाजामध्ये विविध कला कौशल्य दिसून येतात. सिंदी, निरगुडी इत्यादी झाडांच्या फोकांचा वापर करून परंपरागत धान्य साठवण्याच्या कणग्या, डाले, झाप, सध्या टोपल्या, पाट्या, बुट्ट्या, ताटी इत्यादी वस्तू बनवने, बेंड वाजविणे (वाजंत्री व्यवसाय करणारे कैकाडी समाज), माकडांचा खेळ करणे, शिकार करणे इत्यादी कला कौशल्य कैकाडी समाजाच्या लोकांमध्ये अंतर्भूत असलेली दिसून येतात किंवा कुटुंबाचे व्यवसाय परंपरेने ते अंगिकारली जातात असे दिसून आले.

## ८. कुलदेवता

विदर्भ जिल्ह्यात झालेल्या चर्चेदरम्यान असे सांगण्यात आले कि, कैकाडी समाजाची यल्लमा देवी, फिरस्ती अम्मा (फिरस्ती देवी), जेजुरीचा खंडोबा, तुळजापूरची तुळजाभवानी, कानिफनाथ मढी, बुलढाणा येथील आई, काळूबाई इत्यादी कुलदेवता आहेत. कैकाडी समाज हा प्रामुख्याने फिरस्ती देवी यांना मोठ्या प्रमाणात मानतात. फिरस्ती देवीला आखाड/आषाढ महिन्यात पाट (शेळी), बकरे, कोंबडा यांचे बळी देऊन वनभोजन केले जाते. कैकाडी समाज व्यवसाय संदर्भात भटकंती करत असला तरी अश्या कार्यक्रमाच्या वेळी सर्व समाज एकत्र येऊन कुलदेवीची

पूजा करतात. कैकाडी समाज हा हिंदू रीतीरिवाज प्रमाणे इतर हि सण, उत्सव देखील साजरे करतात.

## ९. कैकाडी समाजातील कुळ

विदर्भ मधील विविध जिल्ह्यामध्ये घेण्यात आलेल्या चर्चेतून असे सांगण्यात आले कि सातपाडे आणि कवाडे हे कुळ मोठ्या प्रमाणात सांगण्यात आले. तसेच इतर कुळी हे पुढीलप्रमाणे आहेत - लोढे, मनाडे, शामगीरे, देवगिरे, दोन्तले, पटाले, नागोरे, डाने, सपटसरे, उतरसरे, तिरकाळे, मानपाडे, मदनसर, जलमसर, पतके, निर्गुंदा, नळगुंद्रे, हवाले, जलगुंद्रे, मछीन्द्र, चिखलकर, सुजितराय, खालजीत्रे, मधु, सोनसर, डांगे, पालीसर, कटोरे, मिए, कायसो, बिजलीसरे, अंगसो, बुलाकरे, कायसरे, रामगिरे, गजरे, चीतपुत, डाने इत्यादी कुळे चर्चे दरम्यान सांगितले.

## १०.रूढी परंपरा

**अम्मामरमताई (फिरस्ती अम्मा) (वनभोजन)** उर्वरित महाराष्ट्रामध्ये फिरस्ती आई, लक्ष्मी आई यांचा फाल्दीवरचा कार्यक्रम केला जातो त्याचप्रमाणे भटाळा येथील झालेल्या चर्चेदरम्यान असे सांगण्यात आले कि, येथील संपूर्ण कैकाडी समाज हा वर्गणी गोळा करून गावाच्या बाहेर कार्यक्रम केला जातो. हा कार्यक्रम गावाच्या वस्ती बाहेर केला जात होता. आखाडी/आषाढ महिन्यात गावाच्या बाहेर चिखलाची देवी तयार करण्यात येते व त्याची ओटी भरण्यात येते. तसेच एक फिरता गाडा तयार करून त्यात चिखलाची देवी (लक्ष्मी) बसवून त्याची पूजा केली जाते. त्याचबरोबर दोन चिखलाचे बैल तयार करण्यात येतात. चिखलाची देवी च्या समोर नैवैद्य दारू, बिडी, तंबाखू, कोंबडीचे अंडे, पंचपक्क्वान ठेवले जात व नतंर पूजा केली जाते. या कार्यक्रमामध्ये प्रामुख्याने एक काळी शेळी बळी देण्यासाठी घेतली जाते. शेळीला पंचरंगी धागा बांधला जातो. आणि नंतर बळी दिली जाते. आखाड/ आषाढ महिन्यातील मंगळवार व शुक्रवार या दिवसातच केला जातो. बळी व पूजा वगेरे झाल्या नंतर सर्व समाज भोजन करत असत. भोजन झाल्यानंतर फिरता गाडा व त्यातील चिखलाची देवी ज्या ठिकाणी असा कार्यक्रम झाला आहे त्या ठिकाणाहून काही अंतरावर हि देवी एका झाडाखाली ठेवली जाते. चिखलाची देवी ठेवल्यानंतर

पाठीमागे वळून पाहू नये. तसेच असा कार्यक्रम हा कैकाडी समाजाच्या एखाद्या घरात लग्न समारंभ असल्यास त्यांना वैयक्तिक असा कार्यक्रम करावा लागतो.

**११. जत्रा**

- **अ)** **काळूबाईची जत्रा** सातारा येथील फलटण येथे भरत असेलेले सांगण्यात आले. या जत्रेत कैकाडी समाजाचे सर्व लोक जमा होतात.
- **आ)** **कानिफनाथ मढी:-** अहमदनगरहून पाथर्डी रोड वरील निवडुंगे हे गाव आहे. तेथून 3 कि.मी. अंतरावर मढी हे गाव आहे. पाथर्डीहून मढी गाव 12 कि.मी. अंतरावर आहे. फाल्गुन वद्य पंचमीला (होळी) मढीला कानिफनाथांची यात्रा भरते. ही यात्रा पाडव्या पर्यंत चालते. या यात्रेत गावातील लोक कैकाडी समाजाच्या लोकांना मान-पान देतात, आदर सत्कार करतात, त्यांची जेवणाची सोय करतात. पूर्वी मढी येथे जात पंचायत भरत होती असे गाव- आमानी तालुका मालेगाव जिल्हा वाशीम येथील लोकांनी सांगितले. सद्य स्थितीमध्ये शासनाने बंदी घातल्याने अशी पंचायत म्हणजेच वोकाळे भरत नाहीत.
- **इ)** **नागपूर शहर** रामेश्वरी प्रभाग येथे कैकाडीबाबा महाराज यांचे मंदिर असून तेथे जत्रा भरली जाते. कैकाडीबाबा महाराज हे कैकाडी समाजातील लोकांना चांगले गोष्टी सांगत असत, त्यांनी मोठ्या प्रमाणात जनजागृती केली, पशु हत्या करू नका, चांगले शिक्षण घ्या असे त्यांनी मार्गदर्शन केले आहे. त्यांची जत्रा नागपूर शहरात रामेश्वरी प्रभागात भरली जाते.

**१२.जन्मविधी**

**पाचवीची पूजा** - कैकाडी समाजामध्ये घरात बाळ जन्माला आल्यास घराच्या बाहेरील बाजूस नाहणी म्हणजे बाळाला अंघोळ घालण्यासाठी खड्डा खांदला जातो अश्या प्रकारे पाच दिवस त्याच खड्ड्यात अंघोळ घालत असतात. पाचव्या दिवशी सूप मध्ये हळद, कुंकू, पाच दिवे ठेवून पूजा केली जाते आणि पाचव्या दिवशी मुलाला कपडे नेसवले जात असत. आणि पाचव्या दिवशी तो खड्डा भुजवला जातो. पाचव्या दिवशी ५ सुहासिनी उपवास धरत असत. पाचव्या दिवशी ज्या

कैकाडी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली असेल ते पाट, कोंबडी कापली जात आणि त्याची जेवण दिले जात होते. अन्यथा वरण, भात, पोळी तयार करून सोयरे यांना जेवण दिले जाते. पाचवीच्या दिवशी फक्त अशी पूजा करून जेवण दिले जात होते व नाहणीचा खड्डा भूजावला जात होता. या दिवशी बाळाचे नाव ठेवले जात नव्हते. बाळाच्या जन्माच्या बाराव्या दिवशी बाळाचे नाव ठेवले जात होते. कैकाडी समाज हा सतत भटकंती करत असल्यामुळे नाव ठेवण्यासाठी आत्या लवकर येणे शक्य नसायचे, जर आत्या येत असेल तर आत्या बाळाचे नाव ठेवत असत. अन्यथा घरातील व्यक्ती बाळाचे नाव बाराव्या दिवशी ठेवत असत.

**जावळ काढणे** - जन्मापासून ते लग्न होण्याच्या अगोदर या काळात कधीही जावळ केले जात असत. जावळ काढणे गरजेचे कैकाडी समाजात मानले जात असत. जावळ कार्यक्रम हा मामाच्या हातून केला जातो. जावळ करत असताना कैकाडी समाजाच्या प्रत्येक कुटुंबांची आसराया वेगवेगळ्या ठिकाणी असते. आसराया देवी जिथे असतात तेथे जाऊन जावळ करत असतात. जावळ हा मामा बट (चार केस) कापतात. व नंतर मुलगा असल्यास बोकड कापतात व मुलगी असल्यास पाट (शेळी) कापतात. कैकाडी समाजामध्ये लग्न करण्याच्या अगोदर जावळ करणे गरजेचे आहे, असे सांगण्यात आले. जावळ केल्याशिवाय लग्न लावले जात नसत.

### १३.मयत/मृत्यू विधी

एखादी व्यक्ती मयत झाल्यानंतर घराच्या बाहेर मांडी घालून भिंतीला आधार देवून मयत व्यक्तीला बसवले जात असत त्यानंतर मृत व्यक्तीला अंघोळ घातली जाते. त्या नंतर बांबूची तिरडी बांधून त्यावर मृत व्यक्तीला झोपवले जात असत. तिरडीला दोन भावकीमधील व्यक्ती व दोन सोयरे मधील व्यक्ती खांदेकरी असतात. पूर्वी समाजातील मृत व्यक्तींना जाळू देत नसत कारण इतर समाजातील लोक म्हणतात की कैकाडी लोक हे हिंदू धर्मातील नसल्यामुळे त्यांनी जाळायचे नाही तर पुरायचे असते अशी ताकीद इतर समाजाकडून कैकाडी समाजाला दिला जात होता. सध्या पुरण्यासाठी कैकाडी समाजच्या लोकांना जागा दिले जात नाही म्हणून जाळले जात आहे. मृत व्यक्ती जाळल्यानंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी राख सावळली जाते. राख सावल्या दिवशी दुकानातून बोकडाची मुंडी आणि चार पाय आणतो. जिथे विसावा दिला तेथे मुंडीचानैवैद्य म्हणून ठेवला जातो व जिथे अंत्यविधी येथे नैवैद्य ठेवतात. कावळा नैवैद्य शिवल्या नंतर सर्व लोक घरी जातात. तिसऱ्या दिवशी एक मोठे डुक्कर कापून त्याचे जेवण दिले जाते.

## १४.   लग्न जमविण्याची पद्धत/ विवाहपद्धती

मुलीना हुंडा देण्याची पद्धत ही कैकाडी समाज मध्ये असल्याचे दिसून येते कारण कैकाडी समाजामध्ये मुलींचे प्रमाण कमी होते. कैकाडी समाजामध्ये एकाच कुळात किंवा गोत्रात विवाह होत नाहीत. जाधव-जाधव मध्ये सोयरिक जमत नाही तर गायकवाड-माने, जाधव-माने अशी सोयरिक जुळवली जाते. तसेच सातपाडी-सातपाडी किंवा कवाडे-कवाडे अशा गोत्रामध्ये विवाह होत नाहीत तर, कवाडी व सातपाडी यांच्यात विवाह होतात. मावशीच्या मुलीशी विवाह करता येत नाही, परंतु मामाच्या मुलीशी विवाह करता येतो. पूर्वी कैकाडी समाजात पाळण्यात सुद्धा लग्न ठरवली जात असत. जाधव घराण्यातील मुलगा असल्यास लग्नाच्या अगोदर जावळ (बट कापून) करून बोकड कापवेच लागते. व नंतरच लग्न होते. लग्न जुळवूत असताना मामाला मुख्य अधिकार म्हणजेच मान असायचा. मुलगी पाहण्यासाठी गेल्यानंतर मुलगा मुलगी एकमेकांना पसंत झाल्यास लग्न जमविले जात असत. त्यावेळेस मुलाकडच्या कडून मुलीच्या मामाला सुल्ला म्हणून ३५०/- रुपये दिले जात होते. सुल्ला दिल्या नंतरच मामा लग्नास परवानगी देत असत. तसेच मुलगा मुलीला हुंडा म्हणून १५०/- रुपये दिला जात होता. लग्नाचा पूर्ण खर्च नवरदेवाने करायचे. लग्न मुलीच्या दारात असयाचे. “शाई बदाई” लग्नजमविण्याच्या क्रियेला म्हणतात. लग्न जमल्यानंतर मटन, दारू जेवण व्हायचे. लग्न तीन दिवस चालत असे. पहिल्यादिवशी संध्याकाळी नवरा नवरीला हळद लागत असे. दुसऱ्या दिवशी गाढवावर वरात निघत असे आणि लग्न होत असे. लग्न झाल्यानंतर डुक्कराचे मांस, दारू चा कार्यक्रम असायाचा.

## १५.   आहार

कैकाडी समाज हा शाकाहारी आणि मांसाहारी अशा दोन्ही प्रकारचे अन्न खातात. कैकाडी समाजामध्ये दारू पिण्याचे प्रमाण सुद्धा मोठ्या प्रमाणात दिसून येते. सण, उत्सव, विवाह अश्या कार्यक्रमामध्ये पुरी, भाजी असे पदार्थ असतात. डुकराचे मांस हे मोठ्या प्रमाणात पूर्वी खाल्ले जात होते, परंतु सध्या वराहपालन साठी गावातून विरोध होत असल्यामुळे त्याचे प्रमाण कमी झालेले दिसून येते.

## १६.कैकाडी समाजातील अंधश्रद्धा

कैकाडी समुदायामध्ये अंधश्रद्धेचा प्रभाव आजही मोठ्या प्रमाणात दिसून येतो. कैकाडी समाजामध्ये महिलांच्या अंगात येणे, पोट दुखत असेल तर लिंबाच्या काडीने डाग देणे, चटका देणे

हा प्रकार दिसून येतो. त्याचबरोबर अंधश्रद्धावर भर असल्याने शेळी, बकरे, डुकर, कोंबडा बळी देण्याची पद्धत या समाजात मोठ्या प्रमाणात आहे. आखाडीच्या/आषाढीच्या महिन्यात बळी दिले जाते. तसेच लग्न समारंभ, जावळ करणे, जत्रा, पाचवीच्या दिवशी बळी दिले जातात. त्याचबरोबर कैकाडी समाज हा निसर्ग देवतेला मोठ्या प्रमाणात मानताना दिसून येतो.

**१७. जातपंचायत**

कैकाडी समाजाची विशिष्ट अशी जात पंचायत ठराविक वेळी बसत नाही, जर एखाद्या कुटुंबात वाद झाला, वैवाहिक समस्या निर्माण झाल्यास तो कुटुंबात वाद सुटत नसेल तर जातपंचायत भरली जात होती. कैकाडी समाजाच्या जातपंचायत मध्ये पंच म्हणून कैकाडी समाजाचेच समजदार व्यक्ती किंवा जेष्ठ व्यक्ती काम करतात. पंच दोन्ही बाजूकडील व्यक्तींचे वाद ऐकून निर्णय दिला जातो. गुन्हा सिद्ध झाल्यास त्याच्या स्वरूपानुसार शिक्षा ठोठवण्यात येते. समाजातील व्यक्तींना जेवण देणे, दारू पाजणे, समज देणे, पैश्याच्या स्वरुपात दंड आकारणे, जातीतून बहिष्कृत करणे अश्या स्वरुपात शिक्षा ठोठवली जाते.

**१८.समाजातील स्थान**

कैकाडी समाजातील लोकांकडे आजही उपजीविकेचे साधने नसल्यामुळे त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती मध्ये सुधारणा झालेली नाही. डाले, टोपल्या विणणे हा व्यवसाय प्लास्टिकच्या वस्तूचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. समाजातील खालचे स्थान, डुकराचे मांस खाल्यामुळे इतर लोक त्यांना काम देत नाहीत. त्यामुळे दैनंदिन कष्टाची कामे करून कैकाडी समाजातील लोक आपली उपजीविका भागवतात असे दिसून आले. कैकाडी समाजात साक्षरता नगण्य आहे. त्यामुळे शैक्षणिक सवलती, शिक्षण आणि नोकऱ्या इत्यादींचा ते लाभ घेत नाहीत. त्यांची आर्थिक परिस्थिती अजूनही फारच दारिद्य असून उदरनिर्वाह भागविण्यासाठी ते गावोगावी भटकत असतात. कैकाडी समाजातील लोक हे व्यसनाधीन असून दारू पिणे हे व्यसन मोठ्या प्रमाणात असलेले दिसून येते.

कैकाडी समाजाच्या लोकांना सार्वजनिक ठिकाणी पाणी भरू दिले जात नाही, मंदिर मध्ये प्रवेश करण्यास मनाई करण्यात येते, शाळेमधील कैकाडी समाजाच्या मुलांना त्यांचे नावाने हाक न मारता, "ये कैकाडी" म्हणून हाक मारली जाते, गावातील लग्न समारंभ व इतर कार्यक्रमामध्ये कैकाडी समाजाच्या लोकांना आमंत्रण नसायचे आणि असेल तर त्यांना वेगळ्या ठिकाणी स्वतंत्र बसविण्यात येते अशी दुय्यम किंवा अस्पृश्यतेची वागणूक दिली जात असल्याचे लक्ष गट चर्चेमध्ये कैकाडी समाजाच्या लोकांनी सांगितले. विदर्भातील बहुतेक ठिकाणी कैकाडी समाजाची कुटुंबे हि मूळ गावाच्या वस्ती बाहेर असलेली दिसून आली. लग्नकार्य, मृत्युविधी असे महत्वाचे विधी करण्यासाठी ब्राम्हण येत नसल्यामुळे कैकाडी समाजातील जेष्ठ व्यक्ती अश्या विधी पूर्ण कर असतात.

**१९.रोटी बेटी व्यवहार**

विदर्भ व इतर महाराष्ट्र भागातील कैकाडी समाजामध्ये रोटी बेटी व्यवहार होतो. विदर्भामध्ये राहणाऱ्या अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट असणारा कैकाडी समाज व विदर्भ वगळता इतर जिल्ह्यामध्ये वास्तव्य करत असलेला कैकाडी समाज यांचे राहणीमान, चालीरीती, बोलीभाषा, खान-पान, रूढी, परंपरा, पारंपारिक व्यवसाय, विवाहपद्धती, कुलदेवता, कुळ, आडनावे व इतर समाजाकडून मिळणारी वागणूक या सर्व बाबी एकच असल्याचे दिसून येते. त्यामुळे यांच्यात रोटी बेटी व्यवहार होत असलेला दिसून येतो. त्या संदर्भात विदर्भातील जिल्ह्यामध्ये झालेल्या चर्चेदरम्यान अनेक लोकांनी त्या संदर्भात माहिती दिली तसेच विवाह/लग्नपत्रिका दाखवल्या.

# कैकाडी समाज लक्षगट चर्चेदरम्यान संकलित गावाची माहिती व निरीक्षणे विदर्भातील जिल्हे

१. **कैकाडी गल्ली, मेहकर जिल्हा बुलढाणा** येथे कैकाडी समाजाची जवळपास ३० कुटुंबे आहेत. कैकाडी गल्ली च्या आसपास इतर अनुसूचित जातीतील समाज राहत असलेला दिसून आला. प्रामुख्याने येथील कैकाडी समाजाने असे सांगितले कि त्यांचे पूर्वज ये करमाळा, पंढरपूर जिल्हा सोलापूर येथून ५० वर्षापूर्वी उदरनिर्वाह भागविण्यासाठी स्थलांतरीत झालेले दिसून आले. येथील कैकाडी समाजाचा मुख्य व्यवसाय हा डाले, टोपले, कणगी विणून विकण्याचा व्यवसाय करतात.

२. **बुलढाणा शहर** येथे १०० ते ११० कैकाडी समाजाची कुटुंबे राहत असलेली सांगण्यात आली. कैकाडी गल्ली बुलढाणा शहर येथे त्यांच्या आसपास अनुसूचित जातीतील मातंग, महार, घिसाडी असा समाज आजूबाजूला राहत असलेला दिसून आला. येथील कैकाडी समाजामध्ये सुईने डाग देण्याची पद्धत आढळून आले. त्याचबरोबर येथील कैकाडी समाजाची राहणीमान थोड्या प्रमाणात सुधारलेले दिसून आले.

३. **चिखलगाव तालुका जिल्हा अकोला** येथे कैकाडी समाजाचे जवळपास ९ कुटुंबे (कैकाडी समाजाची लोकसंख्या- १००) आहेत. ब्रिटीश राजवटीमध्ये स्वातंत्र्यसैनिक नाथाजी सटवाजी जाधव हे मुख्य कुटुंबप्रमुख होते. सध्या त्यांची चौथी पिढीची कुटुंबे राहत असलेली सांगण्यात आले. या गावात कैकाडी समाजाच्या आजूबाजूस पारधी, कुंभार, कुणबी समाज राहतो. येथील लोकांचा वराह पालन करणे, गाढवावरून माती वाहून नेणे, डाले टोपले विणणे हा व्यवसाय करत असलेले दिसून आले.

४. **कान्हेरी सराफ तालुका बार्शीटाकळी जिल्हा अकोला** येथे कैकाडी समाजाची १५ ते २० कुटुंबे आहेत. येथील कैकाडी समाज हा १९५५ पासून येथे वास्तव्य करत असलेले सांगण्यात आले. प्रामुख्याने येथील कुटुंब हे पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथून स्थलांतरित झाल्याचे सांगण्यात आले. येथील लोक असे म्हणतात कि त्यांना इतर लोक हे "पंढरपुरी कैकाडी" म्हणून संबोधले जाते. **महत्वाची नोंद :-** कान्हेरी सरफ या गावात ग्रामपंचायत मध्ये २०१५ साली कैकाडी समाजाचे महिला सरपंच म्हणून निवडून आल्या होते. कैकाडी समाजाचे सरपंच

असल्या कारणाने इतर ग्रामपंचायत सदस्य यांनी अविश्वासाचा ठराव पास करून सरपंच पदावरून पायउतार करण्याचा प्रयत्न केला गेला.

५. **गाव मेडशी तालुका मालेगाव जिल्हा वाशीम** येथे कैकाडी समाजाची एकूण ३ कुटुंबे आहेत. येथील कुटुंब हे श्रीगोंदा, अहमदनगर व मंगलवेढा, तालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर येथून स्थलांतरित झालेला दिसून येतो . या गावातील कैकाडी समाजाचा संपूर्ण महाराष्टामध्ये रोटी-बेटी व्यवहार होतो असे सांगण्यात आले. तसेच गावात कर्नाटक राज्यातून रोटी बेटी व्यवहार झालेला आहे.

६. **गाव अमानी तालुका मालेगाव जिल्हा वाशीम** येथे कैकाडी समाजाची एकूण २५ कुटुंबे आहेत. गावाची एकूण लोकसंख्या ४ ते ५ हजार आहे. कैकाडी समाजाच्या वस्तीच्या आजू बाजूस मातंग, बोद्ध, चांभार समाज राहत असलेला सांगण्यात आले. येथील कैकाडी समाज हा ब्रिटीश काळात सुमारे १०० वर्षापूर्वी व्यवसाय निमित्त सोलापूर जिल्ह्यातून स्थलांतरित झालेले आहेत. ब्रिटीश काळात रोड तयार करत असताना गाढवावरून माती वाहने, धरण बांधण्यासाठी माती वाहने अशी कामे कैकाडी समाज करत होता. येथे ५ वर्षापूर्वी कैकाडी समाजाची जातपंचायत भरत होती. परंतु सध्या शासनाने जातपंचायत भरवण्यास बंदी घातल्यामुळे बंद करण्यात आलेली आहे असे सांगण्यात आले. **महत्वाची नोंद :-** येथे कैकाडी समाजाच्या एका व्यक्तीने असे सांगितले कि, महाराष्ट्रातील कैकाडी समाज हा मूळ तामिळनाडू राज्यातील असलेले सांगितले. ज्या वेळेस छत्रपती शिवाजी महाराज यांना मुस्लीम राजासोबत लढाई करण्यासाठी सैन्य कमी पडत होते त्या वेळेस शिवाजी महाराज यांनी तामिळनाडू येथील कैकाडी समाजाला लढाई साठी महाराष्ट्रामध्ये येण्यास सांगितले. आणि लढाई मध्ये जिंकल्यास हा समाज येथेच वास्तव्यास राहिला व आपला उदरनिर्वाह करण्यासाठी विविध व्यवसाय करू लागले. समाज हा विखुरलेला असला तरी लग्न, समारंभ वेळी सर्व समाज एकत्र येतो.

७. **गाव कारंजा लाड तालुका कारंजा लाड जिल्हा वाशीम** येथे कैकाडी समाजाची ४० ते ५० कुटुंब आहेत. येथील कैकाडी समाज हा व्यवसाय निमित्त स्थलांतरित झाले आहेत असे सांगण्यात आले. येथे माकडवाले कैकाडी हि कैकाडी समाजाची उपजातीची लोक वास्तव्यास आहेत. या गावातील कैकाडी समाजातील लोकांना अस्पृश्यतेचा मोठ्या प्रमाणात अनुभव आला. विहरीवर पाणी भरू देत नव्हते. मंदिरात प्रवेश नसायचा. तसेच नोकरी लागताना सुद्धा

अनुभव आला आहे असे येथील कैकाडी समाजाचे  शासकीय कर्मचारी असेलेले लोकांना आला आहे. तसेच पदोन्नती वेळेस सुद्धा डावलले गेले आहे.  १९८० च्या दशकात लग्नविधी करण्यासाठी ब्राम्हण येत नव्हते. कैकाडी समाजातील समजूतदार व्यक्ती लग्न लावत असे किंवा मामा लग्न लावत असे. येथील कैकाडी समाजाचे सातारा, जालना, पुणे येथे रोटी बेटी व्यवहार झालेला आहे.  **कैकाडी समाजावर संशोधन अभ्यास करणारे कैकाडी समाजातील मुरलीधर जाधव** यांनी असे सांगितले कि, कैकाडी समाज हा अनुसूचित जाती मध्ये अल्पसंख्याक आहे, त्यांची आर्थिक परिस्थिती हि हलाखीची आहे, कैकाडी समाजामध्ये निरक्षरता, अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात असलेले सांगितले. त्याचबरोबर हा समाज पारंपारिक गोष्टीत गुतून पडलेला दिसून येतो. कैकाडी समाजामध्ये विवाह हे लहान वयात होताना दिसून येतात. घरातील पुरुषांचे शिक्षणाचे प्रमाण फारच कमी आहे तर महिलांचे शिक्षणाचे प्रमाण नगण्य असल्याचे दिसून येते.

८. **दारव्हा तालुका दारव्हा जिल्हा यवतमाळ** येथे कैकाडी समाजाचे एकूण १५ ते २० कुटुंब आहेत. येथील कुटुंब प्रामुख्याने डाले, टोपले विणणे असा मुख्य व्यवसाय त्यांचा असल्याचा सांगण्यात आला. त्याचबरोबर वराहपालन करणे, गाढवावरून माती वाहून नेणे असा पण पारंपारिक व्यवसाय केला जातो. वराहपालन हा गाव विरोधामुळे बंद करण्यात येत आहे. येथील काही कुटुंब हे पंढरपूर, सोलापूर, नांदेड येथून स्थलांतरित होऊन कायमस्वरूपी वास्तव्य करत आहे. जातपंचायत बद्दल त्यांनी असे सांगितले कि, पूर्वी जातपंचायत भरत होती, अश्या जातपंचायत मध्ये कुळ हे कैकाडी समाजातील जेष्ठ लोक असतात, महिला पंच नसायच्या. अकोला जिल्हा येथे पूर्वी जातपंचायत भरत होती असे सांगण्यात आले आहे.

९. **जगन्नाथबाबा मठ नगर, चंद्रपूर** येथे कैकाडी समाजाची एकूण ५०-६० कुटुंब आहेत. येथील कैकाडी समाजाच्या लोकांना समाजामध्ये गधेवाले कैकाडी आणि पंढरपुरी कैकाडी अशी ओळख असल्याचे सांगण्यात आले. येथील समाज हा सोलापूर जिल्ह्यातून भटकत भटकत धरणाची कामे करण्यासाठी स्थलांतरित झाली आहेत. कैकाडी समाज वराहपालनामुळे मोठ्या प्रमाणात इतर समाजाकडून दुर्लक्षित झालेला आहे असे सांगण्यात आले.

१०. **राजुरा तालुका राजुरा जिल्हा चंद्रपूर** येथे प्रामुख्याने २ कुटुंब असल्याचे सांगण्यात आले आहे. येथे मोठ्या प्रमाणात कैकाडी समाज आहे परंतु सदरील समाजाने आपली जात बदलून घेतली आहे किंवा त्यांनी आंध्रप्रदेश मध्ये आपले स्थलांतर केले आहे असे सांगण्यात आले.

राजुरा येथे येथील कुटुंब आखाड/आषाढ महिन्यात फिरस्ती आईचा कार्यक्रम केला जातो. राजुरा मधील कैकाडी समाजाचे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये रोटी-बेटी व्यवहार होतो. कैकाडी समाजामध्ये एका कुटुंबात प्रामुख्याने नवरा मुलगा हा विदर्भातील असल्यामुळे कैकाडी – अनुसूचित जातीमध्ये मोडतो तर नवरी मुलगी हि इतर महाराष्ट्र मध्ये असल्यामुळे कैकाडी – विमुक्त जाती मध्ये मोडतो त्यामुळे मोठ्या प्रमाणात शासकीय अडचण निर्माण होते, संपूर्ण महाराष्ट्रामधील कैकाडी समाज हा एकच असल्याचे त्यांनी सांगितले आणि राजुरा येथील कुटुंबात ते दिसून आले.

११. **भटाळा तालुका वरोरा जिल्हा चंद्रपूर** येथे कैकाडी समाजाची एकूण २० कुटुंबे वास्तव्यास आहेत. येथील कुटुंब स्थलांतरित किंवा भटकत भटकत असून ७० ते ७५ वर्षापूर्वी येथे कायमस्वरूपी स्थायिक झाले आहेत. येथील कैकाडी समाजातील तुळशीराम जाधव हे ब्रिटीश काळात चिमूर येथे "भारत छोडो" आंदोलनात सहभागी झाले होते. वराहपालन करणे, गाढवावरून माती वाहने, डाले टोपले विणणे, साप पकडून ते घरोघरी दाखवून भिक्षा मांगने असा व्यवसाय केला जातो. कैकाडी भाषा हि येथील जुन्या जेष्ठ लोकांना बोलता येते परंतु तरुण पिढी हि भाषा बोलत नाही किंवा त्यांना ते पूर्णपणे बोलता येत नाही. अम्मामरमताई हि येथील कैकाडी समाजाची मुख्य कुलदेवता आहे. भटाळा येथे गावाच्या बाहेर जंगलात अम्मामरमताई यांचे एका झाडाखाली मंदिर तयार करण्याचे योजिले आहे. येथील संपूर्ण कैकाडी समाज आखाड/ आषाढ महिन्यात तेथे एकत्र वर्गणी गोळा करून जंगलात जाऊन पाट (शेळी) बळी देऊन चिखलाची देवी तयार करून वनभोजन केले जाते. भटाळा येथील समाज हा कुटुंबात लग्न असल्यास असा जंगलात जाऊन कार्यक्रम करावा लागतो. त्याचबरोबर पूर्वी येथे जातपंचायत भरली जात होती. अश्या जातपंचायतीमध्ये कौटुंबिक, वैवाहिक तंटे सोडवली जात होती. जातपंचायत मध्ये पंच म्हणून दोन्ही बाजूचे जेष्ठ व्यक्ती पंच म्हणून कार्य करत असते. अश्या जात पंचायती मध्ये महिला पंच म्हणून घेतले जात नव्हते. **महत्वाची नोंद**:- 1. कैकाडी समाजातील शाळेत शिकणाऱ्या एका मुलाला तेथील शिक्षकाने कैकाडी समाजाचा असल्याने त्याला शाळेतील संडास बाथरूम साफ करायला लावत असत. त्यामुळे अस्पृश्यता पाळली गेली असल्याचे दिसून येते. 2. पोळा सणाच्या दिवशी पोटाच्या बेंबी भोवताल डाग दिले जाते होते याद्वारे अंधश्रद्धा दिसून येते. 3. भटाळा गावातील सयाबाई जनार्धन जाधव या

स्त्रीच्या चैत्राच्या महिन्यात  अम्मामरमताई अंगात येते असे सांगण्यात आले याद्वारे समाजात अंधश्रद्धा दिसून येते.

१२. **गाव पाथरी तालुका चंद्रपूर जिल्हा चंद्रपूर** येथे कैकाडी समाजाची एकूण २० कुटुंब आहेत. येथील कैकाडी समाज हा मूळ येथील असल्याचे सांगितले. पूर्वी कैकाडी समाजाची जातपंचायत नदीच्या किनारी भरली जात होती. सध्या जातपंचायत भरली जात नाही. महाराष्ट्रामधील संपूर्ण कैकाडी समाज हा एकाच असल्याचे सांगण्यात आले. त्यांचा संपूर्ण महाराष्ट्रामध्ये रोटी – बेटी व्यवहार होतो. पाथरी गावातील कुटुंबाचा इतर महाराष्ट्रामध्ये रोटी बेटी व्यवहार झाला आहे.  इतर समाज किंवा शासकीय अधिकारी यांना कैकाडी समाज नेमका कोण आहे याबद्दल माहिती नाही असा अनुभव कैकाडी समाजाच्या लोकांना झाला आहे.

१३. **रामेश्वरी प्रभाग ३३, नागपूर शहर** येथे कैकाडी समाजातील व्यक्तींची लक्ष गट चर्चा घेण्यात आली. येथील लक्ष गट चर्चे दरम्यान असे सांगण्यात आले कि, त्यांचे आजोबा, पणजोबा असे सांगत होते कि आपण मूळ पंढरपूर जिल्हा सोलापूर येथून आलो आहे. तसेच काही कुटुंब दारव्हा, यवतमाळ येथून सुद्धा स्थलांतरित झालेले आहेत. येथील कैकाडी समाजाचा डाले टोपले विणणे, गाढवावरून माती वाहने, वराह पालन करणे, वराहाच्या केसांचा व्यवसाय करणे, सर्प पकडून घरोघरी दाखवून अन्न मांगने (कैकाडी समाज सर्प पकडून सापांचा खेळ करत नाहीत) इत्यादी व्यवसाय केले जातात. येथील कैकाडी समाजाला कैकाडी समाज म्हणून ओळखले जात नसून आज देखील त्यांना "गधेवाले" असे म्हणून बोलावले जाते. नागपूर शहरामधील कैकाडी समाजाच्या कुटुंबाचा संपूर्ण महाराष्ट्रामध्ये रोटी बेटी व्यवहार होत असल्याचा सांगितले.

**महत्वाची नोंद:-**

१.  पूर्वी  कैकाडी समाजामध्ये कौटुंबिक, वैवाहिक वाद व इतर वाद निर्माण झाल्यास ते सोडवण्यासाठी जातपंचायत भरवली जात होती. जातपंचायत बद्दल असे सांगण्यात आले कि, नागपूर शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती असलेले माझी नगरसेवक जाधव यांच्या वैवाहिक तंटा सोडवण्यासाठी अशी जात पंचायत भरवली गेली होती. जात पंचायतीमध्ये दोन्ही पक्षाकडील जेष्ठ व्यक्तीनी  पंच म्हणून काम केल. दोन्ही बाजूकडील म्हणणे ऐकून घेतल्यानंतर निर्णय देण्यात आला होता. जाधव यांना शिक्षा म्हणून सर्व पंच म्हणून आलेल्या व्यक्तींना जेवण आणि दारू पाजण्याची शिक्षा सुनावण्यात आली होती.

२. कैकाडी समाजातील नागपूर शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती असलेले माझी नगरसेवक जाधव यांना १९८३-८४ या साली त्यांना कैकाडी समाजाचे असल्याने सार्वजनिक ठिकाणी पाणी भरायला दिले जात नव्हते.

३. कैकाडी समाजातील काही व्यक्तींना डाले, टोपले विकत असताना तहान लागले असता इतर समाजातील व्यक्ती त्यांना शोचालयास वापर करण्यात येणाऱ्या डब्ब्याने/तांब्याने पाणी प्यायला देत असत. ४. पूर्वी दवाखाना नव्हते त्या वेळेस घरघुती उपचार म्हणून लहान मुलाला चटका दिला जात होते. डाग दिले जात होते.

१४. **सोनाजी कैकाडी नगर, नागपूर शहर** येथे कैकाडी समाजाची ४०-५० कुटुंब आहेत. येथील कुटुंबे हे मराठवाडा येथील जिल्ह्यामधून व्यवसाय संदर्भात स्थलांतरित झालेले आहेत. कैकाडी समाज हा पूर्वी डाले, टोपले विणणे हा मुख्य व्यवसाय करतात. सद्यस्थितीमध्ये पारंपारिक व्यवसाय लुप्त होत असल्या कारणाने आर्थिक गरज भागविण्यासाठी केसांचा व्यवसाय करणे, भांडी विकणे, मजुरी करणे अशी व्यवसाय करत आहेत.

**मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि नाशिक (खान्देश) विभागातील विमुक्त जातीतील (VJ-४) कैकाडी समाज आणि विदर्भातील अनुसूचित जातीतील कैकाडी समाज (SC-२८) लक्ष गट चर्चा आणि प्रत्यक्ष पाहणीतून प्राप्त माहितीचे तुलनात्मक विवरण:-**

| चल | मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि नाशिक (खान्देश) विभागातून प्राप्त माहिती कैकाडी - विमुक्त जाती (VJ-४) | विदर्भ (नागपूर आणि अमरावती विभाग) प्राप्त माहिती कैकाडी - अनुसूचित जाती (SC-२८) |
|---|---|---|
| **आडनावे** | जाधव, गायकवाड आणि माने हि मूळ आडनावे मोठ्या प्रमाणात दिसून येतात. त्याचबरोबर मुळे, शामगिरे, कैवाडे, कोरवी, बजंत्री, देशमाने, गजरे इत्यादी आडनावे या भागात आहेत. | जाधव, गायकवाड आणि माने हि मूळ आडनावे मोठ्या प्रमाणात दिसून येतात. त्याचबरोबर दोन्तले समाजात पवार आडनावाची लोक आहेत. त्याचबरोबर शामगिरे, देवगिरे, मुळे, कोरवी, फुलारी, मलाजुरे इत्यादी आडनाव कैकाडी समाजाची या भागात आहेत. |
| **उपजाती** | गावकैकाडी, पामलोर कैकाडी, दोन्तले (चोर कैकाडी), कुंचीकोरवी, कोतीकुळू (माकडवाले कैकाडी) इत्यादी पोटजाती व्यवसाय व भागानुसार त्यांना वेगवेगळी नावे पडली आहेत. | वऱ्हाडी कैकाडी, पंढरपुरी कैकाडी, गावकैकाडी, कुंचीकोरवे, माकडवाले कैकाडी, पामलोर कैकाडी, गधेवाले, दोन्तले (चोर कैकाडी) इत्यादी पोटजाती विदर्भात व्यवसाय आणि भागानुसार वेगवेगळी नावे पडली आहेत. |

| | | |
|---|---|---|
| **व्यवसाय** | डाले, टोपल्या, कणगी विणणे व त्यांची विक्री करणे, वराहपालन (डुक्कर पालन), गाढवपालन किंवा गाढवाच्या सहाय्याने मजुरी करणे, वाजंत्री/बँड व्यवसाय इत्यादी पारंपारिक व्यवसाय या भागातील कैकाडी समाजाद्वारे केली जातात. | डाले, टोपले, कणग्या, झाप इत्यादी वस्तू बनवून विक्री करणे, वराहपालन, गाढवावरून माती वाहने, माकडांचे खेळ करणे इत्यादी पारंपारिक व्यवसाय या भागातील कैकाडी समुदायाद्वारे केली जातात. |
| **स्थलांतर / मूळ स्थान** | मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि नाशिक विभागातील कैकाडी समाज हा कर्नाटक, आंध्रप्रदेश राज्यातून स्थलांतरित झाले असावेत असे सांगण्यात आले. तसेच येथे राहणारे रहिवाशी वेगवेगळ्या ठिकाणाहून व्यवसायानिमित्त उदरनिर्वाह भागविण्यासाठी भटकंती करतात. सद्यस्थिती मध्ये येथील कैकाडी समाज हा एका ठिकाणी स्थायिक झालेला दिसून येतो. | विदर्भातील कैकाडी समाज मध्य प्रदेश, कर्नाटक, आंध्रप्रदेश राज्यातील मूळ रहिवासी असून तेथून स्थलांतरित झाले असावेत असे सांगण्यात आले. तसेच येथील राहणारे रहिवाशी यांचे पूर्वज पंढरपूर, करमाळा, सोलापूर जिल्ह्यातून व्यवसायानिमित्त स्थलांतरित झालेले आहेत. असे सांगण्यात आले. |
| **कैकाडी अर्थ** | कै म्हणजे हात आणि काडी म्हणजे काडीचे काम करणारे लोक. हाताने गवत, बांबू कापून त्यांच्या वस्तू बनवून उदरनिर्वाह भागविणारे लोक म्हणजे कैकाडी होय. कैकाडी समाजाला वेगवेगळ्या भागात व्यवसायावरून वेगवेगळी नावे किंवा उपजाती पडलेल्या दिसून येतात. कैकाडी समाजाला कर्नाटक मध्ये कोरवी, आंध्रप्रदेश मध्ये येरकुला तर महाराष्ट्रामध्ये कैकाडी म्हणून ओळखला जातो. | कै म्हणजे हात आणि काडी म्हणजे काडीचे काम करणारे लोक. हाताने गवत, बांबू कापून त्यांच्या वस्तू बनवून उदरनिर्वाह भागविणारे लोक म्हणजे कैकाडी होय. कैकाडी समाजाला वेगवेगळ्या भागात व्यवसायावरून वेगवेगळी नावे किंवा उपजाती पडलेल्या दिसून येतात. कैकाडी समाजाला कर्नाटक मध्ये कोरवी, आंध्रप्रदेश मध्ये येरकुला तर महाराष्ट्रामध्ये कैकाडी म्हणून ओळखला जातो. |

| | | |
|---|---|---|
| **बोली भाषा** | कैकाडी समाजाची कैकाडी हीच बोली भाषा आहे. कैकाडी भाषेला लिपी नाही. प्रामुख्याने त्यांच्या भाषेमध्ये तेलगु आणि कन्नड भाषेचे मिश्रण असलेले दिसून येते. कैकाडी समाजातील लोक आपापसात बोलण्यासाठी कैकाडी भाषेचाच वापर मोठ्या प्रमाणात करतात. इतर समाजाच्या लोकांशी संपर्क साधताना कैकाडी समाज मराठी भाषा सुद्धा बोलतो. | कैकाडी समाजाची कैकाडी हीच बोली भाषा आहे. कैकाडी भाषेला लिपी नाही. प्रामुख्याने त्यांच्या भाषेमध्ये तेलगु आणि कन्नड भाषेचे मिश्रण असलेले दिसून येते. कैकाडी समाजातील लोक आपापसात बोलण्यासाठी कैकाडी भाषेचाच वापर मोठ्या प्रमाणात करतात. इतर समाजाच्या लोकांशी संपर्क साधताना कैकाडी समाज मराठी भाषा सुद्धा बोलतो. |
| **कला कौशल्य** | ख्वल्ली (विळा) च्या सहाय्याने सिंदी, निरगुडी इत्यादी झाडांच्या फोकांचा वापर करून परंपरागत धान्य साठवण्याच्या कणग्या, डाले, झाप, साध्या टोपल्या, पाट्या, बुट्ट्या, ताटी इत्यादी वस्तू बनवणे, बँड वाजविणे, माकडांचा खेळ करणे, शिकार करणे इत्यादी कलाकौशल्य सदरील भागात कैकाडी समाजामध्ये असलेली दिसून येतात. | ख्वल्ली (विळा) च्या सहाय्याने सिंदी, निरगुडी इत्यादी झाडांच्या फोकांचा वापर करून परंपरागत धान्य साठवण्याच्या कणग्या, डाले, झाप, साध्या टोपल्या, पाट्या, बुट्ट्या, ताटी इत्यादी वस्तू बनवणे, बँड वाजविणे, माकडांचा खेळ करणे, शिकार करणे इत्यादी कलाकौशल्य सदरील भागात कैकाडी समाजामध्ये असलेली दिसून येतात. |
| **कुलदेवता** | फिरस्ती आई (फिरंगी आई), रेणुका देवी म्हणजेच यल्लम्मा, पालीचा खंडोबा, जेजुरीचा खंडोबा, मरीमाता, तुळजापूरची तुळजाभवानी, वाघजाई, महाकाली, झाडांचा देव/रानाचा देव (फाल्ददेऊर) इत्यादी येथील कैकाडी समाजाची कुलदेवता आहेत. कैकाडी समाज फिरस्ती देवीला मोठ्या प्रमाणात मानतात. फिरस्ती देवीला आखाड/आषाढ महिन्यात पाट(शेळी), बकरे, कोंबडे, डुक्कर यांचे बळी देऊन वनभोजन करण्याची प्रथा रूढ आहे. | अम्मामरमताई (फिरस्ती अम्मा/फिरस्ती देवी), यल्लम्मा देवी, जेजुरीचा खंडोबा, तुळजापूरची तुळजाभवानी, काळूबाई इत्यादी येथील कैकाडी समाजाची कुलदेवता आहेत. कैकाडी समाज हा अम्मामरमताई (फिरस्ती देवी) यांना मोठ्या प्रमाणात मानतात. अम्मामरमताई यांना आखाड/आषाढ महिन्यात पशु बळी देवून सर्व कैकाडी समाजाला भोजन देण्याची प्रथा रूढ आहे. |

| | | |
|---|---|---|
| **रूढी-परंपरा** | आखाड/आषाढ महिन्यात फिरस्ती आई या कुलदेवतेला पशु बळी देऊन नातेवाईकांना जेवण देणे (फाल्दीवरचा कार्यक्रम/आखाडी यात्रा), कुटुंबातील पूर्वजांच्या आत्म्याच्या शांतीसाठी पशु बळी देऊन जेवण देणे (ताईबाईची जत्रा), यल्लम्मा सौंदत्तीची जत्रा, लिम नेसणे, शाल्गाची (मोठे डुक्कर) यात्रा, नवस फेडण्यासाठी डुक्कर कापणे इत्यादी प्रथा येथील कैकाडी समाज पाळताना दिसून येतो. | आखाड/आषाढ महिन्यात तसेच लग्न समारंभ असल्यास लग्नापूर्वी अम्मामरमताई (फिरस्ती अम्मा) या कुलदेवतेला एक काळी शेळी बळी देवून पूजा केली जाते. पूजा करून सर्व कैकाडी समाजातील लोकांना वनभोजन दिले जाते. अशी प्रथा मोठ्या प्रमाणात येथील कैकाडी समाज पाळताना दिसून येतो. |
| **कुळे** | सातपाडे आणि कवाडे हे दोन मुख्य कुळ कैकाडी समाजामध्ये आहेत असे सांगण्यात आले. तसेच दिष्टे, लोढे, मनाडे, शामगीरे, देवगिरे, दोन्तले, पटाले, नागोरे, डाने, सपटसरे, उतरसरे, तिरकाळे, मानपाडे, मदनसर, जलमसर, पतके, निर्गुंदा, नळगुंद्रे, हवाले, जलगुंद्रे, मछीन्द्र, चिखलकर, सुजितराय, खालजीत्रे, मधु, सोनसर, डांगे, बुलाजरे, पालीसर, कटोरे, मिए, कायसो, लालबजारी, नरगुंदे, काडे, बिजलीसरे, अंगसो, बुलाकरे, कायसरे, रामगिरे, गजरे, चीतपुत, डाने इत्यादी कुळे येथील कैकाडी समाजामध्ये आढळतात असे चर्चे दरम्यान सांगण्यात आले. | सातपाडे आणि कवाडे हे दोन मुख्य कुळ कैकाडी समाजामध्ये आहेत असे सांगण्यात आले. लोढे, मनाडे, शामगीरे, देवगिरे, दोन्तले, पटाले, नागोरे, डाने, सपटसरे, उतरसरे, तिरकाळे, मानपाडे, मदनसर, जलमसर, पतके, निर्गुंदा, नळगुंद्रे, हवाले, जलगुंद्रे, मछीन्द्र, चिखलकर, सुजितराय, खालजीत्रे, मधु, सोनसर, डांगे, पालीसर, कटोरे, मिए, कायसो, बिजलीसरे, अंगसो, बुलाकरे, कायसरे, रामगिरे, गजरे, चीतपुत, डाने इत्यादी कुळे येथील कैकाडी समाजामध्ये आढळतात असे चर्चे दरम्यान सांगण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| **जत्रा/यात्रा** | १. अहमदनगर जिल्ह्यातील कानिफनाथ मढी यांची यात्रा फाल्गुन वद्यपंचमीला (होळी) यात्रा भरते. याठिकाणी सर्वे कैकाडी समाज एकत्र येतो.<br>२. औरंगाबाद जिल्ह्यातील बीडकिन येथे आखाड/आषाढ महिन्यात मरिमाता देवीला प्रत्येक कैकाडी समाजाच्या कुटुंबातील एक डुक्कर कापण्याची प्रथा आहे. पूर्ण महिन्याभरात अशी यात्रा भरली जाते. याला कैकाडी समाजामध्ये फाल्देवर बाग असे म्हणतात.<br>३. कैकाडी महाराज हे राजाराम जाधव नावाचे संत होते. त्यांना कैकाडी समाजामध्ये मोठा मान आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी कैकाडी महाराजांची जयंती साजरी केली जाते. यात्रा भरवली जाते. | १. अहमदनगर जिल्ह्यातील कानिफनाथ मढी यांची यात्रा फाल्गुन वद्यपंचमीला (होळी) यात्रा भरते. याठिकाणी सर्वे कैकाडी समाज एकत्र येतो.<br>२. काळूबाईची जत्रा सातारा जिल्ह्यातील फलटण येथे भरते. या जत्रेत येथील कैकाडी समाजाचे सर्व लोक जमा होतात.<br>३. नागपूर शहर रामेश्वरी प्रभाग येथे कैकाडीबाबा महाराज यांचे मंदिर असून तेथे जत्रा भरवली जाते. |

| | | |
|---|---|---|
| **जन्मविधी** | १. कैकाडी समाजामध्ये बाळाचे जन्म झाल्यानंतर पाचव्या दिवशी पाचवीची पूजा करण्याची प्रथा रूढ आहे. पाचव्या दिवशी ज्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली असेल ते पाट (शेळी), कोंबडी, बोकड कापून त्याचे जेवण दिले जाते. अन्यथा वरण, भात, पोळी तयार करून सोयरे यांना जेवण दिले जाते.<br>२. जन्मापासून ते लग्न होण्याच्या अगोदर या काळात बाळाचे जावळ काढणे कैकाडी समाजात अनिवार्य मानले जाते. जावळ कार्यक्रम मामाच्या हातून केला जातो. जावळ करत असताना मुलगा असेल तर बोकड आणि मुलगी असेल तर पाट (शेळी) कापून जेवण दिले जाते.<br>३. कैकाडी समाजामध्ये बाळाचे बारसे करण्याची प्रथा नाही. परंतु काही ठिकाणी इतर समाजाच्या रूढी, परंपरा कैकाडी समाजाने अंगिकारलेल्या दिसून येतात. | १. कैकाडी समाजामध्ये बाळाचे जन्म झाल्यानंतर पाचव्या दिवशी पाचवीची पूजा करण्याची प्रथा रूढ आहे. पाचव्या दिवशी ज्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली असेल ते पाट (शेळी), कोंबडी, बोकड कापून त्याचे जेवण दिले जाते. अन्यथा वरण, भात, पोळी तयार करून सोयरे यांना जेवण दिले जाते.<br>२. जन्मापासून ते लग्न होण्याच्या अगोदर या काळात बाळाचे जावळ काढणे कैकाडी समाजात अनिवार्य मानले जाते. जावळ कार्यक्रम मामाच्या हातून केला जातो. जावळ करत असताना मुलगा असेल तर बोकड आणि मुलगी असेल तर पाट (शेळी) कापून जेवण दिले जाते.<br>३. कैकाडी समाजामध्ये बाळाचे बारसे करण्याची प्रथा नाही. परंतु काही ठिकाणी इतर समाजाच्या रूढी, परंपरा कैकाडी समाजाने अंगिकारलेल्या दिसून येतात. |
| **मृत्यूविधी** | कैकाडी समाजामध्ये हिंदू धर्माच्या प्रथेनुसार मयत व्यक्तीला अग्नी दिला जातो किंवा पुरले जाते. मयत व्यक्तीला जाळल्यानंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी राख सावळली जाते. मयतबाबत शोक तीन, पाच अथवा सात दिवस करतात. तिसऱ्या किंवा पाचव्या दिवशी पशु बळी देऊन समाजातील बांधवाना गोड जेवण दिले जाते. मृत पूर्वजांच्या आत्म्यास शांती देण्याकरिता डुकराचे बळी देणे, गण घालणे, पितृ घालणे या विधी केल्या जातात. | कैकाडी समाजामध्ये हिंदू धर्माच्या प्रथेनुसार मयत व्यक्तीला अग्नी दिला जातो किंवा पुरले जाते. मयत व्यक्तीला जाळल्यानंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी राख सावळली जाते. मयतबाबत शोक तीन, पाच अथवा सात दिवस करतात. तिसऱ्या किंवा पाचव्या दिवशी पशु बळी देऊन समाजातील बांधवाना गोड जेवण दिले जाते. मयत व्यक्तीच्या आत्म्याच्या शांतीसाठी पितृ जेवण दिले जाते. |

| | | |
|---|---|---|
| **विवाह पद्धती** | कैकाडी समाजामध्ये विवाहाची विशिष्ट प्रथा रूढ आहे. कैकाडी समाजामध्ये एकाच कुळात किंवा गोत्रात विवाह होत नाहीत. जाधव-जाधव मध्ये सोयरिक जमत नाही तर गायकवाड-माने, जाधव-माने अशी सोयरिक जुळवली जाते. तसेच सातपाडी-सातपाडी किंवा कवाडे-कवाडे अशा गोत्रामध्ये विवाह होत नाही तर कवाडे व सातपाडे यांच्यात विवाह होतात. मुलीना हुंडा देण्याची पद्धत कैकाडी समाजाध्ये रूढ आहे. लग्न जमविताना मुलीच्या मामाला मोठा मान असतो. सर्व प्रथम कैकाडी समाजामध्ये मुलीना आपल्याच जवळच्या नात्यात देण्याच्या प्रथेमुळे मुलीला आपली सून करून घेण्याचा पहिला अधिकार मामाला असतो. जर मामाला विवाह योग्य मुलगा नसेल तर मामाला सुल्ला देवून मुलीचे दुसऱ्या ठिकाणी लग्न लावून देण्यासाठी परवानगी देत असे. लग्नाच्या अगोदर मुला-मुलीचे जावळ कार्यक्रम करणे बंधनकारक मानले जाते. साधारण लग्न तीन ते पाच दिवस चालत असे. पहिल्या ते पाचव्या दिवसापर्यंत नवरा मुलगा व नवरी मुलगीला हळद लावली जात होती आणि पाचव्या दिवशी लग्न लावले जात होते. | कैकाडी समाजामध्ये विवाहाची विशिष्ट प्रथा रूढ आहे. कैकाडी समाजामध्ये एकाच कुळात किंवा गोत्रात विवाह होत नाहीत. जाधव-जाधव मध्ये सोयरिक जमत नाही तर गायकवाड-माने, जाधव-माने अशी सोयरिक जुळवली जाते. तसेच सातपाडी-सातपाडी किंवा कवाडे-कवाडे अशा गोत्रामध्ये विवाह होत नाही तर कवाडे व सातपाडे यांच्यात विवाह होतात. मुलीना हुंडा देण्याची पद्धत कैकाडी समाजाध्ये रूढ आहे. लग्न जमविताना मुलीच्या मामाला मोठा मान असतो. मुलाकडून मुलीच्या मामाला सुल्ला म्हणून ३५०/- रुपये दिले जात होते. तेंव्हाच मामा मुलीच्या लग्नाला परवानगी देत असे. लग्नाच्या अगोदर मुला-मुलीचे जावळ कार्यक्रम करणे बंधनकारक मानले जाते. साधारण लग्न तीन ते पाच दिवस चालत असे. पहिल्या व दुसऱ्या दिवशी हळद व तिसऱ्या दिवशी लग्न असा कार्यक्रम चालत असे. काही ठिकाणी लग्न झाल्यानंतर गावात वरात/मिरवणूक काढण्याची प्रथा रूढ आहे. |

| | | |
|---|---|---|
| **आहार** | कैकाडी समाज हा शाकाहारी आणि मांसाहारी अशा दोन्ही प्रकारचे अन्न खातात. परंतु मुख्य्ःत कैकाडी समाज मांसाहारी असलेला दिसून येतो. समाजातील अनेक रिती-रिवाज, रूढी, परंपरा जपताना डुकराचा बळी देऊन त्याच्या मांसाचे नैवैद्य दाखविणे व सेवन करण्याची प्रथा रूढ आहे. या व्यतिरिक्त चिकन, मटन, मासे आणि घोरपडीचे मांस देखील खाण्यात येते. सण, उत्सव, विवाह अश्या कार्यक्रमामध्ये पुरी, भाजी असे पदार्थ बनवले जातात. | कैकाडी समाज हा शाकाहारी आणि मांसाहारी अशा दोन्ही प्रकारचे अन्न खातात. परंतु मुख्य्ःत कैकाडी समाज मांसाहारी असलेला दिसून येतो. समाजातील अनेक रिती-रिवाज, रूढी, परंपरा जपताना डुकराचा बळी देऊन त्याच्या मांसाचे नैवैद्य दाखविणे व सेवन करण्याची प्रथा रूढ आहे. या व्यतिरिक्त चिकन, मटन, मासे आणि घोरपडीचे मांस देखील खाण्यात येते. सण, उत्सव, विवाह अश्या कार्यक्रमामध्ये पुरी, भाजी असे पदार्थ बनवले जातात. |
| **अंधश्रद्धा** | कैकाडी समुदायामध्ये अंधश्रद्धेचा प्रभाव आजही असल्याचे दिसून येते. कैकाडी समाजामध्ये महिलांच्या अंगात येणे, पोट दुखत असेल तर लिंबाच्या काडीने डाग देणे, चटका देणे हा प्रकार दिसून येतो. त्याचबरोबर अंधश्रद्धावर भर असल्याने शेळी (पाट), बकरे, डुकर, कोंबडा बळी देण्याची पद्धत या समाजात मोठ्या प्रमाणात रूढ आहे. बोकड, कोंबड्या बळी दिल्याने देव प्रसन्न होतात व ते आपल्याला संकटातून वाचवितात. नवस बोलणे व ते फेडण्यासाठी पशुबळी देणे हा प्रकार सुद्धा दिसुन येतो. | कैकाडी समुदायामध्ये अंधश्रद्धेचा प्रभाव आजही असल्याचे दिसून येते. कैकाडी समाजामध्ये महिलांच्या अंगात येणे, पोट दुखत असेल तर लिंबाच्या काडीने डाग देणे, चटका देणे हा प्रकार दिसून येतो. त्याचबरोबर अंधश्रद्धावर भर असल्याने शेळी (पाट), बकरे, डुकर, कोंबडा बळी देण्याची पद्धत या समाजात मोठ्या प्रमाणात रूढ आहे. बोकड, कोंबड्या बळी दिल्याने देव प्रसन्न होतात व ते आपल्याला संकटातून वाचवितात. नवस बोलणे व ते फेडण्यासाठी पशुबळी देणे हा प्रकार सुद्धा दिसुन येतो. |

| | | |
|---|---|---|
| **जातपंचायत** | कैकाडी समुदायामध्ये जातपंचायत अस्तित्वात होती. जातपंचायतीमध्ये न्यायनिवाडा करणारे समाजातील शहाणे व जेष्ठ व्यक्तींचा समूह पंच म्हणून काम करतात. कैकाडी समुदायामध्ये अश्या पंचांना "ओकाळे" असे म्हणतात. तर ओक खेळणे म्हणजे न्यायनिवाडा करणे, वाद सोडविणे होय. जातपंचायत मध्ये पंच म्हणून फक्त पुरुषच असतात. अशी जातपंचायत ठराविक दिवशी किंवा ठराविक वेळी बसत नाही, जर एखाद्या कुटुंबात वाद झाला असेल व तो कुटुंबात सुटत नसेल तर तो वाद जातपंचायतकडे नेला जातो. तसेच कैकाडी समाज व्यवसायनिमित्त सततचे स्थलांतर करीत असतो. त्यामुळे जत्रा-यात्रा असेल तर हा समाज एकत्रित येतो अश्या वेळेस सुद्धा जातपंचायत भरवली जाते. या जातपंचायतीमध्ये विविध वाद व प्रश्न मांडले जातात व त्याची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला जातो. दोन्ही बाजूच्या मंडळीना बोलण्याची संधी दिली जाते. त्यांचे एकूण घेतल्यानंतर पंच निर्णय देतात. जातपंचायतीमध्ये शिक्षा म्हणून महिलांचे केस कापणे, पुरुष असल्यास टक्कल करून त्याला चप्पल ने मारणे, जातीच्या बाहेर टाकणे (बहिष्कृत करणे/वाळीत टाकणे/कटमोडी करणे), पैश्याच्या स्वरुपात दंड आकारणे, समाजातील सर्व लोकांना जेवण देणे किंवा पंचांना जेवण देणे, दारू पाजणे इत्यादी शिक्षा केली जात होती. | कैकाडी समुदायामध्ये जातपंचायत अस्तित्वात होती. जातपंचायतीमध्ये न्यायनिवाडा करणारे समाजातील शहाणे व जेष्ठ व्यक्तींचा समूह पंच म्हणून काम करतात. कैकाडी समुदायामध्ये अश्या पंचांना "ओकाळे" असे म्हणतात. तर ओक खेळणे म्हणजे न्यायनिवाडा करणे, वाद सोडविणे होय. जातपंचायत मध्ये पंच म्हणून फक्त पुरुषच असतात. अशी जातपंचायत ठराविक दिवशी किंवा ठराविक वेळी बसत नाही, जर एखाद्या कुटुंबात वाद झाला असेल व तो कुटुंबात सुटत नसेल तर तो वाद जातपंचायतकडे नेला जातो. तसेच कैकाडी समाज व्यवसायनिमित्त सततचे स्थलांतर करीत असतो. त्यामुळे जत्रा-यात्रा असेल तर हा समाज एकत्रित येतो अश्या वेळेस सुद्धा जातपंचायत भरवली जाते. या जातपंचायतीमध्ये विविध वाद व प्रश्न मांडले जातात व त्याची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला जातो. दोन्ही बाजूच्या मंडळीना बोलण्याची संधी दिली जाते. त्यांचे एकूण घेतल्यानंतर पंच निर्णय देतात. जातपंचायतीमध्ये शिक्षा म्हणून महिलांचे केस कापणे, पुरुष असल्यास टक्कल करून त्याला चप्पल ने मारणे, जातीच्या बाहेर टाकणे (बहिष्कृत करणे/वाळीत टाकणे/कटमोडी करणे), पैश्याच्या स्वरुपात दंड आकारणे, समाजातील सर्व लोकांना जेवण देणे किंवा पंचांना जेवण देणे, दारू पाजणे इत्यादी शिक्षा केली जात होती. |

| | | |
|---|---|---|
| **समाजातील स्थान** | समाजातील खालचे, डुकराचे मांस खाल्यामुळे इतर लोक त्यांना कामे देत नाहीत. कैकाडी समाजात साक्षरता नगण्य आहे. आर्थिक परिस्थिती अजूनही फारच दारिद्य असून उदरनिर्वाह भागविण्यासाठी ते गावोगावी भटकत असतात. कैकाडी समाजात व्यसनाधीनता मोठ्या प्रमाणात दिसून येते. कैकाडी समाजाला समाजात दुय्यम स्वरुपाची किंवा अस्पृश्यतेची वागणूक मोठ्या प्रमाणात मिळत असल्याचे चित्र दिसून येते. सार्वजनिक ठिकाणी पाणी भरू न देणे, मंदिरात प्रवेशास मनाई, शाळेतील मुलांना वेगळे बसविणे, जातीवरून हाक मारणे अश्या प्रकारची वागणूक मिळते. लग्नकार्य, मृत्युविधी अश्या महत्वाच्या विधी करण्यासाठी ब्राम्हण येत नसल्यामुळे कैकाडी समाजातील जेष्ठ व्यक्ती अश्या विधी पूर्ण करत असतात. | समाजातील खालचे, डुकराचे मांस खाल्यामुळे इतर लोक त्यांना कामे देत नाहीत. कैकाडी समाजात साक्षरता नगण्य आहे. आर्थिक परिस्थिती अजूनही फारच दारिद्य असून उदरनिर्वाह भागविण्यासाठी ते गावोगावी भटकत असतात. कैकाडी समाजात व्यसनाधीनता मोठ्या प्रमाणात दिसून येते. कैकाडी समाजाला समाजात दुय्यम स्वरुपाची किंवा अस्पृश्यतेची वागणूक मोठ्या प्रमाणात मिळत असल्याचे चित्र दिसून येते. सार्वजनिक ठिकाणी पाणी भरू न देणे, मंदिरात प्रवेशास मनाई, शाळेतील मुलांना वेगळे बसविणे, जातीवरून हाक मारणे अश्या प्रकारची वागणूक मिळते. लग्नकार्य, मृत्युविधी अश्या महत्वाच्या विधी करण्यासाठी ब्राम्हण येत नसल्यामुळे कैकाडी समाजातील जेष्ठ व्यक्ती अश्या विधी पूर्ण करत असतात. |
| **रोटी-बेटी व्यवहार** | उर्वरित महाराष्ट्र व विदर्भ भागातील कैकाडी समाजामध्ये रोटी बेटी व्यवहार होतो. विदर्भामध्ये राहणाऱ्या अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट असणारा कैकाडी समाज व विदर्भ वगळता उर्वरित महाराष्ट्रातील जिल्ह्यामध्ये वास्तव्य करत असलेला कैकाडी समाज यांचे राहणीमान, चालीरीती, बोलीभाषा, खान-पान, रूढी, परंपरा, पारंपारिक व्यवसाय, विवाहपद्धती, कुलदेवता, कुळ, आडनावे व इतर समाजाकडून मिळणारी वागणूक या सर्व बाबी एकच असल्याचे दिसून येते. त्यामुळे यांच्यात रोटी बेटी व्यवहार होत असलेला दिसून येतो. | विदर्भ व इतर महाराष्ट्र भागातील कैकाडी समाजामध्ये रोटी बेटी व्यवहार होतो. विदर्भामध्ये राहणाऱ्या अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट असणारा कैकाडी समाज व विदर्भ वगळता इतर जिल्ह्यामध्ये वास्तव्य करत असलेला कैकाडी समाज यांचे राहणीमान, चालीरीती, बोलीभाषा, खान-पान, रूढी, परंपरा, पारंपारिक व्यवसाय, विवाहपद्धती, कुलदेवता, कुळ, आडनावे व इतर समाजाकडून मिळणारी वागणूक या सर्व बाबी एकच असल्याचे दिसून येते. त्यामुळे यांच्यात रोटी बेटी व्यवहार होत असलेला दिसून येतो. |

**गृहीतक - कैकाडी समाजात रोटी बेटी व्यवहार होत आहेत.**

## कैकाडी समाजामध्ये झालेले रोटी बेटी व्यवहार

| अ.क्र. | विवाह झालेल्या मुलाचे नाव | जिल्हा | प्रवर्ग जात प्रमाणपत्रानुसार | विवाहीत मुलीचे नाव | जिल्हा | प्रवर्ग जात प्रमाणपत्रानुसार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दीपक देविदास माने | अहमदनगर | विमुक्त जाती | ज्योती संजय जाधव | बुलढाणा | अनुसूचित जाती |
| २ | दिपक नारायणराव शामदिरे | बुलढाणा | अनुसूचित जाती | तनुजा रंगराव जाधव | सांगली | विमुक्त जाती |
| ३ | गणेश रामदास गायकवाड | पुणे | विमुक्त जाती | ज्योत्स्ना रमेश जाधव | अकोला | अनुसूचित जाती |
| ४ | लक्ष्मण नारायण माने | सातारा | विमुक्त जाती | शितल मारोतीराव जाधव | अकोला | अनुसूचित जाती |
| ५ | दिलीप जयसिंग जाधव | सातारा | विमुक्त जाती | सुनंदा जयदेव माने | वाशीम | अनुसूचित जाती |
| ६ | अज्ञान मच्छिंद्र माने | सोलापुर | विमुक्त जाती | प्रिती रमेश जाधव | बुलढाणा | अनुसूचित जाती |
| ७ | रविंद्र हंसराज गायकवाड | अहमदनगर | विमुक्त जाती | मनिषा गुलाबराव जाधव | बुलढाणा | अनुसूचित जाती |
| ८ | राहुल राजेंद्र जाधव | जळगाव | विमुक्त जाती | माने वर्षा विष्णू | बुलढाणा | अनुसूचित जाती |
| ९ | अविनाश अशोक कोरवी | कोल्हापूर | विमुक्त जाती | वृषाली गणेश जाधव | अकोला | अनुसूचित जाती |
| १० | विलास प्रकाश जाधव | अकोला | अनुसूचित जाती | निलीमा सुभाष माने | सोलापूर | अनुसूचित जाती |
| ११ | शशिकांत शंकर माने | सातारा | विमुक्त जाती | जया मारुतीराव जाधव | अकोला | अनुसूचित जाती |
| १२ | संदीप रवी माने | वाशिम | अनुसूचित | राजश्री शिवाजी | पुणे | विमुक्त जाती |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | जाती | जाधव | | |
| १३ | जाधव योगेश सुरेश | ठाणे | विमुक्त जाती | सरिता वामनराव गायकवाड | वाशीम | अनुसूचित जाती |
| १४ | नरेंद्रकुमार प्रमोद गायकवाड | जळगाव | विमुक्त जाती | बिंदू रमेश जाधव | अकोला | अनुसूचित जाती |
| १५ | जाधव सागर दिलीप | बीड | विमुक्त जाती | गायकवाड ऋतुजा हर्षकुमार | बुलढाणा | अनुसूचित जाती |
| १६ | जाधव विशाल दिलीप | बीड | विमुक्त जाती | गायकवाड संयोगिता उद्धवराव | बुलढाणा | अनुसूचित जाती |
| १७ | विजयकुमार रामदास जाधव | जळगाव | विमुक्त जाती | ज्योती पंजाबराव गायकवाड | अमरावती | अनुसूचित जाती |
| १८ | रवींद्रकुमार आनंदा जालीमसर | कोल्हापूर | विमुक्त जाती | माधुरी रवी माने | वाशीम | अनुसूचित जाती |
| १९ | नवनाथ नामदेव माने | पुणे | विमुक्त जाती | मनीषा रमेश जाधव | बुलढाणा | अनुसूचित जाती |
| २० | जयप्रकाश बुद्धाजी कैवाडे | बीड | विमुक्त जाती | शोभा गायकवाड | बुलढाणा | अनुसूचित जाती |
| २१ | सोमनाथ नारायण माने | पुणे | विमुक्त जाती | वर्षा अशोक जाधव | नागपूर | अनुसूचित जाती |

वरील तक्त्यातील नमूद २१ विवाह नोंदणी वरून स्पष्ट दिसून येते कि,कैकाडी समाजात विदर्भ व उर्वरित महाराष्ट्र यामध्ये रोटी बेटी व्यवहार होत आहेत. तक्त्यात नमूद लोकांचे विवाह नोंदणी पत्र व त्यांचे जातीचे प्रमाणपत्र यावरून त्यांचा प्रवर्ग दिसून येत आहे. यामध्ये विमुक्त जाती व अनुसूचित जाती या जातीमध्ये विवाह झालेले असून सदरचे विवाह हिंदू कायदा तसेच कैकाडी समाजाच्या रूढी परंपरेनुसार झालेले आहेत.

## लक्ष गटचर्चेदरम्यान प्राप्त झालेल्या माहितीवरून प्राप्त निष्कर्ष :-

१. विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रामधील दोन्ही ठिकाणी राहणाऱ्या कैकाडी जातीमध्ये आडनावे, कुळ, वंश, उपजाती, बोलीभाषा, पारंपारिक व्यवसाय यामध्ये साम्य दिसून येते.

२. विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रामधील दोन्ही ठिकाणी राहणाऱ्या कैकाडी जातीमध्ये सण-उत्सव, रूढी-परंपरा, विवाह पद्धती, जन्मविधी, मृत्युविधी, आहारपद्धती, कुलदेवता या मध्ये साम्य दिसून येते.

३. कैकाडी समाजामध्ये त्यांच्या उपजातीनिहाय काही व्यवसाय वेगवेगळे दिसत असले तरी बांबू, निरगुडी, शिंदी च्या फोकापासून टोपल्या, कणगी, झाप बनविणे व त्यांची बाजारात विक्री करणे, गाढवावरून माती वाहने किंवा गाढवपालन करणे आणि वराह (डुक्कर) पालन या व्यवसाय बाबतीत विदर्भातील अनुसूचित जातीमध्ये असणारा कैकाडी समाज आणि उर्वरित महाराष्ट्रातील विमुक्त जातीमध्ये असणारा कैकाडी समाजामध्ये समानता दिसून येते.

४. विदर्भातील अनुसूचित जातीतील कैकाडी समाज आणि उर्वरित महाराष्ट्रातील विमुक्त जातीतील कैकाडी समाज एकच असल्याने त्यांच्यात पूर्वीपासून रोटी-बेटी व्यवहार होतात. त्यासंदर्भात विवाहनोंदणी प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहेत.

५. पूर्वी कैकाडी समाज आपले कौटुंबिक, आर्थिक, विवाहविषयक प्रश्न जातपंचायतीमध्ये मांडत व या जातपंचायातीच्या माध्यमातून या प्रश्नांची सोडवणूक केली जात असे. सद्यस्थितीमध्ये कैकाडी समाजामध्ये जातपंचायत व्यवस्था दिसून येत नाही.

६. विदर्भातील कैकाडी समाज आणि महाराष्ट्रामधील इतर भागात राहणारा कैकाडी समाजाची आहारपद्धती समान असून विशेष करून डुकराचे मांस खाणे हि बाब दोन्ही भागात समान दिसून येते. डुक्कराचे मांस खातात या कारणामुळे इतर समाजाकडून अस्पृश्यतेची वागणूक मिळणे, सार्वजनिक ठिकाणी पाणी भरू न देणे, मंदिरात प्रवेशास मनाई करणे या बाबतीत विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रात समान चित्र असल्याचे दिसून येते.

७. विदर्भातील कैकाडी समाज आणि उर्वरित महाराष्ट्रामधील कैकाडी समाजामध्ये लग्नविधी, मृत्युविधी अश्या प्रसंगी विधी करण्याकरिता ब्राम्हण येत नाही. समाजातील जेष्ठ व्यक्ती त्यांच्या अनुभवानुसार विधी पूर्ण करतात.

८. विदर्भातील आणि उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी जातीतील लोकांची वस्ती सर्वसाधारणपणे मूळ गावाच्या बाहेर स्वतंत्र असलेली दिसून आली. कैकाडी वस्तीच्या शेजारी राहणारे लोक सुद्धा अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या अनुसूचित जातीतील असल्याचे दिसून आले.

९. विदर्भातील कैकाडी समाज आणि महाराष्ट्रामधील इतर भागात राहणारा कैकाडी समाजाची फिरस्ती आई किंवा अम्मामरमताई, यल्लम्मा, खंडोबा या कुलदेवता समान असलेल्या लक्षगट चर्चेद्वारे दिसून आले.

१०. विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाजाची आर्थिक स्थिती हालाकीची असून बहुतांशी लोक दारिद्य रेषेखाली जीवन जगतात. त्यांचे राहणीमान हे सर्वसाधारण दिसून येते.

## प्रकरण पाचवे

# माहिती तक्तीकरण व सादरीकरण

## *माहिती तक्तीकरण व सादरीकरण*

### कैकाडी समाजाची कौटुंबिक माहिती

**विदर्भ तसेच उर्वरित महाराष्ट्रात करण्यात आलेल्या एकूण कुटुंबाचे सर्वेक्षण व ९४० त्यातून प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण व तक्तीकरण**

**कुटूंबप्रमुखाचे लिंग**

**तक्ता क्र. १**

| अ.क्र. | कुटुंबप्रमुखाचे लिंग | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या |
| १ | पुरुष | ५५१ | ७८ | १९६ | ८२ | ७४७ |
| २ | स्त्री | १५१ | २२ | ४२ | १८ | १९३ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

विदर्भातील १९६ (८२%) कुटूंबप्रमुख पुरुष आहेत. उर्वरित महाराष्ट्रातील १५१ (२२%) तर विदर्भातील ४२ (१८%) कुटूंबप्रमुख स्त्रीया आहेत.

**कुटूंबातील व्यक्तींचे लिंग**

**तक्ता क्र.२**

| **अ.क्र.** | **कुटुंबातील व्यक्तींचे लिंग** | **उर्वरित महाराष्ट्र** | | **विदर्भ** | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** |
| १ | **पुरुष** | १७८८ | ५३ | ५९५ | ५३ | २३८३ |
| २ | **स्त्री** | १५७६ | ४७ | ५२९ | ४७ | २१०५ |
| **एकूण** | | **३३६४** | **१००** | **११२४** | **१००** | **४४८८** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रात वास्तव्य करणाऱ्या ७०२ कैकाडी कुटुंबात पुरुषांची संख्या १७८८ (५३%) एवढी आहे.तर विदर्भातील २३८ कैकाडी कुटुंबात ५९५ (५३%) पुरुष आहेत. ९४० कैकाडी कुटुंबात उर्वरित महाराष्ट्रातील स्त्रियांची संख्या १५७६ (४७%) एवढी आहे तर विदर्भातील ५२९ (४७%) एवढ्या स्त्रिया आहेत.

**कुटूंबप्रमुखाचे वय**

**तक्ता क्र. ३**

| **अ.क्र.** | **कुटुंबप्रमुखाचे वय** | **उर्वरित महाराष्ट्र** | | **विदर्भ** | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** |
| १ | १६-२० वर्ष | २ | ० | ० | ० | २ |
| २ | २१-३० वर्ष | ७७ | ११ | २६ | ११ | १०३ |
| ३ | ३१-४० वर्ष | १९४ | २८ | ६० | २५ | २५४ |
| ४ | ४१-५० वर्ष | १९१ | २७ | ५८ | २४ | २४९ |
| ५ | ५१-६० वर्ष | १३१ | १९ | ५५ | २३ | १८६ |
| ६ | ६१-७० वर्ष | ८६ | १२ | २६ | ११ | ११२ |
| ७ | ७१ पेक्षा जास्त | २१ | ३ | १३ | ६ | ३४ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील २ कुटूंबप्रमुखाचे वय १६ ते २० वर्ष आहे. तर विदर्भात १६ ते २० वयोगटातील कुटुंब प्रमुख नाहीत. उर्वरित महाराष्ट्रातील ७७ (११%) तर विदर्भातील २६ (११%) कुटूंबप्रमुखाचे वय २१ ते ३० वर्ष आहे. उर्वरित महाराष्ट्रातील १९४ (२८%) तर विदर्भातील ६० (२५%) कुटूंबप्रमुखाचे वय ३१ ते ४० वर्ष आहे. उर्वरित महाराष्ट्रातील १९१ (२७%) विदर्भातील ५८ (२४%) कुटूंबप्रमुखाचे वय ४१ ते ५० वर्ष आहे. उर्वरित महाराष्ट्रातील १३१ (१९%) विदर्भातील ५५ (२३%) कुटूंबप्रमुखाचे वय ५१ ते ६० वर्ष आहे. उर्वरित महाराष्ट्रातील ८६ (१२%) विदर्भातील २६ (११%) कुटूंबप्रमुखाचे वय ६१ ते ७० वर्ष आहे. उर्वरित महाराष्ट्रातील २१ (३%) विदर्भातील १३ (५%) कुटूंबप्रमुखाचे वय ७० वर्ष पेक्षा जास्त आहे.

**कुटूंबातील व्यक्तींचे वय**

**तक्ता क्र.४**

| **अ.क्र.** | **कुटुंबातील व्यक्तींचे वय** | **उर्वरित महाराष्ट्र** | | **विदर्भ** | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** |
| १ | ०-१० वर्ष | ४५० | १३ | १६८ | १५ | ६१८ |
| २ | ११-२० वर्ष | ७३१ | २२ | २०२ | १८ | ९३३ |
| ३ | २१-३० वर्ष | ७७३ | २३ | २५९ | २३ | १०३२ |
| ४ | ३१-४० वर्ष | ५९६ | १८ | १९८ | १८ | ७९४ |
| ५ | ४१-५० वर्ष | ३६६ | ११ | ११९ | ११ | ४८५ |
| ६ | ५१-६० वर्ष | २४९ | ७ | १०३ | ९ | ३५२ |
| ७ | ६१-७० वर्ष | १५६ | ५ | ५३ | ५ | २०९ |
| ८ | ७१ वर्षापेक्षा जास्त | ४३ | १ | २२ | २ | ६५ |
| **एकूण** | | **३३६४** | **१००** | **११२४** | **१००** | **४४८८** |

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रात ०-१० वर्ष वयोगटात ४५० (१३%) बालके आहेत . तर ११-२० या वयोगटातील ७३१ (२२%) मुले मुली आहेत . २१-३० वर्ष वयोगटातील लोकसंख्या ७७३ (२३%) असून ३१-४० वर्ष वयोगटाची ५९६ (१८%) एवढी लोकसंख्या आहे. ४१-५० वर्ष वयोगटात ३६६ (११%) व्यक्ती आहे. ५१-६० वर्ष वयोगटातील लोकसंख्या २४९ (७%) एवढी आहे .तर ६१-७० वर्ष वयोगटात १५६ (५%) एवढी लोकसंख्या आहे. ७१ वर्षापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या व्यक्तींची संख्या ४३ (१%) आहे.

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील १-१० वर्ष वयोगटात १६८(१५%) व्यक्ती ११-२० वर्ष वयोगटात २०२ (१८%) , २१-३० वर्ष वयोगटातील लोकसंख्या २५९ (२३%) , ३१-४० वर्ष वयोगटात १९८ (१८%) लोकसंख्या आहे. ४१-५० वर्ष वयोगटातील १६८ (१८%) , ५१-६० वर्ष वयोगटातील लोकसंख्या १०३ (९%) , ६१-७० वर्ष वयोगटात ५३ (५%) लोकसंख्या तर ७१ वर्षापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या व्यक्तींची संख्या २२ (२%) आहे.

**कुटूंबप्रमुखाची वैवाहिक स्थिती**

**तक्ता क्र. ५**

| **अ.क्र.** | **कुटुंबप्रमुखाची वैवाहिक स्थिती** | **उर्वरित महाराष्ट्र** | | **विदर्भ** | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** |
| १ | विवाहित | ५९५ | ८५ | १९५ | ८२ | ७९० |
| २ | अविवाहित | ७ | १ | २ | १ | ९ |
| ३ | घटस्फोटीत | ४ | १ | ० | ० | ४ |
| ४ | विधवा /विधुर | ९३ | १३ | ३४ | १४ | १२७ |
| ५ | परित्यक्त्या | ३ | ० | ७ | ३ | १० |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, ५९४ (८५%) उर्वरित महाराष्ट्रातील कुटूंबप्रमुख वैवाहिक आहेत. ७ (१) कुटूंबातील कुटूंबप्रमुख अविवाहित आहेत. ४(१%) कुटूंबप्रमुख घटस्फोटीत आहे. ९३ (१३%) कुटूंबातील कुटूंबप्रमुख विधवा / विधुर असून ३ (०%) परित्यक्त्या स्त्रिया आहेत.

विदर्भातील १९५ (८२%) कुटूंबप्रमुख वैवाहिक आहेत . तर २ (१%) कुटूंबातील कुटूंबप्रमुख अविवाहित आहेत. ३४ (१४%) कुटूंबप्रमुख विधवा / विधुर असून ७ (३%) परित्यक्त्या स्त्रिया आहेत.

**कैकाडी कुटुंबातील व्यक्तींची वैवाहिक स्थिती**

**तक्ता क्र. ६**

| **अ.क्र.** | **कुटुंबातील व्यक्तींची वैवाहिक स्थिती** | **उर्वरित महाराष्ट्र %** | | **विदर्भ %** | | **एकूण संख्या** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | |
| १ | विवाहित | १८९१ | ५६ | ६३५ | ५६ | २५२६ |
| २ | अविवाहित | ३९१ | १२ | ७६ | ७ | ४६७ |
| ३ | घटस्फोटीत | ६ | ० | ३ | ० | ९ |
| ४ | विधवा /विधुर | १६६ | ५ | ५६ | ५ | २२२ |
| ५ | परित्यक्त्या | ९ | ० | १० | १ | १९ |
| ६ | लागू नाही | ९०१ | २७ | ३४४ | ३१ | १२४५ |
| **एकूण** | | **३३६४** | **१००** | **११२४** | **१००** | **४४८८** |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, उर्वरित महाराष्ट्रातील १८९१ (६५%) कैकाडी कुटुंबात विवाहित व्यक्ती आहेत. तर ३९१ (१२%) व्यक्ती अविवाहित आहेत. ६ व्यक्ती घटस्फोटीत व ९ व्यक्ती परित्यक्या आहेत. १६६ (५%) व्यक्ती विधवा/विधुर आहेत. ९०१ (२७%) व्यक्ती हि बालके व युवक आहेत त्यामुळे त्यांना सदर बाब लागू नाही.

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, विदर्भातील ६३५(५५%) कैकाडी कुटुंबात विवाहित व्यक्ती आहेत तर ७६ (७%) व्यक्ती अविवाहित आहेत. ३ व्यक्ती घटस्फोटीत आहे. ५६ (५%) व्यक्ती विधवा/विधुर आहेत . १० (१%) स्त्रिया परित्यक्त्या आहेत. ३४४ (३१%) लोकांना सदर बाब लागू नाही.

**कुटूंबप्रमुखाचे विवाहाच्या वेळेचे वय**

**तक्ता क्र. ७**

| **अ.क्र.** | **कुटुंबप्रमुखाचे विवाहाच्या वेळचे वय** | **उर्वरित महाराष्ट्र** | | **विदर्भ** | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** |
| १ | ८-१७ वर्ष | १८६ | २७ | ५१ | २१ | २३७ |
| २ | १८-२९ वर्ष | ४८६ | ६९ | १५६ | ६६ | ६४२ |
| ३ | ३० पेक्षा जास्त | ९ | १ | ९ | ४ | १८ |
| ४ | माहिती दिली नाही | २१ | ३ | २२ | ९ | ४३ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

कैकाडी समाजाच्या सर्वेक्षणात असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रातील १८६ (२७%) तर विदर्भातील ५१ (२१%) कुटूंबप्रमुखाचे विवाहाच्या वेळेचे वय ८-१७ वर्ष होते. उर्वरित महाराष्ट्रातील ४८६ (६९%) तर विदर्भातील १५६(६६%) कुटूंबप्रमुखाचे विवाहाच्या वेळेचे वय १८-२९ वर्ष होते. उर्वरित महाराष्ट्रातील ९ (१%) तर विदर्भातील ९ (४%) १८६ (२६%) कुटूंबप्रमुखाचे विवाहाच्या वेळेचे वय ३० वर्षापेक्षा जास्त होते. उर्वरित महाराष्ट्रातील २१ (३%) कुटूंबातील लोकांनी तर विदर्भाच्या २२ (९%) लोकांनी माहिती दिलेली नाही.

**वरील तक्त्यावरून आढळून येते कि, कैकाडी समाजात बालविवाहाचे प्रमाण उर्वरित महाराष्ट्रात २६% व विदर्भात २१% आहे.**

**विवाहित व्यक्तींचे विवाहाचे वय**

**तक्ता क्र. ८**

| **अ.क्र.** | **विवाहित व्यक्तींचे विवाहाचे वय** | **उर्वरित महाराष्ट्र** | | **विदर्भ** | | **एकूण संख्या** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | |
| १ | ७-१७ वर्ष | ६५२ | ३४ | १५४ | २४ | ८०६ |
| २ | १८-२९ वर्ष | ११७९ | ६२ | ४६३ | ७३ | १६४२ |
| ३ | ३० पेक्षा जास्त | १४ | १ | १८ | ३ | ३२ |
| ४ | माहिती दिली नाही | ४६ | २ | ० | ० | ४६ |
| **एकूण** | | **१८९१** | **१००** | **६३५** | **१००** | **२५२६** |

कैकाडी समाजाच्या सर्वेक्षणात असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रातील ७-१७ वर्ष वयोगटात विवाह केलेल्या व्यक्तींची लोकसंख्या ६५३ (३४%) एवढी आहे . तर १८-२९ वर्ष या वयात विवाह केलेल्या लोकांची लोकसंख्या ११७९ (६२%) एवढी आहे . ३० पेक्षा जास्त वयोगटात लग्न झालेल्या व्यक्तींची संख्या १४ (१%) आहे. तर ४६ (२%) लोकांनी याबाबत माहिती दिली नाही.

विदर्भात केलेल्या सर्वेक्षणात असे दिसुन येते की, ७-१७ वर्ष वयोगटात विवाह केलेल्या व्यक्तींची लोकसंख्या १५४ (२४%) एवढी आहे. तर १८-२९ वर्ष वयोगटातील विवाह केलेल्या लोकांची संख्या ४६३ (७३%) आहे . ३० पेक्षा जास्त वयोगटात लग्न झालेल्या व्यक्तींची संख्या १८ (३%) आहे.

**कुटूंबप्रमुखाचे शिक्षण**

**तक्ता क्र. ९**

| अ.क्र. | कुटुंबप्रमुखाचे शिक्षण | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | अशिक्षित | ३०० | ४३ | १०४ | ४४ | ४०४ |
| २ | १ ली ते ७ वी | १८५ | २६ | ५४ | २३ | २३९ |
| ३ | ८ वी ते १० वी | १३२ | १९ | ३८ | १६ | १७० |
| ४ | ११ वी ते १२ वी | ५९ | ८ | २८ | १२ | ८७ |
| ५ | १३ वी ते पदवीधर | २१ | ३ | ११ | ४ | ३२ |
| ६ | पदव्युत्तर | ५ | १ | ३ | १ | ८ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील ३००(४३%) कैकाडी समाजातील कुटूंबप्रमुखाचे शिक्षण झाले नसुन ते अशिक्षित आहेत. तर १८५ (२६%) कुटूंबप्रमुखाचे शिक्षण १ ली ते ७ वी पर्यंत झालेले आहे. १३२ (१९%) कुटूंप्रमुखाचे शिक्षण ८ वी ते १० वी पर्यंत झालेले असून ५९ (८%) कुटूंबप्रमुखाचे शिक्षण ११ वी ते १२ वी एवढे झालेले आहे. २१ (३%) कुटूंबप्रमुखाचे शिक्षण १३ वी ते पदवीधर आहेत तर. ५ (१%) कुटूंबप्रमुख पदव्युत्तर आहे.

विदर्भातील १०४(४४%) कैकाडी समाजातील कुटूंबप्रमुखाचे शिक्षण झाले नसुन ते अशिक्षित आहेत तर ५४ (२३%) कुटूंबप्रमुखाचे शिक्षण १ ली ते ७ वी पर्यंत झालेले आहे.३८ (१६%) कुटूंप्रमुखाचे शिक्षण ८ वी ते १० वीपर्यंत झालेले असून २८(१२%) कुटूंबप्रमुखाचे शिक्षण ११ वी ते १२ वी एवढे झालेले आहे. ११ (४%) कुटूंबप्रमुखाचे शिक्षण १३ वी ते पदवीधर आहेत तर ३ (१%) कुटूंबप्रमुख पदव्युत्तर आहे.

**गृहीतक -:कैकाडी समाजामध्ये स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत अत्यंत कमी आहे**


| **लिंग शिक्षण/** | **अशिक्षित** | **टक्केवारी** | **शिक्षित** | **टक्केवारी** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| पुरुष | २७० | ६७ | ४७७ | ८९ | ७४७ |
| स्त्रिया | १३४ | ३३ | ५९ | ११ | १९३ |
| एकूण | ४०४ | १०० | ५३६ | १०० | ९४० |

वरील तक्त्यानुसार असे आढळून येते कि, कैकाडी समाजातील स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण फक्त ११% आहे तुलनेने पुरुषांचे प्रमाण ८९% असल्याचे निदर्शनास येते. यावरून कैकाडी समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेने कमी आहे

## कुटुंबातील लोकांचे शिक्षण

**तक्ता क्र.१०**

| अ.क्र. | कुटुंबातील लोकांचे शिक्षण | उर्वरित महाराष्ट्र % | | विदर्भ % | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या |
| १ | लागू नाही (०-३ वर्ष ) | १४८ | ४ | ४७ | ४ | १९५ |
| २ | पूर्व प्राथमिक | ३८ | १ | १३ | १ | ५१ |
| ३ | अशिक्षित | ९५६ | २८ | ३०८ | २७ | १२६४ |
| ४ | १ ली ते ७ वी | ९५७ | २८ | ३२६ | २९ | १२८३ |
| ५ | ८ वी ते १० वी | ७२४ | २२ | २२१ | २० | ९४५ |
| ६ | ११ वी ते १२ वी | ३०९ | ९ | ११५ | १० | ४२४ |
| ७ | १३ वी ते पदवीधर | २०८ | ६ | ८३ | ७ | २९१ |
| ८ | पदव्युत्तर | २४ | १ | ११ | १ | ३५ |
| **एकूण** | | **३३६४** | **१००** | **११२४** | **१००** | **४४८८** |




वरील तक्त्यावरून असे दिसून येते कि, उर्वरित महाराष्ट्रात ०-३ वर्ष वयोगटात १४८ (४%) तर विदर्भात ४७ (४%) बालके आहेत .उर्वरित महाराष्टातील ३८(१%) तर विदर्भातील १३ (१%) लोकांचे पूर्व प्राथमिक पर्यंतचे शिक्षण झाले आहे.तर उर्वरित महाराष्ट्रातील ९५६ (२८%) तर विदर्भातील ३०८ (२७%) व्यक्ती अशिक्षित आहेत. उर्वरित महाराष्ट्रात ९५७ (२८%) तर विदर्भात ३२६ (२९%) व्यक्तिंनी १ ली ते ७ वी पर्यंतचे शिक्षण घेतले आहे. ८वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण घेतलेले उर्वरित महाराष्ट्रात ७२४ (२२ %) तर विदर्भात २२१ (२०%) व्यक्ती आहेत.उर्वरित महाराष्टात ३०९(९%) तर विदर्भात ११५(१०%) व्यक्तिंनी ११ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण घेतले आहे.तर २०८(६%) उर्वरित महाराष्टातील तर ८३ (७%) व्यक्तिंनी १३ वी ते पदवीधर पर्यंतचे

शिक्षण घेतले आहे. उर्वरित महाराष्ट्र मध्ये २४ (१%) तर विदर्भात ११ (१%) लोकांनी पदव्युत्तर पर्यंतचे शिक्षण घेतले आहे.

**शिक्षण मध्ये सोडले आहे का ?**

**तक्ता क्र. ११**

| **अ.क्र.** | **शिक्षण मध्ये सोडले का** | **उर्वरित महाराष्ट्र** | | **विदर्भ** | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** |
| १ | होय | ३६१ | ५२ | ६८ | २९ | ४२९ |
| २ | नाही | ११५ | १६ | ८१ | ३४ | १९६ |
| ३ | लागू नाही | २२६ | ३२ | ८९ | ३७ | ३१५ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील ३६१ (५२%) तर विदर्भातील ६८ (२९%) कैकाडी समाजातील लोकांनी शिक्षण मध्ये सोडले आहे. उर्वरित महाराष्ट्रातील ११५ (१६%) तर विदर्भातील ८१ (३४%) लोकांनी शिक्षण मध्ये सोडले नाही. उर्वरित महाराष्ट्रातील २२६ (३२%) लोकांना तर विदर्भातील ८९ (३७%) लोकांना सदर बाब लागु नाही.

**शिक्षण सोडण्याची कारणे**

**तक्ता क्र. १२**

| अ.क्र. | शिक्षण सोडण्याची कारणे | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या |
| १ | शिक्षणाची आवड नसल्याने | १५ | ४ | १ | २ | १६ |
| २ | आर्थिक परिस्थिती | २७५ | ७६ | ४९ | ७२ | ३२४ |
| ३ | इतर जातीच्या मुलांच्या त्रासामुळे | ८ | २ | ० | ० | ८ |
| ४ | भटकंतीमुळे | १४ | ४ | ० | ० | १४ |
| ५ | नापास झाल्यामुळे | १ | ० | ० | ० | १ |
| ६ | इतर | ७ | २ | ३ | ४ | १० |
| ७ | कामासाठी /नोकरी | २४ | ७ | ८ | १२ | ३२ |
| ८ | माहिती दिली नाही | १७ | ५ | ७ | १० | २४ |
| **एकूण** | | **३६१** | **१००** | **६८** | **१००** | **४२९** |

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील १५ (४%) कैकाडी समाजातील लोकांना शिक्षणाची आवड नसल्याने त्यांनी शिक्षण घेतले नाही. तर २४५ (७६%) लोकांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने शिक्षण सोडले आहे. ८ (२%) लोकांनी इतर जातीच्या मुलांच्या त्रासामुळे शिक्षण घेणे सोडले असून १४ (४%) लोकांनी भटकंतीमुळे शिक्षण सोडले आहे. १ (०%) लोकांनी नापास झाल्यामुळे शिक्षण सोडले. ७ (२%) लोकांनी इतर कारणामुळे शिक्षण सोडले तर २४ (७%) लोकांनी कामासाठी /नोकरीसाठी शिक्षण सोडले. १७ (५%) लोकांनी माहिती दिलेली नाही.

तर विदर्भातील १ (२%) कैकाडी समाजातील लोकांना शिक्षणाची आवड नसल्याने त्यांनी शिक्षण घेतले नाही तर ४९ (७२%) लोकांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने शिक्षण सोडले आहे.

इतर जातीच्या मुलांच्या त्रासामुळे शिक्षण घेणे सोडणे, भटकंतीमुळे, नापास झाल्यामुळे शिक्षण सोडणाऱ्याचे प्रमाण नगन्य आहे. ३ (४%) लोकांनी इतर कारणामुळे शिक्षण सोडले तर ८ (१२%) लोकांनी लोकांनी  कामासाठी / नोकरीसाठी शिक्षण सोडले. ७ (१०%) लोकांनी माहिती दिलेली नाही.

**कैकाडी समाजाचा मुख्य व्यवसाय**

**तक्ता क्र. १३**

| अ. क्र. | व्यवसाय | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या |
| १ | सफाई कामगार | २४ | ३ | ० | ० | २४ |
| २ | अपंग | ३ | १ | ० | ० | ३ |
| ३ | नोकरी | ४७ | ७ | १६ | ७ | ६३ |
| ४ | निवृत्त | १० | १ | ६ | ३ | १६ |
| ५ | मोलमजुरीहातमजुरी/ | ११४ | १६ | ६१ | २६ | १७५ |
| ६ | झाडू बनविणे विकणे/ | ३८ | ५ | १ | ० | ३९ |
| ७ | डाल्या टोपल्या विणणे / बांबूकाम + वराहपालन | १३० | १९ | १२ | ५ | १४२ |
| ८ | वराहपालन | २६ | ४ | ८ | ३ | ३४ |
| ९ | घरकाम | २३ | ३ | १२ | ५ | ३५ |
| १० | व्यवसाय | २५८ | ३७ | ६३ | २६ | ३२१ |
| ११ | शिक्षण | ४ | १ | ० | ० | ४ |
| १२ | शेती व शेतमजुरी | ८ | १ | १४ | ६ | २२ |
| १३ | माहिती दिली नाही | १७ | २ | ४५ | १९ | ६२ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

कैकाडी समाजाच्या करण्यात आलेल्या सर्वेक्षणात कैकाडी समाजाच्या व्यवसायाबाबत खालीलप्रमाणे माहिती उपलब्ध झाली.उर्वरित महाराष्ट्रातील २४(३%) कैकाडी समाजातील कुटुंबप्रमुख सफाई कामगाराचे काम करत आहे. ३ (१%) कैकाडी कुटुंबप्रमुख अपंग आहेत. ४७ (७%) कैकाडी बांधव नोकरी करत आहेत.१०(१%) निवृत्त आहेत. ११४ (१६%) कैकाडी कुटुंबात मोलमजुरी/हातमजुरी करून उदरनिर्वाह केला जातो. ३८(५%) कुटुंबात झाडू बनविण्याचे काम केले जाते. १३० (१९%) कुटुंबात डाल्या टोपल्या विणणे /बांबूकाम यासोबत वराहपालन देखील केले जाते.२६ (४%) कुटुंबात प्रमुख व्यवसाय म्हणून वराहपालन केले जाते.२३(३%) कुटुंबात महिला घरकाम करत

आहेत. २५८ (३७ ) कुटुंबात छोटे मोठे व्यवसाय उदा. किराणा दुकान ,केसांचा व्यवसाय,भांड्याचा व्यवसाय इत्यादी केले जातात . ४(१%) कुटुंबात शिक्षण घेतले जात आहे.८(१%) कुटुंबात शेती व  शेतमजुरी केली जाते. तर उर्वरित १७(२%) लोकांनी याबाबत माहिती दिली नाही.

विदर्भातील १६ (७%) कैकाडी बांधव नोकरी करत आहेत. ६(३%) निवृत्त आहेत. ६१ (२६%) कैकाडी कुटुंबात मोलमजुरी/हातमजुरी करून उदरनिर्वाह केला जातो.एका कुटुंबात झाडू बनविण्याचे काम केले जाते.१२  (५%) कुटुंबात डाल्या टोपल्या विणणे /बांबूकाम यासोबत वराहपालन देखील केले जाते.८(३%) कुटुंबात प्रमुख व्यवसाय म्हणून वराहपालन केले जाते.१२ (५%) कुटुंबात महिला घरकाम करत आहेत. ६३ (२६% ) कुटुंबात छोटे मोठे व्यवसाय उदा. किराणा दुकान ,केसांचा व्यवसाय,भांड्याचा व्यवसाय इत्यादी केले जातात .१४  (६ %) कुटुंबात शेती व  शेतमजुरी केली जाते. तर उर्वरित ४५ (१९ %) लोकांनी याबाबत माहिती दिली नाही.



**लक्ष्य गट चर्चेदरम्यान कैकाडी समाजाची महिला बांबुकाम करताना**

**गृहीतक - कैकाडी समाजातील लोकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे.**

## मासिक उत्पन्न
## तक्ता क्र. १४

| अ.क्र. | उत्पन्न | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| 1 | ०-१००० रुपये | ७६ | ११ | ६२ | २६ | १३८ |
| 2 | १००१-५००० रुपये | ३९३ | ५६ | १०४ | ४४ | ४९७ |
| 3 | ५००१-१०००० रुपये | १६४ | २३ | ४१ | १७ | २०५ |
| 4 | १०००१-२०००० रुपये | ३९ | ६ | २२ | ९ | ६१ |
| 5 | २०००१ - ३०००० रुपये | ८ | १ | ४ | २ | १२ |
| 6 | ३०००१-४०००० रुपये | ५ | १ | २ | १ | ७ |
| ७ | ४०००१ पेक्षा जास्त | ० | ० | ३ | १ | ३ |
| 7 | माहिती दिली नाही | १७ | २ | ० | ० | १७ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

बार्टी तर्फे महाराष्ट्रात करण्यात आलेल्या कैकाडी समाजाच्या सर्वेक्षणात कैकाडी समाजाच्या उत्पन्नाबाबत माहिती विचारण्यात आली त्यामध्ये उर्वरित महाराष्ट्रातील ७६ (११%) कैकाडी कुटुंबाचे मासिक उत्पन्न ०-१००० च्या दरम्यान आहे. ३९३(५६%) कैकाडी कुटुंबाचे १००१ ते ५००० च्या दरम्यान आहे. १६४ (२३%) लोकांचे उत्पन्न ५००१ ते १०००० च्या दरम्यान आहे. ३९ (६%) लोकांचे उत्पन्न १०००१ते २०००० च्या दरम्यान आहे. ८(१%) कैकाडी कुटुंबाचे २०००१ ते ३०००० च्या दरम्यान आहे. ५ (१%) कैकाडी कुटुंबाचे ३०००१ते ४०००० च्या दरम्यान आहे.तर उर्वरित १७(२%) कैकाडी कुटुंबांनी उत्पन्नाबाबत माहिती दिलेली नाही.

विदर्भात ६२ (२६%) कैकाडी कुटुंबाचे मासिक उत्पन्न ०-१००० च्या दरम्यान आहे.१०४(४४%) कैकाडी कुटुंबाचे १००१ ते ५००० च्या दरम्यान आहे.४१ (१७%) लोकांचे उत्पन्न ५००१ते १०००० च्या दरम्यान आहे.२२ (९%) लोकांचे उत्पन्न १०००१ते २०००० च्या दरम्यान आहे. ४(२%) कैकाडी कुटुंबाचे २०००१ते ३०००० च्या दरम्यान आहे. २ (१%) कैकाडी कुटुंबाचे ३०००१ते ४०००० च्या दरम्यान आहे. तर ३ (१%) कुटुंबाचे मासिक उत्पन्न ४०००१ पेक्षा जास्त आहे.


# कैकाडी समाजाचा सामाजिक दर्जा

## (कुटुंबाची इतर माहिती व सोई सुविधा )

### कुटुंबाचा प्रकार

| अ.क्र. | कुटुंबाचा प्रकार | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या |
| १ | एकत्रित | ३६१ | ५१ | १६७ | ७० | ५२८ |
| २ | विभक्त | ३२७ | ४७ | ६५ | २७ | ३९२ |
| ३ | विस्तारित | ७ | १ | ० | ० | ७ |
| ४ | फक्त एकच व्यक्ती | ७ | १ | ६ | ३ | १३ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

**तक्ता क्र. १५**




बार्टी तर्फे कैकाडी या जातीचे सर्वेक्षण करण्यासाठी महाराष्ट्रातील एकूण ९४० कुटुंबांची निवड करण्यात आलेली आहे. त्यापैकी ७०२ कुटुंबे उर्वरित महाराष्ट्रातील २३८ कुटुंबे विदर्भातील आहेत. उर्वरित महाराष्ट्रातील ७०२ पैकी ३६१ (५१%) कुटुंबे हि एकत्रित कुटुंब पद्धती मध्ये राहतात, ३२७ (४७%) कुटुंब हि विभक्त कुटुंब पद्धती मध्ये

राहतात, ७ (१%) कुटुंबे विस्तारित कुटुंबात राहतात, तर उर्वरित ७ (१% ) कुटुंबात फक्त एकच व्यक्ती राहते.

तर विदर्भातील एकूण २३८ कुटुंबापैकी १६७ (७०%) कुटुंबे एकत्रित कुटुंब पद्धतीत राहतात. ६५ (२७%) कुटुंबे विभक्त कुटुंब पद्धतीत राहत आहेत.तर विस्तारित कुटूबांचे नगण्य प्रमाण असुन, ६ (३%) कुटूंबात फक्त एकच व्यक्ती राहते.

**घराची मालकी**

**तक्ता क्र. १६**

| अ.क्र. | घराची मालकी | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या |
| १ | स्वतची: | ३६३ | ५२ | ११५ | ४८ | ४७८ |
| २ | भाड्याची | ९८ | १४ | २५ | ११ | १२३ |
| ३ | अतिक्रमित जागेत | ९७ | १४ | ७९ | ३३ | १७६ |
| ४ | गावठाण | १२४ | १८ | १६ | ७ | १४० |
| ५ | शासकीय निवासस्थान | ३ | ० | १ | ० | ४ |
| ६ | इतर | १७ | २ | २ | १ | १९ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते कि,उर्वरित महाराष्ट्रातील ७०२ कैकाडी समाजातील लोकांपैकी ३६३ (५२%) लोक स्वतः च्या जागेत राहतात. तर ९८(१४% ) लोक भाड्याच्या घरात राहतात. अतिक्रमित तसेच गावठाणात राहणाऱ्या लोकांची संख्या १२४ (१८%) आहे. शासकीय निवास स्थानात राहणाऱ्याची संख्या ३ आहे. उर्वरित १७ (२%) लोक इतर जागेत म्हणजेच १७ पैकी २ कुटुंबे देवस्थानच्या जागेत , ५ कुटुंबे बेघर आहेत.

तर विदर्भातील २३८ कैकाडी समाजातील लोकापैकी ११५ (४८%) लोक स्वतः च्या जागेत राहतात. तर २५(११% ) लोक भाड्याच्या घरात राहतात. अतिक्रमित जागेत राहणाऱ्याची संख्या ७९ (३३%) तसेच गावठाणात राहणाऱ्या लोकांची संख्या १६ (७%) आहे. शासकीय निवास स्थानात राहणाऱ्याची संख्या १ (१%) आहे. उर्वरित २ (१%) लोक इतर प्रकारच्या जागेत राहत आहेत.

**घराची बांधणी**

**तक्ता क्र. १७**

| अ.क्र. | घराची बांधणी | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या |
| १ | कच्चे | ४६२ | ६६ | १५५ | ६५ | ६१७ |
| २ | पक्के | २३३ | ३३ | ८२ | ३५ | ३१५ |
| ३ | इतर | ७ | १ | १ | ० | ८ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | ९४० |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते कि, उर्वरित महाराष्ट्रात वास्तव्य करणाऱ्या कैकाडी समाजातील ४६२ (६६%) कुटुंबाच्या घराची बांधणी कच्च्या प्रकारची आहे. २३३ (३३%) कुटुंबे पक्क्या घरात राहत आहेत. तर उर्वरित ७ (१%) लोक इतर प्रकारच्या घरात म्हणजे तंबूत राहतात.

तर विदर्भातील १५५ (६५%) कैकाडी समाजातील लोक कच्च्या घरात तर उर्वरित ३५% लोक पक्क्या घरात राहतात.



लक्ष्य गट चर्चेदरम्यान कैकाडी समाजाच्या कुटुंबांची घराची अवस्था

## कुटुंबाच्या मालकीची शेतजमीन आहे का ?
**तक्ता क्र. १८**

| अ.क्र. | शेत जमीन आहे का | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ४४ | ६ | २० | ८ | ६४ |
| २ | नाही | ६५० | ९३ | २१८ | ९२ | ८६८ |
| ३ | माहिती दिली नाही | ८ | १ | ० | ० | ८ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

कैकाडी जातीच्या सर्वेक्षणात असे आढळून आले कि उर्वरित महाराष्ट्रातील ७०२ कुटुंबापैकी ४४ (६%) लोकांच्या कडे स्वतः च्या मालकीची शेतजमीन आहे. तर उर्वरित ६५० (९३%) लोकांच्या कडे स्वतःच्या मालकीची जमीन नाही.

तर विदर्भातील २०(८%) लोकांकडे स्वत:ची शेतजमीन आहे. तर उर्वरित २१८ (९२%) लोकांच्या कडे स्वत:ची शेतजमीन नाही.

## घरात खोल्या किती आहे.

**तक्ता क्र १९**

| अ.क्र. | घरात खोल्या किती आहे | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | एक खोल्या | ३५८ | ५१ | ४७ | २० | ४०५ |
| २ | दोन खोल्या | २५० | ३६ | १२५ | ५३ | ३७५ |
| ३ | तीन खोल्या | ६३ | ९ | ३९ | १६ | १०२ |
| ४ | चार व चार पेक्षा जास्त | ३१ | ४ | २७ | ११ | ५८ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | ९४० |

वरील तक्यावरून असे निदर्शनास येते कि, उर्वरित महाराष्ट्रातील ७०२ कैकाडी लोकापैकी ३५८ (५१%) लोक एका खोलीत राहतात. २५० (३६%) लोक दोन खोल्या असलेल्या घरात राहत आहेत. ६३ (९%) लोक तीन खोल्या असलेल्या घरात राहत आहेत. ३६ (४%) लोक चार व चार पेक्षा जास्त खोल्या असलेल्या घरात राहतात.

तर विदर्भातील २३८ कैकाडी कुटुंबापैकी ४७ (२०%) लोक एका खोलीत राहतात. १२५ (५३%) लोक दोन खोल्या असलेल्या घरात राहत आहेत. १६% लोक तीन खोल्या असलेल्या घरात राहत आहेत. तर ११% लोक चार व चार पेक्षा जास्त खोल्या असलेल्या घरात राहत आहेत.

## स्वयंपाकघरात कोणते इंधन वापरले जाते

**तक्ता क्र. २०**

| अ.क्र. | स्वयंपाकघरात इंधन कोणते | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | चूल-लाकूड | २८४ | ४० | ७९ | ३३ | ३६३ |
| २ | शेणाची गौरी | ५ | १ | २८ | १२ | ३३ |
| ३ | शेगडी | ० | ० | १ | ० | १ |
| ४ | कोळसा | १ | ० | ० | ० | १ |
| ५ | गॅस | ३३० | ४७ | १०५ | ४४ | ४३५ |
| ६ | वीज | २ | ० | ० | ० | २ |
| ७ | चूल-लाकूड +गॅस | ६१ | ९ | २५ | ११ | ८६ |
| ८ | बायोगॅस | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | इतर | १९ | ३ | ० | ० | १९ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

महाराष्ट्रात घेण्यात आलेल्या कैकाडी समाजाच्या सर्वक्षणात ,वरील तक्त्यावरून असे दिसून येते कि, उर्वरित महाराष्ट्रातील २८४ (४०%) व्यक्तींच्या घरी स्वयंपाकासाठी इंधन म्हणून चूल- लाकूड वापरले जातात. ५ (१% ) व्यक्ती घरी स्वयंपाकासाठी इंधन म्हणून शेणाची गौरी वापरतात. शेगडी,कोळसा, वीज, सौर, बायोगॅस आणि इतर इंधनाचा वापर नगण्य स्वरुपात केला जातो. सर्वात जास्त ३३० (४७%) व्यक्तींच्या घरी स्वयंपाकासाठी गॅस / PNG इंधन असते. तर ६१ (९%) कुटुंबात चुल-लाकुड+गॅस इंधन वापरतात . उर्वरित ३% लोकांच्या घरी स्वयंपाकासाठी वरील पैकी कोणतेही इंधन मिश्र स्वरुपात वापरली जातात.

तर विदर्भात ७९ (३३%) कैकाडी समाजातील लोक स्वंयपाकासाठी चूल-लाकूड वापरतात. २८ (१२%) लोक शेणाची गौरी वापरतात. तर ४४% लोक स्वंयपाकासाठी गॅस वापरतात. ११% लोक चलु-लाकूड+गॅस वापरतात.

## पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत

**तक्ता क्र. २१**

| अ.क्र. | **पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत** | **उर्वरित महाराष्ट्र** | | **विदर्भ** | | **एकूण संख्या** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | |
| १ | सर्वाजनिक नळ | ३३० | ४७ | १०८ | ४५ | ४३८ |
| २ | वैयक्तिक नळ | १८९ | २७ | ७३ | ३१ | २६२ |
| ३ | विहीर | ४७ | ७ | २६ | ११ | ७३ |
| ४ | टाकी/तलाव | ७ | १ | ० | ० | ७ |
| ५ | हातपंप | ५६ | ८ | ६ | २ | ६२ |
| ६ | बोअरवेल/बोअर(इलेक्ट्रिकल मोटारसह) | ८ | १ | ५ | २ | १३ |
| ७ | इतर | ३१ | ४ | ११ | ५ | ४२ |
| ८ | मिश्र | ३४ | ५ | ९ | ४ | ४३ |
| | **एकूण** | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते कि, उर्वरित महाराष्ट्रातील ३३० (४७%) कैकाडी समाजाच्या लोकांचा पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत सार्वजनिक नळ आहे. १८९ (२७%) लोकांना वैयक्तिक नळ आहे. तर ४७ (७%) लोक पिण्याचे पाणी विहिरीवरून भरत असतात. ७(१%) टाकी /तलावावरून पाणी भरतात. ५६ (८%) लोक हातपंपावरून पिण्याचे पाणी भरतात. ८ (१%) लोकांकडे बोअरवेल आहे. ३१ (४%) लोक इतराच्या नळावरून किंवा त्यांचा पिण्याचा पाण्याचा स्त्रोत इतर आहे. ३४ (५%) लोक वैयक्तिक नळ+सार्वजनिक नळावरून पिण्याचे पाणी भरतात.

विदर्भातील १०८ (४५%) कैकाडी समाजाच्या लोकांचा पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत सार्वजनिक नळ आहे. ७३ (३१%) लोकांना वैयक्तिक नळ आहे. तर २६ (११%) लोक पिण्याचे पाणी विहिरीवरून भरत असतात. ६ (२%) लोक हातपंपावरून पिण्याचे पाणी भरतात २% लोकांकडे बोअरवेल आहे. तर ११ (५%) लोक इतर ठिकाणाहुन पाणी भरतात. ४% लोक सार्वजनिक नळ, विहीर, हातपंपावरून पिण्याचे पाणी भरतात.

## घरापासुन पिण्याचे पाणी मिळण्याचे अंतर

**तक्ता क्र. २२**

| अ.क्र. | घरापासून पिण्याचे पाणी मिळण्याचे अंतर: | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | घरामध्ये | १३७ | १९ | ७० | ३० | २०७ |
| २ | घरापासून जवळ | ३९८ | ५७ | ९६ | ४० | ४९४ |
| ३ | घरापासून लांब | १६७ | २४ | ७२ | ३० | २३९ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

उपरोक्त तक्त्यात असे दिसून येते कि, उर्वरित महाराष्ट्रातील १३७ (१९%) लोकांच्या घरामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे .तर विदर्भातील ७० (३०%) लोकांच्या घरामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे. तर उर्वरित महाराष्ट्रातील ३९८ (५७ %) व विदर्भातील ९६ (४०%) लोकांच्या घरापासून जवळच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असून उर्वरित महाराष्ट्रातील १६७ (२४%) तर विदर्भातील ७२ (३०%) लोकांच्या घरापासुन लांब पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे.

## स्नानगृहाची व्यवस्था कोणत्या प्रकारची आहे.

**तक्ता क्र. २३**

| अ.क्र. | स्नानगृहाची व्यवस्था | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | मोरी/न्हाणीघर | ३८१ | ५४ | १५४ | ६५ | ५३५ |
| २ | उघड्यावर (कुंपण घालून तयार केलेले) | २९९ | ४३ | ७९ | ३३ | ३७८ |
| ३ | व्यवस्था नाही | २० | ३ | २ | १ | २२ |
| ४ | इतर | २ | ० | ३ | १ | ५ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे निर्दशनास येते की , उर्वरीत महाराष्ट्रातील ३८१ (५४%) कैकाडी समाजाच्या लोकांची स्नानगृहाची व्यवस्था मोरी/न्हाणीघर अशी आहे.२९९ (४३%) लोकांची स्थानगृहाची व्यवस्था उघडयावर (कुंपण घालून तयार केलेले) आहे. २०

(३%) लोकांची स्नानगृहाची व्यवस्था नाही.  २ (०%) लोकांची स्थानगृहासाठी इतर व्यवस्था आहे.

तर १५४ (६५%)  विदर्भातील कैकाडी समाजाच्या लोकांची स्थानगृहाची व्यवस्था व्यवस्था मोरी/न्हाणीघर अशी आहे. ७९ (३३%) लोकांची स्थानगृहाची व्यवस्था उघडयावर (कुंपण घालून तयार केलेले) आहे. २ (१%) लोकांची स्नानगृहाची व्यवस्था नाही. ३ (१%) लोकांची स्थानगृहासाठी इतर व्यवस्था आहे.

## शौचालयाचा प्रकार

### तक्ता क्र. २४

| अ.क्र. | शौचालय | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | वैयक्तिक | १७५ | २५ | १३१ | ५५ | ३०६ |
| २ | सार्वजनिक (मोफत) | १३७ | १९ | १० | ४ | १४७ |
| ३ | सार्वजनिक (पैसे देऊन) | ८२ | १२ | १ | १ | ८३ |
| ४ | खुल्या जागेवर | ३०८ | ४४ | ९६ | ४० | ४०४ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

कैकाडी समाजाच्या सर्वक्षणात, वरील तक्त्यावरून असे दिसून येते कि, उर्वरित महाराष्ट्रातील १७५ (२५%)  कुटूंबाची शौचालयाची व्यवस्था ही वैयक्तीक आहे. १३७ (१९%) कुटूंबाची शौचालयाची व्यवस्था सार्वजनिक (मोफत) असून ८२ (१२%) कुटूंबाची सार्वजनिक (पैसे देऊन) आहे. तर ३०८ (४४%) कुटूंब शौचालयासाठी खुल्या जागेचा वापर करतात.

तर विदर्भात १३१ (५५%) कुटूंबाची शौचालयाची व्यवस्था ही वैयक्तीक आहे. १० (४%) कुटूंबाची शौचालयाची व्यवस्था ही सार्वजनिक (मोफत) असून  ९६ (४०%) कुटूंब शौचालयासाठी खुल्या जागेचा वापर करतात.

## सांडपाण्याची व्यवस्था

### तक्ता क्र. २५

| अ.क्र. | घरातील सांडपाण्याची व्यवस्था कशी आहे? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | उघड्यावर (गटार,नाला,तलाव,नदी) | ५९१ | ८४ | १६० | ६७ | ७५१ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | बंद गटार | १०८ | १५ | ७१ | ३० | १७९ |
| ३ | इतर | ३ | १ | ७ | ३ | १० |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

उपरोक्त तक्यावरुन असे दिसून येते की, उर्वरित महाराष्ट्रातील ५९१ (८४%) तर विदर्भामध्ये १६० (७७%) कुटूंबाची घरातील सांडपाण्याची व्यवस्था ही उघडयावर (गटार, नाला, तलाव, नदी ) आहे . उर्वरित महाराष्ट्रातील १०८ (१५%) कुटूंबाची सांडपाण्याची व्यवस्था बंद गटार असुन विदर्भामध्ये ७१ (३०%) असलेली दिसुन येते. त्याचप्रमाणे उर्वरित महाराष्ट्रामध्ये घरातील सांडपाण्याची व्यवस्था ही इतर ३ (१%) आहे तर विदर्भामध्ये ७ (३%) आहे.

## कोणत्या प्रकारची वीज वापरली जाते.

**तक्ता क्र. २६**

| अ.क्र. | विजेचा स्त्रोत | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | वीज | ५३० | ७६ | २१२ | ८९ | ७४२ |
| २ | रॉकेल | ६३ | ९ | १२ | ५ | ७५ |
| ३ | सौर उर्जा | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | इतर तेल | ३ | ० | ० | ० | ३ |
| ५ | इतर | ३ | ० | ४ | २ | ७ |
| ६ | वीज नाही | ९० | १३ | ९ | ४ | ९९ |
| ७ | वीज+ रॉकेल | ११ | २ | १ | ० | १२ |
| ८ | माहिती दिली नाही | २ | ० | ० | ० | २ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते कि, उर्वरित महाराष्ट्रातील ५३० (७६%) कैकाडी समाजाच्या लोकांचा विजेचा स्त्रोत वीज आहे. ६३ (९ %) लोकांचा रॉकेल हे वीजेचे स्त्रोत आहे. तर सौर उर्जा व इतर तेल यांचा वापर नगण्य स्वरुपाचा आहे. ३ (०%) लोक इतर विजेचे स्त्रोत वापरत असतात. तर ९० (१३%) लोकांकडे वीज नाही. ११ (२%) लोक वीज व रॉकेलचा वापर करतात.

विदर्भातील २१२ (८९%) कैकाडी समाजाच्या लोकांचा वीजेचा स्त्रोत वीज आहे. १२(५%) लोकांना रॉकेल आहे. तर सौर उर्जा व इतर विजेचे स्त्रोत नगण्य स्वरुपाचे आहे. ४ (२%) लोक इतर विजेचे स्त्रोत वापरत असतात. ९ (४%) लोकांकडे वीज नसून १ (०%) लोक वीज व रॉकेल यांचा वापर करतात.

# विज पुरवठा कसा होतो

## तक्ता क्र. २७

| अ.क्र. | विज असल्यास पुरवठा कसा होतो | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | नियमित | २८६ | ४१ | १५२ | ६४ | ४३८ |
| २ | अनियमित | २२६ | ३२ | ५७ | २४ | २८३ |
| ३ | माहिती दिली नाही | १८ | ३ | ३ | १ | २१ |
| ४ | वीज नसलेले | १७२ | २४ | २६ | ११ | १९८ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

उपरोक्त तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, उर्वरित महाराष्ट्रातील २८६ (४१%) तर विदर्भामध्ये १५२ (६४%) लोकांना नियमित विजेचा पुरवठा होतो. उर्वरित महाराष्ट्रातील २२६ (३२%) तर विदर्भामध्ये ५७ (२४%) लोकांना अनियमित विजेचा पुरवठा होतो. उर्वरित महाराष्ट्रामध्ये १७२ (२४%) तर विदर्भामध्ये २६ (११%)लोकांना विजेचा पुरवठा होत नाही.

# महाराष्ट्रातील कैकाडी समाजाची वैवाहिक माहिती.

**गृहीतक :-विदर्भामधील असणारा कैकाडी समाज व उर्वरित महाराष्ट्रामध्ये असणारा समाज एकच आहे का?**

**तक्ता क्र. २८**

| अ.क्र. | विदर्भामधील असणारा कैकाडी समाज व उर्वरित महाराष्ट्रमध्ये असणारा समाज एकाच आहे का? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ६२१ | ८८ | १९३ | ८१ | ८१४ |
| २ | नाही | ३२ | ५ | २६ | ११ | ५८ |
| ३ | माहिती नाही | ४० | ६ | १८ | ८ | ५८ |
| ४ | माहिती दिली नाही | ७ | १ | ० | ० | ७ |
| ५ | भाषेत फरक आहे | २ | ० | १ | ० | ३ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

कैकाडी समाजाच्या सर्वक्षणात, वरील तक्त्यावरून असे दिसून येते कि, उर्वरित महाराष्ट्रातील ६२१ (८८%) लोकांनी कैकाडी समाज एकच आहे अशी माहिती दिली . ५६ (७%) लोकांनी विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाज एक नाही अशी माहिती दिली.४० (६%) लोकांनी याबाबत काही माहिती नसल्याचे सांगितले.तर ७(१%) लोकांनी काही माहिती दिली नाही.उर्वरित २ लोकांनी भाषेत फरक असल्याचे नमूद केले आहे.

तर विदर्भातील १९३ (८१%) लोकांनी विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाज एकच आहे अशी माहिती दिली. २६ (११%) लोकांनी विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाज एक नाही अशी माहिती दिली. १८ (८%) लोकांनी कैकाडी समाजाच्या साम्याबाबत काही माहिती नाही असे उत्तर दिले आहे.तर उर्वरित १ व्यक्तीने भाषेत फरक असल्याचे सांगितले.

**वरील दोन्ही विभागातील अनुक्रमे ८८% व ८१ % लोकांनी विदर्भातील कैकाडी समाज व उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाज एकच असल्याची माहिती दिली आहे. यावरून दोन्ही विभागातील कैकाडी समाज एकच आहे असे निष्कर्षांअंती दिसून येते व त्यांचा अनुसूचित जातीमध्ये समावेश करणे योग्य वाटते.**

## कुटूंबामध्ये पोटजाती विवाह होतो का ?

**तक्ता क्र. २९**

| अ.क्र. | आपल्या कुटुंबात पोटजाती मध्ये विवाह होतो का? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ४४९ | ६४ | १८६ | ७८ | ६३५ |
| २ | नाही | २५० | ३६ | ५१ | २२ | ३०१ |
| ३ | माहिती दिली नाही | ३ | ० | १ | ० | ४ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

कैकाडी जातीच्या सर्वेक्षणात असे आढळून आले कि उर्वरित महाराष्ट्रातील ४४९ (६४%) तर विदर्भात १८६ (७८%) कुटूंबामध्ये पोटजातीमध्ये विवाह होतो . उर्वरित महाराष्ट्रातील २५०(३६%) कुटूंबामध्ये पोटजातीमध्ये विवाह केला जात नसून विदर्भातील ५१ (२२%) लोकांकडे कुटूंबातील पोटजातीमध्ये विवाह केला जात नाही. पोटजाती मध्ये विवाह करण्याचे प्रमाण जास्त आहे असे निदर्शनास येते.

## कुटूंबामध्ये आंतरजातीय / अंतरधर्मीय विवाह केला आहे का ?

**तक्ता क्र. ३०**

| अ.क्र. | आपल्या कुटुंबात आंतरजातीय/आंतरधर्मीय विवाह केला आहे का? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ५० | ७ | १२ | ५ | ६२ |
| २ | नाही | ६५१ | ९३ | २२५ | ९५ | ८७६ |
| ३ | माहिती दिली नाही | १ | ० | १ | ० | २ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्या वरून असे दिसून येते की, उर्वरित महाराष्ट्रातील ५० (७%) तर विदर्भामध्ये १२ (५%) कैकाडी समाजाच्या कुटूंबामध्ये आंतरजातीय / आंतरधर्मीय विवाह केला आहे . उर्वरित महाराष्ट्रामध्ये ६५१ (९३ %) कुटूंबामध्ये आंतरजातीय / आंतरधर्मीय विवाह केला नसून विदर्भामध्ये याचे प्रमाण २२५ (९५%) एवढे आहे. उर्वरित

महाराष्ट्रातील १ (०%) कुटूंबातील लोकांना कुटूंबामध्ये आंतरजातीय / आंतरधर्मीय विवाह केला आहे का याबाबतची माहिती दिली नाही.

## आंतरधर्मीय / आंतरजातीय विवाह केला असेल तर तपशील

**तक्ता क्र. ३१**

| अ.क्र. | होय असल्यास तपशील | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | आंतरधर्मीय | ३६ | ७२ | ० | ० | ३६ |
| २ | आंतरजातीय | १४ | २८ | ६ | ५० | २० |
| ४ | माहिती दिली नाही | ० | ० | ६ | ५० | ६ |
| **एकूण** | | **५०** | **१००** | **१२** | **१००** | **६२** |

उपरोक्त तक्यावरुन असे दिसुन येते की, ३६(७२%) उर्वरित महाराष्ट्रातील कुटूंबातील लोकांनी आंतरधर्मिय विवाह केला असुन १४ (२८%) कुटूंबातील लोकांनी आंतरजातीय विवाह केला आहे .

तर विदर्भामध्ये अंतरधर्मिय विवाह करण्याचे प्रमाण नगण्य स्वरुपात आहे. ६ (५०%) कुटूंबातील लोकांनी आंतरजातीय विवाह केला आहे. ६ (५०%) लोकांनी माहिती दिली नाही.

### आंतरधर्मीय / आंतरजातीय विवाह केल्यामुळे समाजातील इतर लोकांकडुन मिळणारी वागणुक

**तक्ता क्र. ३२**

| अ.क्र. | हा विवाह केल्यामुळे आपल्याला समाजातील इतर लोकांकडून कशी वागणूक मिळाली | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | समान | ३७ | ७४ | ७ | ५८ | ४४ |
| २ | भेदभाव | ९ | १८ | ० | ० | ९ |
| ४ | माहिती दिली नाही | ४ | ८ | ५ | ४२ | ९ |
| **एकूण** | | **५०** | **१००** | **१२** | **१००** | ६२ |

वरील तक्यावरुन असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रामध्ये ३७ (७४%) कैकाडी समाजातील लोकांना आंतरधर्मीय / आंतरजातीय विवाह केल्यामुळे समाजातील

इतर लोकांकडुन मिळणारी वागणुक ही समान पध्दतीची आहे. ९ (१८%) लोकांना आंतरधर्मीय / आंतरजातीय विवाह केल्यामुळे समाजातील इतर लोकांकडुन भेदभावाची वागणुक मिळत आहे. ४ (८%) लोकांना हा विवाह केल्यामुळे कशी वागणुक मिळते हे सांगितले नाही.

तर विदर्भामध्ये ७ (५८%) कैकाडी समाजातील लोकांना आंतरधर्मीय / आंतरजातीय विवाह केल्यामुळे समाजातील इतर लोकांकडुन मिळणारी वागणुक ही समान पध्दतीची आहे. तर विदर्भामध्ये ५ (४२%) लोकांना हा विवाह केल्यामुळे मिळणाऱ्या वागणुकीबद्दल माहिती दिली नाही.

**आंतरजातीय विवाह केल्यामुळे आपल्या कुटूंबाला अडचणींना सामोरे जावे लागले होते का ?**

**तक्ता क्र. ३३**

| अ.क्र. | अंतरजातीय विवाह केल्यामुळे आपल्या कुटुंबाला अडचणी आल्या का? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ९ | १८ | ० | ० | ९ |
| २ | नाही | ३१ | ६२ | ६ | ५० | ३७ |
| ३ | लागू नाही | ८ | १६ | ५ | ४२ | १३ |
| ४ | माहिती दिली नाही | २ | ४ | १ | ८ | ३ |
| **एकूण** | | **५०** | **१००** | **१२** | **१००** | **६२** |

कैकाडी जातीच्या सर्वेक्षणात असे आढळून आले कि उर्वरित महाराष्ट्रातील ९ (१८%) कैकाडी समाजातील लोकांना आंतरजातीय विवाह केल्यामुळे अडचणीनां सामोरे जावे लागले. उर्वरित महाराष्ट्रातील ३१ (६२%) कैकाडी समाजातील लोकांना तर विदर्भातील ६ (५०%) लोकांना हा आंतरजातीय विवाह केल्याने कोणत्याही अडचणींना सामोरे जावे लागत नाही.

**आपल्या कुटूंबात हुंडा देण्याची / घेण्याची पध्दत आहे का ?**

**तक्ता क्र. ३४**

| अ.क्र. | आपल्या कुटुंबात हुंडा देण्याची / घेण्याची पद्धत आहे का? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |


| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | होय | ३०८ | ४४ | १३६ | ५७ | ४४४ |
| २ | नाही | ३९४ | ५६ | १०२ | ४३ | ४९६ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की,उर्वरित महाराष्ट्रामध्ये ३०८ (४४%) तर १३६ (५७%) विदर्भामध्ये कैकाडी समाजात लग्नाच्यासाठी हुंडा देण्याची/ घेण्याची पध्दत आहे. ३९४ (५६%) उर्वरित महाराष्ट्रातील तर १०२ (४३%) विदर्भातील कैकाडी समाजामध्ये हुंडा दण्याची/घेण्याची पध्दत नाही.

## हुंडा घेण्याची पद्धत असल्यास कोणाकडुन दिला जातो

**तक्ता क्र. ३५**

| अ.क्र. | होय असल्यास कोणाकडून दिला जातो | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | मुलीकडून मुलाला दिला जातो | २४६ | ८० | १२८ | ९४ | ३७४ |
| २ | मुलाकडून मुलीला दिला जातो | ५५ | १८ | २ | १ | ५७ |
| ३ | दोन्ही कडून | १ | ० | ५ | ४ | ६ |
| ४ | माहिती दिली नाही | ६ | २ | १ | १ | ७ |
| **एकूण** | | ३०८ | १०० | १३६ | १०० | ४४४ |



कैकाडी समाजाच्या सर्वेक्षणावरुन असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रामध्ये २४६ (८०%) लग्न पद्धतीत मुलीकडुन मुलाला हुंडा दिला जातो तर विदर्भामध्ये याचे प्रमाण १२८ (९४%) आहे. मुलाकडुन मुलीला हुंडा देण्याचे प्रमाण उर्वरित महाराष्ट्रामध्ये ५५ (१८%) असुन विदर्भामध्ये २ (१%) लोक मुलाला हुंडा देतात. उर्वरित महाराष्ट्रामध्ये फक्त एका कुटुंबात दोन्ही कुटुंबांना हुंडा देण्याची पद्धत आहे. तर विदर्भामध्ये ५ (४%) कुटुंबात दोन्हीकडील कुटुंबांना हुंडा देण्याची पध्दत आहे. ६ (२%) उर्वरित महाराष्ट्रामधील लोकांनी तर १ (१%) विदर्भातील लोकांनी हुंडा पद्धतीबद्दल माहिती दिली नाही.

**आपल्या कुटूंबातील कोणत्याही महिलेचा पुर्नविवाह झाला आहे का ?**

**तक्ता क्र. ३६**

| **अ.क्र.** | **आपल्या कुटुंबातील कोणत्याही महिलेचा पुर्नविवाह झाला आहे का?** | **उर्वरित महाराष्ट्र** | | **विदर्भ** | | **एकूण संख्या** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | |
| १ | होय | ८५ | १२ | ७ | ३ | ९२ |
| २ | नाही | ६१७ | ८८ | २३१ | ९७ | ८४८ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील ८५ (१२%) कैकाडी समाजातील कुटुंबात महिलेचा पुर्नविवाह झाला आहे. तर विदर्भातील ७ (३%) महिलांचा पुर्नविवाह केला आहे . याउलट उर्वरित महाराष्ट्रातील ६१७ (८८%) कैकाडी समाजातील कुटूंबामध्ये महिलांचा पुर्नविवाह होत नाही . तर विदर्भातील २३१ (९७%) कैकाडी कुटूंबातील महिलांचा पुर्नविवाह केला जात नाही.

**रेशन कार्ड आहे का?**

**तक्ता क्र. ३७**

| **अ.क्र.** | **रेशन कार्ड** | **उर्वरित महाराष्ट्र** | | **विदर्भ** | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | होय | ६१९ | ८८ | २२० | ९२ | ८३९ |
| २ | नाही | ८३ | १२ | १८ | ८ | १०१ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रातील ६१९ (८८%) कैकाडी समाजातील लोकांकडे तर विदर्भातील २२० (९२%) लोकांकडे रेशन कार्ड आहे. तर उर्वरित महाराष्ट्रातील ८३ (१२%) लोकांकडे तर विदर्भातील १८ (८%) लोकांकडे रेशन कार्ड नाही.

**कोणत्या रंगाचे रेशन कार्ड आहे.**

**तक्ता क्र. ३८**

| **अ.क्र.** | **रेशन कार्डाचा रंग** | **उर्वरित महाराष्ट्र** | | **विदर्भ** | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** |
| १ | पिवळे | २१४ | ३४ | ११८ | ५४ | ३३२ |
| २ | केशरी | ३७८ | ६१ | ९१ | ४१ | ४६९ |
| ३ | पांढरे | २३ | ४ | १० | ५ | ३३ |
| ४ | माहिती दिली नाही | ४ | १ | १ | ० | ५ |
| **एकूण** | | **६१९** | **१००** | **२२०** | **१००** | **८३९** |

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसते की, २१४ (३४%) उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाजातील लोकांकडे पिवळया रंगाचे रेशन कार्ड आहे. ३७८ (६१%) लोकांकडे केशरी रंगाचे रेशन कार्ड आहे. २३ (४%) लोकांकडे पांढऱ्या रंगाचे रेशन कार्ड आहे तर ४ (१%) लोकांनी माहिती दिली नाही.

विदर्भातील ११८ (५४%) कैकाडी लोकांकडे पिवळया रंगाचे रेशन कार्ड असुन ९१ (४१%) लोकांकडे केशरी रंगाचे रेशन कार्ड आहे. तर १० (५%) लोकांकडे पांढरे रेशन कार्ड आहे.

## रेशन कार्ड आहे का?

**तक्ता क्र. ३७**

| अ.क्र. | रेशन कार्ड | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ६१९ | ८८ | २२० | ९२ | ८३९ |
| २ | नाही | ८३ | १२ | १८ | ८ | १०१ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रातील ६१९ (८८%) कैकाडी समाजातील लोकांकडे तर विदर्भातील २२० (९२%) लोकांकडे रेशन कार्ड आहे. तर उर्वरित महाराष्ट्रातील ८३ (१२%) लोकांकडे तर विदर्भातील १८ (८%) लोकांकडे रेशन कार्ड नाही.

## कोणत्या रंगाचे रेशन कार्ड आहे.

**तक्ता क्र. ३८**

| अ.क्र. | रेशन कार्डाचा रंग | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | पिवळे | २१४ | ३४ | ११८ | ५४ | ३३२ |
| २ | केशरी | ३७८ | ६१ | ९१ | ४१ | ४६९ |
| ३ | पांढरे | २३ | ४ | १० | ५ | ३३ |
| ४ | माहिती दिली नाही | ४ | १ | १ | ० | ५ |
| **एकूण** | | **६१९** | **१००** | **२२०** | **१००** | **८३९** |

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसते की, २१४ (३४%) उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाजातील लोकांकडे पिवळया रंगाचे रेशन कार्ड आहे. ३७८ (६१%) लोकांकडे केशरी रंगाचे रेशन कार्ड आहे. २३ (४%) लोकांकडे पांढऱ्या रंगाचे रेशन कार्ड आहे तर ४ (१%) लोकांनी माहिती दिली नाही.

विदर्भातील ११८ (५४%) कैकाडी लोकांकडे पिवळया रंगाचे रेशन कार्ड असुन ९१ (४१%) लोकांकडे केशरी रंगाचे रेशन कार्ड आहे. तर १० (५%) लोकांकडे पांढरे रेशन कार्ड आहे.

## जातीचा दाखला आहे का ?

### तक्ता क्र. ३९

| अ.क्र. | जातीचा दाखला | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ३८८ | ५५ | १४७ | ६२ | ५३५ |
| २ | नाही | २४६ | ३५ | ८७ | ३६ | ३३३ |
| ३ | माहिती दिली नाही | ६८ | १० | ४ | २ | ७२ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

बार्टी या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील ३८८ (५५%) कैकाडी समाजातील तर विदर्भातील (६२%) १४७ लोकांकडे जातीचा दाखला आहे. उर्वरित महाराष्ट्रातील २४६ (३५%) व विदर्भातील ८७ (३६%) लोकांकडे जातीचा दाखला नाही. उर्वरित महाराष्ट्रातील ६८ (१०%) लोकांनी माहिती दिलेली नाही तर ४ (२%) कैकाडी लोकांनी माहिती दिलेली नाही.

## जातपडताळणी प्रमाणपत्र

### तक्ता क्र. ४०

| अ.क्र. | जातपडताळणी प्रमाणपत्र | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ६७ | १० | ४५ | १९ | ११२ |
| २ | नाही | ४७१ | ६७ | १८७ | ७९ | ६५८ |
| ४ | माहिती दिली नाही | १६४ | २३ | ६ | २ | १७० |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील ६७ (१०%) विदर्भातील ४५ (१९%) कैकाडी समाजातील लोकांकडे जातपडताळणी प्रमाणपत्र आहे. उर्वरित महाराष्ट्रातील ४७१ (६७%) तर विदर्भातील १८७ (७९%) कैकाडी लोकांकडे जातपडताळणी प्रमाणपत्र नाही. २३ % उर्वरित महाराष्ट्रातील व २% विदर्भातील लोकांनी जातपडताळणी प्रमाणपत्राबाबत माहिती दिली नाही.

## जातीची चुकीची नोंद झाली आहे का?

## तक्ता क्र. ४१

| अ.क्र. | जातीची चुकीची नोंद झाली आहे का? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ११२ | १६ | ३ | १ | ११५ |
| २ | नाही | ४८० | ६८ | २२८ | ९६ | ७०८ |
| ३ | माहिती नाही | ३ | १ | ० | ० | ३ |
| ५ | माहिती दिली नाही | १०७ | १५ | ७ | ३ | ११४ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रातील ११२ (१६%) कैकाडी समाजातील कुटूंबातील लोकांच्या जातीची चुकीची नोंद झालेली आहे. ४८० (६८%) लोकांची जातीची चुकीची नोंद झालेली नाही. तर ३ लोकांनी जातीच्या चुकीच्या नोदिंबाबत माहिती नाही असे सांगितले .

तर विदर्भातील ३ (१%) कैकाडी समाजातील कुटूंबातील लोकांच्या जातीची चुकीची नोंद झाली आहे. विदर्भातील २२८ (९६%) कैकाडी समाजातील लोकांची जातीची चुकीची नोंद झाली नाही. उर्वरित महाराष्ट्रातील १५ % लोकांनी तर विदर्भातील ३ % लोकांनी जातीच्या चुकीच्या नोंदीबद्दल माहिती दिली नाही.

**गृहीतक : कैकाडी समाजातील लोकांना शासनाच्या योजनांचा लाभ खूप कमी प्रमाणात मिळालेला आहे.**

## शासकीय योजनांचा लाभ घेतला आहे का?

## तक्ता क्र. ४२

| अ.क्र. | कोणत्या शासकीय योजनांचा लाभ घेतला आहे का? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| 1 | होय | ५४ | ८ | २४ | १० | ७८ |
| 2 | नाही | ६४८ | ९२ | २१४ | ९० | ८६२ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, ५४ (८%) उर्वरित महाराष्ट्रातील तर विदर्भातील २४ (१०%) कैकाडी लोकांनी शासकीय योजनांचा लाभ घेतला आहे . ६४८ (९२%) उर्वरित महाराष्ट्रातील व विदर्भातील २१४ (९०%) लोकांनी कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेतला नाही.

## होय असल्यास योजनेचे नाव
## तक्ता क्र. ४३

| अ.क्र. | होय असल्यास योजनेचे नाव | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| **१** | GAS-BPL योजना | १ | २ | ० | ० | १ |
| **२** | अपंग शिष्यवृत्ती | १ | २ | ० | ० | १ |
| ३ | इंधन योजना | १ | २ | ० | ० | १ |
| **४** | इंदिरा आवास योजना | २४ | ४४ | १८ | ७५ | ४२ |
| **५** | संजय गांधी निराधार योजना | ५ | ९ | १ | ४ | ६ |
| **७** | महात्मा फुले योजना | १ | २ | ० | ० | १ |
| **८** | शौचालय योजना | ४ | ७ | ० | ० | ४ |
| **९** | श्रावण बाल निराधार योजना | २ | ४ | १ | ४ | ३ |
| **११** | स्वच्छ भारत | ३ | ५ | ० | ० | ३ |
| **१२** | सेन्ट्रल बँक (बचतगट ,मुद्रा लोन ) | १ | २ | 2 | ८ | ३ |
| **१३** | माहिती दिली नाही | ९ | १७ | २ | ८ | ११ |
| **१४** | शिलाई मशीन व हीनपत्रे | २ | ४ | ० | ० | २ |
| **एकूण** | | **५४** | **१००** | **२४** | **१००** | **७८** |

बार्टी या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील १ (२%) कैकाडी समाजातील लोकांना GAS-BPL योजना, अपंग शिष्यवृत्ती, इंधन योजना, महात्मा फुले योजना, सेन्ट्रल बँक (बचतगट, मुद्रा लोन) या योजनांचा लाभ घेतला आहे. २४ (४४%) लोकांनी इंदिरा आवास योजनेचा लाभ घेतला आहे. ५ (९%) लोकांनी संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेतलेला आहे. ४ (७%) लोकांनी शौचालय योजनेचे लाभ घेतला आहे. २ (४%) कुटूंबातील लोकांनी श्रावण बाळ निराधार योजनेचा लाभ घेतलेला असून ३ (५%) लोकांनी स्वच्छ भारत या योजनेचा लाभ घेतला आहे. ९ (१७%) लोकांनी माहिती दिली नाही तर २ (४%) कैकाडी कुटूंबीयांनी शिलाई मशीन व हीनपत्रे या योजनेचा लाभ घेतला आहे.

विदर्भातील कैकाडी समाजातील GAS-BPL योजना, अपंग शिष्यवृत्ती, इंधन योजना, महात्मा फुले योजना, शौचालय योजना, स्वच्छ भारत, शिलाई मशीन व हीनपत्रे या योजनेचे लाभ घेणाऱ्या लोकांचे प्रमाण नगण्य स्वरुपात आहे. १८ (७५%) लोकांनी इंदिरा गांधी आवास योजनेचा लाभ घेतला आहे. १ (४%) लोकांनी संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ निराधार योजनेंचा लाभ घेतला आहे. २ (८%) लोकांनी सेन्ट्रल बँक (बचत, मुद्रा लोन) या योजनेचे लाभ घेतला आहे. शिलाई मशीन व हीनपत्रे योजनेंचा लाभ घेणाऱ्याचें नगण्य स्वरुपाचे आहे.

## योजनेचा लाभ घेताना आपणास अडचणी आल्यात का ?

### तक्ता क्र. ४४

| अ.क्र. | योजनेचा लाभ घेताना आपणास अडचणी आल्यात का? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | कागदपत्रांची पूर्तता झाली नाही | ५२ | ७ | १ | १ | ५३ |
| २ | अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून उदासीनता | १५ | २ | ३ | १ | १८ |
| ३ | लाभ मिळण्यासाठी होणारी दिरंगाई | १६ | २ | ० | ० | १६ |
| ४ | आवश्यक पात्रता नसणे | ४ | १ | ० | ० | ४ |
| ५ | इतर | ७ | १ | ० | ० | ७ |
| ६ | लागू नाही | ५४५ | ७८ | २१५ | ९० | ७६० |
| ७ | कागदपत्रांची पूर्तता झाली नाही+अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून उदासीनता +लाभ मिळण्यासाठी होणारी दिरंगाई +आवश्यक पात्रता नसणे | ५९ | ८ | १६ | ७ | ७५ |
| ८ | माहिती दिली नाही | ४ | १ | ३ | १ | ७ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रातील ५२ (७%) कैकाडी समाजातील लोकांना कागदांपत्रांची पुर्तता न झाल्याने योजनेचा लाभ घेता आला नाही. १५ (२%) लोकांना अंमलबजावणी अधिकाऱ्याकडुन उदासिनता मिळाल्याने योजनेचा लाभ घेता आला नाही. १६ (२%) लोकांना लाभ मिळण्यासाठी होणाऱ्या दिरंगाईमुळे लाभ घेता आला नाही. ४ (१%) लोकांना योजनेसाठी असणारी पात्रता नसल्याने, इतर कारणांमुळे व योजनेची कोणतीच माहिती नसल्याने कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ मिळाला नाही. ५४५ (७८%) लोकांना लागू होत नाही. ५९ (८%) लोकांना कागदपत्रांची पूर्तता झाली नाही, अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून उदासीनता, लाभ मिळण्यासाठी होणारी दिरंगाई, आवश्यक पात्रता नसणे यामुळे योजनेचा लाभ घेता आला नाही.

तर विदर्भातील १ (१%) लोकांना कागदपत्राची पुर्तता न झाल्याने कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेता आलेला नाही. ३(१%) लोकांना अंमलबजावणी अधिकाऱ्याकडुन उदासिनता मिळाल्याने योजनेचा लाभ घेता आला नाही. लाभ मिळण्यासाठी होणारी दिरंगाई, आवश्यक पात्रता नसणे व इतर कारणांमुळे योजनांचा लाभ घेता आलेला नाही. २४५ (९०%) लोकांना शासकीय योजनांचा लाभ हे लागु होत नाही तर १६ (७%) लोकांना कागदपत्रांची पूर्तता झाली नाही, अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून उदासीनता, लाभ मिळण्यासाठी होणारी दिरंगाई, आवश्यक पात्रता नसणे यामुळे योजनेचा लाभ घेता आला नसून ३ (१%) लोकांनी माहिती सांगितलेली नाही.

## आपल्या कुटूंबाचा पिढीजात (पारंपारिक) व्यवसाय आहे का?

**तक्ता क्र.** ४५

| अ.क्र. | आपल्या कुटूंबाचा पिढीजात (पारंपारिक) व्यवसाय आहे का ? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ६२६ | ८९ | १७२ | ७२ | ७९८ |
| २ | नाही | ७६ | ११ | ६६ | २८ | १४२ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, उर्वरित महाराष्ट्रातील ६२६ (८९%) तर विदर्भातील १७२ (७२%) कैकाडी समाजातील लोकांचा पिढीजात पारंपारिक व्यवसाय आहे. उर्वरित महाराष्ट्रातील ७६ (११%) लोकांचा पारंपारिक व्यवसाय नासून तर विदर्भातील ६६ (२८%) लोकांचा पिढीजात पारंपारिक व्यवसाय नाही.

## समाजातील इतर लोकांच्या दृष्टीने पिढीजात (पारंपारिक) व्यवसायाचा दर्जा कसा आहे?

**तक्ता क्र.** ४६

| अ.क्र. | समाजातील इतर लोकांच्या दृष्टीने पिढीजात (पारंपारिक) व्यवसायाचा दर्जा कसा आहे | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |


| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कमी | ५२६ | ७५ | १८९ | ७९ | ७१५ |
| २ | मध्यम | १२४ | १८ | ३५ | १५ | १५९ |
| ३ | उच्च्ा | २० | ३ | २ | १ | २२ |
| ५ | माहिती दिलेली नाही | ३२ | ४ | १२ | ५ | ४४ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील निरिक्षणावरुन असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रातील ५२६ (७५%) तर विदर्भातील १८९ (७९%) कैकाडी समाजातील लोकांना त्यांचा पिढीजात व्यवसायाचा दर्जा कमी वाटतो. उर्वरित महाराष्ट्रातील १२४ (१८%) तर ३५ (१५ %) लोकांना त्यांचा पारंपारिक व्यवसाय मध्यम स्वरुपाचा वाटतो. उर्वरित महाराष्ट्रातील २० (३%) व विदर्भातील २ (१%) समाजातील लोकांना पारंपारिक व्यवसाय उच्च दर्जाचा वाटतो. तर उर्वरित महाराष्ट्रातील ३२ (४%) व विदर्भातील १२ (५%) लोकांनी माहिती दिलेली नाही.

## तुमच्या पुढील पिढीने तुमचा पारंपारिक व्यवसाय करावा असे वाटते का?

**तक्ता क्र.** ४७

| **अ.क्र.** | **तुमच्या पुढील पिढीने तुमचा पारंपारिक व्यवसाय करावा असे तुम्हांला वाटते का ?** | **उर्वरित महाराष्ट्र** | | **विदर्भ** | | **एकूण संख्या** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | |
| १ | होय | ४७ | ६ | ३ | १ | ५० |
| २ | नाही | ६१६ | ८८ | २२१ | ९३ | ८३७ |
| ३ | पर्याय नाही | ५ | १ | ० | ० | ५ |
| ४ | माहिती दिली नाही | ३४ | ५ | १४ | ६ | ४८ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |




उपरोक्त् तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, उर्वरित महाराष्ट्रातील ४७ (६%) तर विदर्भातील ३ (१%) कैकाडी समाजातील लोकांना त्यांचा पारंपारिक व्यवसाय पुढील पिढीने करावा असे वाटते . उर्वरित महाराष्ट्रातील ६१६ (८८%) लोकांना त्यांचा पारंपारिक व्यवसाय पुढील पिढीने करू नये असे वाटते .तर विदर्भातील याचे प्रमाण २२१ (९३) एवढे आहे. उर्वरित महाराष्ट्रातील ५ (१%) लोकांना पर्याय नाही असे वाटते. उर्वरित महाराष्ट्रातील ३४ (५%) लोकांनी तर विदर्भातील १४(६%) लोकांनी माहिती दिली नाही

## आपले कुटूंब स्थलांतरीत कुटूंब आहे का ?

**तक्ता क्र. ४८**

| अ.क्र. | आपले कुटूंब स्थलांतरीत कुटूंब आहे का ? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ३६८ | ५२ | ६३ | २६ | ४३१ |
| २ | नाही | ३३४ | ४८ | १७५ | ७४ | ५०९ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

बार्टी या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील ३६८ (५२%) कैकाडी समाजातील कुटूंब स्थलांतरीत कुटूंब आहे . ६३ (२६%) कैकाडी कुटूंब स्थलांतरीत नाही.

तर विदर्भातील ६३ (२६%) कुटूंब स्थलांतरीत कुटूंब आहे. १७५ (७४%) कैकाडी कुटूंब स्थलांतरीत कुटूंब नाही.

## सदरील ठिकाणी किती वर्षापासुन राहता

**तक्ता क्र. ४९**

| अ.क्र. | सदरील ठिकाणी किती वर्षापासुन राहता | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | ० ते पाच वर्षे | १० | १ | २ | १ | १२ |
| २ | ६ ते १० वर्षे | २१ | ३ | ८ | ३ | २९ |
| ३ | ११ ते २० वर्षे | ३० | ४ | २० | ८ | ५० |
| ४ | २१ ते ३० वर्षे | ३७ | ५ | ३७ | १६ | ७४ |
| ५ | ३१ ते ४० वर्षे | ६६ | १० | ५९ | २५ | १२५ |
| ६ | ४० पेक्षा जास्त | ४४० | ६३ | ८६ | ३६ | ५२६ |
| ७ | लागू नाही | ९८ | १४ | २६ | ११ | १२४ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, ० ते पाच वर्षापासुन राहणाऱ्या कैकाडी समाजाची संख्या उर्वरित महाराष्ट्रामध्ये १०(१ %) तर विदर्भात २ (१%) आहे. तर ६ ते १० वर्षापासून रहाणाऱ्या लोकांची संख्या उर्वरित महाराष्ट्रामध्ये २१ (३ %) तर विदर्भात ८ (३%)आहे. ११ ते २० वर्षे सदर ठिकाणी रहाणाऱ्यांची संख्या उर्वरित महाराष्ट्रामध्ये ३० (४%) तर विदर्भात २० (८%) आहे. २१ ते ३० वर्षे सदर ठिकाणी रहाणाऱ्यांची संख्या उर्वरित महाराष्ट्रामध्ये ३७ (५%) तर विदर्भात ३७ (१६%) आहे. तर ३१ ते ४० वर्षे सदर ठिकाणी रहाणाऱ्यांची संख्या उर्वरित महाराष्ट्रामध्ये ६६ (१०%) तर विदर्भात ५९ (२५%) असून ४० पेक्षा जास्त वर्षे सदर ठिकाणी संख्या उर्वरित महाराष्ट्रात ४४० (६३%) तर विदर्भात ८६(३६%)आहे.

## सामाजिक माहिती (जातीविषयक माहिती )

### गृहीतक : विदर्भाप्रमाणेच उर्वरित महाराष्ट्रात अस्पृश्यता आहे

### इतर समाजाचे तुमच्याकडे बघण्याचा दृष्टीकोण कसा आहे ?

**तक्ता क्र. ५०**

| अ.क्र. | इतर समाजाचे तुमच्याकडे बघण्याचा दृष्टीकोण कसा आहे ? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | समानता | ३७५ | ५३ | १९८ | ८३ | ५७३ |
| २ | भेदभाव | ३०८ | ४४ | ३६ | १५ | ३४४ |
| ३ | कमी दर्जाची | १२ | २ | २ | १ | १४ |
| ४ | समानता+भेदभाव | १ | ० | ० | ० | १ |
| ५ | माहिती दिली नाही | ६ | १ | २ | १ | ८ |
| | **एकुण** | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

कैकाडी समाजाच्या सर्वेक्षणावरुन असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रामध्ये ३७५ (५३%) लोकांच्या मते इतर समाजाचे कैकाडी समाजातील लोकांकडे बघण्याचा दृष्टीकोणात समानता आहे. तर ३०८ (४४%) लोकांच्या मते इतर समाजाचे कैकाडी समाजातील लोकांकडे बघण्याचा दृष्टीकोणात भेदभाव आहे. १२ (२%) लोकांच्या मते त्यांच्या कडे बघण्याचा दृष्टीकोण अत्यंत कमी दर्जाचा आहे. १ (१%) लोकांच्या मते इतर समाज कधी समानता तर कधी भेदभावाने बघतात. तर ६ (१%) कैकाडी समाजातील लोकांनी माहिती दिलेली नाही.

तर विदर्भातील १९८ (८३%) कैकाडी समाजातील लोकांच्या मते त्यांच्याकडे इतर समाजाचा बघण्याचा दृष्टीकोण समानता पुर्वक आहे. ३६ (१५) लोकांच्या मते कैकाडी समाजातील लोकांकडे बघण्याचा दृष्टीकोणात भेदभाव आहे. २ (१%) लोकांकडे इतर

समाजाचा बघण्याच्या दृष्टीकोण कमी दर्जाचा आहे तर २ (१%) लोकांनी याबाबत माहिती दिली नाही .

**वरील आकडेवारीवरून विदर्भापेक्षा उर्वरित महाराष्ट्रात भेदभावाचे प्रमाण जास्त आढळून येत आहे.**

## इतर समाजाच्या समारंभात तुम्ही सहभागी होता का (लग्न भोजन इ.)

**तक्ता क्र. ५१**

| अ.क्र. | इतर समाजाच्या समारंभात तुम्ही सहभागी होता का | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ४६१ | ६६ | २२१ | ९३ | ६८२ |
| २ | नाही | २३७ | ३४ | १६ | ७ | २५३ |
| ३ | माहिती दिली नाही | ४ | ० | १ | ० | ५ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रामध्ये ४६१ (६६%) तर विदर्भातील २२१ (९३%) कैकाडी समाजातील लोक इतर समाजाच्या समारंभात सहभागी होतात. उर्वरित महाराष्ट्रातील २३७ (३४%) तर विदर्भातील १६ (७%) लोक इतर समाजाच्या समारंभात सहभागी होत नाही. उर्वरित महाराष्ट्रातील ४ (०%) लोकांनी तर विदर्भातील एका व्यक्तीने माहिती दिली नाही.

## इतर समाजाचे लोक तुमच्या समारंभात सहभागी होता का?

**तक्ता क्र. ५२**

| अ.क्र. | इतर समाजाचे लोक तुमच्या समारंभात सहभागी होता का? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ४४० | ६३ | २१५ | ९० | ६५५ |
| २ | नाही | २५७ | ३६ | १८ | ८ | २७५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | माहिती दिली नाही | ५ | १ | ५ | २ | १० |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

उपरोक्त तक्त्यावरून असे दिसुन येते की, ४४० (६३%) उर्वरित महाराष्ट्रातील तर २१५ (९०%) विदर्भातील कैकाडी समाजातील लोकांच्या समारंभात इतर समाजातील लोक सहभागी होतात .२५७ (३६%) उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाजातील लोकांच्या समारंभात इतर समाजातील लोक सहभागी होत नाही. तर १८ (८%) विदर्भातील कैकाडी समाजातील लोकांच्या समारंभात इतर समाजातील लोक सहभागी होत नाही. तर ५ (१%) लोकांनी माहिती दिली नाही.

## इतर जातीतील लोकांच्या स्वयंपाक घरात तुम्हास प्रवेश दिला जातो का?

**तक्ता क्र. ५३**

| अ.क्र. | इतर जातीतील लोकांच्या स्वयंपाक घरात तुम्हास प्रवेश दिला जातो का? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ३६४ | ५२ | १७९ | ७५ | ५४३ |
| २ | नाही | ३३८ | ४८ | ५९ | २५ | ३९७ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील ३६४ (५२%) तर विदर्भातील १७९ (७५%) लोकांना इतर जातीतील लोकांच्या स्वयंपाक घरात प्रवेश दिला जातो. उर्वरित महाराष्ट्रातील ३३८ (४८%) लोकांना इतर जातीतील लोकांच्या स्वयंपाक घरात प्रवेश दिला जात नसून विदर्भातील ५९ (२५%) समाजातील लोकांच्या इतर समाजातील लोक सहभागी होत नाहीत.

## कामाच्या ठिकाणी किंवा कोणत्याही कारणाने तुम्ही तुमची जात लपवता का?

**तक्ता क्र. ५४**

| अ.क्र. | कामाच्या ठिकाणी किंवा कोणत्याही कारणाने तुम्ही तुमची जात लपवता का? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ४२ | ६ | ९ | ४ | ५१ |
| २ | नाही | ६०३ | ८६ | २०७ | ८७ | ८१० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | कधीकधी | ५७ | ८ | २२ | ९ | ७९ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

बार्टी या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील ४२ (६%) कैकाडी समाजातील लोक जात लपवतात. ६०३ (८६%) लोक त्यांची कैकाडी जात लपवत नाहीत , तर ५७ (८%) लोक कधी कधी जात लपवतात.

विदर्भातील ९ (४%) लोक त्यांची जात लपवतात तर २०७ (८७%) लोक त्यांची जात लपवत नाहीत. तर २२ (९%) लोक कधी कधी जात लपवतात.

## शिक्षण घेताना शाळा / विद्यालय मध्ये आपणास अस्पृश्यतेबद्दल अनुभव आला का?

**तक्ता क्र.** ५५

| अ.क्र. | शिक्षण घेताना शाळा / विद्यालय मध्ये आपणास अस्पृश्यतेबदद्यदल अनुभव आला का? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | २०२ | २९ | १४ | ६ | २१६ |
| २ | नाही | ४९१ | ७० | २२० | ९२ | ७११ |
| ४ | माहिती दिली नाही | ९ | १ | ४ | २ | १३ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यानुसार असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रातील २०२ (२९%) कैकाडी समाजातील लोकांना शिक्षण घेत असताना अस्पृश्यतेबद्दल अनुभव आला. उर्वरित महाराष्ट्रातील ४९१ (७०%) लोकांना शिक्षण घेत असताना अस्पृश्यतेबद्दल अनुभव आला नाही. उर्वरित महाराष्ट्रातील ९ (१%) लोकांनी याबाबत माहिती दिली नाही

तर विदर्भातील १४ (६%) लोकांना शिक्षण घेत असताना अस्पृश्यतेबद्दल अनुभव आला. विदर्भातील २२० (९२%) लोकांना शिक्षण घेत असताना अस्पृश्यतेबद्दल अनुभव आला नाही. विदर्भातील ४ (२%) लोकांनी माहिती दिली नाही. यावरून असे दिसून येते कि,विदर्भापेक्षा उर्वरित महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना अस्पृश्यतेचा अनुभव येण्याचे प्रमाण जास्त आहे.

**वरील आकडेवारी वरून २९ % उर्वरित महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना अस्पृश्यतेबदद्यदल अनुभव आला असल्याची माहिती दिलेली आहे.यावरून उर्वरित महाराष्ट्रातील अस्पृश्यता दिसून येते.**

## तुमच्या समाजातील महिलांना हळदी कुंकू किंवा तत्सम कार्यक्रमात आमंत्रित केले जाते का ?

**तक्ता क्र.५६**

| अ.क्र. | तुमच्या समाजातील महिलांना हळदी कुंकू किंवा तत्सम कार्यक्रमास आमंत्रित केले जाते का ? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ४३७ | ६२ | २०९ | ८८ | ६४६ |
| २ | नाही | २५५ | ३६ | २६ | ११ | २८१ |
| ३ | लागू नाही | १ | १ | ० | ० | १ |
| ४ | माहिती दिली नाही | ८ | १ | ३ | १ | ११ |
| ५ | कमी प्रमाणात | १ | ० | ० | ० | १ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

सर्वेक्षणावरुन असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रातील ४३७ (६२%) कैकाडी समाजातील महिलांना हळदी कुंकू किंवा तत्सम कार्यक्रमास आमंत्रित केले जाते. २२५ (३६%) कुटुंबातील महिलांना हळदी कुंकू किंवा तत्सम कार्यक्रमास आमंत्रित केले जात नाही. १ कुटुंबाला सदर बाब लागु नाही अशी माहिती दिली तर एका कुटुंबाने महिलांना कमी प्रमाणात आमंत्रित केले जाते अशी माहिती दिली.८ (१%) लोकांनी याबाबत माहिती दिली नाही.

विदर्भातील २०९ (८८%) कैकाडी समाजातील महिलांना हळदी कुंकू किंवा तत्सम कार्यक्रमास आमंत्रित केले जाते. २६ (११%) महिलांना हळदी कुंकू किंवा तत्सम

कार्यक्रमास आमंत्रित केले जात नाही. १ कुटुंबाला सदर बाब लागु नाही अशी माहिती दिलेली आहे. ३ (१%) लोकांनी माहिती दिली नाही.

## कैकाडी समाजाचे असल्यामुळे कोणत्याही कारणास्तव कधी गावातील किंवा इतर समाजातील लोकांनी तुम्हाला मारहाण / शिवीगाळ असे काही केले आहे का ?

**तक्ता क्र.** ५७

| अ.क्र. | गावातील किंवा इतर समाजातील लोकांनी तुम्हाला मारहाण /शिवीगाळ असे काही केले आहे का | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | १८८ | २७ | १८ | ८ | २०६ |
| २ | नाही | ४९९ | ७१ | २१९ | ९२ | ७१८ |
| 3 | माहिती दिली नाही | १५ | २ | १ | ० | १६ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील १८८ (२७%) लोकांना कैकाडी समाजाचे असल्यामुळे काही कारणास्तव गावातील किंवा इतर समाजातील लोकांनी मारहाण / शिवीगाळ केली आहे . ४९९ (७१%) लोकांना कैकाडी समाजाचे असल्यामुळे मारहाण किंवा शिवीगाळ करण्यात आलेली नाही. उर्वरित महाराष्ट्रातील १५ (२%) लोकांनी माहिती दिली नाही.

तर विदर्भातील १८ (८%) लोकांना कैकाडी समाजाचे असल्यामुळे कोणत्याही कारणास्तव गावातील किंवा इतर समाजातील लोकांनी मारहाण / शिवीगाळ केली आहे. विदर्भातील २१९ (९२%) लोकांना कैकाडी समाजाचे असल्यामुळे कोणत्याही कारणास्तव कधी गावातील किंवा इतर समाजातील लोकांनी मारहाण / शिवीगाळ केलेली नाही.

**यावरून असे निदर्शनास येते कि, विदर्भापेक्षा उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाजाला अस्पृश्यतेचा जास्त त्रास झाला आहे.तरीहि उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाज अनुसूचित जातीत समाविष्ट नसून विमुक्त जातीत समाविष्ट आहे.**

## समाजातील सार्वजनिक मंदिरामध्ये आपल्याला प्रवेश आहे का ?

**तक्ता क्र.** ५८

| **अ.क्र.** | **समाजातील सार्वजनिक मंदिरामध्ये आपल्याला प्रवेश आहे का ?** | **उर्वरित महाराष्ट्र** | | **विदर्भ** | | **एकूण संख्या** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **संख्या** | **टक्केवारी** | **संख्या** | **टक्केवारी** | |
| १ | होय | ५३० | ७६ | २३६ | ९९ | ७६६ |
| २ | नाही | १४६ | २१ | १ | १ | १४७ |
| ३ | होय पण कधी कधी रोखले जाते | १० | १ | ० | ० | १० |
| ४ | जात नाहीत | ७ | १ | ० | ० | ७ |
| ५ | माहिती दिली नाही | ९ | १ | १ | ० | १० |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रातील ५३० (७६%) कैकाडी समाजातील लोकांना सार्वजनिक मंदिरामध्ये प्रवेश आहे. १४६ (२१%) कैकाडी समाजातील लोकांना सार्वजनिक मंदिरामध्ये प्रवेश नाही. १% समाजातील लोकांना कधी कधी रोखले जाते. तर ७(१ %) लोकांनी ते मंदिरात जात नाही अशी माहिती दिली .

विदर्भातील २३६ (९९%) समाजातील लोकांना प्रवेश मंदिरामध्ये आहे. १ (१%) लोकांना मंदिरात प्रवेश नसुन समाजातील एका व्यक्तीने माहिती दिली नाही.

**वरील आकडेवारीवरून असे दिसून येते कि,उर्वरित महाराष्ट्रातील १४६ कैकाडी बांधवांना सार्वजनिक मंदिरात प्रवेश नाही.याउलट विदर्भात फक्त एका व्यक्तीने प्रवेश नसल्याचे सांगितले आहे.यावरून उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी बांधवांना अस्पृश्यतेचा अनुभव येत आहे असे आढळून येते.**

## कैकाडी समाजास जातीच्या उतरंडीमध्ये कनिष्ठतेचा दर्जा देऊन अन्याय झाला आहे असे वाटते का?

**तक्ता क्र.**५९

| अ.क्र. | कैकाडी समाजास जातीच्या उतरंडीमध्ये कनिष्ठतेचा दर्जा देऊन अन्याय झाला आहे असे वाटते का ? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ३६८ | ५२ | ५६ | २३ | ४२४ |
| २ | नाही | ३२८ | ४७ | १८० | ७६ | ५०८ |
| ३ | माहिती दिली नाही | ६ | १ | २ | १ | ८ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रातील ३६८ (५२%) कैकाडी समाजास जातीच्या उतरंडीमध्ये कनिष्ठतेचा दर्जा देऊन अन्याय झाला आहे. ३२८ (४७%) कैकाडी समाजास जातीच्या उतरंडीमध्ये कनिष्ठतेचा दर्जा देऊन अन्याय झालेला नाही. ६ (१%) लोकांनी माहिती दिली नाही.

तर विदर्भातील ५६ (२३%) कैकाडी समाजास जातीच्या उतरंडीमध्ये कनिष्ठतेचा दर्जा देऊन अन्याय झाला आहे. तर १८० (७६%) कैकाडी समाजास जातीच्या उतरंडीमध्ये कनिष्ठतेचा दर्जा देऊन अन्याय झाला नाही. दिली नसून विदर्भात २ (१%) लोकांनी माहिती दिली नाही.

**विदर्भातील कैकाडी लोकांपेक्षा उर्वरित महाराष्ट्रातील ५२% कैकाडी लोकांना जातीच्या उतरंडीमध्ये कनिष्ठतेचा दर्जा देऊन अन्याय झाला आहे.यामध्ये त्यांना अस्पृश्यता, जातीवाचक शिवीगाळ, मारहाण, पाणी न भरण्यास मज्जाव करणे इत्यादी चा समावेश आहे.**

## तुम्हाला गावामध्ये प्रवेश आहे का? (जर कुटुंब गावाच्या बाहेर वास्तव्य करत असले तर)

**तक्ता क्र.** ६०

| अ.क्र. | तुम्हाला गावामध्ये प्रवेश आहे का ? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ४८५ | ६९ | १७९ | ७५ | ६६४ |
| २ | नाही | ५६ | ८ | १ | १ | ५७ |
| ५ | माहिती दिली नाही | १६१ | २३ | ५८ | २४ | २१९ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

बार्टी या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात जर कुटुंब गावाच्या बाहेर वास्तव्य करत असले तर त्यांना गावात प्रवेश आहे का याबाबत प्रश्न विचारण्यात आला त्यामध्ये वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते कि, उर्वरित महाराष्ट्रातील ४८५ (६९%) कैकाडी समाजातील लोकांना तुम्हाला गावामध्ये प्रवेश आहे. तर उर्वरित महाराष्ट्रातील ५६ (८%) कैकाडी लोकांना गावामध्ये प्रवेश नाही. उर्वरित महाराष्ट्रातील १६१ (२३%) लोकांनी माहिती दिली नाही

विदर्भातील १७९ (७५%) कैकाडी समाजातील लोकांना गावामध्ये प्रवेश आहे. विदर्भामध्ये १ (१%) लोकांना गावामध्ये प्रवेश नाही. तर उर्वरित विदर्भातील ५८ (२४%) लोकांनी माहिती दिली नाही.

**यावरून कैकाडी बांधवांना गावात प्रवेश असल्याची आकडेवारी विदर्भात उर्वरित महाराष्ट्रापेक्षा जास्त असल्याची आढळून येत आहे.**

# कैकाडी समाजातील महिलांची स्थिती

**आपल्या कुटूंबात कमवित्या महिला आहेत का ?**

**तक्ता क्र. ६१**

| अ.क्र. | आपल्या कुटूंबात कमवित्या महिला आहेत का ? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ५०८ | ७२ | १३३ | ५६ | ६४१ |
| २ | नाही | १९४ | २८ | १०५ | ४४ | २९९ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |


वरील तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रामध्ये कमवित्या महिलांची संख्या ५०८ (७२%) आहे तर विदर्भामध्ये कमवित्या महिलांची संख्या १३३ (५६%) आहे. उर्वरित महाराष्ट्रात १९४ (२८%) महिला तर विदर्भामध्ये १०५ (४४%) महिला कमवित्या नाहीत.

## कमविण्याचे कारण

**तक्ता क्र. ६२**

| अ.क्र. | कमविण्याचे कारण | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | मुख्य कमावती स्त्री म्हणून | ५४ | १० | २३ | १७ | ७७ |
| २ | घरास आर्थिक मदत म्हणून | ४१५ | ८२ | १०५ | ७९ | ५२० |
| | वरील दोन्ही | २३ | ५ | १ | १ | २४ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | शिक्षणासाठी | २ | ० | ० | ० | २ |
| ४ | लग्नासाठी | १ | ० | ० | ० | १ |
| ५ | इतर | ४ | १ | १ | १ | ५ |
| ७ | माहिती दिली नाही | ९ | २ | ३ | २ | १२ |
| **एकुण** | | **५०८** | **१००** | **१३३** | **१००** | **६४१** |




उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रामध्ये ५४ (१०%) महिला मुख्य कमवती स्त्री म्हणुन काम करतात. ४१५ (८५%) महिला घरास आर्थिक मदत म्हणुन काम करतात तर २३ (५%) महिला मुख्य कमावती स्त्री म्हणुन व घरास आर्थिक मदत म्हणुन दोन्ही कारणास्तव काम करतात. तसेच शिक्षणासाठी व लग्नासाठी अनुक्रमे २,१ (०%) महिला कमावतात. ४ (१%) महिला इतर कारणासाठी कमावितात तर ९ (२%) महिलांनी माहिती दिली नाही.

विदर्भामध्ये २३ (१७%) महिला मुख्य कमवती स्त्री म्हणुन काम करतात. १०५ (७९%) महिला घरास आर्थिक मदत म्हणुन काम करतात. १ (१%) महिला मुख्य कमावती स्त्री , घरास आर्थिक मदत व इतर कारणासाठी काम करतात. शिक्षणासाठी व लग्नासाठी कमविणाऱ्या महिलांची संख्या नगण्य स्वरुपात असून ३ (२%) महिलांनी माहिती दिली नाही.

**आपल्या घरातील महिला अर्थाजनाकरिता अंग मेहनती / श्रमाचे काम करतात का?**

**तक्ता क्र. ६३**

| अ.क्र. | आपल्या घरातील महिला अर्थाजनाकरिता अंग मेहनती / श्रमाचे काम करतात का ? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ४४७ | ६४ | ७८ | ३३ | ५२५ |
| २ | नाही | २५५ | ३६ | १६० | ६७ | ४१५ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील ४४७ (६४%) महिला तर विदर्भातील ७८ (३३%) महिला अर्थाजनाकरिता अंग मेहनत किंवा श्रमाचे काम करतात . उर्वरित महाराष्ट्रातील २५५ (३६%) महिला व विदर्भातील १६० (६७%) महिला अर्थाजनाकरिता अंगमेहनत / श्रमाचे काम करत नाहीत.

**घराची मालकी अथवा शेत जमिन यावर महिलांचे नाव दिले जाते का?**

**तक्ता क्र. ६४**

| अ.क्र. | घराची मालकी अथवा शेत जमीन यावर महिलांचे नाव दिले जाते का ? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | २५५ | ३६ | १२८ | ५४ | ३८३ |
| २ | नाही | ४०४ | ५८ | ७२ | ३० | ४७६ |
| ३ | लागू नाही | ५ | १ | १ | ० | ६ |
| ४ | माहिती दिली नाही | ३८ | ५ | ३७ | १६ | ७५ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |


उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रातील २२५ (३६%) कैकाडी समाजाच्या कुटूंबात घराची मालकी अथवा शेत जमीन यावर महिलांचे नाव दिले

जाते .तर विदर्भातील त्याचे प्रमाण १२८ (५४%) एवढे आहे . उर्वरित महाराष्ट्रातील ४०४ (५८%) तर विदर्भातील ७२ (३०%) कुटूंबात घराची मालकी अथवा शेत जमीन यावर महिलांचे नाव दिले जात नाही. उर्वरित महाराष्ट्रामध्ये ५ (१%) कुटूंबातील महिलांना तर विदर्भातील १ (०%) कुटूंबातील महिलांना सदर बाब लागु नसल्याचे उत्तर दिले आहे. उर्वरित महाराष्ट्रातील ३८ (५%) कुटूंबातील महिलांनी तर विदर्भातील ३७ (१६%) महिलांनी याबाबत माहिती दिलेली नाही.

## तुमच्या कुटुंबातील महिलेचे पहिल्या प्रसूतीच्या वेळी वय किती होते

### तक्ता क्र. ६५

| अ.क्र. | तुमच्या पहिल्या प्रसूतीच्या वेळी वय किती होते | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | १८ पेक्षा कमी | २२६ | ३२ | ५१ | २२ | २७७ |
| २ | १८ पेक्षा जास्त | ३७९ | ५४ | १६४ | ६९ | ५४३ |
| ३ | माहित नाही | ४ | १ | ० | ० | ४ |
| ४ | मुल नाही | ७ | १ | ३ | १ | १० |
| ५ | लागू नाही | ६ | १ | ० | ० | ६ |
| ६ | माहिती दिली नाही | ८० | ११ | २० | ८ | १०० |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |




बार्टीने केलेल्या सर्वेक्षणात असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रातील २२६ (३२%) कैकाडी समाजातील कुटूंबातील महिलांचे पहिल्या प्रसूतीच्या वेळी वय १८ वर्षापेक्षा कमी होते .तर ३७९ (५४%) महिलांचे पहिल्या प्रसूतीच्या वेळी वय १८ वर्षापेक्षा

जास्त होते. १% महिलांना वय माहित नाही, १% महिलांना मुल नाही व सदर बाब लागु नसून ८० (११%) महिलांनी माहिती दिली नाही.

विदर्भातील ५१ (२२%) कैकाडी समाजातील कुटूंबातील महिलांचे पहिल्या प्रसूतीच्या वेळी वय १८ वर्षापेक्षा कमी होते. तर १६४ (६९%) महिलांचे पहिल्या प्रसूतीच्या वेळी वय १८ वर्षापेक्षा जास्त होते. ३ (१%) महिलांना मुल नाही. २० (८%) महिलांनी माहिती दिलेली नाही.

## मागच्या वेळेस बाळंतपण कोठे झाले.

**तक्ता क्र. ६६**

| अ.क्र. | मागच्या वेळेस बाळंतपण कोठे झाले ? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | सरकारी दवाखाना | ३५१ | ५० | १०७ | ४५ | ४५८ |
| २ | खाजगी दवाखाना | ६३ | ९ | २२ | ९ | ८५ |
| ३ | घरी | २६० | ३७ | ९२ | ३९ | ३५२ |
| ४ | सरकारी +खाजगी दवाखाना | ३ | ० | ० | ० | ३ |
| ५ | खाजगी दवाखाना+घरी | १ | ० | १ | ० | २ |
| ६ | लागू नाही | २० | ३ | १३ | ६ | ३३ |
| ७ | माहिती दिली नाही | ४ | १ | ३ | १ | ७ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील ३५१ (५०%) कैकाडी समाजातील महिलांचे मागच्या वेळेस बाळंतपण सरकारी दवाखान्यात झाले. ६३ (९%) महिलांचे बाळंतपण हे खाजगी दवाखान्यात झाले आहे. २६० (३७%) महिलांचे बाळंतपण घरीच झालेले आहे. ३,१ (०%) महिलांचे बाळंतपण अनुक्रमे सरकारी + खाजगी दवाखाना आणि खाजगी दवाखाना + घरी झालेले आहे. २० (३%) महिलांना हे लागू नाही तर ४ (१%) महिलांनी माहिती दिलेले नाही.

तर विदर्भातील १०७ (४५%) कैकाडी समाजातील महिलांचे मागच्या वेळेसचे बाळंतपण सरकारी दवाखान्यात झालेले आहे तर २२ (९%) महिलांचे बाळंतपण खाजगी दवाखान्यात झाले आहे. ९२ (३९%) महिलांचे बाळंतपण घरी झालेले आहे. सरकारी + खाजगी दवाखाना + खाजगी दवाखाना + घरी बाळंतपण झालेल्या महिलांचे प्रमाण नगन्य स्वरुपाचे आहे. १३ (६%) महिलांना हे लागू होत नसून ३ (१%) महिलांनी याबाबत माहिती दिलेली नाही

## मागील ५ वर्षात कुटूंबातील स्त्रीचा प्रसूती दरम्यान मृत्यु झाला आहे का ?

**तक्ता क्र. ६७**

| अ.क्र. | मागील 5 वर्षात कुटुंबातील स्त्रीचा प्रसूती दरम्यान मृत्यू झाला आहे का? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | २० | ३ | ३ | १ | २३ |
| २ | नाही | ६५७ | ९४ | २३२ | ९८ | ८८९ |
| ३ | माहिती दिली नाही | २५ | ३ | ३ | १ | २८ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसून येते की, २० (३%) उर्वरित महाराष्ट्रातील तर ३ (१%) विदर्भातील कैकाडी समाजातील महिलांचा प्रसूती दरम्यान मृत्यु झाला आहे. ६५७ (९४%) महाराष्ट्रातील कैकाडी समाजातील महिलांचा प्रसूती दरम्यान मृत्यु झालेला नाही तर त्याचे प्रमाण विदर्भातील २३२ (९८%) एवढे आहे. २५ (३%) उर्वरित महाराष्ट्रातील तर ३ (१%) विदर्भातील महिलांनी माहिती दिलेली नाही .

## घरातील विविध निर्णय प्रकियेत महिलांच्या विचारांना प्राधान्य / मत घेतले जाते का ?

**तक्ता क्र.** ६८


| अ.क्र. | घरातील विविध निर्णय प्रक्रियेत महिलांच्या विचारांना प्राधान्य/मत घेतले जाते का | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ५१७ | ७४ | २०० | ८४ | ७१७ |
| २ | नाही | १५७ | २२ | ३२ | १३ | १८९ |
| ३ | माहिती दिली नाही | २८ | ४ | ६ | ३ | ३४ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील ५१७ (७४%) विदर्भातील २०० (८४%) कैकाडी समाजातील कुटूंबात घरातील निर्णय प्रक्रियेत महिलांच्या विचारांना प्राधान्य/मत घेतले जाते. उर्वरित महाराष्ट्रातील १५७ (२२%) तर विदर्भातील ३२ (१३%) कैकाडी समाजातील कुटूंबात घरातील निर्णय प्रक्रियेत महिलांच्या विचारांना प्राधान्य/मत घेतले जात नाही .उर्वरित महाराष्ट्रातील २८ (४%) तर विदर्भातील ६ (३%)महिलांनी माहिती दिलेली नाही.

## कुटूंबामध्ये तुम्हाला कशाप्रकारे वागणूक दिली जाते

**तक्ता क्र. ६९**

| अ.क्र. | कुटुंबामध्ये तुम्हाला कशाप्रकारे वागणूक दिली जाते | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | समान | ३३९ | ५७ | १९९ | ८४ | ५९८ |
| २ | मिश्र | १६३ | २३ | २० | ८ | १८३ |
| ३ | दुय्यम | १३३ | १९ | १६ | ७ | १४९ |
| ४ | माहिती दिली नाही | ७ | १ | ३ | १ | १० |
| एकूण | | ७०२ | १०० | २३८ | १०० | ९४० |




उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसून येते की, उर्वरित महाराष्ट्रातील ३३९ (५७%) कैकाडी समाजातील महिलांना कुटूंबामध्ये समान वागणूक देतात .१६३ (२३%) महिलांना कुटूंबामध्ये मिश्र वागणुक मिळते. १३३ (१९%) महिलांना दुय्यम प्रकारे वागणुक मिळते.

तर विदर्भामध्ये १९९ (८४%) महिलांना कुटूंबामध्ये समान वागणुक देतात. २० (८%) महिलांना कुटूंबामध्ये मिश्र वागणुक मिळते. १६ (७%) महिलांना दुय्यम प्रकारे वागणुक मिळते.

उर्वरित महाराष्ट्रातील ७ (१%) व विदर्भातील ३ (१%) महिलांनी माहिती दिली नाही.

# कैकाडी समाजातील अंधश्रद्धा

### कुंडली पाहता का?

**तक्ता क्र.** ७०

| अ.क्र. | कुंडली पाहता का | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ४६० | ६६ | १९९ | ८४ | ६५९ |
| २ | नाही | २४२ | ३४ | ३९ | १६ | २८१ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

कैकाडी समाजाच्या करण्यात आलेले सर्वेक्षावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील ४६० (६६%) व विदर्भातील १९९ (८४%) कैकाडी समाजातील कुटूंबामध्ये कुंडली पाहतात. तर उर्वरित महाराष्ट्रातील २४२ (३४%) व विदर्भातील ३९ (१६%) कैकाडी समाजातील कुटूंबामध्ये कुंडली पाहत नाही.

## कुठल्या महात्त्वाच्या कामासाठी जाताना मुहूर्त पाहिला जातो का ?

**तक्ता क्र.** ७१

| अ.क्र. | कुठल्या महत्वाच्या कामासाठी जाताना मुहूर्त पाहिला जातो का | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ३४५ | ४९ | ८१ | ३४ | ४२६ |
| २ | नाही | ३४५ | ४९ | १५० | ६३ | ४९५ |
| ३ | माहिती दिली नाही | १२ | २ | ७ | ३ | १९ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रातील ३४५ (४९%) कैकाडी समाजातील कुटूंबामध्ये महत्वाच्या कामासाठी जाताना मुहूर्त पाहिला जातो .तर ३४५ (४९%) कैकाडी कुटुंबात महत्वाच्या कामासाठी जाताना मुहूर्त पाहिला जात नाही. १२ (२%) कुटूंबामध्ये महत्वाच्या कामासाठी जाताना मुहूर्त पाहिला जातो कि नाही याबाबत माहिती दिली नाही.

विदर्भातील ८१ (३४%) कैकाडी समाजातील कुटूंबामध्ये महत्वाच्या कामासाठी जाताना मुहूर्त पाहिला जातो. १५० (६३%) कुटूंबामध्ये महत्त्वाच्या कामासाठी जाताना मुहूर्त पाहिला जात नाही. तर ७ (३%) समाजातील लोकांनी माहिती दिली नाही.

## देव-देवतेला पशु बळी देतात का ?

**तक्ता क्र.७२**

| अ.क्र. | देव-देवतेला पशु बळी देतात का ? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ६५० | ९३ | २१७ | ९१ | ८६७ |
| २ | नाही | ५२ | ७ | १६ | ७ | ६८ |
| ३ | माहिती दिली नाही | ० | ० | ५ | २ | ५ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसुन येते की, ६५० (९३%) उर्वरित महाराष्ट्रातील तर १६ (७%) विदर्भातील कैकाडी समाजात देव-देवतेला पशु बळी देतात. उर्वरित महाराष्ट्रातील ५२ (७%) तर विदर्भातील १६ (७%) लोक देव-देवतेला बळी देत नाही. विदर्भातील ५ (२%) लोकांनी माहिती दिली नाही.

## मंदिरात जाता का ?

**तक्ता क्र. ७३**

| अ.क्र. | मंदिरात जाता का ? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ६१४ | ८७ | २३० | ९६ | ८४४ |
| २ | नाही | ८५ | १२ | ४ | २ | ८९ |
| ३ | माहिती दिली नाही | ३ | १ | ४ | २ | ७ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, कैकाडी समाजातील उर्वरित महाराष्ट्रातील ६१४ (८७%) लोक मंदिरात जातात. ८५ (१२%) कैकाडी बांधव मंदिरात जात नाहीत . ३ (१%) लोकांनी माहिती दिलेली नाही.

तर विदर्भातील २३० (९७%) लोक मंदिरात जातात. ४ (२%) लोक मंदिरात जात नाही. तर विदर्भातील ४ (२%) लोकांनी माहिती दिलेले नाही.

## आपणास पुनर्जन्म आणि शकुन अपशकुन यावर विश्वास आहे का ?

**तक्ता क्र.७४**

| अ.क्र. | आपणास पुनर्जन्म आणि शकुनअपशकुन यावर विश्वास आहे का | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ३७५ | ५३ | १०० | ४२ | ४७५ |
| २ | नाही | ३२० | ४६ | १३१ | ५५ | ४५१ |
| ३ | माहिती दिली नाही | ७ | १ | ७ | ३ | १४ |
| **एकुण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

कैकाडी समाजाचे सर्वेक्षणावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रातील ३७५ (५३%) व विदर्भातील १०० (४२%) कैकाडी समाजातील लोकांचा पुनर्जन्म आणि शकुन अपशकून यावर विश्वास आहे. तर उर्वरित महाराष्ट्रातील ३२० (४६%) तर विदर्भातील १३१ (५५%) कैकाडी समाजातील लोकांचा पुनर्जन्म आणि शकुन अपशकून यावर विश्वास नाही. उर्वरित महाराष्ट्रातील ७ (१%) तर विदर्भातील ७ (३%) लोकांनी माहिती दिलेली नाही.

## मासिक पाळीच्या वेळी घरातील महिलेस बाजूला बसविले जाते का ?

**तक्ता क्र.७५**

| अ.क्र | मासिक पाळीच्या वेळी घरातील महिलेस बाजूला बसविले जाते का ? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | ४९८ | ७१ | १२७ | ५३ | ६२५ |
| २ | नाही | १९२ | २७ | ९८ | ४१ | २९० |
| ३ | माहिती दिली नाही | १२ | २ | १३ | ६ | २५ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील  तक्त्यावरुन असे दिसते की,  उर्वरित महाराष्ट्रातील ४९८ (७१%) कैकाडी समाजातील कुटूंबामध्ये महिलांना मासिक पाळीच्या दिवसांमध्ये बाजुला बसविले जाते. तर १९२ (२७%) कैकाडी समाजातील कुटूंबामध्ये महिलांना मासिक पाळीच्या दिवसांमध्ये बाजुला बसविले जात नाही. १२ (२%) लोकांनी माहिती दिलेली नाही.

विदर्भामध्ये १२७ (५३%) कैकाडी समाजातील कुटूंबामध्ये महिलांना मासिक पाळीच्या दिवसांमध्ये बाजुला बसविले जाते तर ९८ (५१%) महिलांना मासिक पाळीच्या दिवसांमध्ये बाजूला बसविले जात नाही. १३ (५%) लोकांनी माहिती दिलेली नाही.

## आपल्या घरात नवस फेडण्यासाठी मुरळी / देवदासी सोडणे अशी घटना घडली आहे का ?

**तक्ता क्र. ७६**

| अ.क्र | आपल्या घरात नवस फेडण्यासाठी मुरळी / देवदासी सोडणे अशा सारखी काही घटना घडली आहे का? | उर्वरित महाराष्ट्र | | विदर्भ | | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | |
| १ | होय | १० | १ | २ | १ | १२ |
| २ | नाही | ६८७ | ९८ | २३२ | ९७ | ९१९ |
| ३ | सांगितलं नाही | ५ | १ | ४ | २ | ९ |
| **एकूण** | | **७०२** | **१००** | **२३८** | **१००** | **९४०** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, उर्वरित महाराष्ट्रामध्ये १० (१%) कैकाडी समाजातील कुटूंबामध्ये नवस फेडण्यासाठी मुरळी/देवदासी सोडणे अशा घटना घडल्या आहेत . ६८७ (९८%) कुटूंबामध्ये  मुरळी/देवदासी सोडणे अशा घटना घडल्या नाहीत. तर उर्वरित  ५ (१%) कैकाडी लोकांनी याबाबत माहिती दिली नाही.

तर विदर्भामध्ये २ (१%) कुटूंबामध्ये नवस फेडण्यासाठी मुरळी/देवदासी सोडणे अशा घटना घडल्या आहेत. २३२ (९७%) कुटूंबामध्ये  मुरळी/देवदासी सोडणे अशा घटना घडल्या नाहीत.  तर विदर्भातील ४ (२%) लोकांनी माहिती दिलेली नाही.

# प्रकरण सहावे

# अहवालातील ठळक बाबी

# अहवालातील ठळक बाबी

## ❖ कैकाडी समाजाची कौटुंबिक माहिती

- उर्वरित महाराष्ट्रातील ५५१ (७८%) तर विदर्भातील १९६ (८२%) कुटूंबप्रमुख पुरुष आहेत .उर्वरित महाराष्ट्रातील १५१ (२२%) तर विदर्भातील ४२ (१८%) कुटूंबप्रमुख स्त्रीया आहेत.

- बार्टीने केलेल्या कैकाडी समाजाच्या सर्वेक्षणात असे दिसुन येते की, उर्वरित महाराष्ट्रातील १८६ (२७%) तर विदर्भातील ५१ (२१%) कुटूंबप्रमुखाचे विवाहाच्या वेळेचे वय ८-१७ वर्ष होते. यावरून कैकाडी समाजात बालविवाहाचे प्रमाण आढळून येते.

- उर्वरित महाराष्ट्रातील ३०० (४३%) तर विदर्भातील १०४ (४४%) कैकाडी समाजातील कुटूंबप्रमुखाचे शिक्षण झाले नसुन ते अशिक्षित आहेत.तर पदवीधर व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण अत्तल्प आहे. **कैकाडी समाजात अशिक्षित लोकांचे प्रमाण जास्त आहे.**

- उर्वरित महाराष्ट्रात शिक्षण अर्धवट सोडण्याचे प्रमाण ५२% आहे. पैकी उर्वरित महाराष्ट्रातील २४५ (७६%) लोकांनी तर विदर्भातील ४९ (७२%) लोकांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने त्यांनी शिक्षण अर्धवट सोडले आहे.

- कैकाडी समाजात उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी ,बांबूकाम ,वराहपालन केले जाते.तसेच लघु व्यवसाय करणाऱ्याचे प्रमाण जास्त आढळून आले.

- कैकाडी कुटुंबाचे मासिक उत्पन्न उर्वरित महाराष्ट्रात ३९३(५६%) तर विदर्भात १०४ (४४%) कैकाडी कुटुंबाचे १००१ते ५००० च्या दरम्यान आहे. यावरून त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याचे आढळून येते.

## ❖ कुटुंबाची इतर माहिती व सोई सुविधा

- उर्वरित महाराष्ट्रातील ७०२ पैकी ३६१ (५१%) तर विदर्भातील एकूण २३८ कुटुंबापैकी १६७ (७०%) कुटुंबे हि एकत्रित कुटुंब पद्धती मध्ये राहतात, ३२७ (४७%) तर विदर्भातील ६५ (२७% कुटुंब हि विभक्त कुटुंब पद्धती मध्ये राहतात.

- उर्वरित महाराष्ट्रातील ३६३ (५२%) तर विदर्भातील ११५ (४८%) लोक  स्वतः च्या जागेत राहतात. तर ९८ (१४% ) तर विदर्भातील २५ (११%) लोक  भाड्याच्या घरात  राहतात.  उर्वरित महारष्ट्रातील ९७ (१४%) तर विदर्भात ७९ (३३%) लोक अतिक्रमित जागेत राहतात.

- उर्वरित महाराष्ट्रात वास्तव्य करणाऱ्या  कैकाडी समाजातील  ४६२ (६६%) कुटुंबाच्या तर विदर्भातील १५५ (६५%) कुटुंबाची  घराची बांधणी  कच्च्या प्रकारची आहे. २३३ (३३%) कुटुंबे पक्क्या घरात राहत आहेत. तर उर्वरित ७ (१%) लोक इतर प्रकारच्या घरात म्हणजे  तंबूत राहतात.

- उर्वरित महाराष्ट्रातील ७०२ कुटुंबापैकी ४४ (६%)  तर विदर्भातील २०(८%) लोकांच्या कडे स्वतः च्या मालकीची शेतजमीन आहे. तर उर्वरित महाराष्ट्रातील  ६५० (९३%) तर विदर्भात २१८ (९२%)  लोकांच्या कडे स्वत:ची शेतजमीन नाही.

- उर्वरित महाराष्ट्रातील ७०२ कैकाडी लोकांपैकी ३५८ (५१%) लोक एका खोलीत राहतात.  २५० (३६%) लोक दोन खोल्या असलेल्या घरात राहत आहेत.  तर विदर्भातील  २३८ कैकाडी कुटुंबापैकी ४७ (२०%) लोक एका खोलीत तर  १२५ (५३%) लोक दोन खोल्या असलेल्या घरात राहत आहेत.

## ❖ <u>कैकाडी समाजाची वैवाहिक माहिती</u>

- उर्वरित महाराष्ट्रातील ६२१ (८८%) तर विदर्भातील १९३ (८१%) लोकांनी कैकाडी समाज एकच आहे अशी माहिती दिली . उर्वरित महाराष्ट्रात ५६ (५%) तर विदर्भात २६ (११%)  लोकांनी विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाज एक नाही अशी माहिती दिली.

- कैकाडी जातीच्या सर्वेक्षणात असे आढळून आले कि उर्वरित महाराष्ट्रातील ४४९ (६४%) तर विदर्भात १८६ (७८%) कुटूंबामध्ये पोटजातीमध्ये  विवाह होतो . उर्वरित महाराष्ट्रातील २५०(३६%) कुटूंबामध्ये पोटजातीमध्ये  विवाह केला जात नसून विदर्भातील ५१ (२२%) लोकांकडे कुटूंबातील पोटजातीमध्ये  विवाह केला जात  नाही.

- उर्वरित महाराष्ट्रातील ५० (७%) तर विदर्भामध्ये १२ (५%) कैकाडी समाजाच्या कुटूंबामध्ये आंतरजातीय / आंतरधर्मीय विवाह केला आहे . उर्वरित महाराष्ट्रामध्ये ६५१ (९३ %) कुटूंबामध्ये आंतरजातीय / आंतरधर्मीय विवाह केला नसून विदर्भामध्ये याचे प्रमाण २२५ (९५%) एवढे आहे.
- ३६ (७२%) उर्वरित महाराष्ट्रातील कुटूंबातील लोकांनी आंतरधर्मिय विवाह केला असुन १४ (२८%) कुटूंबातील लोकांनी आंतरजातीय विवाह केला आहे . तर  विदर्भामध्ये अंतरधर्मिय विवाह करण्याचे प्रमाण नगण्य स्वरुपात आहे.  ६ (५०%) कुटूंबातील लोकांनी आंतरजातीय विवाह केला आहे.  ६ (५०%) लोकांनी माहिती दिली नाही.

❖ उर्वरित महाराष्ट्रामध्ये ३७ (७४%) तर विदर्भामध्ये ७ (५८%) कैकाडी समाजातील लोकांना आंतरधर्मीय / आंतरजातीय विवाह केल्यामुळे समाजातील इतर लोकांकडुन मिळणारी वागणुक ही समान पध्दतीची आहे अशी माहिती दिली . उर्वरित महारष्ट्रातील ९ (१८%) लोकांना आंतरधर्मीय / आंतरजातीय विवाह केल्यामुळे समाजातील इतर लोकांकडुन भेदभावाची वागणुक मिळत आहे.

➢ उर्वरित महाराष्ट्रामध्ये ३०८ (४४%) तर १३६ (५७%) विदर्भामध्ये कैकाडी समाजात लग्नाच्यासाठी हुंडा देण्याची/ घेण्याची पध्दत आहे. ३९४ (५६%) उर्वरित महाराष्ट्रातील तर १०२ (४३%) विदर्भातील कैकाडी समाजामध्ये हुंडा दण्याची/घेण्याची पध्दत नाही.

➢ उर्वरित महाराष्ट्रामध्ये २४६ (८०%) लग्न पद्धतीत मुलीकडुन मुलाला हुंडा दिला जातो तर विदर्भामध्ये याचे प्रमाण १२८ (९४%) आहे. मुलाकडुन मुलीला हुंडा देण्याचे प्रमाण उर्वरित महाराष्ट्रामध्ये ५५ (१८%) असुन विदर्भामध्ये २ (१%) लोक मुलाला हुंडा देतात. उर्वरित महाराष्ट्रामध्ये फक्त एका कुटुंबात दोन्ही कुटुंबांना हुंडा देण्याची पद्धत आहे. तर विदर्भामध्ये ५ (४%) कुटुंबात दोन्हीकडील कुटुंबांना हुंडा देण्याची पध्दत आहे.

➢ उर्वरित महाराष्ट्रातील ८५ ( १२%) कैकाडी समाजातील कुटुंबात महिलेचा पुर्नविवाह झाला आहे. तर विदर्भातील ७ (३%) महिलांचा पुर्नविवाह केला आहे .

## ❖ **<u>कैकाडी कुटुंबांकडे असलेले शासकीय दाखले</u>**

➢ उर्वरित महाराष्ट्रातील ६१९ (८८%) कैकाडी समाजातील लोकांकडे तर विदर्भातील २२० (९२%) लोकांकडे रेशन कार्ड आहे. तर उर्वरित महाराष्ट्रातील ८३ (१२%) लोकांकडे तर विदर्भातील १८ (८%) लोकांकडे रेशन कार्ड नाही.

➢ उर्वरित महाराष्ट्रातील २१४ (३५%) विदर्भातील ११८ (५४%) कैकाडी समाजातील लोकांकडे पिवळया रंगाचे रेशन कार्ड आहे. उर्वरित महाराष्ट्रातील ३७८ (६१%) तर विदर्भात ९१ (४१%) लोकांकडे केशरी रंगाचे रेशन कार्ड आहे.

➢ उर्वरित महाराष्ट्रातील ३८८ (५५%) कैकाडी समाजातील तर विदर्भातील १४७ (६२%) लोकांकडे जातीचा दाखला आहे. उर्वरित महाराष्ट्रातील २४६ (३५%) व विदर्भातील ८७ (३७%) लोकांकडे जातीचा दाखला नाही.

➢ उर्वरित महाराष्ट्रातील ६७ (१०%) विदर्भातील ४५ (१९%) कैकाडी समाजातील लोकांकडे जातपडताळणी प्रमाणपत्र आहे. उर्वरित महाराष्ट्रातील ४७१ (६७%) तर विदर्भातील १८७ (७९%) कैकाडी लोकांकडे जातपडताळणी प्रमाणपत्र नाही.

- उर्वरित महाराष्ट्रातील ११२ (१६%) कैकाडी समाजातील कुटूंबातील लोकांच्या जातीची चुकीची नोंद झालेली आहे. ४८० (६८%) लोकांची जातीची चुकीची नोंद झालेली नाही. तर ३ लोकांनी जातीच्या चुकीच्या नोदिंबाबत माहिती नाही असे सांगितले .तर विदर्भातील ३ (१%) कैकाडी समाजातील कुटूंबातील लोकांच्या जातीची चुकीची नोंद झाली आहे. विदर्भातील २२८ (९६%) कैकाडी समाजातील लोकांची जातीची चुकीची नोंद झाली नाही.

- ५४ (८%) उर्वरित महाराष्ट्रातील तर विदर्भातील २४ (१०%) कैकाडी लोकांनी शासकीय योजनांचा लाभ घेतला आहे . ६४८ (९२%) उर्वरित महाराष्ट्रातील व विदर्भातील २१४ (९०%) लोकांनी कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेतला नाही.

### ❖ <u>जातीविषयक माहिती</u>-

- उर्वरित महाराष्ट्रातील ३०८ (४४%) लोकांच्या मते इतर समाजाचे कैकाडी समाजातील लोकांकडे बघण्याचा दृष्टीकोणात भेदभाव आहे. १२ (२%) लोकांच्या मते त्यांच्या कडे बघण्याचा दृष्टीकोण अत्यंत कमी दर्जाचा आहे. तर विदर्भातील ३६ (१५) लोकांच्या मते कैकाडी समाजातील लोकांकडे बघण्याचा दृष्टीकोणात भेदभाव आहे. २ (१%) लोकांकडे इतर समाजाचा बघण्याच्या दृष्टीकोण कमी दर्जाचा आहे. **वरील आकडेवारीवरून विदर्भापेक्षा उर्वरित महाराष्ट्रात भेदभावाचे प्रमाण जास्त आढळून येत आहे.**

- उर्वरित महाराष्ट्रातील २३७ (३४%) तर विदर्भातील १६ (७%) लोक इतर समाजाच्या समारंभात सहभागी होत नाही.

- ४४० (६३%) उर्वरित महाराष्ट्रातील तर २१५ (९०%) विदर्भातील कैकाडी समाजातील लोकांच्या समारंभात इतर समाजातील लोक सहभागी होतात .२५७ (३६%) उर्वरित महाराष्ट्रातील तर विदर्भातील १८ (८%) कैकाडी समाजातील लोकांच्या समारंभात इतर समाजातील लोक सहभागी होत नाही.

- उर्वरित महाराष्ट्रातील ३६४ (५२%) तर विदर्भातील १७९ (७५%) लोकांना इतर जातीतील लोकांच्या स्वयंपाक घरात प्रवेश दिला जातो. उर्वरित महाराष्ट्रातील ३३८ (४८%) लोकांना इतर जातीतील लोकांच्या स्वयंपाक घरात प्रवेश दिला जात नसून विदर्भातील ५९ (२५%) समाजातील लोकांच्या इतर समाजातील लोक सहभागी होत नाहीत.

- उर्वरित महाराष्ट्रातील ४२ (६%) कैकाडी समाजातील लोक जात लपवतात. ६०३ (८६%) लोक त्यांची कैकाडी जात लपवत नाहीत ,तर ५७ (८%) लोक कधी कधी जात लपवतात. विदर्भातील ९ (४%) लोक त्यांची जात लपवतात तर २०७ (८७%) लोक त्यांची जात लपवत नाहीत. तर २२ (९%) लोक कधी कधी जात लपवतात.

- उर्वरित महाराष्ट्रातील २०२ (२९%) कैकाडी समाजातील लोकांना शिक्षण घेत असताना अस्पृश्यतेबद्दल अनुभव आला.तर विदर्भातील १४ (६%) लोकांना शिक्षण घेत असताना अस्पृश्यतेबद्दल अनुभव आला.
  **वरील आकडेवारी वरून २९ % उर्वरित महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना अस्पृश्यतेबदद्यदल अनुभव आला असल्याची माहिती दिलेली आहे.यावरून उर्वरित महाराष्ट्रातील अस्पृश्यता दिसून येते.**

- उर्वरित महाराष्ट्रातील १८८ (२७%) तर विदर्भातील १८ (८%) लोकांना कैकाडी समाजाचे असल्यामुळे काही कारणास्तव गावातील किंवा इतर समाजातील लोकांनी मारहाण / शिवीगाळ केली आहे
  **यावरून असे निदर्शनास येते कि, विदर्भापेक्षा उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाजाला अस्पृश्यतेचा जास्त त्रास झाला आहे.तरीहि उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाज अनुसूचित जातीत समाविष्ट नसून विमुक्त जातीत समाविष्ट आहे.**

- उर्वरित महाराष्ट्रातील १४६ (२१%) कैकाडी समाजातील लोकांना सार्वजनिक मंदिरामध्ये प्रवेश नाही. १% समाजातील लोकांना कधी कधी रोखले जाते. **उर्वरित महाराष्ट्रातील १४६ कैकाडी बांधवांना सार्वजनिक मंदिरात प्रवेश नाही.याउलट विदर्भात फक्त एका व्यक्तीने प्रवेश नसल्याचे सांगितले आहे.यावरून उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी बांधवांना अस्पृश्यतेचा अनुभव येत आहे असे आढळून येते.**

- उर्वरित महाराष्ट्रातील ३६८ (५२%) तर विदर्भातील ५६ (२३%) कैकाडी समाजास जातीच्या उतरंडीमध्ये कनिष्ठतेचा दर्जा देऊन अन्याय झाला आहे. **विदर्भातील कैकाडी लोकांपेक्षा उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी लोकांना जातीच्या उतरंडीमध्ये कनिष्ठतेचा दर्जा देऊन अन्याय झाला आहे.**

- उर्वरित महाराष्ट्रातील ४८५ (६९%) विदर्भातील १७९ (७५%) कैकाडी समाजातील लोकांना तुम्हाला गावामध्ये प्रवेश आहे. तर उर्वरित महाराष्ट्रातील ५६ (८%) कैकाडी लोकांना गावामध्ये प्रवेश नाही. **यावरून कैकाडी बांधवांना गावात प्रवेश असल्याची आकडेवारी विदर्भात उर्वरित महाराष्ट्रापेक्षा जास्त असल्याची आढळून येत आहे.**

## ❖ कैकाडी समाजातील महिलांची स्थिती

- उर्वरित महाराष्ट्रामध्ये कमवित्या महिलांची संख्या ५०८ (७२%) आहे तर विदर्भामध्ये कमवित्या महिलांची संख्या १३३ (५६%) आहे.

- उर्वरित महाराष्ट्रामध्ये ५४ (१०%) महिला मुख्य कमवती स्त्री म्हणुन काम करतात. ४१५ (८२%) महिला घरास आर्थिक मदत म्हणुन काम करतात तर २३ (५%) महिला मुख्य कमावती स्त्री म्हणुन

व घरास आर्थिक मदत म्हणुन दोन्ही कारणास्तव काम करतात. विदर्भामध्ये २३ (१७%) महिला मुख्य कमवती स्त्री म्हणुन काम करतात. १०५ (७९%) महिला घरास आर्थिक मदत म्हणुन काम करतात.

- उर्वरित महाराष्ट्रातील ४४७ (६४%) महिला तर विदर्भातील ७८ (३३%) महिला अर्थाजनाकरिता अंग मेहनत किंवा श्रमाचे काम करतात .

- उर्वरित महाराष्ट्रातील २२५ (३६%) कैकाडी समाजाच्या कुटूंबात घराची मालकी अथवा शेत जमीन यावर महिलांचे नाव दिले जाते .तर विदर्भातील त्याचे प्रमाण १२८ (५४%) एवढे आहे . उर्वरित महाराष्ट्रातील ४०४ (५८%) तर विदर्भातील ७२ (३०%) कुटूंबात घराची मालकी अथवा शेत जमीन यावर महिलांचे नाव दिले जात नाही.

- उर्वरित महाराष्ट्रातील २२६ (३२%) विदर्भातील ५१ (२२%) कैकाडी समाजातील कुटूंबातील महिलांचे पहिल्या प्रसूतीच्या वेळी वय १८ वर्षापेक्षा कमी होते.

- उर्वरित महाराष्ट्रातील २६० (३७%) तर विदर्भातील ९२ (३९%) महिलांचे बाळंतपण घरीच झालेले आहे.

- २० (३%) उर्वरित महाराष्ट्रातील तर ३ (१%) विदर्भातील कैकाडी समाजातील महिलांचा प्रसूती दरम्यान मृत्यु झाला आहे.

- उर्वरित महाराष्ट्रातील ५१७ (७४%) विदर्भातील २०० (८४%) कैकाडी समाजातील कुटूंबात घरातील निर्णय प्रक्रियेत महिलांच्या विचारांना प्राधान्य/मत घेतले जाते. उर्वरित महाराष्ट्रातील १५७ (२२%) तर विदर्भातील ३२ (१३%) कैकाडी समाजातील कुटूंबात घरातील निर्णय प्रक्रियेत महिलांच्या विचारांना प्राधान्य/मत घेतले जात नाही.

- उर्वरित महाराष्ट्रातील ३३९ (५७%) तर विदर्भामध्ये १९९ (८४%) कैकाडी समाजातील महिलांना कुटूंबामध्ये समान वागणूक देतात .१६३ (२३%) तर विदर्भामध्ये २० (८%) महिलांना कुटूंबामध्ये मिश्र वागणुक मिळते. १३३ (१९%) तर विदर्भामध्ये १६ (७%) महिलांना दुय्यम प्रकारे वागणुक मिळते.

### ☯ **<u>कैकाडी समाजातील अंधश्रद्धा</u>**

- उर्वरित महाराष्ट्रातील ४६० (६६%) व विदर्भातील १९९ (८४%) कैकाडी समाजातील कुटूंबामध्ये कुंडली पाहतात.

- उर्वरित महाराष्ट्रातील ३४५ (४९%) तर विदर्भातील ८१ (३४%) कैकाडी समाजातील कुटूंबामध्ये महत्वाच्या कामासाठी जाताना मुहूर्त पाहिला जातो.

- ६५० (९३%) उर्वरित महाराष्ट्रातील तर २१७ (९१%) विदर्भातील कैकाडी समाजात देव-देवतेला पशु बळी देतात.

- उर्वरित महाराष्ट्रातील ३७५ (५३%) व विदर्भातील १०० (४२%) कैकाडी समाजातील लोकांचा पुनर्जन्म आणि शकुन अपशकून यावर विश्वास आहे.

- उर्वरित महाराष्ट्रातील ४९८ (७१%) विदर्भामध्ये १२७ (५३%) कैकाडी समाजातील कुटूंबामध्ये महिलांना मासिक पाळीच्या दिवसांमध्ये बाजुला बसविले जाते.

- उर्वरित महाराष्ट्रामध्ये १० (१%) तर विदर्भामध्ये २ (१%) कुटूंबामध्ये नवस फेडण्यासाठी मुरळी/देवदासी सोडणे अशा घटना घडल्या आहेत.

# प्रकरण सातवे
# निष्कर्ष व शिफारशी

# निष्कर्ष

- ❋ सर्वेक्षण करण्यात आलेल्या सर्व जिल्ह्यात कैकाडी समाजात अशिक्षित लोकांचे प्रमाण जास्त आहे. तसेच यामध्ये महिलांचे शिक्षणाचे प्रमाण पुरुषांपेक्षा अत्यंत कमी आहे.
- ❋ आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे शिक्षण अर्धवट सोडण्याचे प्रमाण विदर्भापेक्षा उर्वरित महारष्ट्रात जास्त आहे.
- ❋ कैकाडी समाजाच्या सर्वेक्षणात असे दिसुन येते की, कैकाडी समाजात बालविवाहाचे प्रमाण जास्त आहे.
- ❋ विदर्भाप्रमाने उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाजाचा वराहपालन हा मुख्य व्यवसाय आहे.तसेच कैकाडी समाजात अजूनही पारंपरिक व्यवसाय बाबुकाम करणाऱ्याचे प्रमाण जास्त आहे.
- ❋ फक्त १००० रुपये पर्यंत मासिक उत्पन्न असल्याचे प्रमाण उर्वरित महाराष्टात ११% तर विदर्भात २६ % आढळून येत आहे.उर्वरित महाराष्टातील ५६% कैकाडी समाजाचे मासिक उत्पन्न हे फक्त १००१ ते ५०००रुपये च्या दरम्यान आहे.तर विदर्भात याचे प्रमाण ४४ % आहे. यावरून त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याचे आढळून येते.
- ❋ दोन्ही विभागातील लोकांनी विदर्भातील कैकाडी समाज व उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाज एकच असल्याची माहिती दिली आहे.
- ❋ उर्वरित महाराष्ट्रातील १६% कैकाडी समाजातील लोकांची जातीची नोंद चुकीची लागलेली आहे.
- ❋ उर्वरित महाराष्ट्रातील ५२% कुटुंबे हि स्थलांतरीत कुटुंबे आहेत. विदर्भात स्थलांतरित कुटुंबाचे प्रमाण कमी आहे.
- ❋ उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाजाकडे इतर समाजाचा बघण्याचा दृष्टीकोन ४४% भेदभावाचा आहे.तर विदर्भात याचे प्रमाण फक्त १५% आहे.विदर्भापेक्षा उर्वरित महाराष्ट्रात भेदभावाचे प्रमाण जास्त आढळून येत आहे.
- ❋ कैकाडी समाजाच्या समारंभात इतर समाजाचे लोक सहभागी होण्याचे प्रमाण विदर्भापेक्षा उर्वरित महाराष्ट्रात तुलनेने कमी आहे.
- ❋ इतर जातीच्या स्वयंपाक घरात प्रवेश असण्याचे प्रमाण विदर्भापेक्षा उर्वरित महाराष्ट्रात तुलनेने कमी आहे.

- ❈ उर्वरित महाराष्ट्रातील २९% कैकाडी समाजातील लोकांना शिक्षण घेत असताना अस्पृश्यतेचा अनुभव आला आहे.याउलट विदर्भात याचे खूप कमी आहे.
- ❈ उर्वरित महाराष्ट्रातील २७% कैकाडी लोकांना कैकाडी असल्यामुळे कोणत्याही कारणास्तव इतर समाजाकडून मारहाण शिवीगाळ करण्यात आली आहे .याउलट विदर्भात याचे प्रमाण अत्यल्प आहे. विदर्भापेक्षा उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाजाला अस्पृश्यतेचा जास्त त्रास झाला आहे.तरीहि उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाज अनुसूचित जातीत समाविष्ट नसून विमुक्त जातीत समाविष्ट आहे.
- ❈ अजूनही उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाजातील २१% लोकांना सार्वजनिक मंदिरात प्रवेश नाही. तर विदर्भातील सर्व कैकाडी समाजाला मंदिरात प्रवेश आहे.
- ❈ उर्वरित महाराष्टातील ५२% कैकाडी बांधवांना जातीच्या उतरंडीमध्ये कनिष्ठतेचा दर्जा देऊन अन्याय झाला आहे. यामध्ये त्यांना अस्पूश्यता,जातीवाचक शिवीगाळ,मारहाण ,पाणी भरण्यास मज्जाव करणे इत्यादी चा समावेश आहे.तर विदर्भात याचे प्रमाण २४% आहे.
- ❈ कैकाडी समाजातील स्त्रियांना अंगमेहनतीचे काम करावे लागते. जसे डाल्या टोपले विणणे, केरसुणी तयार करून विकणे इत्यादी.
- ❈ तसेच या समाजात अंधश्रद्धचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले.उ दा.या समाजात देवतेला पशू-बळी देण्याचे प्रमाण खूप जास्त प्रमाणात आहे. मासिक पाळीच्या वेळेस महिलांना बाजूला बसविण्याचे प्रमाण जास्त आहे.

## लक्ष्य गट चर्चेतून मिळालेले निष्कर्ष

- ❈ विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रामधील दोन्ही ठिकाणी राहणाऱ्या कैकाडी जातीमध्ये आडनावे, कुळ, वंश, उपजाती, बोलीभाषा, पारंपारिक व्यवसाय यामध्ये साम्य दिसून येते.
- ❈ विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रामधील दोन्ही ठिकाणी राहणाऱ्या कैकाडी जातीमध्ये सण-उत्सव, रूढी-परंपरा, विवाह पद्धती, जन्मविधी, मृत्युविधी, आहारपद्धती, कुलदेवता या मध्ये साम्य दिसून येते.
- ❈ कैकाडी समाजामध्ये त्यांच्या उपजातीनिहाय काही व्यवसाय वेगवेगळे दिसत असले तरी बांबू, निरगुडी, शिंदी च्या फोकापासून टोपल्या, कणगी, झाप बनविणे व त्यांची बाजारात विक्री

करणे, गाढवावरून माती वाहने किंवा गाढवपालन करणे आणि वराह (डुक्कर) पालन या व्यवसाय बाबतीत विदर्भातील अनुसूचित जातीमध्ये असणारा कैकाडी समाज आणि उर्वरित महाराष्ट्रातील विमुक्त जातीमध्ये असणारा कैकाडी समाजामध्ये समानता दिसून येते.

❋ विदर्भातील अनुसूचित जातीतील कैकाडी समाज आणि उर्वरित महाराष्ट्रातील विमुक्त जातीतील कैकाडी समाज एकच असल्याने त्यांच्यात पूर्वीपासून रोटी-बेटी व्यवहार होतात. त्यासंदर्भात विवाहनोंदणी प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहेत.

❋ पूर्वी कैकाडी समाज आपले कौटुंबिक, आर्थिक, विवाहविषयक प्रश्न जातपंचायतीमध्ये मांडत व या जातपंचायातीच्या माध्यमातून या प्रश्नांची सोडवणूक केली जात असे. सद्यस्थितीमध्ये कैकाडी समाजामध्ये  जातपंचायत व्यवस्था दिसून येत नाही.

❋ विदर्भातील कैकाडी समाज आणि महाराष्ट्रामधील इतर भागात राहणारा कैकाडी समाजाची आहारपद्धती समान असून विशेष करून डुकराचे मांस खाणे हि बाब दोन्ही भागात समान दिसून येते. डुक्कराचे मांस खातात या कारणामुळे इतर समाजाकडून अस्पृश्यतेची वागणूक मिळणे, सार्वजनिक ठिकाणी पाणी भरू न देणे, मंदिरात प्रवेशास मनाई करणे या बाबतीत  विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रात समान चित्र  असल्याचे दिसून येते.

❋ विदर्भातील कैकाडी समाज आणि उर्वरित महाराष्ट्रामधील कैकाडी समाजामध्ये लग्नविधी, मृत्युविधी अश्या प्रसंगी विधी करण्याकरिता ब्राम्हण येत नाही. समाजातील जेष्ठ व्यक्ती त्यांच्या अनुभवानुसार विधी पूर्ण करतात.

❋ विदर्भातील आणि उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी जातीतील लोकांची वस्ती सर्वसाधारणपणे मूळ गावाच्या बाहेर स्वतंत्र असलेली दिसून आली. कैकाडी वस्तीच्या शेजारी राहणारे लोक सुद्धा अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या अनुसूचित जातीतील असल्याचे दिसून आले.

❋ विदर्भातील कैकाडी समाज आणि महाराष्ट्रामधील इतर भागात राहणारा कैकाडी समाजाची फिरस्ती आई किंवा अम्मामरमताई, यल्लम्मा, खंडोबा या कुलदेवता समान असलेल्या लक्षगट चर्चेद्वारे दिसून आले.

❋ विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रातील कैकाडी समाजाची आर्थिक स्थिती हालाकीची असून बहुतांशी लोक दारिद्य रेषेखाली जीवन जगतात. त्यांचे राहणीमान हे सर्वसाधारण दिसून येते.

# *शिफारशी*

शासनाने दिलेल्या आदेशानुसार बार्टीमार्फत कैकाडी समाजाचा विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रातील जिल्ह्याचा तुलनात्मक अभ्यास करीत असताना अनेक संदर्भ साहित्यातून मानववंशशास्त्र दृष्टीकोनातून, लक्ष गट चर्चा आणि निरीक्षण त्याचप्रमाणे प्रत्यक्ष सर्वेक्षण करून माहिती संकलित करण्यात आलेली आहे .

सदर अभ्यासातून उर्वरित महाराष्ट्र आणि विदर्भामधील कैकाडी समाज यांचे राहणीमान, व्यवसाय, आडनावे, बोली भाषा त्यांचे देव देवता एकच असल्याचे निष्कर्ष समोर आले आहेत. तसेच त्यांच्यात रोटी बेटी व्यवहार देखील होत आहेत .

त्याचप्रमाणे अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट करण्यासाठी आवश्यक असणारे सर्व निर्देशांक दोन्ही प्रवर्गातील कैकाडी समाजामध्ये दिसून येतात. उदा.

- दोन्ही प्रवर्गातील कैकाडी समाजासोबत अस्पृश्यता पाळली जाते. विशेषतः विमुक्त जाती या प्रवर्गातील समाजासोबत आजही अस्पृश्यता पाळली जात आहे.
- दोन्ही प्रवर्गातील कैकाडी समाज यांच्यात रोटी बेटी व्यवहार होतात.
- दोन्ही प्रवर्गातील कैकाडी समाज सामाजिक. आर्थिक, शैक्षणिक दृष्ट्या अतिशय मागासलेले आहेत.
- दोन्ही प्रवर्गातील कैकाडी समाज हे अस्वच्छ काम करतात व डुकराचे पालन करतात व डुकराचे मांस खातात

या संशोधन अभ्यासाचे हे मुख्य निष्कर्ष आहेत .

# अहवालाच्या निष्कर्षामधून करण्यात आलेल्या शिफारशी

१. कैकाडी समाजाचे क्षेत्रीय बंधन उठवून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कैकाडी समाजास एकाच प्रवर्गामध्ये समावेश करावा. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दोन्ही प्रवर्गामध्ये असणारे कैकाडी समाज यांच्यात प्रवर्ग भिन्नता नसून त्यांच्या रोटी- बेटी व्यवहार होतात, त्यांना अस्पृश्यासम वागणूक मिळते, जाती भेद पाळले जातात, सामाजिक, आर्थिक शैक्षणिक मागासलेपणा कैकाडी समाजामध्ये जास्त प्रमाणात आहे. या मुद्यांच्या आधारे ***कैकाडी समाजाचे क्षेत्रबंधन उठवून विदर्भाप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये कैकाडी समाज अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट करणेबाबत हा अभ्यास अहवाल शिफारस करीत आहे .***

या मुख्य शिफारशिसोबत सोबत समाजाची पार्श्वभूमी पाहता खालील प्रमाणे इतर शिफारशी करण्यात येत आहे .

२. **मुलभूत सोयी सुविधांबाबत शिफारशी:**

कैकाडी समाज प्रामुख्याने शहरातलगत वसलेल्या वस्त्या किंवा झोपडपट्ट्यामध्ये वास्तव्यास असून कच्चे बांधकाम असलेल्या मातीची स्थानिक कुडाच्या भिंतीच्या घरांमध्ये राहतो,पत्र्याची घरे,पिण्याच्या पाण्याची व्यवस्था , सार्वजनिक शौचालय,पातळीवर शासनाने जरी वीज केलेल्या असल्या तरीही त्या अपुऱ्या असून उघडी गटारे,कचऱ्याचे ढीग आणि अस्वच्छतेमुळे घाणीचे साम्राज्य पसरलेले आजही दिसते. तसेच डुक्करांचे पालन देखील ते लगतच्या उकिरडयावर करत असल्यामुळे मुख्य लोकवस्ती पासून लांब किंवा काही अंतरावर त्यांचे वास्तव्य दिसून येते.

- सामाजिक न्याय विभाग महानगर पालिका आणि समाज कल्याण प्रशासनामार्फत,स्थानिक नेतृत्व यांनी पुढाकार घेऊन वस्त्यांचे पुनर्वसन करण्याकरिता योजना तयार करुन त्यांची अंमलबजावणी करावी. कैकाडी समाज केंद्रित क्षेत्रे आणि झोपडपट्ट्या विकसित करण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी .

- उर्वरित महाराष्ट्रामधील गावाबाहेर राहणारा विमुक्त जातीतील कैकाडी हा अनुसूचित जाती मध्ये नसल्यामुळे अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या वस्तींचा विकास ) दलित वस्ती सुधार योजना (या अंतर्गत देखील त्यांची वस्तींचा विकास होत नाही, यामुळे देखील या वस्त्या अविकसित असल्याचे दिसून येत आहे.त्यामुळे या समाजाला वैयक्तिक लक्ष केंद्रित करुन मार्गदर्शन करण्याबाबत उपक्रमांची आखणी करावी.
- वस्तीचा विकास होण्यासाठी रस्ते,वीज पुरवठा, पाणी पुरवठा, रस्त्यावरील प्रकाश व्यवस्था ,सार्वजनिक ठिकाणची स्वच्छाता अशा, सोयी उपलब्ध करुन देत असताना समाज मंदिरे,बगीच्या सारखी मनोरंजनाची ठिकाणे सुध्दा-बाग,मार्गदर्शन केंद्रे,वाचनालये,अंगणवाडया स्थापनेबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.
- शाळा,महाविद्यालये,सार्वजनिक सुविधा आणि रुग्णालयांसारख्या सोयी-सुविधांच्या ठिकाणी त्यांना प्रवेश सहज घेता येण्यासाठी मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. अशाने समाजामध्ये सकारात्मक परिणाम होऊन त्यांच्या सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा होईल.पायाभूत सुविधांच्या विकासाच्या अवस्थेत, महाराष्ट्र शासनातर्फे प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

### ३. शैक्षणिक क्षेत्रातील शिफारशी

ग्रामीण भागातील कैकाडी समाजा सोबत पाळली जाणारी अस्पृश्यता यामुळे शाळा गळतीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसत.शिक्षणाशिवाय हा समाज प्रगती करू शकणार नाही. त्यासाठी शैक्षणिक क्षेत्रामध्ये अंमलबजावणी करण्यायेग्य शिफारशी खालील प्रमाणे करण्यात येत आहेत.

**प्राथमिक ते उच्च माध्यमिक शिक्षण**

- पहिली ते दहावीचा या टप्प्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक गोडी निर्माण होण्यासाठी तसेच अधिकतम शाळा गळतीचे प्रमाण कमी करण्यास कैकाडी समाजातील सर्व विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाच्या शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी अर्थसहाय्य करण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

- दहावीच्या पुढे शिक्षणामध्ये तांत्रिक शिक्षण किंवा व्यावसायिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन आय.टी.आय. किंवा इतर व्यावसाय प्रशिक्षण माध्यमातून व्यावसाभिमुख शिक्षण देणेबाबत शासनाने उचित असा निर्णय घ्यावा जेणे करुन ते भविष्यात चांगला रोजगार मिळवू शकतील किंवा स्वत: नोकरी ,धंदा सुरु करू शकतील.
- कला व्यवस्थापन अशा मेडिकल विज्ञान शाखेसोबतच अभियांत्रिकी,वाणिज्य, विविध शाखांमधून पदवी ,पदव्युत्तर पदवी मिळविण्यासाठी शिष्युवृत्ती देणेबाबत शासनाने उचित असा निर्णय घ्यावा.
- शाळा किंवा महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रियेबाबत जनजागृती आणि शिक्षण विषयक मार्गदर्शन व सल्ला देणेकरीता कार्यशाळा आयोजित करून विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय, अभियांत्रिकी, माहिती व तंत्रज्ञान व तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रमाबाबत मार्गदर्शन तसेच शैक्षणिक क्षेत्रातील शिष्यवृत्ती व सवलती मिळवून देण्यासाठी विशेष मदत करण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.
- औपचारिक शिक्षणासोबत अनौपचारिक शिक्षणास प्राथमिक स्तरापासूनच सुरुवात करण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी जेणेकरून मुलांमधील इतर कला गुण कौशल्य विकास वृध्दिंगत होण्यास मदत होईल.
- वैद्यकीय अभियांत्रिकीय शिक्षणासाठी सेट किंवा नेट सारख्या प्रवेश परीक्षा किंवा विविधि शिष्यवृत्या मिळविण्यासाठी आवश्यक प्रवेश परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य किंवा मार्गदर्शन किंवा मोफत कोचिंग उपलब्ध करून देणेबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**४. आर्थिक क्षेत्रातील शिफारशी**

कैकाडी समाजातील अधिक तर लोक डाल्या किंवा टोपल्या विणणे,मजूर , केरसुणी बनविणे,म्हणून काम करतात. सफाई सारख्या अस्वच्छ कामामध्ये सफाई कामगार व बिगारी कामगार म्हणून काम करण्याचे प्रमाणदेखील जास्त आढळून आले आहे. कैकाडी समाजाला सन्मानाने करता येईल अशा प्रकारच्या नोकरी – धंद्यात आणण्यासाठी विविधि शिफारसी करण्यात आल्या आहेत.

- स्वयंरोजगार वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासन तसेच सी.एस.आर. अंतर्गत उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या कार्यक्रमांचे शहरी व ग्रामीण भागामध्ये योग्यरित्या अंमलबजावणी करण्याबाबत शासनान योग्य ती कार्यवाही करावी.
- तोप्ल्या किंवा डाला विणणे हा पारंपारिक  व्यवसाय आधुनिक जगामध्ये कालबाह्य ठरत असून त्यास जागतिक बाजारपेठेमध्ये मागणी कमी आहे. अशा पारंपारिक व्यवसायाला व कलेला जोपासण्यासाठी त्याला आधुनिकतेची जोड देणे आवश्यक आहे.
- खाजगी व शासकीय नोकरी च्या संधी कैकाडी समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी जनजागृती पर कार्यक्रम ,शिबिरे,कार्यशाळा,राबवून चांगल्या दर्जाच्या कामाच्या संधी उपलब्ध करवून देणेबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.
- पोलीस भरती संशोधन क्षेत्र कंपनीमध्ये होणारी कौशल्याधारित भरती ,सैन्य भरती ,व प्रशिक्षण केंद्रे सुरू मार्गदर्शन किमान बारावी किंवा पदवीचे शिक्षण पुर्ण झालेल्यांना उपजीविकेसाठी हि क्षेत्रे त्यांना उपलब्ध करण्याबाबत शासनाने उचित असा निर्णय घ्यावा.
- एम.पी.एस.सी. / यु.पी.एस.सी. स्पर्धा परीक्षा देण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण केंद्रांची स्थापना करुन किंवा अस्तित्वात असलेल्या संस्थांमध्ये विनामुल्य प्रवेश देणेबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी. जेणेकरुन कैकाडी समाजातील विद्यार्थी देखील शासकीय सेवेमध्ये आपले योगदान देवू शकतील.यामुळे समाजाची देखील प्रतिमा उंचाविण्यास मदत होईल.

**५. महिला सक्षमीकरण :**

- महिला सक्षमीकरणाकरिता शासन स्तरावर राबविण्यात येणारे स्वयंसहाय्यता बचत गट वस्त्यांमध्ये प्रभावीपणे राबविण्यासाठी (बचत गटाकरिता व महिलांना व्यवसाय उद्योग उभा करण्यासाठी कार्यशाळांचे आयोजन करण्यात ,विविध प्रशिक्षणाचा येउुन घरगुती व्यावसाय सुरु करण्याकरिता अल्प दरात कर्ज उपलब्ध करून देणेबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.
- शिक्षण स्वच्छता या सर्व बाबतीत राहणीमानाचा दर्जा, आरोग्य , महिलांचा दृष्टिकोन विकसित होण्याकरिता महिलांविषयक शासकीय योजना कायदे  याबाबत महिलांना माहिती देणेबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**६. सामाजिक बांधिलकी (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबीलिटी - सी.एस.आर.)**

आज बहुतांश कंपन्या अंतर्गत मराठी व इंग्लिश मिडीयम शाळांमधून डिजिटल (सी.एस.आर.) क्लास इ. स्वच्छता गृह,लर्निग-पिण्याचे शुध्द पाणी अशा अनेक गोष्टी उपलब्ध करून देण्याकरिता अनेक उपक्रम राबवीत आहेत.तसेच मोफत आरोग्य सेवा,पर्यावरण पूरक उपक्रम,शैक्षणिक विकासासाठी आर्थिक सहाय्य,स्वच्छता मोहीम,वृक्ष लागवड व जोपासना , उद्यान असे प्रकल्प राबवीत आहेत.

- सी.एस.आर. उपक्रम राबविणाऱ्या विविध कंपन्यांशी करार करून पुढील पाच ते दहा वर्षासाठी कैकाडी समाजाचे वास्तव्य मोठ्या प्रमाणात असलेल्या भागामध्ये विविध सोयी सुविधा पुरविण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**७. सामाजिक संस्था सहभाग :**

सामाजिक संस्थामध्ये शास्त्रीय पद्धतींचा वापर करून समाज विकासाकरिता अनेक स्तरावर त्यांच्याकडून कृती आराखडा तयार करण्यात येत असतो.विविध क्षेत्रातील काम करणाऱ्या सामाजिक संस्थांना कैकाडी समाजाची लक्ष केंद्रित वस्त्यांची पाहणी करून विकास आराखडे व कृती आराखडे सादर करण्याचे आव्हान करून ते राबविण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**८. अस्पृश्यता निवारण :**

शासनामार्फत तसेच अनेक समाज कार्य करणाऱ्या संस्थांमार्फत अंधश्रद्धा ,व्यसनाधीनता, गुन्हेगारी ,हिंसाचार इत्यादी विषयावर जाणीवजागृतीपर कार्यक्रम घेताना दिसत आहे. परंतु अस्पुश्यता हि समजाला लागलेली कीड कालबाह्य झालेली असून या विषयाकडे म्हणावे तितके गांभीर्याने पाहिले जात नाही. परंतु आजही हि समस्या अनेक भागांमध्ये असून त्याचे समूळ उच्चाटन करून माणसाला माणसासारखे जगता यावे यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे हि आजची गरज आहे .

# संदर्भ सूची (*Bibliography*)


१) के.एस.सिंग – "Anthropological Survey Of India" १९९४

२) के.एस.सिंग - द पिपल ऑफ इंडिया

३) मराठी विश्वकोष :- विभाग अकरावा : काव्य – खतें

४) बाय आर. व्ही. रसेल ॲण्ड हिरालाल- द ट्राईब्स ॲण्ड कास्ट द सेंट्रल प्राव्हिन्सेसे ऑफ इंडिया

५) बापट अहवाल राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांचा अहवाल क्र. १८/ जुलै २००६

६) लक्ष्मण माने - उपरा कांदबरी

७) डॉ. एस.जी.देवगावकर - महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती पान न.१८८ ते १९०.

८) लक्ष्मण माने - महाराष्ट्रातील विमुक्त जाती एक चिकित्सक अभ्यास

९) त्रिंबक नारायण अत्रे –गावगाडा

१०) श्री. सरवदे अशोक शिवाजी –"बीड जिल्ह्यातील अनुसूचित जातीचे आर्थिक व सामाजिक अध्ययन " शोधप्रबंध http://hd१.handle.net/१०६०३/१३७२७

११) जाधव अ.पी.- Socio economic aspects and communication networks-A study of Kaikadi caste.

१२) महाराष्ट्रीय ज्ञानकोश" खंड १४ पृ क्र. २१४ ते २१५

१३) मांग – महार संबंध प्रा.बी.सी.सोमवंशी, पृष्ठ ९,१९८९

१४) Caste and philosophy in per Buddist India by Dr.B.R. Kamble, ParimalPrakashan, Aurangabad, १९७९ P. No १० to १५ Ibid p.No.१४

१५) Hindu culture & caste system, in India " by sunderialsagar, Uppal Book store Delhi: १९७५ P. No. ११

१६) Caste in India" by J.H. Hutton oxford university press Bombay, १९६३ P,४७

१७) भारतीय संस्कृती कोश" संपादक प. महादेव शास्त्री जोशी, खंड ३ पृ. क्र. ५८३

१८)	वैदिक संस्कृतीचा विकास"ले.डॉ. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई आवृत्ती दुसरी १९७२ पृ .क्र. २४७

१९)	भारतातील जाती ले. बी. आर.आंबेडकर अनुवादक प्रा. मा. फ. गजरे पृ. क्र. ६

२०)	कर्वे, इरावती — तत्रैवपृ.क्र. २५.